म. ग्रं सं ठाणे.
विषय प्रवास
सं क्र. ६५७

गे

— व्यंकटेश माडगुळकर

REFBK-0024220



म. ग्र. सं. ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# जंगलांतील दिवस

६४९
28220
25/7/84

व्यंकटेश माडगूळकर

REFBK-0024220

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

पहिली आवृत्ती
फेब्रुवारी १९८४

© व्यंकटेश माडगूळकर,
प्लेझंट अपार्टमेंटस्, भांडारकर रोड,
अभ्यंकर गल्ली, पुणे–४११ ००४.

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.

मुद्रक :
अशोक केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

किंमत ३५ रुपये

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | काझिरंगा आणि मानस | १ |
| २ | कांचनमृग | ४० |
| ३ | नवेगाव बांध : पाऊलखुणा | ५२ |
| ४ | भरतपूर | ६७ |
| ५ | राजस्थानचं वाळवंट | ७५ |
| ६ | शेल्लरच्या अभ्यासिकेत | ९३ |
| ७ | खजुराहोची शिल्पकला | १०३ |
| ८ | शोध | १०९ |
| ९ | मगर आणि वानर | १२१ |
| १० | काळवीट पाहायला रेहेकुरीला | १३२ |
| ११ | पेरियार | १३९ |

## जंगलात शिरण्यापूर्वी

मी माणदेशातल्या लहानशा खेड्यात जन्मलो आणि तिथेच वाढलो. पावसाने भिजलेली काळी शेते, ओढ्या-ओघळींचे थंडगार हिरवे काठ, विस्तृत माळराने आणि काटवने, टेकड्या, खडी आणि ताली ह्यांतून हिंडता फिरता मी कळता झालो. रामोशी, फासेपारधी, धनगर, वैदू, अशा रानोमाळ हिंडणाऱ्या जातिजमातींची पोरे हे माझे खेळगडी होते. शेवाळाखाली दडलेले मासे हाताच्या पंज्यांखाली मी धरले, होल्याची पोरे घरी आणून ठेवली, काटवनातले पांढरे रानउंदीर पकडले आणि मुरमुटीच्या खोडावरचे सोनकिडे पाळले.

सरूड, फरूड, घोरपडी, सापसुरळीसारखे सरपटणारे प्राणी, चितूर, भुरगुंज्या, भोरड्या, पकुर्ड्या, काड्याकरकोचा, धनचिडी, पोरेबाळवणी ह्यांसारखी पाखरे, झिंगे, डोकरा, मरळ, वांबसारखे मासे आणि खेकडा, विरोळा, पाननिवळी ह्यासारखे जलचर, माळठिसकी, लांडगा, खोकड, मुगूस, खारी यासारखे प्राणी ही मंडळी मला किती लहान वयात भेटली. त्यांच्या मागे आणि पुढे धावता पळता माझ्या पायांत बळ आले. पोटऱ्या भरल्या आणि मांडीचे पट फिरले.

पोरवयातले माझे खाणे आठवले, तर अजून चळकन् तोंडाला पाणी सुटते. माणदेशातल्या रानातला सगळा मेवा, रानातल्या पाखरा-प्राण्या-कीटकासाठी जसा होता, तसा माझ्यासाठीही होता. निवडुंगाच्या हिरव्यागार फणीला आलेली तांबडीभडक बोंडे, कुसळे झाडून मी खाल्ली, गोंदणीची उंच झाडे वेंगून, माणकासारखी लालचुटूक, मधाळ गोंदणे खाऊन तोंड चिकट

काढून घेतले. रानबोरे, लेंडी जांभळे, उंबरे, टेंबरे, कवठे, वेलफळे ही फळे एकीकडे पाखरे, माकडे, खारी खात असत आणि दुसरीकडे मी खात असे. हे खाणे राहू द्या, पण चिंचेचा मोहर, जोंधळ्याच्या ताटावर पडलेली साखर, बाभळीचा डिंक, पिकलेल्या निंबोळ्या, कागुण्या, शेंदण्या, निळुंब्या, अळुंब्या, नेपतीची फळे हेही माझ्या नजरेतून सुटत नसे. आता, रानातल्या पाखराचा, जनावरांचा, कीटकाचा हा मेवा माणसाचे पोर खात राहिले, तर त्याचा निसर्गाशी जिव्हाळ्याचा संबंध का नाही राहणार ?

माझ्या या भ्रमतीत नाना पाखरे, नाना प्राणी, मला आपसूक भेटले, जेवणाच्या पक्तीत नव्या ओळखी होतात, तशा त्यांच्याशी झाल्या. कोणी न सांगता सवरता, कोणी न शिकवता-पढवता मला बरेच कळू लागले. निसर्गाच्या ह्या विशाल ग्रंथातली चार अक्षरे मला ओळखता येऊ लागली.

मी कळता झालो आणि माझ्या गावातून उडालो. पोटापाण्यासाठी करकोचेही सकाळी उडून दूर जातात. पण संध्याकाळी आपल्या ठरावीक झाडावर छावणीसाठी पुन्हा परत येतात. मला ते जमले नाही. मी शहरात आलो आणि तिथेच राहिलो.

माझ्या मुलांचा विचार मनात आला, की मला फार खिन्न वाटते. ती धावपळीत वाढताहेत. शांत, उल्हसित, निरागस निसर्गापासून ती कितीतरी दूर आहेत. त्याना काही माहीत नाही. ही मुले मोठी झाली, म्हणजे त्यांचा फुरसतीचा वेळ कसा आनंदात घालवतील ? मला लहानपणी जी निसर्गाची मांडी जोजवत होती, ती त्याना नाहीच मिळाली. ही मुले हॉस्पिटलमध्ये जन्मली, डब्यातले दूध पिऊन वाढली, सिमेंट-लोखंडाच्या खोल्यात लहानाची मोठी झाली, बसमधून हिंडली, पाखरांऐवजी 'विविधभारती'ची गाणी त्यानी ऐकली. वन्य प्राणी पाहिले, ते सर्कशीतल्या पिंजऱ्यात किंवा टी. व्ही. सेटवर त्यांना काहीच मिळाले नाही. मिळणारही नाही.

मी शहरी वातावरणात राहू लागलो, त्याला आता चाळीस वर्षे होत आली, तरीही माझे मन रानावनांतच रमते. मी तसा छांदिष्टच माणूस आहे, जनलोकांतून थोडे बाजूलाच असावे, काही नाद लावून घ्यावा आणि त्याचा पाठपुरावा करीत राहावे, यात मला विशेष आनंद वाटतो. रानावनांतील या अद्‌भुत जगाविषयी अपार कुतूहल असल्यामुळे अलिकडची काही वर्षे माझे वाचनही जास्ती करून प्रवास, निसर्ग, राने-वने, पशुपक्षी, कीटक यांच्याविषयी लिहिलेल्या पुस्तकांचेच असते. जॉर्ज शेल्लर, जेन गुडाल, हेन्री डेव्हिड थोरो, सारा हार्डी डग्लस हॅमिल्टन, गाविन मॅक्सवेल, रिचर्ड बर्टन, मनु, कौटिल्य, कबीर, तुकाराम यांचं मी फार देणं लागतो. संस्कृत ग्रंथ मूळ भाषेतून वाचता येत नाहीत, याचे, एखाद्या अपंगाला वाटावे, इतके मला वाईट वाटते. ज्या कुणी जीवन मुळाकडे जाऊन पाहिले, त्यांचे अनुभव आपण वाचावेत, कुवतीनुसार समजावून घ्यावेत आणि हेतुपूर्वक जगावे, असे मला फार वाटते.

आपल्या जीवनाला फुरसतीचा एक भरजरी, लांबलचक पदर असावा, असे मनापासून वाटत असले, तरी चरितार्थ चालविण्यासाठी कामधंदा करण्यातच आपण फार खर्ची पडतो. आवडीचे, पण चरितार्थ साधेल, असे नसलेले आपण बाजूला टाकतो किंवा पुढे कधी तरी करू, म्हणून पुढे ढकलतो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत धावपळ चाललेली असते. सारखी गती. गती. रिक्षातून, बसमधून, रेल्वेतून, विमानातून धावायचे. सगळे जीवन या यांत्रिक गतीने व्यापून टाकले आहे. कधी अंगावर चांदणे पडत नाही. कधी झाडाच्या पानांची सळसळ ऐकू येत नाही. कधी ओढ्यात अंघोळ होत नाही. कधी उताणे झोपून चांदण्यांनी गच्च भरलेले आकाश पाहता येत नाही.

ह्या रोजच्या धावपळीतून एखादी झुकांडी मारून चौऱ्याहत्तर

सालापासून चौऱ्याऐंशी सालापर्यंतच्या दहा वर्षांत मी कुठे कुठे हिंडलो आणि मला काय काय दिसले, काय काय जाणवले, ते मी निरनिराळ्या नियतकालिकांमधून सांगत आलो. या साऱ्या निवेदनांचा हा संग्रह आहे. (यात कुठे द्विरुक्ती झाली असेल, तर वाचकांनी तेवढी मला सूट द्यावी.)

मला काही मृगपक्षी-शास्त्रवेत्ता व्हायचे नाही किंवा वनशास्त्र अभ्यासायचे नाही. पण रानावनातील या अद्भुत जगाविषयीचे माझ्या छांदिष्ट मनात जे अनिवार आणि न संपणारे कुतूहल आहे, त्यामागे लागून नित्यासाठी वनवासी व्हावे, असे माझ्या हल्ली फार मनात येते.

जंगलांतील दिवसांच्या या कहाण्या वाचून वाचकांपैकी कुणा चार जणांना बुद्धी झाली आणि आपल्या कृत्रिम जगातून बाहेर पडून निसर्गाची भव्यता, श्रीमंती आणि सौंदर्य याचा त्यांनी आनंद घेतला, तर बरेच आहे.

व्यंकटेश माडगूळकर

६९
दा. क्र. २७२२०
दिनांक २५।७।०२

# काझिरंगा आणि मानस

एका सुप्रभाती माझ्या मनात आलं, की आपण आसाममधील काझिरंगा अभयारण्यात जावं, आणि तिथले चिलखती अंगाचे प्रचंड गेंडे बघावेत. गेंडेच का, तर त्याचं रूपच आदिम आहे. दलदलीच्या जंगलातला तो मूळ पुरुष वाटतो. तो कुणालाही भीत नाही. जन्मतःच कवच अंगावर घेऊन आलेला हा निर्भय योद्धा आहे. आणि तो जंगलात एकटा एकटा भटकतो. गोतावळ्यात राहणं, आणि नाना नात्यागोत्यांनी स्वतःला जखडून घेणं त्याला मान्य नाही. कुणा आसामी कवीनं म्हटलं आहे,'

'कुणाला भिऊ नकोस,
कशाची पर्वा करू नकोस,
मनसोक्त एकटा भटक,
एकशिंगी गेंड्यासारखा—'

मला काझिरंगाच्या दलदली रानावनांतून भटकायचं होतं. गेंडे बघायचे होते, मस्त रानरेडे बघायचे होते, नाचरी हरणं बघायची होती. अभयारण्यातून मुक्तपणे हिंडणारे हे पशुपक्षी बघून हरखायचं होतं. माणूस देवपुत्र कसला, तो निसर्गपुत्रच आहे. चाळीच्या खुराड्यात राहून सुद्धा तो गॅलरीत दोन कुंड्या जोपासतो, आणि उशीच्या अभ्य्यावर पानंफुलं विणतो. उघडं आकाश, हिरवं रान, भरारणारे पक्षी आणि खळाळतं पाणी बघून आनंदत नाही, असा माणूस असेल का ? कवीसुद्धा कबुली देतो '

'हिरवळ आणिक पाणी,
तेथे सुचती मजला गाणी .'

तात्पर्य, मला काझिरंगाला जायचं होतं. ती तहान होती.

संकल्प आणि सिद्धी ह्यात किती अंतर असतं, हे मला आता चांगलं माहीत आहे, तरी पण मनात विचार येताच मी उमेदीनं कामाला लागलो. आसाम, आसामची जंगलं, झाडं,

फळं, फुलं, प्राणी, पाखरं ह्याविषयी जे जे मिळालं, ते ते वाचून काढलं. आसामचा भूगोल तपासला. ई. पी. गी, अर्जुनसिंग, कैलास संखला, सफडोफ यांची पुस्तकं उलथीपालथी केली आणि बेत नक्की केला. मुहूर्त निवडला.

ईश्वरकृपेनं सगळं जमत गेलं. रेडिओनं रजा दिली, खासदार जयंतराव टिळकांनी, आसामच्या वरिष्ठ अधिकाऱ्यासाठी ओळखपत्रं दिली, सेंट्रल बँकेनं (माझेच) पैसे दिले, 'ट्रेडविंग'नं विमानाचं तिकीट दिलं. बावीस नोव्हेंबरला संध्याकाळी पाच वीसला पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या आगगाडीनं शिट्टी दिली आणि मी निघालो.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे विमान होतं. त्या ब्राह्ममुहूर्तावर मुंबई सोडली आणि मधे कलकत्त्याला पाय लावून, दुपारी जबरदस्त उकाड्यात गौहत्तीला पोचलो.

उकाडा, हैराण करणारी गर्दी. मग, गंगाप्रसाद चौधरी ह्या प्रकाशक मित्राच्या जुन्या गाडीतून, ह्या ऑफिसातून त्या ऑफिसात चकरा. इकडे फोन, तिकडे ट्रंककॉल, तारा अशी धावपळ रात्री उशिरापर्यंत. नंतर ब्रह्मपुत्रेच्या तीरावरून चकरा. मग न आवडलेलं हॉटेलातलं जेवण आणि अस्वस्थ झोप. सकाळी सहा वाजता आसाम सरकारच्या पर्यटन खात्यानं दिलेल्या गाडीतून नॅशनल हायवे नं. ३७ वरून काझिरंगाकडे. दोनशे सतरा किलोमीटर्स, म्हणजे चार तासांचा रस्ता.

रस्त्याच्या दुतर्फा लांबच लांब पसरलेली हिरवीपिवळी भातशेतं, निळेजांभळे डोंगर, बळसे-वेलांच्या. पांढऱ्या-काळ्या आभाळाचं प्रतिबिंब दाखवीत पसरलेले निळे जलाशय. मासे झोळणारी उघडी वाघडी पोरं. झाडीतून डोकावणारी तांबड्या छपरांची घरं. हिरव्या शेतातून चरणाऱ्या गुरांचे रंगीत ठिपके. ढवळे ढवळे बगळे.

मधेच कुठं भातखाचरातल्या माशावर ध्यान ठेवून स्तब्ध बसलेला, पांढऱ्या चोचीचा, काळ्याबाळ्या रंगाचा लठ्ठ ढोक दिसे. तर कुठे माशासाठी थंडगार पाण्यात बुड्या घेऊन घेऊन भिजलेला पाणकावळा, दोन्ही पंख उघडून ते वाळवीत खडकावर बसून असे. एका ठिकाणी तर, रस्त्याच्या अगदी कडेला असलेल्या इनक्याच्या काठी, दहा-बारा पाणकावळ्यांचा जथा, पंख वाळवण्याचा कार्यक्रम सामुदायिकरीत्या पार पाडताना दिसला. मला चंद्रभागेचं कार्तिक मासातलं वाळवंट आठवलं.

रस्त्याकाठच्या पाण्यातून ठिकठिकाणी माशासाठी जाळी लावलेली दिसतात. त्या सगळ्या सुंदर पार्श्वभूमीवर उंच उंच बांबूंच्या काठ्या उभ्या आडव्या रोवून त्यांना झोळ्यासारखी अडकवलेली ही जाळी, म्हणजे कुशल ब्रशाच्या फटकाऱ्यानं काढलेली चित्रंच वाटत. जॉमेट्रिकल काम्पोझिशन्स्.

हळूहळू उन्हं तापू लागली. दोनशे सतरा किलोमीटर्स हे अंतर फार आहे, याची जाणीव झाली. माध्यान्ह काळ झाला. रस्त्यालगतच्या एका हॉटेलात जेवलो. प्रचंड मोठा भाताचा ढीग, तो पातळ करायला वाडगाभर आंबट वरण, आणि भला लांबलचक, जाडजूड असा

तळलेल्या माशाचा तुकडा. हिरव्या मिरच्या, इटालियन् लिंबाची मोडी फोड, कांदा असं जेवण पुढ्यात आलं, ते अर्धेअधिक संपवता संपवता माझी दमछाक झाली.
मग भरल्या पोटानं प्रवास. भूगोलात वर्णन वाचलं आणि चित्रं ( वाईट काढलेली ) बघितली, ते आसाममधील चहाचे मळे.
हे सगळं ठीक आहे, पण काझिरंगा कधी येणार ?

काझिरंगा.
ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातला, तीस मैल लांबीचा आणि बारा मैल रुंदीचा जंगलचा प्रदेश. मिकीर टेकड्यालगतचा. एकोणीसशेआठ सालपर्यंत, शिकाऱ्यांचं आणि शिकारचोरांचं हे नंदनवन होतं. त्या काळात गेंड्याची बेसुमार कत्तल झाली. शेवटी, जंगल अधिकाऱ्याच्या लक्षात आलं, की आता इथं फक्त डझन-दोन डझनच गेंडे उरले आहेत. तरी हे अभयारण्य व्हायला चाळीस साल उजाडलं.
तोपर्यंत, तळ्या-दलदलीच्या काठांवर, छावण्या ठोकून शिकारचोर राजरोस गेंडे मारत होते, आणि त्याची शिंगं भरमसाट किमतीला विकत होते. लोक ती घेत होते. का, तर शिंगाचं चूर्ण पोटात घेतलं, तर नष्ट झालेलं पौरुषत्व पुन्हा प्राप्त होतं, अशी समजूत. पुरुष म्हणवून घेण्यासाठी माणूस काय खाईल, याचा नेम नाही. विशेषकरून चिनी गिऱ्हाईक ह्या मालाला फार होतं, म्हणे.
त्यावेळी नव्यानं फॉरेस्ट ऑफिसर म्हणून नेमणूक झालेला एक अधिकारी लिहितो, की ' जागोजाग मला तळ ठोकून राहिलेले शिकारचोर आढळले. त्यांनी मारलेल्या गेंड्याचे एकूण चाळीस सांगाडे मी मोजले. त्याची शिंगे मात्र काढून नेली होती.

काझिरंगाला पोचलो, तेव्हा दोन वाजले होते.
फॉरेस्ट बंगला उत्तम जागी होता. कोणा रसिक साहेबबहाद्दुरानं तो प्रशस्त आणि कलापूर्ण असा बांधून ठेवला होता. सरकारी पाहुणा असल्यामुळं मला वरच्या मजल्यावरची खास जागा मिळाली. सगळं झकमक होतं. खोल्या एअरकंडिशन्ड होत्या. फोन, गाद्यागिरद्या, गालिचे, पडदे, गीझर, टब-अगदी फाइव्हस्टार हॉटेल ! म्हटले, चला, जंगलमें मंगल.
सेवेसाठी बेअरर अदबीनं दाराबाहेर उभे.
शॉवर सोडून मी मनमुराद आंघोळ केली आणि अर्ध्या तासात ताजातवाना होऊन, गळ्यात दुर्बीण अडकवून खाली उतरलो. जिना उतरताना लक्ष गेलं, शिल्पं मांडावीत, तसे गेंड्याच्या आणि हत्तीच्या हाडांचे सांगाडे जिन्याच्या कोपऱ्याकोपऱ्यावर ठेवले होते. इथं गेंड्याचं तोंड, तिथं हत्तीचं तोंड, तर त्या तिकडं प्रचंड शिंगाच्या रेड्याचं तोंड. इंटीरिअर डेकोरेशनची ही कल्पना मला फार अभिनव वाटली. केव्हा ना केव्हा ह्या

अफाट जंगलात एखादा रेडा, हत्ती, गेंडा आपल्या मरणान मरणारच. तरस, कोल्हे, घारी, गिधाडं त्याच्यावर पडणारच आणि उन्हावाऱ्यानं, पावसापाण्यानं हे सांगाडे स्वच्छ, साफ होणारच. त्यातला उत्तम असा आकारसुंदर भाग उचलून आणून कोणा सौंदर्यदृष्टी असलेल्या जंगल अधिकाऱ्यान ही सजावट केली असावी.

खाली उतरलो, तर लाऊंजमध्ये काझिरंगाचे जंगल अधिकारी येऊन वाट पाहत बसले होते. त्याचं नाव फार नाजूक आणि काव्यपूर्ण होतं. परिमल लहान. पण अंगापिंडानं ते चांगले बलदंड होते. ओठभर मिशा होत्या. वयानंही चांगले तरुण होते.

इकडच तिकडच बोलून झाल्यावर ते म्हणाले,

" काही गेंडे नॅचरल डेथनं मरतात. प्रत्येक वर्षी आम्ही त्यांच्या शिंगाचा लिलाव करतो. किलोला पंधरा हजार रुपयापर्यंत भाव येतो. चौऱ्याहत्तर साली तीन गेंडे मेले; आणि एक शिंगाचं वजन किलोभर असतंय ! "

" पण, प्रत्येक वर्षी गेंडे मरतात ? "

" मरतात, मारलेही जातात. दरवर्षी काही गेंडे लोक मारतात आणि गेंड्याकडून काही लोक मारले जातात. "

फॉरेस्ट बंगल्याच्या आवारात एखादा मानवी सांगाडा दिसेल, अशी माझी अपेक्षा होती, पण नव्हता.

काझिरंगा हिंडून बघायचं, ते हत्तीच्या पाठीवरून. ह्या फेरीत एखादा तरी प्रसंग असा येतो, की चवताळलेला गेंडा हत्तीवर चाल करून येतो. खरं तर हत्ती हा केवढा प्रचंड प्राणी; पण सारासार विचार हा गेंड्याच्या बाबतीत संभवत नाही. वाघसुद्धा कधी गेंड्याच्या वाटेला जात नाही. हत्ती आणि वाघ दोघंही गेंड्याचा मान राखून असतात. म्हणजे जंगलातला सर्वश्रेष्ठ योद्धा गेंडाच मानला पाहिजे

अठराशेऐंशी सालची एक हकीकत शिकाऱ्यान लिहून ठेवली आहे एका गेंड्यावर त्यानं डझनभर वार टाकले, तरीही तो गेला. संध्याकाळ झाली होती, म्हणून माग न काढता हा शिकारी परत गेला आणि सकाळी पुन्हा माग काढू लागला, तर जखर जखमी झालेल्या गेंड्याचं रक्त ठिकठिकाणी आढळलं. ते बघत बघत मागे लागला. पण गेंडा मेलेला आढळला नाही. तो जखमी स्थितीतच दोन वाघाशी लढत देत होता. हा जखमी झाला आहे, पुरा करून खाऊ, ह्या हिशेबान जवळ गेलेल्या त्या दोघांही वाघाना गेंड्यान धडा शिकवला होता.

हा शिकारी लिहितो,

' एका वाघाची मान गेंड्यानं फाडली होती आणि दुसरा वाघही रक्तान माखलेला दिसत होता.' शिकाऱ्यान ह्या दोन्ही वाघावर वार घातले. त्यासरशी ते

पळाले. मग तो जखमी गेंडा शिकाऱ्यान मारला.
गेंडा चालून आला, म्हणजे बघणारे पाठीवर आहेत, याचं भान न ठेवता हत्ती तोंड फिरवून आणि शेपूट वर करून धूम ठोकतो. वर असलेल्या माणसांना झाडाच्या फांद्यांचे फटकारे खाऊन जायबंदी होण्याची पाळी येते.
मी मनात म्हणालो,
ईश्वरकृपेन असा काही प्रसंग आज येवो. सांगण्यासारखं तरी काही घडेल.

बंगल्यापासून अर्धा पाऊण मैल गाडीतूनच पण वाईट रस्त्यान जावं लागल. हा रस्ता नुकताच झाला होता. इथं हत्ती तयार होता आजूबाजूच विशाल हिरवं जगल, जागोजाग दिसणारी तळी, आणि पक्षिगण बघून मलाही गेंड्यासारखंच वाटल. निर्धोक, एकटं, बिनकाळजी—
पलीकडं, अगदी हात—दोन्ह्याच्या अंतरावर चार-सहा लहान हरणं चरत होती. कान टवकारून त्यानी काही वेळ अंदाज घेतला आणि काही धोका नाही, हे बघताच पुन्हा शेपूट लुटलुटत ती गवताचे शेंडे खुडू लागली.
हत्तीवर चढून स्वार होण्यासाठी लाकडी वॉच टॉवरच्या पहिल्या मजल्याचा उपयोग करून मी हत्तीवर बसलो. राजासारखं नाही, पण जैन साधूसारखं वाटल. मी, माहूत आणि गंगाप्रसाद.
बरोबर आलेला पर्यटन खात्याचा अधिकारी गाडीजवळ उभा होता. हात हलवून तो म्हणाला,
"गुड लक टु यू, सर!"
मी म्हणालो,
"ॲंड सेफ लॅंडिंग टू—"
—आणि हत्ती गवतात शिरला.

काझिरगाचा केवढा तरी विस्तीर्ण प्रदेश सभोवार दिसत होता. अजून गवत फार उंच नव्हत. रस्त्यावरून चाकोऱ्या जाव्यात, तसे हत्तीच्या जाण्यान पडलेल्या चार-दोन वाटा समोर दिसत होत्या.
झुलत झुलत हत्ती चालला होता. माहूत कपाळाला आडवा हात लावून चौफेर बघत होता. मी म्हणालो,
"बाबा, रे, टुरिस्टना जसा तू नेहमीच्या वाटेनं नेतोस आणि आणतोस, तसं करू नकोस. आपण थोडे आडरानातून भटकू या. मी फार लांबून आलोय्. मला सगळं नीट बघायच आहे. आपली ही फेरी उत्तम झाली, तर मी तुला चागलं बक्षीस देईन."
माझं राष्ट्रभाषेतल हे बोलणं, गंगाप्रसाद चौधरीन आसामीत त्याला सांगितल, त्यावर

चेहरा उजळवून माहूत म्हणाला,

" हां, साब, मालूम है. आप तो गेस्ट हैं मिनिष्टर साबके ! "

पुन्हा काही वेळ शांततेत गेला. नुसता हत्तीच्या पायाचा दल्दलीत होणारा आवाज, त्यानं ओरबाडलेल्या गवताचा आवाज. जंगलचा सुरेख वास सर्वत्र भरून राहिला होता. भिंग चमकावं, तशी जागोजाग पाण्याची डबकी चमकत होती. दुपारच्या उन्हात बगळे, ढोक, पाणकोंबड्या चोची पंखात घालून निवांत झाले होते.

तेवढ्यात समोर बोट करून माहूत कुजबुजला,

" साब, गेंडा ! "

मी टवकारून बघत राहिलो.

ह्या पूर्वी मी गेंडा पाहिला होता, पण तो म्हैसूरच्या झू मध्ये. हरणीसारखा मवाळ, काही खायला मिळेल, म्हणून मागतकऱ्यासारखा तोंड करून आपल्या दिशेन धावत येणारा. ओळखीचा पोलिस इन्स्पेक्टर घरगुती पायजमा-शर्टात बघितला, म्हणजे जसं चमत्कारिक वाटतं, तस मला वाटलं होतं. आता दिसणारा गेंडा स्वतःच्या घरात होता, भाड्याच्या नव्हे.

समोर, गवतात लहानस पाण्याच डबकं होत. त्याच्या कडेलाच भला मोठा खडक होता आणि त्यावर पांढराशुभ्र गायबगळा बसून होता.

हत्ती हळूहळू डबक्याजवळ गेला. अगदी दहा यार्डांवर, तसा बगळा कुरकुरत उडाला आणि तो खडक भसदिशी पाण्यातून वर झाला.

अरे, हाच तो, प्रचंड एकशिंगी भारतीय गेंडा. पाच फूट दहा इंच उंचीच प्रचंड धूड. नमोनमः ! नमोनमः ! !

धूड खाली टेकूनच महाराज उठले होते. पुढचे दोन्ही पाय तेवढे ताठ. कान टवकारलेले चेहऱ्यावर भाव असा

" का ? हाडं मोडून घ्यायची आहेत का ? "

हत्तीवर बसून कोणी आपल्याला बघायला आलं असेल, ही कल्पना काही त्याच्या डोक्यात येत नसावी. ती कुणाच जनावराना येत नाही, म्हणून तर कारवारच्या जंगलात आम्ही बैलगाडीतून हरण टिपू शकलो होतो. हत्ती आणखी पुढ झाला तसा, हा मोहरा करून उभा राहिला. चिखलान माखलेल वरच अंग वाळल होत, ते कुंभमेळ्यातल्या गोसाव्यासारखं दिसत होत आणि पाण्यातून नुकतच वर आलेलं अंग काळं, ओल चकचकीत. काही क्षण ताणलेली शांतता.

माझ्या अंगावर, नाही म्हटलं, तरी काटा.

गेंडा हे तसं वेडं जनावर आहे. मनात आल, तर मान खाली घालून सों सों चालून येणार.

—आणि हा काही जंगली हत्ती नव्हे. पाळलेल्या आईपोटी, पाळलेल्या बापाचा वारसा




घेऊन जन्मलेला आणि दिलेल्या रोट्या आणि गवताच्या पेंड्या खाऊन, बांधल्या जागी वाढलेला मवाळ हत्ती.

हा जर बुजून पळाला, तर ! झाडाच्या फांदीवर डोकं आपटून कपाळमोक्ष व्हायचा !

हत्ती थंड उभा होता. त्याचे कानसुद्धा हलत नव्हते. गेंडा डोकं फिरल्यासारखा बारीक डोळ्यांनी आणि टवकारल्या कानांनी रोखून बघत होता .

माझ्या मनात आलं,

हा आता चार्ज करणार.

मग भस्सदिशी तो पाण्यातून निथळत वर आला ..

—आणि चार पावलं टाकून, मोहरा करून, सामने उभा राहिला. घामावर लाल माती चिकटलेल्या एखाद्या मल्लासारखा–

माझ्या मनात हलगी घाईवर येऊन वाजत राहिली–




—आणि तू तू तू करून रणशिंग फुकलं गेलं !

हा आता धावत येऊन धडक मारणार, अशा पवित्र्यात उभ्या राहिलेल्या गेंड्याच्या मनात एकाएकी काय आलं, कोण जाणे. एक डोळा खंबीरपणे जागी रोवून उभ्या राहिलेल्या हत्तीवर ठेवून, कान तसेच टवकारलेले ठेवून, तो सावकाश उजव्या बाजूला वळला आणि मागून हल्ला होतोय्, का नाही, याचा अंदाज घेत घेत गवतात शिरला. पाठीमागूनही त्याचं रूप, काच्या कसलेल्या मल्लासारखंच दिसत होतं. माझी निराशा झाली.

इ. पी. गी. यानी लिहून ठेवलेली हकीकत मला आठवली. अगदी सुरुवातीला, म्हणजे तीस साली, हा साहेबमाणूस हत्तीवर बसून काझिरंगा अभयारण्यात हिंडला. हिंडून झाल्यावर व्हिजिटर्स बुकमध्ये त्यान नोंद केली :

" Twice charged by rhino, and the elephant each time bolted for some distance. "

पुढं काही महिन्यानी, त्याचे काही चहामळेवाले मित्र काझिरंगाला गेले. दरम्यान गेंड्यांना ठाऊक झालं होतं, की हत्ती असे अधूनमधून आपल्या दर्शनासाठी येतात, त्यानं डोकं बिघडवून घेण्यासारखं





काही नाही. अभयारण्याची प्रवेश–फी आणि हत्तीच भाड भरल्यानतर पावती खिशात टाकून ह्या मित्रांनी त्याच बुकात, मी याच्या नोंदीखाली नोंद केली .
" Rather disappointing, charged only by the Forest Department. "
फेरी संपल्यावर अशीच काहीशी नोंद मला करावी लागणार, अस माझ्या मनात आल. ( पण तसं घडल नाही. पुढं I was charged by both– the rhino and the Forest Department ! )

गवतात शिरून चाललेला गेंडा बराच वेळ दिसत राहिला. हत्ती बराच चालून गेला. आता गवत फार उंच होत. जवळ जवळ पंधरा फूट. हिरवंगार, आणि माथ्यावर काळपट करड्या रगाचे तुरे फुललेल. मधून, पुढच्या गवतात झाकलेले पाढरे शुभ्र बगळे भर्रकन् उडत आणि पुढं गेल, की पाण्यात उभा असा गेंडा दिसे. तेवढ्या फेरीत एकूण नऊ गेंडे मी मोजले. प्रत्यक वेळी ते एकएकटे होते. कुठ जोडी नव्हती, का आई आणि पोर नव्हत. आणि प्रत्येक वेळी पाहिलेला गेंडा पाण्याच्या डबक्यात होता, नाल्याच्या संथ पाण्यात डुबत होता, आसपास गायबगळे होते. एकदा एकाच्या पाठीवर काळा कोतवाल दिसला. काहींच्या पाठींवर मैना होत्या. सतत पाण्यात राहावं, एवढी काही उष्णता हवेत नव्हती, तरी हे सगळे गेंडे पाण्यात का उभे होते ?
नाना जातींच्या कीटकाचा त्याना ताप होत असावा, कारण आम्हाला पाठीवर घेऊन चाललेला हत्तीही गवताचा झाडू सोंडेत गोळा करून मारत्ता माश्या, डास वारीत होता. गेंड्याच्या कातडीला वळ्या, घड्या अनेक असतात, त्यातून शिरून त्याच रक्त पिणारे गोचीड, गोमाश्यासारखे प्राणी त्याला सतावून सोडत असावेत. म्हणूनच बगळे, मैना आणि कोतवाल सारखे त्याच्या अंगाभोवती होते आणि कीटकाचा जाच टाळण्यासाठीच हे सगळे गेंडे पाण्यात शिरत असावेत.

काझिरगाच्या वाटेन येताना, आणि अभयारण्यात फिरताना, अरेरे म्हणावं, अशी एकच दुष्ट वनस्पती मला सर्वत्र वाढलेली दिसली. वॉटर हायसिंथ. जिथं जिथं पाणी होतं, तिथ तिथं ही वनस्पती भयाण वाढलेली होती. (हिची वाढ इतक्या झपाट्यानं होते, म्हणे, की एखादा लहान तुकडा काही महिन्यात सहाशे चौरस यार्ड पसरतो.) साऊथ अमेरिकेतून कोणी तरी शोभेच झाड म्हणून हे बी, पन्नास साठ वर्षांपूर्वी भारतात आणलं आणि बघता बघता त्यानं आजच अक्राळ विक्राळ रूप धारण केलं. ह्याला कोणी तोंड लावत नाहीत. रानडुकर कधीमधी मुळ खातात.

शिकारचोराकडून गेंड्याची शिकार अजूनही होते. कारण नुसत्या शिंगाचाच व्यापार होत

नाही, गेंड्याच मात्र. कातडी ह्यानाही लोकांनी अनेक दैवी गुण चिकटवले आहेत. स्वित्झर्लंडमध्ये सशोधन होऊन सिद्ध झालेल आहे, की शिंगात काही औषधिगुण नाही, पण लोकाचा विश्वास आहे. हे शिंग अंथरुणाखाली ठेवलं, की बाळतपण सुखरूप होत. ह्या समजुतीपायी, ज्याच्यापाशी शिंग आहे, त्याला जबर भाड देऊन शिंग आणलं जात आणि अंथरुणाखाली ठेवलं जात.
शिंगाच्या कोरलेल्या प्याल्यात घेऊन कोणतही पेय बिनधोक प्यावं, त्यात कोणी दुष्टाव्यान विष मिसळलं असल, तर तात्काळ ह्या पेल्यात त्याला फेस दिसतो. ह्या समजुतीपायी अनेक राजे–रजवाडे असले पेले वापरीत. अजूनही असले पेले वस्तुसंग्रहाल्यातून पाह्यला मिळतात.

तेराशे एकोणनव्वद सालात तैमूरलगान अनेक गेंड्याची काश्मीरकडे शिकार केल्याची वर्णन आहेत.
सिंधू नदीच्या काठी, पंधराशे एकोणीस सालात आपण गेंड्याची शिकार केल्याची नोंद बाबरान केलेली आहे.
कोणी एका राजान त्याच सुमारास, पोर्तुगालच्या राजाला एक गेंडा, गोव्याहून जहाजात घालून पाठवला, असही इतिहास सांगतो. ह्या भागातले गेंडे हळू हळू नाहीसे झाले.

गेंड्याची नजर तीक्ष्ण नाही, धोक्यापासून दूर पळून जीव वाचवण्याऐवजी तो बेधडक त्याला सामोरा जातो. शिवाय नेहमी एकाच जागी विष्ठा टाकण्यासाठी जाण्याची त्याला सवय आहे. ह्या जागी जाताना सुद्धा तो, समोर डोळे ठेवून न जाता, पाठमोरा होऊन सरकत सरकत मागे जातो. ह्या त्याच्या सवयीचा फायदा घेऊन, शिकारचोर, त्याच्या विष्ठेच्या ठरावीक जागा हेरून, खड्डे खणतात, त्यावर फांद्या, पाला–पाचोळा पसरून टाकतात, आणि वेडा गेंडा नेमका ह्या खड्ड्यात पडून त्याच्या हाती लागतो.

ज्याला शिंग शिंग म्हणतात, ते बैलाच्या, हरणाच्या शिंगासारखं शिंगही नसतंच. केसासारखे ततू एकत्र घट्ट होऊन तयार झालेली ही एक प्रकारची वाढ असते. ते कवटीच्या हाडाशीही साधलेलं नसत, मांसातच असत. जोराचा दणका बसला, तर उखडून येत, रक्तस्राव होतो. पुन्हा काही काळान वर्षभरात नवी वाढ होते.

लोक आजारावर औषध म्हणून गेंड्याच्या कातड्याचे तुकडे अंगावर घालतात, त्याच शिंग पाण्यात टाकून ते पाणी रोज चमचा चमचा पितात. दमा आणि डांग्या खोकला बरा होतो, या समजुतीनं गेंड्याच मूत्र सुद्धा पितात. कलकत्त्याच्या प्राणिसंग्रहालयाला गेंड्याच मूत्र विकून दरवर्षी दहा एक हजार रुपये उत्पन्न मिळत !

असा हा मौल्यवान भारतीय गेंडा, काझिरंगा अभयारण्यात सांभाळला आहे, वाढवला आहे. जवळ जवळ सातशे गेंडे काझिरंगाच्या कुरणात आज नांदताहेत. पैकी नऊ तर मी प्रत्यक्ष डोळ्यांनं पाहिले.

लहान तांबडी हरणं जोडीजोडीनं गवतात बसून होती. हिरव्या गवतात पाय दुमडून बसलेली, मोठ्यामोठ्या कानाची ही हरणं इतक्या जवळून मी ह्यापूर्वी कधीच बघितली नव्हती.

एकदा तर अगदी जवळ काही फुटांवर हत्ती येईपर्यंत ती सावट घेत होती, मग 'कुक्' असा आवाज करून उठली आणि धूम पळाली. ही हॉगडिअर्स होती. काझिरंगाला त्यांची संख्या बरीच मोठी होती. वेगवेगळ्या जातींची पधराशे हरणं ह्या अरण्यात आहेत, असं फॉरेस्ट ऑफिसर म्हणाले. शिरगणती बहात्तर सालची होती. गेंडे सातशे, हत्ती चारशे बावीस, म्हशी आणि रेडे मिळून पाचशे पंचावन्न, रानडुकरं पाचशेबावीस, अस्वलं सहा, गवे अठरा, वाघ एकोणतीस.

जाता जाता, वरच्या उंच गवत पुन्हा लागलं. उसाच्या मळ्यातून जात जात आहोत, असं वाटलं. मधेच हत्ती थांबवून माहुतानं खाली बोट दाखवलं.

वाघाची अगदी ताजी पावलं चिखलात उमटली होती. कदाचित हरणाच्या कळपावर डोळा ठेवून तो इथंच कुठं, जवळपास बसून असावा.

समोरचं, आजूबाजूचं काही दिसत नव्हतं.

काळोखातून वाट काढीत जावं, तसा हत्ती जात होता. वाघाचा माग लागल्यामुळं आम्ही गप्प होतो.

एवढ्यात मोठ्यानं गुरगुराट झाला. आणि चढावरून मागं लोटला जावा, तसा हत्ती पाच-पंधरा पावलं सरसर मागं सरला. आम्ही हिंदकळलो, सावरून एकमेकांना घट्ट धरून बसलो. माहुतानं अंकुश लावून काही इशारा केला. हत्ती पुन्हा थोडा वेगानं पुढं सरला, पुन्हा गुरगुराट, पुन्हा हत्ती वेडावाकडा मागं गवतात सरला, बराच मागं. दिसत काहीच नव्हतं.

समोर आहे काय ?


मारलेलं हरीण पुढ्यात असलेला आणि त्याच्या उष्ण, लालभडक रक्तानं तोंड, मिश्या माखलेला वाघ !

हा हत्ती काही पोरसवदा, कच्चा नव्हता. चांगला अनुभवी, प्रसंगी खंबीरपणानं वाघावर रतून उभा राहणारा होता. तो एवढा विलक्षण घाबरून मागं का सरतो आहे ! आता मात्र माहूतही चिडला. पुन:पुन्हा इशारा करून 'पुढं हो, पुढं भीड', असं सांगू लागला.

मग हत्ती मोठ्यांदा चीत्कारला आणि सोंड उभारून आवेशानं पुढं झाला.

मला वाटलं, आता काही दंगा होणार.

आवेशानं हत्ती पुढं झाला आणि चिखल-पाण्यात धाड् धाड् आवाज करीत, एक प्रचंड गेंडा पाठमोरा जाताना दिसला. म्हणजे, गेंडाच होता, वाघ नव्हे.
हे सगळं अगदी थोडक्या वेळात घडून गेलं, पण माझी छाती बराच वेळ धडधडत होती. म्हणजे गेंडा हत्तीवर सुद्धा धावून येतो आणि हत्ती माघार घेऊन पळतो, हे खरंच.



ह्या दाट गवतात, पुढच्या डबक्यात बसलेला गेंडा हत्तीला दिसलाच नसावा आणि शांतपणे समाधी लावून थंड पाण्यात उभ्या राहिलेल्या गेंड्यालाही हत्ती आला, हे कळलं नसावं. एकदम दचकून त्यानं चार्ज केला. आणि बेसावध हत्ती सरासरा मागं सरला. काही का असेना, काझिरंगात क्वचित घडणारा नाट्यपूर्ण प्रसंग घडला होता. त्याची थोडी चुणूक मला अनुभवायला मिळाली होती.

काही घडलंच नाही, अशा थाटात हत्ती पुन्हा चालू लागला. जाता जाता दोन्ही बाजूंच गवत ओरबाडू लागला. मधूनच एखादा घास तोंडात घालत होता, मधूनच डास-माश्या वारीत होता.

समोर विस्तृत असा पाणथळ भाग आला. सूर्यप्रकाशात पाणी लखलखत होतं. बोरूच्या बेटातून बदकं पोहत होती. ढोक, बगळे सावध होऊन, माना काढून आमच्याकडे बघत होते.

एवढ्यात उथळ पाण्यात बसलेली दोन हरणं दिसली. स्वॅम्प डिअर्स. एक मादी आणि तिचं एक पोर. मोठाले कान टवकारून बघत होती.

हत्ती त्यांच्या दिशेनं पुढं पुढं येत होता.

हा नक्की काही धोका आहे का ? आपण सुखानं बसलो आहोत, ते सोडून उधळावं का !

काही क्षणातच आई उठून उभी राहिली. एकटक बघू लागली. पोरही उठलं. चित्रासारखी ती दोन्ही बघू लागली. लव्हाळ्यांची, बोरूच्या पात्याची आणि त्यांची प्रतिबिंबं पाण्यात पडली होती.

मी हरखून हे निसर्गचित्र बघत होतो.

हत्तीची धूड आपल्या दिशेनं पुढं पुढंच येत आहे, हे ध्यानी येताच ती मायलेकरं, आमच्यावरची नजर न काढता सावकाश उजव्या बाजूला पुढं पुढं सरकू लागली.

---आणि उजव्या बाजूला, काही अंतरावर, ढळत्या सूर्याच्या प्रकाशानं लखलखीत झालेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर हरणाचा कळप दिसला. हे सारेच तरुण नर असावेत. बोरूच्या रेषामागे त्यांच्या काळपट आकृत्या दिसत होत्या. सगळ्यांच्या माना वर आणि मोठेमोठे कान टवकारलेले.

म्हणजे ही आई आणि पोर, काटकोनात त्यांच्या दिशेनं पुढं सरकत होतं.

काही वेळ अंदाज घेऊन, बारा–पंधरा नरांचा तो कळपही हळू हळू पुढं सरळ दिशेनं सरकू लागला.

---आणि ह्या दोहोंच्या मधे एका मोठ्या झुडुपाच्या सावलीला बसलेला भव्य शिंगाचा एकच एक बारशिंगा आम्हाला दिसला. ह्या सगळ्या कळपाचा तो स्वामी असावा. पसरल्या कानांनी तो एकटक आमच्याकडं बघत होता. डाव्या बाजूला पुढं पुढं सरकत जाणारी आई आणि तिचं लेकरू पुढं, थेट समोर हा बारशिंगा आणि उजव्या बाजूला तो

कळप. असं मनोहारी दृश्य होत.

दलदलीच्या भागात राहणारी ही हरणं ' शाळा ' करून वावरतात. एका वयाची पंधरा–वीस हरणं दंगाधोपा न करता चरतात. मुलांची शाळा वेगळी, मुलींची वेगळी.

पोरांच्या शाळेत कधी कधी, एकदम दोन नर हातघाईवर येतात. शिंगाला शिंग भिडवून रेटारेटी सुरू होते. पण हे भांडण नसत. तू मोठा, का मी मोठा, ठरविण्यासाठी हे ताकदीच प्रदर्शन असत. ह्यात उजवा ठरेल, तो विजेता. लगेच त्याचं वडीलपण मान्य करून दुसरा प्रतिस्पर्धी माघार घेतो. पुन्हा गुण्यागोविंदान दोघं चरू लागतात. अशी रेटारेटी होऊन नंबर ठरतात. एक, दोन, तीन, चार. मोठ्या बापाचा म्हणून कोणी मोठा मानला जात नाही. कळपात राहून आपण नंबर ठरवून घ्यावा लागतो.

अशा शाळांपैकी ही एक ' शाळा ' होती. चकचकीत प्रकाशामुळं मी मोजू शकलो नाही. पण एकूण पंधरा–वीस पोरं असावीत.

—आणि हा भव्य शिंगाचा नर म्हणजे नंबर एकचा असावा. त्या मादींचा धनी आणि पोरांचा बाप.

मादी आणि पोर, ती तिकडची तरुण पोरं सगळी सावध झाली होती; पण हा नं. १ चा बारशिंगा अजून जागच्या जागी स्थिर होता. हत्ती जवळ जवळ जाऊ लागला.

तसा तो केवळ उठून उभा राहिला. आणि त्या क्षणी ती तरुण पोरं उधळली. ती आई, ते पोर उधळल. पाण्यातून आवाज करत पंधरा एक यार्डावर जाऊन थांबलं. पुन्हा माना वळवून कान पसरून बघत राहिलं.

नर मात्र जागीच उभा होता.

पळून जाणं त्याला शोभण्यासारख नव्हतं. खरोखरीच हा धोका आहे, याची पूर्ण खात्री झाल्याशिवाय तो पळणार नव्हता. ते त्याच ब्रीद नव्हतं. तो कळपाचा शास्ता होता. आम्ही त्याच्या वडिलकीचा मान राखला.

हत्ती उलट्या दिशेला फिरवून निघालो पाण्यातून, गाळातून, वनस्पतींच्या दाट तवंगातून वाट काढीत हत्ती विरुद्ध दिशेला दूर दूर जात होता. मी मागं वळून बघत होतो. कळपाचा शास्ता बारशिंगा अजून जागी ठाम उभा होता.

" साब, सामने देखिये। "

माग बघत होतो, तो वळून मी समोर पाहिल.

दूरवर, नदीच्या काठाला हिरव्याचार गवताच्या पार्श्वभूमीवर काळे ठिपके दिसत होते. काळे ठिपके आणि पांढरे गायबगळे. मी दुर्बीण डोळ्यांना लावली.

पार पलीकडे, ओढ्याच्या काठी रानम्हशींचा कळप चरत होता. दुर्बिणीतून बघूनही मला एवढंच दिसल. मागं हिरवगार उंच गवत होत. त्यामागं झाडझुडं आणि निळं आकाश होतं. ह्या पार्श्वभूमीवर काळाभोर रानम्हशींचा कळप चरत होता आणि बरेच गायबगळे कळपाच्या मागंपुढं टपून राहिलेले होते. काही धीट बगळे म्हशींच्या पाठीवर,

शिंगावर झोकात बसून होते.

मी आजवर ऐकत आलो होतो, रानम्हशी हा जंगलातला प्राणी भयानक असतो. मुळात, ह्या जातीजवळ आडमुठेपणा असतोच. देवानंच दिलेला. त्यात ह्या रानम्हशी. वाघ हा त्याचा घरातला शत्रू, आणि शिकारी माणूस हा बाहेरचा. ह्या दोघापासून संरक्षण करण्यासाठी ह्याना सतत तत्पर राहावं लागत. मोठमोठे कान पसरून आणि ओलसर नाकाडं वर करून, जेव्हा तेव्हा त्या सावट घेत असतात—वाघाचा, माणसाचा. डेअरीतल्या म्हशी बघून ह्या म्हशींची कल्पना येणं कठीण, पण हे धूड प्रचंड असतं रेड्याची उंची पाच फूट सहा इंच. कधी कधी सहा फूट सहा इंच, वजन दोन हजार पौंड. शिंगाची लांबी, एका शिंगाच्या टोकापासून मस्तक धरून, दुसऱ्या शिंगाच्या टोकापर्यंत एकशेआठ इंच.

'Rifle and Romance in the Indian Jungle' ह्या पुस्तकाचा लेखक तर ही लांबी एकशेएकोणसत्तर इंच म्हणून सांगतो ! तो लिहितो, की

ब्रिटिश म्यूझियममध्ये ठेवलेल्या एका शिंगाची लांबी साडेअठ्याहत्तर इंच आहे.

कळपात म्हशी आणि लहान रेडकं असतात. रेडे मात्र एकटेदुकटेच असतात. अंधारात लाबलांब भटकत राहतात. ह्या नदीकाठावरून त्या नदीच्या काठी. कधी कधी, एकट्या रेड्याच्या जोडीला तरुण असा दुसरा रेडाही असतो. अशा रेड्याचा माग काढून त्याची शिकार करणं ही फार धोक्याची आणि अतिशय कष्टाची बाब असते.

'Rifle and Romance' च्या लेखकान एक कथा नोंदलेली आहे.

एका शिकाऱ्यान कष्टान माग काढून मोठा रेडा मारला. संध्याकाळ झाली होती, म्हणून तो परत कॅंपवर आला आणि दुसरे दिवशी सकाळीं पुन्हा मागावर गेला. रेडा पडलेला दिसला. मेला असेल, अशा समजुतीन शिकारी जवळ जाताच रेड्यानं उठून हल्ला केला.

शिकारी झाडाकडं धावला. बुंध्याच्या आड झाला. रेडा बुंध्याशी धडकला, तेव्हा बुंध्याच्या दोन्ही बाजूंनी अंगाशी आलेली त्याची दोन्ही शिंगं शिकाऱ्यानं घट्ट धरली. पण एका झिंझाड्यासरशी रेड्यानं शिकाऱ्याला बाजूला फेकल आणि शिंगांनी भोसकलं. एक शिंग शरीरातून आरपार गेलं. रेडा निघून गेल्यावर, शिकाऱ्याच्याबरोबरची माणस त्याच्या मदतीला धावली. त्याना बघताच शिकारी फक्त एक शब्द बोलला,

"पाणी !"

—आणि दुसऱ्या क्षणी त्यानं प्राण सोडला.

काय प्रकार झाला असेल, याची थोडीशी कल्पना मी स्वतः करू शकतो, कारण म्हसरू ह्या आडमुठ्या जातीच्या शिंगाचा प्रसाद मलाही एकवार मिळालेला आहे.

मी दहा–अकरा वर्षांचा असेन. गावापासून अर्धा मैल दूर, आमचं रान होतं, पंधरकी.



नोकरीनिमित्त वडिलांना आणि आम्हाला गावोगाव हिंडावं लागे. म्हणून पंधरकी आम्ही बटाईन एका शेतकऱ्याला दिली होती. हा, तिथून मैलभर दूर असलेल्या यमाजी पाटलाच्या वाडीतला शेतकरी सज्जन होता. पण त्याची म्हैस मारकुटी आहे, ह्याचा पत्ता मला नव्हता. अधूनमधून आईबरोबर मी माडगूळला गेलो, की एकट्याच पंधरकीत जात असे. पंधरकीतल्या सपाट तांबड्या रानातून सहज चक्कर मारली, तरी मन रमत असे.

कुठं बाभळीच्या झुडपात बसून पठाणी होला मान फुगवून घू घू घू बोलत असे, कुठं पकुड्यांचा थवा माना वर काढून बघत असे, कुठं भुरगुंज्याचा थवा फर्रकन् आपल्या पायातून उडे. नाना पाखराच्या गळ्यानं सगळी पंधरकी बोलत असे आणि नाना वासांनी घमघमत असे.

फुललेल्या गवताचा, झुडुपाचा, पिकाचा वास सर्वत्र पसरलेला असे
मी गेलो, तेव्हा पंधरकीत कडधान होतं. मटकी शेंगाला आली होती, मूग होते, चवळी होती. चवळीच्या कोवळ्या शेंगा मुठी भरभरून तोडाव्या, चड्डीचे दोन्ही खिसे भरावेत आणि गवताळ बांधाच्या लोडाला टेकून मनसोक्त शेंगा खाव्यात, म्हणून मी गेलो होतो. तर ऐन पिकात शिरून कडधान खाणारी म्हैस दिसली. आजूबाजूला कोणी माणूसकाणूस नव्हतं आणि ही ओढाळ म्हैस खुशाल कडधान खात होती.
माझं पित्त खवळलं, बांधावरचे दगड घेऊन मी तिच्या अंगावर धावलो.
"तुज्या मायला तुज्या डोंबराच्या!" म्हणून धोंडा भिरकावला. ह्यावर गर्रकन् तोंड फिरवून उलट्या दिशेनं टोंगाळा करण्याऐवजी, म्हैस शिंग रोखून माझ्यावरच धावून आली आणि पळून जायला मुळीच सधी न देता तिनं मला शिंगावर उचललं आणि कडधानात आपटलं. एवढ्यानं भागलं नाही. तिच्या निबर शिंगाचं टोक नेमकं माझ्या चड्डीच्या कमरपट्ट्यात घुसून बाहेर आलं. शिंगाला मी टांगलाच गेलो. पुन्हा पुन्हा म्हैस मला उचलत होती आणि पुन्हा पुन्हा लाल मातीत घोळसत होती. परटाच्या हातून धुणं खडकावर आपटलं जावं, तसा मी धुतला जात होतो. रडत होतो, घाबरून ओरडत होतो आणि चड्डीचा पट्टा तुटता तुटत नव्हता.
शेवटी कसं मला सुचलं, कुणाला ठाऊक, घोळसला जाता जाता मी बटणं काढून, चड्डीतून बाहेर पडलो, आणि जीव घेऊन गावच्या दिशेनं, उभ्या पिकातून, कडधानातून, बोराटी-भुरमुटीच्या झुडुपातून आडवातिडवा पळत गाव गाठलं.

रात्री माझी निळी चड्डी वाटेकऱ्यानं घरी आणून दिली. कडधानानं कूस भरून म्हैस दिवस मावळल्यावर घरी गेली, तेव्हा म्हशीच्या शिंगाला लोंबताना त्यानं ती पाहिली. पंधरकीत चरायला गेलेल्या म्हशीच्या शिंगाला चड्डी आहे, त्या अर्थी, ही धाकट्या मालकाचीच असणार, असा अंदाज त्या चाणाक्ष शेतकऱ्यानं बांधला आणि तातडीनं तो माझी लाज झाकण्यासाठी चड्डी घेऊन आला होता.
चला! जिवावर बेतलं होतं, ते चड्डीवर निभावलं!

आता, गोठ्यात राहून, धन्यानं दिलेला बैलाचा उष्टा चगळचोथा खाऊन शेणाचे पू टाकणाऱ्या म्हशीची ही हिम्मत, तर जंगलचा चारा खाऊन आणि मोकळा वारा पिऊन स्वतंत्र वृत्तीनं जगणाऱ्या रानम्हशींचं काय सांगावं? आणि रानरेड्यांच्या हिमतीचा अंदाज कुणी घ्यावा?
गुडघ्याएवढ्या चिखलातून, गवतातून, पाण्यातून वाट काढीत आमचा हत्ती कळपाच्या दिशेनं निघाला. धोक्याची हाकाटी करत बगळे, ढोक, बदकं उडू लागली.
अंगाला चिकटून रक्त पिणाऱ्या कीटकाचा वैताग चुकवण्यासाठी जंगली म्हशी, रेडे

राडीत लोळतात आणि ती पुटं अंगावर बाळगतात. उन्हात राड वाळली, की झाडांच्या खोडाला अंग घासतात. राडीच्या पोपड्यांबरोबर अंगावरच्या गोचड्याही निखळून पडतात. नको तिथले केस काढण्यासाठी स्त्रिया सौंदर्यप्रसाधन चोपडतात, तशातलाच हा एक प्रकार.

रानम्हशींचा कळप फार बुजरा असतो. माणसाचा वाराही त्या घेत नाहीत. फोटो काढण्यासाठी जवळ जाणं अशक्यच. म्हशी तत्काळ गवतात शिरून दिसेनाशा होतात आणि चुकून रेडा कळपात असला, तर तो बेधडक अंगावर चाल करतो. म्हणून गावठी म्हशींच्या कळपात शिरून फोटोग्राफरनं ह्या रेड्याजवळ जावं, असं ई. पी. गी. सुचवतात. लहान म्हशींचा कळप जवळ आला, की हा एरवी अंगावर धावून येणारा रेडा पाघळतो आणि अगदी गरिबासारखा वागतो. आपण हत्तीवर असतानासुद्धा रेडा अनेक वेळा धावून आला, आणि एकदा पायउतार होऊन, फोटो काढण्यासाठी गेलो असताना, रेड्यानं पाठलाग केला. केवळ नशीब बलवत्तर, म्हणून सुटलो, अशी नोंदही एका ठिकाणी त्यांनी केली आहे.
हे एकुलगे रेडे खुशाल अभयारण्याच्या बाहेर पडून गावठी म्हशींकडं जातात. तिथं रेडा असला, तर तत्काळ त्याचा जीव घेतात. अशा एका रेड्यानं नऊ पाळीव रेडे मारल्याची नोंद आहे. त्यामुळं आसपासचे गवळी रेडा असा बाळगतच नाहीत. त्यांच्या म्हशींना पोर होतात, ती अशा जंगली रेड्यापासनंच. ही रेडकं चांगली थोराड निपजतात. पण टोणगा निपजला, तर तो शेतकामाला कुचकामी ठरतो, आणि रेडी निपजली, तर ती दुभती म्हणून फारशी उपयोगाची नसते.
तरी बरं, ब्रह्मपुत्रेच्या काठच्या ह्या जातीची शिंगं आफ्रिकेतल्या म्हशी–रेड्यासारखी नसतात. त्यांची शिकार करणाऱ्या अनेकांनी, आफ्रिकेच्या जंगलातला एक भयंकर प्राणी म्हणूनच म्हशीचं वर्णन केलं आहे. ह्या म्हशींची शिंगं फार जाडजूड, आणि मुंडास्याच्या वेढ्यांसारखी अगदी कपाळावरच असतात.
हंटर नावाच्या शिकाऱ्यानं आपल्या पुस्तकात दिलेली एक हकीकत मला आठवते. मसाई लोक हे किती शूर असतात, हे सांगताना त्यानं आठवण लिहिली आहे. भाल्यानं शिकार करायला गेलेल्या एका मसाई योद्ध्याला म्हशीनं चोळसलं होतं. हंटरनं त्याला उचलून आपल्या जीपमध्ये घातलं. ( आणि साठ मैल दूर असलेल्या हॉस्पिटलमध्ये पोचवलं. ) असं स्पष्टच दिसत होतं, की ह्याच्या शरीरातली अनेक हाडं मोडली आहेत. पण सबंध प्रवासात हा पुरुषोत्तम एकदाही कण्हला, विव्हळला नाही, मग रडण्याभेकण्याचं नावच नको.
मसाई पोरगा वयात आला, आता त्याला जोडीदारीण द्यावी, असं जमातीतले बाप्ये केव्हा मानतात, तर त्या पोरानं, हातात भाला आणि ढाल घेऊन सिंहावर हल्ला केला

आणि रिकाम्या हातानं, त्या वनराजाच्या शेपटाला धरून खेचलं, म्हणजे !

आता हत्ती जवळ जवळ जात होता. तो वीसएक यार्डांवर आला, तेव्हा सगळं कळप चित्रासारखा स्तब्ध उभा राहिला. नाकं वर केलेली. सदा माश्या वारण्यासाठी हलणारे मोठेमोठे कान आणि शेपूट सुद्धा स्तब्ध. बगळे कुरकुरत उडाले आणि दूर झाडावर जाऊन बसले.

पंधरा-वीस म्हशी होत्या, त्या लगेच शेजारच्या उंच गवतात शिरून दिसेनाशा झाल्या. एक म्हैस मात्र ठाम उभी होती. आणि तिच्या पायाशी एक लहान पोर. दोघंही हत्तीकडे रोखून बघत होते.

ही म्हैस त्या कळपाची प्रमुख असावी. शिवाय त्या पोराची आई. वाट्टेल ते झालं, तरी ही आपली आई शत्रूशी झुंज देईल आणि आपलं रक्षण करील, असा विश्वास त्याला वाटत असला पाहिजे.

हत्ती चांगला जवळ गेला आणि गप्प उभा राहिला. जणू काही, त्यालाही आपली लक्ष्मणरेषा माहीत होती. इथून पुढं चार पावलं आपण टाकली, की ही महाकाय म्हैस, पुढचा पाय उचलून आपटील. चिखलमाती उधळील, नाकपुड्या फेंदारून फूत्कार करील आणि एखादा कडा कोसळावा, तशी आपल्यावर कोसळेलच, याबद्दल त्याला शंका नव्हती.

पोर आईच्या सावलीत उभं.

आई आव्हान स्वीकारून उभी.

हत्ती स्तब्ध.

आम्ही निश्चल. श्वास रोखून.

काही क्षण गेले.

--आणि माहुतानं हळूच हत्तीला खूण केली. हत्ती सावकाश फिरला. आल्या वाटेनं परत निघाला.

आई आणि पोर अजूनही तशीच उभी होती.

काझिरंगाच्या गवताळ आणि ओल्या रानातून भटकता भटकता अडीच-तीन तास निघून गेले होते. दिवस मावळतीला चालला होता. संध्याकाळच्या वाऱ्यानं गवत डुलत होती. पाखरं रात्रीच्या मुक्कामावर परत निघाली होती. लवकरच हरणं, म्हशी, गेंडे ही जनावरंही रवंथ करीत कुठंतरी आडोशाला, उबेला बसणार होती. पश्चिमदिशा डाळिंबाच्या फुलासारखी दिसत होती. पक्ष्यांच्या काळ्या आकृत्या घरट्याच्या ओढीनं लाल आकाशातून जात होत्या.

आता आम्हाला परत जाणं भाग होतं.



जाता जाता, अगदी वाटेवर हरणाची जोडी दिसली. एक रानकोंबडा आडवा तुरतुरत गेला.

ह्या अडीच-तीन तासात किती तरी वन्य पशुपक्षी दिसले. मी काही मैलो-गणती हिंडलो नव्हतो, तरी म्हशी दिसल्या, हरणं दिसली, गेंडे दिसले. वाघाची ताजी पावल दिसली. जवळ जवळ दहा हजार वेगवेगळे पशुपक्षी ह्या अरण्यात सुखानं राहत होते, त्याचं ईषत् दर्शन तरी मी घेतलं. शांततामय सहजीवनाचा वारंवार घोष न करता सगळे एकत्र नांदत होते. शेजारी शेजारी चरत होते. हत्ती, हरणं, गेंडे, म्हशी ही सगळी गवतात चरणारी मंडळी, पण तिथ मी-तू, मी-तू होत नव्हत.

का बर ?

आफ्रिकेच्या गवताळ प्रदेशात वन्यप्राण्यांचे

कळप एकमेकात मिसळून चरत असतात. पलीकडेच काही अंतरावर, उंच गवतात सिंहीण दबा धरून बसलेली असते. ती तिथं आहे, हे माहीत असूनही, सावधपणानं हरणं चरत असतात. म्हशी चरत असतात.
जिवाला धोका असणं हा जीवनाचाच एक भाग आहे, हे त्यानी गृहीत धरलेलं असतं. माझं गवत हा खाईल आणि मी उपाशी राहीन, असं कुणाला वाटत नाही, त्यावरून कळपाकळपाच्या मारामाऱ्याही होत नाहीत.
गवतासारखं एकच अन्न, पण प्रत्येक प्राण्याच्या त्याविषयीच्या चवी वेगळ्या असतात. ग्नू नावानं ओळखला जाणारा हरणाच्याच जातीचा प्राणी, फक्त कोवळं लुसलुशीत गवत खातो. उलट झेब्रे तेच गवत चांगलं वाढल्यावर त्याच्यावर चरतात, आणि टोपी जातीची काळविटं त्याच्यावर तुटून पडतात, ती, हे गवत चांगलं निबर झालं, म्हणजे मग!
अशीच काही पद्धत काझिरंगातल्या ह्या जनावरानीही उचलली नसेल ना?
गवत तेच, पण वेगवेगळ्या अवस्थेत, वेगवेगळ्या प्राण्यानी खावं. म्हणजे मारामारीचा संभवच नाही.

दुसरी एक मजेची गोष्ट मी सारखी पाहत होतो. म्हशींच्या मागे, पुढे गायबगळे सारखे टपून होते. ह्या थोराड जनावराच्या चारीही पायानी, आणि त्याच्या मुसक्टानी गवतातून उडणारे टोळ, गवळणीसारखे कीटक, आळ्या, सरडे, उंदर, बेडकं असं त्याचं खाणं, फार शोधाशोध न करता आयतं त्यांना मिळत होतं. म्हशी पुढं सरकल्या, की उडण्याची तकलीफ न घेता, हे पांढरेधोट बगळे, वाहनात बसून मजेनं जावं, तसं त्याच्या पाठीवर शिंगावर बसून जात होते आणि ह्यात काही गैर आहे, ही पाखरं आपला भलताच फायदा उठवीत आहेत, असं म्हशींना वाटत नव्हतं. पाखराची चालण्याची शक्ती ती किती! म्हणून ते ह्या वाहनाचा उपयोग करून घेत असावेत.
हेच बगळे गेंड्याच्या भोवतीही गर्दी करून होते. हरणाच्या पाठीवर लहान साळुंक्या होत्या, काळे कोतवाल होते. जनावरं खाली बघून चरत होती, आणि ही लहान पाखरं त्याच्या पाठीवर बसून होती. एखादा लठ्ठ टोळ दिसला, की तेवढ्यापुरती गिरकी घेऊन त्याला मटकवत होती. आणि पुन्हा पाठीवर बसत होती. उंचावर असल्यामुळं त्याना सगळीकडे नजर ठेवता येत होती. माना वेळावून ती दाही दिशांना बघू शकत होती. कुठं धोका जाणवला, की आरडून ओरडून, गेंड्याना, हरणाना, म्हशींना इशारा देत होती. हिरव्यागार गवतातून अचानक फर्कन् तीन चार पांढरेधोट बगळे उडत आणि जरा पुढं जाऊन बघावं, तर निळ्या पाण्यात डुबणारा काळाधोप गेंडा दिसे! पाठीवरचे बगळे असे उडताच तो सावध होऊन उठलेला असे.
ही लहान पाखरं जनावरांच्या पाठीवरूनच सफर करतात, असं नाही, चार-पाच फूट

उंचीचा बस्टार्ड पक्षी जेव्हा गवतातून चालतो, तेव्हा त्याच्या पाठीवर बसून सुद्धा, एखादा कोतवालासारखा लहानगा पक्षी आपण हत्ती वरून जावं, तसा जातो. वाहनाचा आनंद माणसानंच घ्यावा, असं थोडंच आहे!
रान काढून सावजं उठवण्याचं काम मोठी जनावरं करतात आणि ही पाखरं आपली शिकार साधतात. मोठी जनावरंही पाखराचं हे अंगाखांद्यावरचं खेळणं सहन करतात. कारण जिथं शिंगं, खूर, शेपूट पोचत नाही, अशा अवघड जागी चिकटून रक्त पिणारे त्यांच्या अंगावरचे लहान लहान कीटक ही पाखरं मटकावून त्यांना सुख देतात.
माझा अंदाज आहे, की लहानसहान बलुतेदार पूर्वी जसे एक एक मोठा शेतकरी, आपलं कूळ म्हणून धरून ठेवीत, तशी ही पाखरही एकच कूळ धरून ठेवत असावीत.
मैना–साळुंक्याच्याच कुळातला एक पक्षी oxpecker असं करतो. आफ्रिकेतल्या गेंड्यांशी आणि रानम्हशी, रेड्याशी त्याचं असं कूळ-बलुतेदाराचं नातं असतं. मोठ्या कळपापैकी एकच जनावर तो धरून असतो. सगळा जन्म तिथंच काढतो. रेड्याच्या पाठीवरच त्याचं सगळं होतं, खाणं, मादी शोधून तिच्याशी प्रियाराधन करणं, हनिमून! जे जगाच्या पाठीवर माणसं करतात, ते सगळं तो रेड्याच्या, गेंड्याच्या पाठीवर करतो. त्याच्या पायाची नखं चांगली धारदार आणि जनावराच्या कातडीशी लटकण्याजोगी पकड असणारी असतात. तोल सावरायला उपयोगी पडेल, अशी लांब, ताठ शेपटी असते. आखूड, सपाट अशी चोच असते. तिचा कात्रीसारखा उपयोग करून तो अडचणीत शिरून बसलेल्या गोचड्या, गोमाश्या खातो, आणि समोर धोका दिसला, की वारंवार ओरडून, आपल्या कुळाच्या डोक्याभोवती चकरा घेऊन त्याला सावध करतो.

कुणातरी हुशार फोटोग्राफरनं घेतलेला एक उत्तम फोटोग्राफ पाहिलेला मला आठवतो. आफ्रिकेतल्या जंगलातला मोठा काळवीट, प्रचंड शिंगाचा आणि गलेलठ्ठ मानेचा, वाहत्या धारेत उभा राहून पाणी पितो आहे. आणि त्याच्या हनुवटीला उलटं लोंबून, दोन oxpeckers ही पाणी पिताहेत.
असं हे गुण्यागोविंदाचं नांदणं असतं. वेगवेगळ्या प्राण्यांचे कळप शांततामय सहजीवनाचे चाहते असतात. मारामारीसाठी मारामारी सहसा होत नाही. कधी होते, ती नरानरात, मादींच्यापायी. तीही जीव घेण्याच्या इराद्यानं नाही, तर फक्त मी बलिष्ठ आहे, हे सिद्ध करण्यासाठी. रक्तपात असा घडत नाही.
आणखी लढालढी होते, ती हद्दी सांभाळण्यासाठी. ही भांडणं, विशेष करून पाखराच्यात होतात. ही माझी हद्द, ही तुझी हद्द. ही जिद्द पक्ष्यात फार असते.
साध्या मैना बघा. नळावर बाया भांडाव्यात, तशा त्वेषानं भांडतात. एकमेकींच्या अंगावर धावून जातात. लाथा झाडतात, मारतात एकमेकींचे केस ओढतात.
मैना कशाला, साध्या घरचिमण्या भांडताना बघा मोठं बघण्यालायक भांडण असतं. ही

भांडणं हद्दीवरून होतात. खेड्यापाड्यात, शेताचा बांध रेटण्यावरून जशा हाणामाऱ्या होतात, त्यापैकीच हाही प्रकार.
रानातली जनावरं ही आपआपल्या हद्दी ठरवून टाकतात आणि आपल्या हद्दीत दुसरा कोणी आल्याचं त्यांना मुळीच खपत नाही. कोल्हे, लांडगे, खोकड आपली हद्द जाहीर व्हावी, म्हणूनच झाडाच्या खोडावर, दगडावर मुताची तुरतुरी सोडतात. गव्यासारखे दांडगे प्राणी शिंगानं झाडाच्या साली फाडून ठेवतात आपल्या हद्दीतल्या झाडावर आपला वास ठेवण्यासाठी नरगवा, आपल्याच मूत्रात लोळतो. त्या चिखलान अंग भरवून घेऊन ते झाडाच्या बुंध्याला घासतो. आपल्याकडच्या हरणाच्या डोळ्यापाशी वासाची अशी एक ग्रंथी असते, ती ग्रंथी झाडाच्या फांद्यांना घासून ते आपला वास तिथं लावून ठेवतात. पर-हद्दीतल्या नरानं तो वास घ्यावा आणि समजावं, की हे रान दुसऱ्याच्या मालकीचं आहे.



मग त्यानं दांडगावा करून मारामारी करावी, जय मिळवावा किंवा पराजय पत्करून माघार घ्यावी.

काही जनावर, आवाज उठवून आपली हद्द जाहीर करतात. पक्षी आवाज करतात, ते केवळ मादी धावत यावी, म्हणून नव्हे; तर आपल्या हद्दीची खूण, म्हणून.

अर्थात, बारा महिने तेरा काळ आपली हद्द सगळेच सांभाळत नाहीत. वर्षातले काही महिनेच ही बांधाची आखणी होते. एरवी कोणी कुठंही हिंडतो. हरणाच्या बाबतीत जेव्हा नर माजावर येतात, तेव्हाच माद्यांच्या कळपात शिरतात. एरवी वर्षभर, माद्या-पोरं एका कळपानं, आणि नर एका कळपान, असे हिंडतात. कळपान राहणं एवढंच संरक्षण.

काझिरंगा हिंडल्यावर वरचेवर माझ्या मनात येत होत, की आकाशवाणी खात्यातून जगल



खात्यात बदली करून घेण्याची सोय असती, तर किती बरं झालं असतं. आता कर्तृत्वाची फार वर्षे हाती राहिलेली नाहीत. जी दहा-पाच राहिली असतील, ती मी असल्या जंगलात आनंदात घालविली असती आणि चित्र आणि शब्दचित्रं रेखाटीत राहिलो असतो. ह्या असल्या अभ्यासासाठी आपल्याकडे शिष्यवृत्त्याही नाहीत. परदेशात असतात. कोल्ह्याच्या मागावर तीन वर्षे हिंडून एका प्राध्यापकानं लिहिलेलं सुंदर पुस्तक मी वाचलं आहे. मनुष्य-वस्तीपासून कितीतरी दूर टांगानिका सरोवराच्या काठी राहून Jane Goodall ह्या तरुण इंग्लिश संशोधिकेनं अनेक वर्षं चिंपाझी माकडांचा अभ्यास नाही केला ? तिला त्या भागातलं प्रत्येक माकड ओळखता येई. त्या सर्वांना तिनं नावंही दिली होती. जवळ सतत केळ्यांचा घड ठेवून ती माकडांशी दोस्ती करी. ही माकडं कशी राहतात, एकमेकांशी कशी वागतात, ह्याचा केवढा तरी मौलिक अभ्यास तिला नोंदता आला. जंगली माकडांचा एवढा विश्वास तिनं मिळविला होता, की एकदा, एक बाळंतीण माकडीण आपलं बाळ घेऊन तिच्या तंबूत दाखवायला आली !
जेनचं उदाहरण डोळ्यापुढं ठेवून पुढं एक अमेरिकन तरुणी Dian Fossey, तीन वर्षं कामधंदा सोडून मध्य आफ्रिकेतल्या डोंगरी गोरिलांचा अभ्यास करत राहिली. ती गोरिलांसारखं चीत्कारली, ओरडली, वरचेवर तिनं त्यांच्याप्रमाणे आपली छातीही पिटून घेतली. असं वागणं हे थोडं शिष्टाचाराला सोडून होतं खरं; पण, त्यामुळं, मी तुमच्यापैकीच आहे, असं ती गोरिलांना पटवून देऊ शकली. आणि मनुष्यप्राण्याच्या अगदी जवळच्या अशा ह्या जंगली प्राण्यांविषयी केवढी तरी माहिती तिनं मिळवली.

असे हे ' दरिद्राणाम् मनोरथाः ' करत करत मी पुन्हा वॉचटॉवरपाशी पोचलो. आणि हत्तीवरून खाली उतरलो. माहुताच्या हातावर एक दहाची, एक पाचाची अशा दोन नोटा टिकवून त्याचा सलाम घेतला, उजळलेला चेहरा पाहिला. आणि कच्च्या रस्त्यावर वाट बघत उभ्या असलेल्या गाडीत चढून धुरोळा उडवीत पुन्हा रेस्ट हाऊसपाशी पोचलो. आपल्या खोलीत जाऊन कपडे बदलले. अंगावरचं ओझं उतरून पायजमा, अंगरखा चढवला. तेवढ्यात खालचा बेअरा वर येऊन म्हणाला,
" बडेसाहेब खाली वाट बघताहेत आपली. "
बडेसाहेब म्हणजे काझिरंगाचे जंगल अधिकारी परिमल लहान.
मी खाली उतरताच हात पुढं करून ते म्हणाले,
" फेरफटका छान झाला, हे कळलं. तुमची काही हरकत नसली, तर चला छोटासा जंगली बार आहे आमचा पलीकडं, तिथं बसून गप्पा करू. "
मी म्हणालो,
" वाहवा ! चला, यापरता दुसरा आनंद नाही आता. "

भारतीय गेंडे बघण्यासाठी परदेशी पाहुणे फार येत असावेत. कारण काझिरंगाचा बार उत्तम होता. एखाद्या आदिवासीन उभारलेल्या झोपडीसारखा. बांबूंनी, लाकडी फळ्यानी सजवलेला. चार–सहाच टाळकी मंद प्रकाशात बसून गप्पा करीत होती. चिरुटाच्या आणि मद्याच्या वासानं बार घमघमत होता.

" काय घेणार ? "

" काहीही ! "

मग, बिअरचे थंडगार पेले किणकिणले. गोहत्तीहून माझ्यासोबत आलेला टूरिस्ट ऑफिसर शर्मा दोन फ्रेंच मुलींना घेऊन आत शिरताच, सेंटच्या वासाचा भपकारा आला. माझ्याशी मामुली बोलून त्यान एका कोपऱ्यातल्या टेबलाशी बैठक जमवली. आणखी चार–दोन माणसं आली. बोलण्याला उकळ्या फुटू लागल्या. आधीच मंद प्रकाशात बसलेली माणसं सिगरेट–चिरुटाच्या धुरामुळं धूसर दिसू लागली. लवकरच सगळा बार, तुलूस लोत्रेकच्या एखाद्या चित्रासारखा दिसू लागला.

इकडेतिकडे मामुली बोलणं झाल्यावर मी विचारलं,

" शिकारचोराकडन बेसुमार गेंडे मारले जात होते, त्याचा बंदोबस्त तुम्ही कसा केलाय् ? "

" आम्ही बंदोबस्त केलाय्; पण अजूनही पोचिंग चालतच. गेल्या वर्षी तीन गेंडे असे मारले गेले. "

" म्हणजे तुम्ही सांगितलेल्या हिशेबाप्रमाणं पंचेचाळीस हजार रुपये त्यानी कमावले ! बंदोबस्त केलाय्, म्हणजे काय केलंय् ? "

" आता ह्या सगळ्या जंगलात अगदी आतल्या भागातसुद्धा ठिकठिकाणी तीस कॅम्प्स् आहेत. आमची जंगल खात्याची एकूण एकशेएक्याण्णव माणस लक्ष ठेवतातच, पण त्याशिवाय पंचावन्न गार्डस् नेमलेत. ते सतत पहारा ठेवतात. "

" आणि तरीही गेंडे मारले जातातच ? "

" अगदी थोडे, पण जातात. व्यापारी लोक काही शिकारचोरांना हाताशी धरतात, त्याना विसारादाखल दहा–पाच हजार देतात आणि त्याच्याकडून गेंड्याची शिकार करवतात ! "

" मग ह्यावर उपाय काय ? "

" काही नाही. लोकच शहाणे झाले पाहिजेत. वन्य प्राण्यांच, पक्ष्यांच संरक्षण केलं पाहिजे, हे त्यांना – म्हणजे जास्तीत जास्त लोकाना कळायला लागेल, तेव्हा हे प्रकार बंद होणार ! "

मी म्हणालो,

" असो, तुम्ही सदोदित जंगलातच असता. नाट्यपूर्ण असे प्रसंग सदोदित घडत असणार ? "

" घडतात अधूनमधून. एकदा मला घाबरल्या आवाजात फोन आला, कुठून ? चहाच्या

मळ्यातून.
"'लगोलग या. एक मोठा गेंडा आमच्या मळ्यात आलाय् आणि तो दिसेल त्या माणसावर चाल करून जातोय्. चहाची तोडणी बंद पडलीय्.'
"मी विचारलं,
"'कुणी कामगार जखमी झालाय्, मारला गेलाय्, असं नाही ना?'
"'अजून तर नाही – पण शक्यता आहे. चार तास झाले, आम्ही इतका ओरडा करतोय्, पण गेंडा हालत नाही.'
"मी तात्काळ जीप काढली. चार गार्डस् बरोबर घेतले आणि गेलो.
"अभयारण्याला लागून असलेल्या चहाच्या मळ्यात पोचलो, तर पानाची तोडणी करणाऱ्या सगळ्या बायका टोपल्या जागच्या जागी टाकून, झाडावर चढून बसलेल्या. कामगारांचीही तीच गत. दरम्यान मळ्याचे मालक – त्यांना काहीच ठाऊक नसल्यामुळं सहज चक्कर मारावी, म्हणून मळ्यात आले. जीप येताना बघून गेंड्याला पुन्हा जोर आला आणि तो जीपवर धावून गेला त्यासरशी ड्रायव्हर उडी टाकून पळाला. मालक पळाले. सहा–सात वर्षांचं धीट पोरगं मात्र आत होतं. ते धारिष्ट्यानं जीपचा हॉर्न वाजवत राहिलं. त्याला वाटलं, ह्या आवाजानं कुठून गेंडा पळून जाईल. तो कसला जातो! त्यानं धाडकन् जीपला टक्कर दिली एकदा, दोनदा, तीनदा
"पोराचं धारिष्ट्य खरोखरच मोठं, ते मुळीच न रडता नेकता हॉर्न वाजवत राहिलं. शेवटी धडका मारूनमारून गेंड्यानं जीप रस्त्याकडेच्या खड्डयातच लोटली. तरीही पोर हॉर्न वाजवीतच होतं. पुन्हा गेंड्यानं खड्डयात जाऊन कलंडलेल्या जीपला धडक दिली आणि त्याचं शिंग चाकात गुंतलं. त्यासरशी रेटून रेटून त्यानंच जीप पुन्हा खड्डयाबाहेर आणली. पोर अजूनही हॉर्न वाजवीत होतं.
"शेवटी मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी मोठ्या हिकमतीनं पिटाळून तो गेंडा पुन्हा अभयारण्यात आणला.
"त्या धाडसी मुलाला राष्ट्रपतीचं पारितोषिक मिळालय् आता, असामान्य धैर्याबद्दल!"
मी विचारलं,
"पण हा गेंडा बाहेर कसा काय गेला?"
"जातात पुष्कळदा. पुष्कळदा दोघात मारामारी होते आणि जो ताकदीनं भारी, तो गरिबाला पिटाळून लावतो. पुष्कळदा गेंडे वयानं होतात, थकतात आणि अरण्याच्या बाहेर बाहेर भटकत राहतात."
"किती वर्षं आयुष्य असतं गेंड्याला?"
"नक्की सिद्ध झालेलं नाही. पण हत्तीसारखाच तोही सत्तर वर्षं जगतो, असं मानतात."
"हत्तींनी कधी असा गोंधळ घातला होता का!"
"आमच्या टूरिस्ट लोकांना पाठीवर घेऊन जंगल दाखविणारा चाळीस वर्षांचा एक

हत्ती एकदा मस्तीत आला, आणि पळाला. हायवेवर उभा राहून तो येणाऱ्या जाणाऱ्या ट्रकवर हल्ला करायला लागला. ट्रॅफिक त्याच्यामुळं बंद झाला. अडवलेल्या ट्रकचा ड्रायव्हर पळून जायचा, पण ट्रकची मोडतोड व्हायची. दहा–बारा दिवस हा प्रकार सतत घडत होता. आम्ही हत्तीला शांत करण्यासाठी फार प्रयत्न केले. मला त्याच्या हल्ल्यामुळं पुष्कळदा पाय लावून पळावं लागलं. अखेर त्याला गोळी घालून मारावा लागला."

"पण त्याचा राग ट्रक्सवरच का होता ?"

"त्याचा शोध आम्हाला पुढं लागला. कधी काळी, कुणा बेदरकार ड्रायव्हरनं ट्रकचा धक्का मारून ह्या हत्तीला जायबंदी केला होता."

अशा बऱ्याच गप्पा रात्री नऊ वाजेपर्यंत झाल्या.

लहान साहेब म्हणाले,

"तुम्ही फार धावपळीत आलात. आता आम्ही सबंध काझिरंगा जीपसारख्या वाहनातून बघता यावं, म्हणून आतून मार्ग करतो आहोत. पुन्हा सवडीनं या, मी सगळं जंगल तुम्हाला दाखवीन."

मी पुन्हा इतक्या दूर येईनच, असा भरवसा मला नव्हता. तरी तोंडदेखल 'हो हो' म्हणालो आणि निरोप घेऊन उठलो.

सकाळची वेळ ही अभयारण्य बघण्यासाठी चांगली वेळ नव्हे, प्राणी दिसतात, ते दुपारीच, असं मला जाणकारांनी सांगितलं होतं. तरी सकाळी पुन्हा एकवार कालचाच प्रकार केला. आता माझ्या सोबतीला त्या दोन फ्रेंच मुली होत्या. शॉपिंगसाठी बाहेर पडताना करावा, तसा नट्टापट्टा त्यांनी केला होता. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष असल्यामुळे हत्तीवरच्या पुढच्या दोन्ही बैठका त्यांना मिळाल्या. मी बापडा तिसऱ्या, म्हणजे हत्तीच्या शेपटाकडच्या बैठकीवर अवघडून बसलो होतो. टूरिस्टनी लादलेले आणखी चार हत्ती बरोबर होते. त्यांतला एक अगदीच पोरसवदा होता.

भल्या सकाळी आमची माळच्या माळ निघाली. अनुभवी आणि वयानं सर्वांत मोठा, म्हणून की काय, कोण जाणे, आमचा हत्ती सर्वांच्या पुढं होता.

पोरसवदा हत्ती शिकाऊ असावा, कारण त्याच्यावर माहूत आणि गाईड असे दोघेच होते. हा हत्ती सारखा पोरकटपणा करीत होता. मध्येच माहुतानं हातातल्या अंकुशानं त्याच्या गंडस्थळावर रट्टे लगावले. तो नुसता आवाज कानी येताच आमचा हत्ती चीत्कारला. जणू त्यानं ओरडून सांगितलं,

'नका, रे, मारू त्याला. लहान पोर आहे अजून !

खरं तर त्याला काहीच दिसत नव्हतं. लहान हत्ती अगदी शेवटी होता. जंगलात होणाऱ्या इतक्या आवाजातून त्यानं हाच आवाज नेमका टिपला होता. मी चौकशी केली नाही, पण माझा असा अंदाज आहे, की ह्या दोन हत्तींत काही नातं असावं. कदाचित ही आई

आणि ते पोर असेलही.

सकाळच्या फेरीत एक रानडुक्कर पहिल्यादा दिसल. एकटच होत. बहुधा एकुलगा असावा. उंच गवतातून वाट काढीत ते आमच्यापासून दूर जाईपर्यंत दिसत होत.
एक गेंडा ओढ्याच्या धारेत, अगदी मधे जाऊन उभा राहिला होता. शिंग, कान पाठीचा भाग तेवढा दिसत होता. सूर्याला अर्घ्य देण्यासाठी सकाळी सकाळी एखादा ऋषी गंगेत उभा असावा, असा तो वाटत होता.
फार दूर उभे असलेले बारशिंगे दिसले. चार-दोन गेंडे दिसले. म्हशी मुळीच दिसल्या नाहीत.
एक गेंडा डबक्यात होता. त्याच्याभोवती सगळ्या हत्तींनी कडं केलं आणि फ्रेंच मुलींसकट सगळ्यानी नीट फोटो उतरवून होईस्तवर त्यानं पोझ दिली. त्याला प्रसिद्धीची हौस असावी.
ह्याशिवाय फारसं काही दिसलं नाही, काही घडलंही नाही. मग हौशी मंडळींनी एकमेकांचे हत्तीवर बसून फोटो काढले.
कालच्या मानान आजची भ्रमंती अगदीच अळणी वाटली.

बंगल्यावर परत आलो आणि सामानाची आवराआवर करून काझिरंगा अभयारण्याला सलाम ठोकला.

सकाळी नऊ वाजता परत गौहत्तीस यायला निघालो. आता मला मानसचे वेध लागले होते. गौहत्तीला पोचून, एकशेसेहेचाळीस किलोमीटर प्रवास करायचा होता. रात्री मानसला मुक्काम, सकाळी फेरफटका आणि लगेच तिथून निघून गौहत्तीहून दुपारी दीड वाजता कलकत्त्याला जाणार विमान गाठायच.

संकोश आणि मानस ह्या दोन प्रचंड नद्या भूतानमधल्या हिमालय टेकड्यातून उड्या घेत मैदानात उतरलेल्या आहेत. मानस नदीच्या दोन्ही काटांवर भारतातील उत्तम अभयारण्य आहे. डोळ्याच पारणं फिटावं, असं निसर्गसौंदर्य आणि वन्य प्राणी असा क्वचित जमणारा मेळ इथं जमलेला आहे.
एकंगे पाच चौरस मैल हे अरण्य आहे. हत्ती, गवे, सांबरं, दलदलीत राहणारी हरण, असे अनेक प्राणी नदीच्या दोन्ही तीरांनी हिंडतात.
१९०७ साली इथं पहिल्यांदा सोनेरी वानर दिसली. जगात इतरत्र कुठंही न आढळणारी अशी ही अत्यंत सुंदर दिसणारी वानरं आहेत.

मला ती बघायची होती. प्रचंड आवाज करीत दगडगोट्यांतून, खडकाधोंड्यांतून वाहणाऱ्या मानस नदीच्या प्रवाहात होडक्यांतून प्रवास करायचा होता. आता मला आसाम सरकारची मदत मिळणार नव्हती. ' हे अभयारण्य आमच्या अधिकारकक्षेत नाही. तिथं फारशा सोयी नाहीत. जाताना खाणं बरोबर घेऊन जा, ' असा सल्ला मला आसामच्या पर्यटन खात्याचे डायरेक्टर श्री. शंखाकुटी ह्यांनी दिला होता. मानसची ट्रिप ही फारच कष्टदायक आहे, असंही पुनःपुन्हा सांगितलं होत.

तरी पण, सोनेरी वानर बघण्यासाठी मला मानसला जायचच होतं.

मला ' मानस अभयारण्य ' दाखवण्याची सगळी जबाबदारी गंगाप्रसाद चौधरी या गौहत्तीला राहणाऱ्या तरुण मित्रानं आपल्या अंगावर घेतली होती. त्यासाठी दिवसभर त्याची धावपळ चाललेली मी बघत होतो.

गंगाप्रसाद स्वत' इग्रजीचे प्राध्यापक, त्याचे दोन भाऊ गौहत्तीला 'बाणी प्रकाशन' ही प्रकाशनसस्था आणि पुस्तकाची दोन मोठी दुकान चालवीत होते. मोठा भाऊ कलकत्त्याला राहून प्रेस चालवीत होता आणि गौहत्तीपासून मानसला जाण्याच्या वाटेवर चौधरी कुटुंबाच खेडं आणि भाताची, नागवेलीची, सुपारीची शेती होती. शरदबाबूंच्या कादंबरीतील कुटुंबाची आठवण व्हावी, अस हे सारं कुटुंब होत.

ही सर्व मंडळी धावपळ करीत होती. एक आपली मोटार ठाकठीक करण्यात गुंपलेला होता, एकजण सारखे इकडे तिकडे ट्रंककॉल्स् करीत होता. स्वतः गंगाप्रसाद खाण्यापिण्याचं साहित्य जमवीत होता. आणि मोठे बंधू कलकत्त्याहून येऊन ' पाठशाला ' या आपल्या गावी माझ्या स्वागतासाठी थांबले होते.

तयारी होता होता दुपारचे तीन वाजले. मी ' बाणी प्रकाशन'च्या दुकानात पुस्तकं चाळून चाळून कंटाळलो. दुकानातील फोन करून सारखं कुणाकुणाशी बोलणं होत होत, ' भालो आछे ? की खोबोर ? ' असे काही शब्द कानावर पडत होते, त्यावरून ' मानस ' पाहणं म्हणजे प्रचड खटाटोप आहे, याची मला जाणीव झाली आणि शेवटी मी म्हणालो, " गंगाप्रसाद, फारच गुतागुंतीच असलं ही ट्रिप जमवणं, तर सोडून द्या. आपण इथंच एखादं नाटक बघू. गावातील कामाक्षी मंदिर वगैरे बघू. "

पण गंगाप्रसाद म्हणजे साक्षात उत्साह होता. तो तरुण प्राध्यापक इरेलाच पडला होता. अखेर साडेतीन वाजले आणि आम्ही निघालो.

अंतर काही थोडंथोडक नव्हत. एकशेशहात्तर किलोमीटर्स. त्यांत गंगाप्रसादची ॲॅम्बॅसिडर गाडी वरचेवर गरम होत होती आणि वारंवार तिला पाणी पाजावं लागत होत.

अस थाबत थाबत आम्ही गंगाप्रसादच्या खेड्यात पाठशालेला पोहोचलो, तेव्हा चागला अधार झाला होता.

गगाप्रसादचा वाडा सुरेख होता. मुलाबाळांनी घर भरलेलं होतं. बरेच भाऊ, बऱ्याच

वहिणी, वहिन्या आणि ऐंशी वर्षांचे वडील या सर्वांच्या ओळखी झाल्या.
खाणंपिणं उरकलं
गंगाप्रसादचा धाकटा भाऊ, एक पुतणी, ड्रायव्हरचा लहान मुलगा असे आणखी तिघेजण उत्साहानं निघाले.
वाट लवकर ओसरावी, म्हणून टाळ्यांच्या तालावर आसामी लोकगीतं म्हणून झाली कल्याणीचा आवाज सुरेख होता आणि किती तरी लोकगीतं तिला तोंडपाठ होती. ड्रायव्हरचा एवढा एवढासा पोरगाही सुरेल गाणी म्हणत होता.

बारपेटा रोडला पोचलो, तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. तिथं फॉरेस्ट ऑफिसमध्ये दोन कर्मचारी आणि अंगांत केवळ गंजिफ्रॉक, खाली खाकी चड्डी घातलेला, कमरेला पंचा कसलेला प्यून अजून काम करीत होते. गंगाप्रसादनं अगोदरच फोन करून ठेवला होता. मानसमध्ये रात्री–अपरात्री प्रवेश करण्यासाठी, बंगल्यात रात्रभर राहण्यासाठी, सकाळी होडीतून नदीत फेरफटका मारण्यासाठी कागदपत्रं टाईप होत होती. त्यात अर्धा तास गेला. अकरा वाजता जंगल अधिकाऱ्याच्या घरी जाऊन त्यांना उठवलं, कारण कागदपत्रावर सह्या हव्या होत्या. एवढ्या अपरात्री आपल्याला उठवलं, म्हणून साहेब मजकूर चिडणार, असं मी धरून चाललो होतो. पण हे गृहस्थ फारच सज्जन निघाले. त्यांनी हसून स्वागत केलं. सह्या दिल्या. बरीच माहिती दिली. ' गुड लक् ' म्हणून निरोप दिला.
मानसच्या प्रवेशदारावर पास दाखवून उघडलेल्या फाटकातून आमची गाडी आत शिरली, तेव्हा मध्यरात्र टळून गेली होती. मी विचारले,
" इथून बंगला किती दूर आहे ? "
" तेरा मैल ! "
मी थंड झालो !
गर्द काळोखी रात्र होती. जंगलातून काढलेल्या अरुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंच हत्तीगवत होतं. मोटारीच्या दिव्यांच्या झोतात भयाण जंगलाशिवाय काही दिसत नव्हतं. पाटीतून बैलगाडी जावी, तशी मोटार जात होती.
आम्ही प्रख्यात मानस अभयारण्यात शिरलो होतो. मला जंगल-अधिकाऱ्यानं दिलेल्या माहितीप्रमाणं इथं साठ गेंडे होते, चारशेपन्नास रानम्हसरं होती, चारशे हत्ती होते, चारशे वाघ होते, दीडशे गवे होते, दोन हजार हरणं, पाचशे डुकरं आणि पंधरा अस्वलं होती.
माझ्या मनात वारंवार पाल चुकचुकत होती, मानसमधला एखादा दाताचे लांबलचक फाळ वागवणारा रानटी हत्ती जर या अरुंद वाटेवर आडवा आला आणि त्यानं मनात आणलं, तर आमची ही मोटार काडयाच्या पेटीसारखी तो सहज चुरा करून टाकील. हे राहू दे. यंत्रात काही बिघाड होऊन ही मोटार इथं बंद पडली, तर ?

गंगाप्रसाद, त्याचा भाऊ, कल्याणी, ड्रायव्हर, त्याचं गाणार पोर—सगळे निर्धास्त होते. पुस्तकाचा व्यापार करणाऱ्या या मंडळींचा जंगलाशी फारसा परिचय कधी आलेला नव्हता, आणि अज्ञानामुळं असते, तशी धिटाई त्यांच्यापाशी होती, माझी खात्री आहे, की तसल्या रात्री इंजिन तापलं असतं, तर ड्रायव्हरनं गाडी थांबवली असती आणि हातात मोकळं डबडं घेऊन पाण्याच्या शोधासाठी तो जंगलात शिरला असता.

मानसचं एकूण क्षेत्रफळ सहाशेअडुसष्ट चौरस किलोमीटर्स आहे.
मी सहज चौकशी केली,
" गंगाप्रसाद, इकडे कधी आला होता तुम्ही या आधी ? "
" हो. आठ वर्षांपूर्वी एकदा पिकनिकला आलो होतो ! "
पिकनिकला ! तरीच हे सगळे एवढ्या मजेत होते मी मनातल्या मनात
' कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ' या श्लोकाचं पठन करीत राहिलो.

नाना प्रसंग आठवत होते.
पावसाळ्याचे दिवस. फासेपारधी मित्रानं बातमी आणली, की जवळच्या अमक्या तमक्या डोंगराच्या पठारावर पिकाच्या दोन पट्ट्या आहेत. त्यात भेकरं रोज चरतात.
रात्री नऊ वाजता मित्राची जीप घेऊन निघालो. वाटलं होतं, त्यापेक्षा डोंगरावर चढणीचा रस्ता भलताच खराब होता. रस्ता कसला, बैलगाडीच्या जाण्यायेण्यानं पडलेली गाडीवाट. मधेच ताबडं रानं, खोल चाकोऱ्या. जीप इतकी कलायची, की आणखी थोडी कलली, तर धडामकन् उलटणार.
काळोखं किट्ट. आभाळ भरून आलेलं. पठारावर गेलो, तर तिथं मोकळ्या रानात एक उकीरडा. चार बैल बांधलेले. आणि एकच झोपडी. तिथं निजानीज केव्हाच झालेली. कुत्रं तेवढं जीव तोडून भुंकलं.
आम्ही बऱ्याच हाका घातल्या, तेव्हा झोपडीचा मालक म्हणाला,
" कोन हाय् ? "
फासेपारधी म्हणाला,
" सायेब लोक हायेत. मोटार हितं ठिऊ का तासभर ? "
तो झोपेतच होता, गोधडीखालून बाहेर न पडता म्हणाला,
" हूँ. "
पायउतार होऊन पठारावर गेलो. गवत कमरेइतकं वाढलेलं. वाट पायाखालची नाही. दगडावरून पाय घसरत. कुणी तरी घाई केली आणि शेतात आधीच पोहोचून हातातली बॅटरी उजळली. त्यासरशी अंधार पडताच कोवळ्या पिकावर येऊन दोन तास भरपेट चरून, शेतातच पाय मुडपून बसलेल्या चार भेकरांचे आठ डोळे रत्नांसारखे चमकले.

धाड्धाड्—दोन बार वाजले.
ते अंगावर न बसता भेकर उडाली आणि काळोखात बुडून दिसेनाशी झाली.
कुणी म्हणे, बार लागले; कुणी म्हणे, भेकरं धडपडताच झुडपात वाजले. मग अंधारात शोधाशोध सुरू झाली. पाच–सहा बॅटऱ्या काळोखाला भोकसे पाडत, चारी दिशाना चमकू लागल्या.
किती वेळ गेला, कुणाला ठाऊक. अकस्मात पाऊस सुरू झाला. तो अंगावर घेत घेत, गवतातून वाट काढीत मोटारीपर्यंत पोहोचेपर्यंत चिंब भिजलो.
अखेर जीपमध्ये दाटीवाटीन शिरलो आणि निघालो.
आता वाट म्हणजे काळ्या मातीचा राडा झाला होता. चाकं जमीन धरतच नव्हती. अडचणीत जीप घसरणीला लागली. ड्रायव्हर मधेच घाबरून म्हणाला,
" साहेब, तुम्ही सगळे उतरा, वाट अवघड आहे. मी एकट्याच आधी गाडी धोक्यातून काढतो. "
उतरलो.
—आणि दहा यार्ड गेलो, न गेलो, तोवर गाडी एका अंगावर पडली, चाकं नुसतीच फिरत राहिली.
पाऊस कोसळतच होता.
अंधारातच भीतीन कातर झालेल्या हाका :
" आन्ना, ए आन्ना, हायेस, का घावलास खाली ? "
वेळ घेऊन, मग खोल आवाज,
" मी निघलो, गा, निघलो. "
" लागलं का कुठं ? "
" माजं लागनं जाऊ दे, र. आता गाडीच काय करायच ? "
तशा पावसात मग आम्ही ती झोपडी गाठली. हाका घातल्या. कसा तरी तो दादा-बाबा शेतकरी बाहेर आला.
जुपा बैलगाडी, पहारी काढा, उलटलेली जीप काढावयाची आहे.
पाऊस काही थांबत नव्हता.
दोन-अडीच तास प्रचंड खटाटोप झाला. आम्ही पाच जण आणि ते दोन शेतकरी, त्यांचे चार बैल असे आठजण दमछाक होईस्तोवर खपलो आणि पहाटे तीन वाजता जीप चाकावर उभी झाली.
पावसात भिजल्यामुळं पाचापैकी तीन जणांना ब्रॉकोन्यूमोनिया झाला आणि महिना दीड महिना त्यान खीस काढला !

मानसच्या बंगल्यापाशी आलो, तेव्हा बेडक्या आणि रातकिडे ह्यांचा प्रचंड कोरस चालू

होता. काही दिसत नव्हतं, पण समोर दगडागोट्यांतून धावणाऱ्या मानसच्या पाण्याचा घोघाट कानावर आदळत होता. गंगाप्रसादनं आणि ड्रायव्हरनं बरोच हाकाटी केल्यावर, चौकीदार जागा झाला आणि कंदील पेटवून त्या उजेडात किल्ल्या घेऊन बंगला उघडायला आला. म्हणजे इथं वीज नव्हती.

असो. बैठा बंगला मात्र छान होता. आपल्याकडच्या जुन्या डाकबंगल्याची आठवण यावी, असा.

मानस नदीच्या पाण्याची गर्जना ऐकत मी व्हरांड्यातल्या जुन्या खुर्चीवर बसून राहिलो. तोवर चौकीदारानं कंदील लावले. बिछाने घातले. पाण्याच्या बादल्या आणून ठेवल्या. बारपेटाच्या दयाळू अधिकाऱ्यानं, जंगल खात्याचा एक माणूस आमच्या सोबती दिला होता. त्यामुळं सगळी सोय झटपट झाली.

जुन्या लांबलचक टेबलावर जेवण मांडलं गेलं, तेव्हा गंगाप्रसादनं पाहुण्यासाठी केवढा खटाटोप केला आहे, हे ध्यानी घेऊन मला ओशाळल्यासारखं झालं. मीठ, लिंबू, कांद्यापासून तो चहा, साखर, पानापर्यंत सगळं त्यानं येताना बरोबर आणलं होतं. चमचे, बश्या, पेले, नॅपकीन्स्, चाकू, सुऱ्या .

नाटक संपल्यावर, नाटकवाले जेवण उरकतात, तसे रात्री दोन वाजता आम्ही जेवलो आणि उत्तम बिछान्यावर पडलो.

कंदिलाच्या उजेडामुळं कीटक जातींपैकी नाना चित्रविचित्र आकाराची आणि रंगांची मंडळी आत आली होती. त्यांच्या चळवळीकडे कानाडोळा करून, मच्छरदाणीचा आसरा घेऊन मी गुडुप् झोपून गेलो.

गंगाप्रसाद् म्हणाला होता,

“ आता झोपायचं नाहीच. पहाटे चार वाजले, की बाहेर पडायचं, नदीकाठी जनावरं दिसतील ! ”

सकाळी जागा झालो. भली पहाट होती. व्हरांड्यात येऊन पाहिलं, समोर मानसचं विस्तृत पात्र दिसत होतं.

भराभर मी कपडे-बूट चढवले आणि दुर्बीण घेऊन बाहेर पडलो. गवता-झुडपातून गेलेली पाऊलवाट चालून, दगडगोट्याचा गवतानं झाकलेला बांध ओलांडून पात्रात उतरलो. सगळा नदीकाठ लहानमोठ्या, गुळगुळीत गोट्यांनी भरलेला होता.

पार पलीकडे मानसचा तो काठ आणि बेकीचा प्रवाह या मधल्या पट्ट्यात हालचाल दिसली. काय बरं ?

दुर्बीण डोळ्याला लावून नीट पाहिलं.

हरणाचा भलामोठा कळप होता.

रात्रभर चरून आता ती पाण्यावर आली होती काय ?

ही ' Hog deer ' म्हणून ओळखली जातात, ती हरणं असावीत. कारण ती चेंडूसारखी उड्या घेत नव्हती, तर खाली माना घालून धावत होती चितळाची जातभाई. या दोन जातींत संकरही होतो, म्हणे अंगाची लांबी जास्त, पाय त्या मानानं आखूड, रंग तपकिरी. कान आतल्या बाजूनं पांढरे, शेपटीच्या खालचा भागही पांढरा. पोट, मान यांच्या खालचा भाग पांढरा नाही, पण पांढरट.

नदीकाठच्या गवताळ भागातच ही हरणं नांदतात. ते गवतसुद्धा उंच नाही, असं. खरं तर ही हरणं जोडीजोडीनंच दिसतात. पण कधी कधी अठरा-वीस जणांचा कळपही एकत्र चरताना दिसतो. भल्या सकाळी आणि संध्याकाळीच तेवढं चरावं, एरवी थंड सावलीला बसून राहावं, ही यांची सवय.

मानसच्या थंड पाण्यावरूनच वाहणाऱ्या वाऱ्यानं माझा वास त्यांच्यापर्यंत गेला, की काय, कोण जाणे. पलीकडे, गवतात शिरून सगळा कळप दिसेनासा झाला.

मी पात्राच्या काठाकाठानं एकवार खाली-वर पाहून घेतलं आणि त्यातल्या त्यात प्रशस्त असा गोटा शोधून त्यावर बसलो.

समोर केवढं तरी विशाल असं मानसचं पात्र होतं. पार पलीकडे भूतान हद्दीतलं घनदाट जंगल, त्याही पलीकडे उंच उंच टेकड्या आणि त्याही पलीकडे निळं, स्वच्छ आकाश. ह्यापेक्षा निरागस आणि उत्तेजनकारक अशी कशाची संगत असेल का ? अगदी अश्रद्ध, माणूसघाणा, विषण्ण असा जरी कोणी असला, तरी इथं तो शांत होणार नाही का ? भिकार असा खिन्नपणा अशा ठिकाणी त्याला कधी शिवेल तरी का ? मानवी सोबतीचे काल्पनिक लाभ इथं किती क्षुद्र वाटतात बर !

हळूहळू प्रकाश येत होता. मी उजवीकडे पाहिलं आणि अंगावर रोमांच उभे राहिले. मी बसलो होतो, त्याच काठाला पण पार पलीकडे, जंगलातून एक प्रचंड रेडा बाहेर आला आणि चारी पाय नदीच्या पात्रात टेकून पाणी पिऊ लागला. तृप्त होऊन परत फिरला. चढ चढला आणि जंगलात दिसेनासा झाला.

जराशानं पलीकडे त्या तिकडच्या तीरावर रानहत्तीचं काळं धूड झुलत झुलत आलं आणि पाण्यात येऊन उभं राहिलं.

म्हणजे मघा हरणं जी एकाएकी गवतात शिरली, ती माझ्या वासानं, का ह्याच्या वासानं ? मला दिसलेली दोन्ही जनावरं इतकी दूर होती, की माझ्याजवळच्या दुर्बिणीतूनही त्यांच्या सगळ्या हालचाली मला नीट न्याहाळता आल्या नाहीत. काय वाटेल ते करून एक उत्तम प्रतीची दुर्बीण मला मिळवलीच पाहिजे.

चांगलं उजाडलं, तसा मी दगडगोट्यांतून, ओल्या गवतातून वाट काढीत बंगल्याकडे परत आलो.

व्हरांड्यात उभा राहिलो. समोरच्या झाडाझुडपावर आता पाखरं गर्दी करू लागली होती. त्याच्या स्वरांनी मानसमधली सकाळ गुणगुणू लागली होती, शिळा घालू लागली होती, ताना मारू लागली होती.

माझ्या अगदी समोर एक उंच शेलाटं झाड होतं. त्यावर सुंदर रंगाचा, माझ्या ओळखीचा नाही, असा कोणी पक्षी अगदी शेंड्याशी बसून, मोडून लोंबणारी काटकी चोचीनं ओढत होता. अंगच्या बळानं त्याची ओढाओढ चालू होती आणि मोडलेली पण अर्धवट वाळल्यामुळं ओल्या सालीला लोंबणारी काटकी तुटता तुटत नव्हती. त्याला ती घर बांधण्यासाठी पाहिजे होती काय ? भल्या सकाळी उठून पोटपाणी न करता हा वेडा घरबांधणीच्या सामानाचीच जुळवाजुळव कशाला करत होता ?

हा Shrike च का ? तो कोणत्या महिन्यात अंडी घालतो बर ?

मला वाटत, अगदी टोकावर बसून त्यानंच मघा ही काटकी आपल्या अंगाच्या भारानं मोडली असावी आणि ती घेऊन जाईनच जाईन, म्हणून तो तिच्याशी झट्या घेत असावा. हळूच आत जाऊन मी माझं फाउंटन पेन आणि पॅड घेऊन आलो आणि उभ्या उभ्याच त्याला रेखाटू लागलो...

तेवढ्यात उडाला. माझी हालचाल त्याला संशयास्पद वाटली असावी.

सकाळची न्याहरी उरकली आणि निरोप आला, की बोट तयार आहे. माझं स्केचपॅड घेऊन नदीकाठी गेलो.

बोट कसली, अगदी लहानसं होडकं होतं.

मानसच्या निळ्याभोर प्रवाहात अगदी काठाकाठानं होडकं जाऊ लागलं. उजवीकडे उंचच्या उंच खडकाची भिंत, डावीकडे खळाळणारा दूरवर पसरलेला रुंद प्रवाह आणि त्यातून एखादी लाकडाची ढलपी तरंगत जावी, तसं आमचं होडकं.

खडकावर नाचणारे एवढे एवढे पक्षी दिसत होते. सतत शेपटी खालीवर करणाऱ्या धोबिणी होत्या. मधेच एक मुठीएवढा, काळ्या कुळकुळीत रंगाचा पण डोक्यावर लाल जर्द शेंदराचा ठिपका असलेला रॉबिनसारखा पक्षी दिसला. हाही मी कधी बघितला नव्हता.

पाण्याच्या प्रवाहाची मर्जी सांभाळीत सांभाळीत बरेच खाली गेलो आणि मग प्रवाह आडवा तोडून पैलतीरी गेलो. भूतान हद्दीत पाऊल टाकलं.

जंगलात शिरलो उंच उंच वृक्षांनी, लतावेलींनी गच्च अशा भूतानच्या जंगलातून चालता चालता मी सारखा वर डोळे करून फांद्या न्याहाळीत होतो. अगदी समोर डोक्यावर रंगीबेरंगी राघूंचा थवा फांदीवरून खाली आमच्याकडे बघत होता. झाडापाशी पोहोचताच आकांत करीत तो उडाला. पिवळा, हिरवा, लाल, निळा असा रंगांचा फवारा डोक्यावरून गेला.

जरा पुढं गेलो, तर खोडावर सरसर चढत भली मोठी तांबडी खार गेली उंच जाऊन, फांदीआड सगळं अंग लपवून आमच्याकडे बघू लागली. थोड्या वर तिचा जोडीदारही दिसला.
कारवारच्या जंगलात मी बघितल्या होत्या, त्यापेक्षा ह्या खारी जास्ती मोठ्या होत्या, रंग जास्ती गडद, काळपट चिटकरी होता आणि ह्या जास्ती केसाळही होत्या. चौदा ते सोळा इंच लांब अंग आणि दोन फूट लांब शेपटी असलेल्या ह्याच त्या Giant Squirrels. क्वचित जमिनीला पाय लावणाऱ्या, उंच उंच वृक्षावरून उड्या घेत राहणाऱ्या. काळ्या पाठीच्या आणि पिवळसर पोटाच्या.

भूताननं रेस्ट हाऊसही सुरेख जागी बांधलं होतं. भूतानी चाकरमान्ये भेटले. त्यांच्याकडं चौकशी केली, तेव्हा कळलं, की सोनेरी वानरं पलीकडं, नदीच्या बाजूला आहेत. थोडं बघत बघत जा, म्हणजे दिसतील.
निघालो. झाडंझुडं फार उंच होती. ह्यात आता ती वानरं कशी दिसणार, म्हणत काही वेळ वाट तुडवली आणि नदीकाठी लाकूड तोडीत गढलेल्या एकाकडून नेमकी जागा कळली. सगळा कळपच्या कळप अगदी पलीकडेच, नदीला लागून असलेल्या झाडावर आहे.
नदीच्या पात्रात उतरून गेल्यावर बारा–पंधरा वानरांचा कळप दिसला गुबगुबीत रेशमी अंगाची वानर आम्हांला पाहून डहाळ्यांतून गप्प राहिली.
दुर्बीण डोळ्यांना लावून मी त्यांना नीट न्याहाळू शकलो. पिवळसर तांबूस रंग होता. हातापायाचे तळवे, तोंड काळसर होतं. इतकी देखणी वानरं जगात इतरत्र कुठंही नाहीत. अगदी अलीकडे तपास लागल्यामुळं अद्याप कोणी ह्या जातीचा अभ्यास केलेला नाही. ही सोनेरी वानर कशी राहतात, काय खातात, याची माहिती उपलब्ध नाही.

मग वाळवंटातून चालत चालत आम्ही पुन्हा परत होडक्यापाशी आलो आणि पुन्हा प्रवाह तोडून मघा हरण दिसली होती, त्या भागात गेलो. वाळूत, मेंढराची पावलं लागावीत, तशी हरणाची पावलं होती. गवतात शिरताच पलीकडे चरणारी हरणं पुन्हा दिसली. आम्हांला बघताच ती लपाछपीचा खेळ खेळू लागली. एकच हरण पाठमोरं चरत होतं. लपत-छपत गंगाप्रसाद त्याच्या अगदी जवळ गेला आणि सुरेख फोटो काढू शकला.
त्या रानातून भटकता भटकता मला हरणाचं एक शिंग सापडलं. सोविनेर म्हणून ते मी वागवत पुण्यापर्यंत आणलं आहे. माझ्या लिहायच्या टेबलावर आता ते ठेवलं आहे. पेपरवेटसारखा मी त्याचा उपयोग करतो.

आता परत निघणं आवश्यक होतं. एवढ्या दूर येऊन इथं आपण फार वेळ भटकू शकलो नाही, वेळेअभावी फार काही पाहू शकलो नाही, म्हणून मला फार हळहळ वाटत होती. खरं तर इथं दोन-तीन दिवस राहायला हवं होतं. कधी पायी, कधी होडक्यातून, कधी हत्तीच्या पाठीवरून हिंडायला हवं होतं. मानसमध्ये केवढा तरी समृद्ध निसर्ग होता किती पाखरं होती, किती प्राणी होते आणि मी काहीच बघू शकलो नव्हतो. एखाद्या उत्तम नाटकाला पाच-दहा मिनिटं बसल्यावर, थिएटरमधून उठून यावं लागल्यावर जशी हळहळ वाटते, तशी वाटत होती.

धावपळ करीत गौहत्तीला येऊन दुपारी दीडचं विमान पकडलं, तरीही हा विषय मनातून गेला नाही. मनोमनी मी निश्चय केला :
' अगदी सावकाशीनं परत एकवार मी मानसला येईनच येईन ! '

[' केसरी ', पुणे : रविवार आवृत्ती : २० नोव्हेंबर १९७५, ७, २१ व २८ डिसेंबर १९७५, ४, ११ व १८ जानेवारी १९७६. ]


# कांचनमृग

कोणत्या ना कोणत्या निमित्तानं आजवर मी अनेक डाकबंगल्यातून राहिलो आहे. कोणी म्हणाल, कंटाळा आला पण जाव कुठं ?—तर मी सांगेन, डाकबंगल्यात. डाकबंगला ही संस्थाच मोठी लोभस आहे. आधी, गाववस्तीपासून दूर, उंचवट्यावर, नदी, ओढा, तळं ह्यांच्या काठाशी अशी जागा निवडलेली असते. आजूबाजूला खूप मोकळं आवार असत. वडापिंपळासारखे जुने जुने वृक्ष, सुगंधी फुलबागा ह्यांनी हे आवार रम्य वाटत. नाना पाखरं इथं वस्तीला असतात. डाकबंगल्याचं बांधकामही अगदी खास डाकबंगल्याचंच असत; आणि जेवढा जुना बंगला, तेवढं त्याचं बांधकाम उत्तम. सौंदर्य आणि सोय—दोन्हीलाही काही उणं नाही. सोय इतकी, की बाहेर भटकून तुम्ही आलात, तर बुटांना लागलेला चिखल काढण्यासाठी पायऱ्यांशी एक लोखंडी साधन कायमचं उभं केलेलं. आराम ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची, हे सूत्र ध्यानी घेऊन केलेलं तिथलं ऐसपैस फर्निचर, ऐसपैस दार, खिडक्या, भिंतींची उंची आणि रुंदी. ऐसपैस व्हरांडा आणि हाकेच्या अंतरावर असलेलं चौकीदाराचं घर, स्वयंपाकघर आणि तिथला तो मुर्गीबरोबर साहेबालाही बनविण्यात कुशल असा खानसामा.. वाहवा! गावात असून गावचं नाही, आजूबाजूला गर्दी नाही, पण भयाण एकटेही नाही, असे इथे आपण अगदी सुखात राहू शकतो. अवघड वाटावं, अशी, हात पडेल तिथं सोयही नसते आणि खोळंबून राहावं, अशी गैरसोयही नसते. थोडी सोय, माफक गैरसोय. एकान्त, पण हाक देईल, तेव्हा तैनातीला माणूस हजर. बऱ्यापैकी जेवण, वारा, थंडी, ऊन, पाऊस, अंधार, चांदणं, रुखरुख, आणि सहसा दुर्लभ असं स्वातंत्र्य—असं सगळं हवं हवं ते डाकबंगल्यात असत. तात्पर्य काय, डाकबंगल्याला पर्याय नाही. आणि असा हा डाकबंगला फॉरेस्ट खात्याचा असला, तर काय, सोन्याहून पिवळं!

नागपूरपासून शंभरअधिक मैलांवर, भंडारा जिल्ह्यातल्या नागझिरा अभयारण्यातला फॉरेस्ट बंगला ही तर अद्भुत वास्तू आहे!

नवेगाव बांध, इटिहा डोह, पालादूर, पवनी...असा जंगलांतून, गोंड वस्तीतून,

जलाशयाच्या काठाकाठावरून प्रवास करत, धुळीने माखलेले अंग घेऊन मी नागझिराला आलो आणि फॉरेस्ट बंगला पाहिला, तेव्हा सगळा शीण गेला. ' धन्य ती पंढरी, धन्य भीमातीर ' अशी चित्तवृत्ती झाली. सोबतीला नवेगाव बांधचे मारुती चितमपल्ली होते. त्यांनीच मला आवर्जून बोलावून घेतलं होतं. ' लवकर या. फेब्रुवारीच्या अखेरीला इथले वनसौंदर्य मावळू लागते, रम्य झिलाने सुकू लागतात '—असे त्याचं तातडीचं पत्र जानेवारीतच मिळालं होतं, तरी मला चाकरमान्याला जाईजाईतो फेब्रुवारीचा मध्य



उजाडला होता. प्रवासात ‘ वाचलेली पुस्तकं ’ ह्याशिवाय दुसरा विषय नव्हता मी काय वाचलं, तुम्ही काय वाचलं, यावर बोलता बोलता सगळी वाट ओसरली होती.

आंघोळी उरकून ताजेतवाने झालो. गॅलरीत बसून चहापाणी करतो, न करतो, तोच चितमपल्लींनी चौकीदाराला हाक दिली आणि इथल्या लायब्ररीतली भाराभर पुस्तकं पुढ्यात येऊन पडली. वन्य प्राणी, पक्षी, झाडंझुडं यांच्यावरची दुर्मीळ अशी नाना पुस्तकं होती. कोण्या रसिक अधिकाऱ्यानं प्रवाशासाठी ही सोय इथं केली, त्याला मी शतशः धन्यवाद दिले. अधाश्यासारखा मी पुस्तकं चाळीत राहिलो.

संध्याकाळ झाली.
चितमपल्ली म्हणाले,
“ चला, जीपमधून जरा फेरफटका मारून येऊ. नशिबात असल, तर काही दिसेल. ”
“ काय ? ”
“ वाघ, बिबळ्या, अस्वल, कांचनमृग, नीलगाई, अस्वल—काहीही. ”
पुस्तकांचा लोभ सोडून मी उठलो.
नागझिरा अभयारण्यातून, वन्य प्राणी पाहण्यासाठी म्हणून खास गोलाकार असा जीपचा रस्ता काढलेला आहे. खाचखळग्यांच्या, चढउताराच्या ह्या अरुंद रस्त्यावरून जीप धावू लागली. आम्ही दोघही ड्रायव्हरशेजारी बसून सारखं डाव्याउजव्या बाजूला बघत राहिलो. काळोख झाला मागे तोल सावरीत उभा राहिलेला फॉरेस्ट गार्ड हातातल्या सर्चलाइटचा झोत इथतिथं टाकू लागला आणि बऱ्याच वेळानं झमकन् डोळे चमकले.
हलक्या आवाजात कुजबूज झाली,
“ काय ? ”
“ बायसन, बायसन—जरा पुढं घ्या गाडी, हां—थांबा, थांबा. ”
“ कुठं—? ”
“ ते बघा—एक, दोन, तीन. तीन आहेत, तीन ! ”
अंधारात अंतराचा चकवा नेहमीच पडतो. शिवाय फॉरेस्ट गार्ड गाडीत उभा होता. त्याच्याइतकी उंची प्राप्त झाल्याशिवाय काही दिसणं शक्य नव्हतं. घाईगडबडीनं मीही जीपमधे अवघडून उभा राहिलो.
दूरवर नुसते डोळे दिसले, अस्पष्ट अंग दिसली.
गार्ड वर्णन करत होता,
“ एक काळा आहे, दोन तांबडे. ”
म्हणजे एक पुरी वाढ झालेला आणि दुसरे दोन्ही तरणे खोंड असावेत. फार वेळ अंगावर झगझगीत प्रकाश घेऊन गव्यासारखा लाजाळू प्राणी उभा राहणं अशक्य. वळून

ते दाट झाडीत शिरले.
ठीक आहे. अस्पष्ट का होईना, काही दिसलं.
पुढं काही अंतरावर चार कांचनमृगांचं टोळकं दिसलं. ते बराच वेळ उजेडाकडे बघत उभं होतं.
—आणि पुढं दोन नीलगाई दिसल्या.
पुन्हा काही कांचनमृग.
पुन्हा गवे
पण ही सगळी मंडळी दाट झाडीत, रस्त्यापासून आत अशी दिसली. काजव्यासारखे नुसते अनेक हिरवे डोळे दिसत.

जंगल बघण्याचा हा प्रकार मला विशेष बरा वाटला नाही. जीपचा घरघराट, दिव्याचा झोत, आमची कुजबूज ह्यामुळं बापडे कांचनमृग आणि गवे, नीलगाई हबकून गेल्या असतील. त्यांचा डौल, रंग, त्यांचं हलणं हे सगळं असं अंधारात काय दिसणार? ह्यापेक्षा सकाळ-संध्याकाळ हत्तीवरून रपेट मारण्याची सोय जर इथं असती, तर कितीतरी बघता आलं असतं.

बऱ्याच उशिरा बंगल्यावर परतलो.
नागझिराला अजून एक गोष्ट बरी आहे, वीज नाही. कंदील, शामदान, गॅसबत्ती अशी सगळी प्रकाशयोजना होती. हॉलमध्ये बत्ती, बाथरूममधे कंदील, झोपायच्या खोलीत शामदान. बरं वाटलं. आजूबाजूला गाव, बाजारपेठ काही नाही. त्यामुळं इथं येताना सगळा कोरडा शिधा बरोबर घेऊन यावं लागतं. चितमपल्लींनी ते केलं होतं. पेट्रोलच्या कॅन्सबरोबर दूध, कांदेबटाटे, पीठ, मीठमिरची, तेल आणि स्वयपाकी असं सगळंच साहित्य त्यांनी जीपमधे भरलं होतं.
आम्ही फिरून येईतो जेवण तयार होतं. जेवलो आणि पुन्हा पुस्तकात नाकं खुपसून अंथरुणावर पडलो.
फार दिवस मी शोधत होतो, ते जॉर्ज शेल्लरचं दुर्मीळ पुस्तक—' दि डिअर ॲंड दि टायगर '—इथं, अचानक माझ्या हाती पडलं होतं. कान्हाकिसली ह्या अरण्यात चौदा महिने काढून ह्या थोर अभ्यासकानं लिहिलेला हा ग्रंथ अप्रतिम होता.
मध्यानरात्र उलटली, तरी शामदानाच्या मंद उजेडात मी कान्हाकिसलीच्या जंगलात भटकत होतो. वरचेवर दुर्बीण डोळ्याला लावून बघत होतो. कांचनमृगाचे, बारशिंगाचे कळप न्याहाळत होतो. वाघिणीच्या मागे दबत दबत जात होतो.
वाचता वाचता डोळे जड झाले. अक्षरं दिसेनात.
आजूबाजूच्या जंगलात नाना आवाज होत होते.

ह्या फेब्रुवारीचा मध्य होता. माजावर येऊन, माना गलेलठ्ठ झालेले कांचनमृगाचे नर वरचेवर डिरक्या टाकीत होते. आवाज अगदी जवळून येत होता—बहुधा समोरच्या तलावापलीकडे जी झाडी होती, तिच्यातच आता ही उलाढाल चालली असावी. पुस्तकातील वर्णन, प्रत्यक्षातले आवाज, जंगलातला प्रवास आणि रात्रीचा मुक्काम ह्या सगळ्या गोष्टी एकमेकांत मिसळून वास्तव आणि कल्पना यांचं काही विलक्षण मिश्रण तयार झालं होतं. त्यात डुबता डुंबता मी केव्हा खोल बुडालो आणि गाढ झोपलो, ते समजलं नाही.

सकाळी जागा झालो, तेव्हा पाखरं मंजुळ गात होती. वरच्या मजल्यावर असलेल्या झोपायच्या खोलीतून उठून मी गॅलरीत येऊन उभा राहिलो. माठातल्या, वाळ्याचा वास असलेल्या पाण्यासारखी हवा सुखद, थंड आणि सुगंधित होती. अजून पुरतं उजाडलं नव्हतं. समोर तलावावर विरळ धुकं तरंगत होतं. दहिवरानं ओली झालेली बागेतली उंच उंच झाडं अजून स्तब्ध उभी होती. हिरवळीच्या पट्ट्याचे काठ निळ्यापांढऱ्या, पिवळ्यातांबड्या फुलांनी लखलखत होते.
सूर्योदय झाला आणि पुन्हा आम्ही जीप घेऊन बाहेर पडलो.

सात वाजण्याचा सुमार झाला. जंगलातून बाहेर पडून कांचनमृग आता मोकळ्या गवतात चरू लागले होते. बऱ्याच माद्या आणि वर्षाभराची पोरं दिसली. कुठं एखादा शिंगाड्या नर दिसला. सकाळच्या कोवळ्या उन्हात उंच उंच गवतातून माना वर करून, कान पसरून चकित मुद्रेनं ती जीपकडे बघत होती. तासा-दीड तासात जागजागी भेटलेल्या कळपात एकूण एकोणीस हरणं मी मोजली. ऊन तापू लागलं, तेव्हा पुन्हा ती जंगलात सावलीला परतली. आता आली, तर दुपारी चारच्या सुमाराला ती बाहेर येणार होती, नाहीतर मग संध्याकाळी पाचनंतर. पावसाळ्यात आभाळ ढगांनी झाकळलेलं असतं, अशा शिरवळीच्या वेळी मात्र बराच वेळ ती उघड्यावर चरतात.
मधे वाटेवर गप्प बसून राहिलेली वानरं दिसली. झाडावर न्याहरी आटपून ती उन्हाला आली असावीत. खेडेगावातील रिकामी मंडळी जशी पटांगणात उगीच उन्हाला बसून राहतात, तशी ही वानरं, हालचाल न करता बसून होती. जीप थांबवून, पिशवीतली वही काढावी आणि भराभर रेखाचित्रं काढावीत, असं मला फार वाटलं, पण इतरांना उगीच थांबावं लागेल, ह्या संकोचानं मी गप्प राहिलो.
जिथं कांचनमृग आहेत, तिथं वानरं असणारच. ते कांचनमृग आणि हे शाखामृग—पण दोघांत चांगलं सख्य असतं. कांचनमृगाचा काय फायदा ही वानरं उठवतात, कोण जाणे, पण कांचनमृगांना मात्र वानरांमुळं चांगलंचुंगलं खायला मिळतं. भोकर, आवळा, जांभूळ, उंबर असल्या झाडावरून वानरांचा कळप हिंडतो, तेव्हा नेहमीचा गवताचा चारा सोडून

कांचनमृग ह्या झाडांखाली गोळा होतात आणि वानरांनी अर्धवट खाऊन टाकलेली, त्यांच्या उड्यामुळे फांद्या हलून टपाटपा खाली पडणारी ताजी, रसाळ फळं गचागचा खातात. आवळ्यांनी त्यांची दोन्ही गालफड टम् होतात आणि तोंडातून रस ओघळत राहतो. ह्या अप्रूप झाडाची, तोंडाला न येणारी कोवळी पालवीसुद्धा वानरामुळंच त्यांना मिळते. जांभळाच्या झाडावर वानरांचा कळप जोगावतो आहे, मोठी वानरं, माद्या, त्यांच्या पोटाला चिकटलेली पोरं यांचा दंगा वर चालला आहे आणि खाली धावून धावून कांचनमृग येताहेत, वर पाहताहेत,



झाळ्या, जांभळांचे घोस खाली पडताच त्यांवर तोंड टाकताहेत . एवढ्यात शेंड्यावरचा मोठा ठोल्या वानर गप्प होतो. त्याला दुरून येणारा विबळ्या दिसतो. हूर् हूपच्या ऐवजी खकर खक्, खकर खक् असा इशारतीचा आवाज तो करतो आणि त्यासरशी आईच्या काखा सोडून थोडी दूर झालेली पोरं धाईगडबडीन आयाच्या पोटाला चिकटतात. खालच्या झाळ्यावरची वानर वर, उंच उंच जातात. दोन पायावर उभी राहून दूर बघू लागतात. वानरी थोड्यासारख्या जागच्या जागी गप्प राहतात आणि तोंडात जांभळाचे घोस घेतलेला कांचनमृगांचा कळप टाण् टाण् उड्या घेत विरुद्ध दिशेला उधळतो. वानरांनी दिलेला इशारा त्यांना बरोबर कळतो.
बरीच हरणं, वानर, काही नीलगाई बघून आम्ही पुन्हा मुक्कामावर आलो. जेवणं उरकली. मी पुन्हा पुस्तकात शिरलो.

तिसरा प्रहर झाला. चितमपल्ली म्हणाले,
" चला, तलावाच्या पलिकडच्या टोकाला दोन टेकड्यामध्ये एक चांगला वॉच-टॉवर आहे. जनावर पाण्यावर येतात, त्या जागी बांधलेला. जाऊन तिथं बसू या. "
बसू या, तर बसू या. चला.
निघालो. बरोबर टिपणवही, दुर्बीण घेतली.
डाव्या बाजूचा नाला पार करून पुढे गेलो. झाडाझुडानी भरलेल्या टेकडीच्या पायथ्यानच पाऊलवाट गेलेली होती. हळूहळू बोलत जात होतो. एवढ्या दिवसाउजेडी समोर काही जनावर दिसेल, याची मुळीच कल्पना नव्हती मला. तिन्हीत्रिकाळ जंगलात राहणाऱ्या चितमपल्लींनाही नव्हती. आमच्या पायांचे आवाज होत होते. तोंडाचेही होत होते. तलावाच्या अगदी टोकाशी, डाव्या बाजूला, चांगल्या अडचणीच्या जागी मुद्दाम जनावरं पाहण्यासाठी बांधलेल्या टॉवरकडे ही पायवाट जात होती.
वळणावर आलो आणि ध्यानीमनी नसताना ' पुक् , पुक् ' असा पिठाच्या गिरणीचा व्हावा, तसा आवाज झाला. कांचनमृगाचा कळप उधळला. दिसेनासा झाला. दोघांची अंगं तेवढी मला दिसली.
चकित होऊन मी जागच्या जागी उभा राहिलो.
वाटलं, थोडं सावकाश कानोसा घेत आलो असतो, तर हा सगळा कळप मला न्याहाळता आला असता. टेकडीवर चढून, थोड्या उंच जागी बसलो असतो, तर केवढं तरी नाट्य माझ्यासमोर घडताना मला दिसलं असत.

ऋतुकालानुसार कांचनमृगांच्या कळपाचा आकार लहानमोठा होत राहतो. साधारणतः पाच ते दहा जनावर एका कळपात असतात. माजाच्या काळात एखादा मोठा शिंगाडा, काही लहान नर, माद्या आणि अजून आईची पाठ न सोडलेली पोरं. पण हे दृश्य



नेहमीच दिसेल, असं नाही. असे एकत्र राहण्यापेक्षा सवतेसुभे करून राहण्याकडेच जास्ती कल असतो. नराचा घोळका वेगळा आणि माद्या–पोर यांचा घोळका वेगळा. वयात आलेले नर माजावर आले, म्हणजेच माद्या-पोराच्या कळपात घुसतात.

माजावर आलेल्या शिंगाड्याची मस्ती पाहण्यासारखी असते. वरचेवर तो घोगऱ्या आवाजात डिरकत असतो. शिंगानं माती उकरतो. गवताच्या, झाडाझुडोऱ्याच्या मुळ्या शिंगात अडकून मुंडावळ्या लोंबताहेत, अशा अवस्थेत, लष्ठ मानेनं तो सारखा मादी

शोधत हिंडत असतो.

वयात आलेल्या मादीपाशी जाऊन तिच्या निरणाला नाक लावतो. असा स्पर्श झाला, की मादी खळाखळा मुतते. ते ओठावरून ओघळताच हा वर तोंड करून ओठ मुडपून नाकाला लावतो. त्या वासावरूनच त्याला ही मादी माफेवर आहे, का नाही, हे कळतं. नसली, तर तिचा पिच्छा सोडून तो दुसरीच्या मागे लागतो. ती माफेवर येऊ घातली आहे, हे कळताच प्रणयाराधन सुरू होतं. तिच्या मागोमाग सारखं हिंडायचं, ती जोगावून कुठं टेकली, की शेजारी अंगाला अंग घासून आपणही पाय मुडपून बसायचं.

मादीही नाना हुलकावण्या देते. त्यानं हिच्या पाठीच्या टोकाशी हनुवटी टेकली, की ही दोन पावलं पुढं पळते. उधळते. आणि तो नाही मागे आला, तर गोल चक्कर टाकून आपण त्याच्यापाशी येते. असा खेळ कित्येक तास चालतो. आणि शेवटी जेव्हा नर पाठीवर हनुवटी टेकतो, तेव्हा शेपूट वर करून, पाठीची कमान वर उचलून मादी एका जागी स्थिर उभी राहते.

वाकून वाकून आम्ही पायाच्या खुणा पाहिल्या. बरीच जनावरं कळपात असावीत. आम्ही येण्याअगोदर सगळा कळप इथं पटांगणात खेळत असला पाहिजे.

बांधावरून घसरणीला लागून आम्ही खाली उतरलो. ही अगदी सुरेख जागा होती. सभोवार सरळसोट वाढलेल्या झाडाचे बुंधे आभाळात उंच उंच गेले होते. सुसरीच्या पाठीप्रमाणं खोडं असणारे निळेकाळे ऐन वृक्ष, पांढऱ्या खोडाचा धावडा वृक्ष, तेंडू आणि बिजा ह्या उभ्या खांबांच्या पायतळी नाल्याच्या आकाराचं पाण्याचं डबकं आणि त्यावर नजर ठेवून बसता येईल, असा, पंचवीस-तीस फूट उंचीचा लोखंडी टॉवर.

पायऱ्यावरून चढून आम्ही वर गेलो आणि हत्तीवरच्या हौद्यात जमवावी, तशी बैठक जमवली.

खालचं पाणी आरशासारखं चमकत होतं. पाननिवळे किडे त्यावर रेघा, वर्तुळं काढत होते झाडाची पिवळी पानं अधूनमधून शेंडा सोडून खाली गिरगिरत उतरत होती. पाण्यात पडत होती. वर्तुळं उठत, विरत होती.

पाखरांचे आवाज होत होते. आधी काळ्या कोतवालानं हाक दिली. मग लाजरा भारद्वाज घूत्कारला. जरा वेळानं तांबूट, मग पोपटांनी कलकलाट केला. मागोमाग सातबायांचा कर्कश गलका ऐकू आला. चितमपल्लींचं निरीक्षण असं, की पाखरांच्या ओरडण्यातही क्रम आणि संगती असते. कोण कोणत्या वेळी ओरडणार, हे निश्चित असतं.

हे ओळखीचे आवाज त्या निबिड अरण्यात किती तरी वेगळे आणि जोरदार वाटत होते. ह्या सगळ्या आवाजावर, माजावर आलेल्या कांचनमृगांचा जोरदार आवाज मधूनच उठत होता. बिनमाहीतगारानं हे काय ओरडत आहे, म्हणून दचकून जावं, इतका जोरदार आणि भय उत्पन्न करणारा. एकापाठोपाठ एक असे तीन-चार आवाज होत आणि लगेच

पार त्या टोकाकडून दुसरा नर तसाच आवाज देई.

संध्याकाळ होत होती. ह्या पाण्यावर आता कोणतही जनावर येण्याची शक्यता होती. आम्ही धोंड्यासारखे गप्प बसून होतो. बराच वेळ पाण्यावर काही आलं नाही. आम्ही दोघेही पाण्याकडे तोंड करून बसलो होतो. मी हळूच फिरलो आणि पाण्याकडे पाठ करून समोर बघत राहिलो.

समोरून लहानशी पाऊलवाट डोंगराकडे गेली होती. मावळत्या सूर्याचे किरण झाडाच्या शेंड्यांतून घुसून ह्या वाटेच्या अगदी टोकाशी, स्पॉटलाइट टाकावा, तसे पडले होते. गर्द सावलीतील तेवढाच भाग उजळून निघाला होता.

पार पलीकडे, माझ्या उजव्या बाजूला, रेस्टहाउसच्या दिशेला कॉलेजयुवकांची टोळी सहलीला आली असावी. त्यांच हसणं-बोलणं आमच्या कानावर येत होतं.

सावकाशपणे एक मादी झुडपातून बाहेर आली आणि त्या स्पॉटलाइटमध्ये येऊन उभी राहिली. शेपूट ताठ करून आणि कान उभारून मादी आवाजाचा सावट घेत होती. तिच्यामागोमाग एक चपळ पोर आलं. त्याचा जन्म बहुधा गेल्या वर्षीच झाला असावा. डोंगराच्या दिशेन ती मायलेकर वर सरकली. लगेच मागोमाग आणखी दोन माद्या आल्या. त्याच जागी थबकून पुन्हा पुढं दिसेनाशा झाल्या. पोर आणि माद्या. पोर. पुन्हा मादी. अशी सात-एक जनावर गेली. थोडी शांतता आणि मग मागोमाग प्रचंड शिंगांचा एक मस्तवाल नर. एखादा फॅशन-शो पाहावा, तसा मी ही सगळी परेड बघत होतो. आम्ही बसलो होतो, त्या जागेपासून वीस एक यार्डांवरून वारवार कांचनमृग जात होते. आणि मधूनमधून नर च डिरकणं चालूच होतं.

दिवस पार उतरला पाखरं शांत झाली. अंधारून आलं. अगदी शेवटी शेवटी बुर्रर्र, धुर्रर्र, बुर्रर्र असा ठिपक्या होला ओरडला आणि सगळं जंगल शांत होऊन रातकिड्यांनी सूर लावला.

आता फक्त संधिप्रकाश राहिला होता.

कुठून तरी एक नाइट हेरॉन आला आणि डबक्याकाठी उतरला. माशावर डोळा ठेवून बसला. अगदी आवाज न करता, चोरासारख्या त्याच्या हालचाली सुरू झाल्या. सावकाश एकएक पाऊल पाण्यात, मान मागं, एकदम थांबून पुढं. स्तब्ध.

सूर्य मावळल्यावर, कधी एकाकी वाट तुडवताना 'क्वार्क्' असा कर्कश आवाज येतो. दचकून वर पाहावं, तर नाइट हेरॉनच्या काळ्या सावल्या डोक्यावरून उडत जाताना दिसतात. दिवस मावळला, की त्यांना उजाडतं. दिवसभर कुठं तरी झाडाच्या सावलीला खांदे उंचावून झोप घेणारे नाइट हेरॉन थोळक्यानं किंवा एकटे एकटे मच्छीमारीसाठी बाहेर पडतात.

संध्याकाळ झाली होती. पाण्याकाठी बसलेल्या नाइट हॅरॉनचे लालचुटूक डोळे, पिवळेनारिंगी पाय, काळी पाठ, काही दिसत नव्हतं.
चार–दोनदा त्यान पाण्यात चोच मारली. काही मिळालं, की नाही, कळलं नाही. तो उडून मोठ्या पाण्याकडे गेला. क्षणभर, सोबत गेली, असं वाटलं.

आता पाणी काळवंडलं होत. जंगल शांत होत. रातकिड्यांचं समूहगान तेवढं चालू होत. पाण्यावर जनावर येण्याची काही आता शक्यता दिसत नव्हती. एवढ्यात घारीएवढ्या आकाराचं, विटकरी रंगाचं घुबड सावलीसारखं आलं आणि पाण्याकाठी उतरलं. बराच वेळ धुंडून त्यालाही काही शिकार मिळाली नाही. तेव्हा उडून झाडीत दिसेनासं झालं.

घड्याळात साडेसात वाजून गेले होते. म्हणजे एखादा चित्रपट पाहावा, तसे हे पाणी पाहत आम्ही दोघं इथं तीन तास बसलो होतो. येताना विजेरी घेऊन यावी, हे भान न राहिल्यामुळं, अंधाराआधी रेस्टहाऊसवर पोचणं जरूरीचं होत.
टॉवरखाली उतरून, आल्या वाटेनं परत रेस्टहाऊसकडे आलो.
वाटेत रात्रीच्या मुक्कामासाठी जागा पसंत करणारा एक मोठा रानकोंबडा आढळला.
अंथरुणात पडल्यावर रात्री उशिरापर्यंत शिंगाड्या नराचं डिरकणं ऐकू येत होत.

मुक्काम संपला.
दुसरे दिवशी भल्या सकाळी उठून आम्ही परतीची वाट धरली. आता इथून भंडारा, मग नागपूर आणि रेल्वेनं पुणं.
सकाळच्या हवेत, टवटवीत ताज्या जंगलात, इथं तिथं काञ्चनमृग पुन्हा दिसले.
दचकून पाहणारा नर. शेपूट उभारून पळण्यापूर्वीचा दृष्टिक्षेप टाकणाऱ्या माद्या. बिट्टीबिट्टी पोरं. एकूण नागझिरा म्हणजे काञ्चनमृगाचंच अभयारण्य होत.
दोन्ही बाजूंनी जंगल असलेल्या वाटेवरून जीप धावत होती.
मी मनात म्हणत होतो .
डिसेंबर-जानेवारी ह्या काळात काञ्चनमृगाचे नर माजावर येतात. इथं हा काळ थोडा लांबलेला दिसतो. नागझिरा जंगलातले नर अजून माजावरच आहेत. आठ, साडे आठ महिन्यांनी, आज गाभण राहिलेल्या माद्यांना पोरं होणार.
व्यायच्या आधी तीन-एक दिवस मादी कळपातून बाजूला होते. दाट जाळकटी, उंच गवत अशी एखादी दडणीची जागा हेरून तिच्या आसपासच घुटमळत राहते. वेळ आली, की गर्द जाळकटीत जाऊन पोर टाकते. जंगलातल्या ह्या धकाधकीच्या मामल्यात पोराला फार काळ बाळपणा भोगता येत नाही. आईच्या पोटातून बाहेर पडल्यापासून अर्ध्या तासातच ते आपल्या लांबलचक पायावर उभं राहण्यासाठी धडपडू लागत आणि तासा–

सभ्यातासात डुगडुगत उभंही राहत. एक दिवसाच वय झालं, रे, झालं, की दुसऱ्या दिवशी ते चालतं, पळत आणि उड्याही हाणत !
आई आपल्या नव्या बाळाला वारंवार चराचरा चाटते. ह्या चाटण्यामुळच पोराला आपली आई ओळखता येते. एरवी ते कुणाही मृगामागं धावत. असे ते धावलं, की आई तात्काळ जाऊन त्याला चाटते, पुढं चालू लागते आणि मग पोराला कळत, की ही आई—हिच्यामागं जायच.
दहा दिवसांचे झालं, की पोर कळपातून आईमाग जात. कांचनमृगाचा कळप पाण्यावर गेला आणि परतला, की ह्या गडबडीत अशी लहान पोर पुष्कळदा चुकतातही.
शेल्लरने कान्हापार्कमधला एक प्रसंग सांगितला आहे :
' पाण्यावर आलेला एक कळप पाणी पिऊन गेला, दरम्यान दुसरा कळप येऊन गेला
—आणि नतर पाण्यावर आलेल्या पंचवीस वानराच्या घोळक्यात एक गोंधळलेलं पोर उभ असलेल मला दिसलं. '
चुकामूक झालेल्या मायलेकराची भेट पुष्कळदा दुसऱ्या दिवशी होते. कधीकधी होतही नाही. अजगराच्या विळख्यातून, गरुडाच्या झडपेतून, वाघ-बिबळ्या-तरस याच्या दाढेतून वाचली, तर अशी पोरकी पोर दुसऱ्या माद्या दत्तक घेतात. एका मादीपाठोपाठ कधीकधी दोन-दोन, तीन-तीन पोर हिंडताना दिसतात.

जंगल संपून आता नागपूरकडे जाणारा हमरस्ता लागला होता. मैलामागून मैल मागे पडत होते, गावं येत होती, जात होती. माणसांचं जग सुरू झालं होतं.
मी मात्र कांचनमृगाच्याच मागं हिंडत होतो.

[ ' मौज ' दिवाळी अंक १९७६ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
ग्रा. क्र. 2??220

# नवेगाव बांध : पाऊलखुणा

> ' सामान्यतः जो अर्थ गृहीत धरला जातो, त्या अर्थानं मी पशूंना हिंस्र समजत नाही. त्याच्याकडे मी एवढा ओढला गेलो, याचं कारण त्याच्या तोंडून मी कधी मूर्खपणाचं वक्तव्य ऐकलं नाही. '
>
> —थोरो

रात्री मधेच कधीतरी जाग आली. फॉरेस्ट बंगल्याच्या चौकीदारानं बांबूच्या छड्यांचे आधार देऊन खुबीनं उभ्या केलेल्या मच्छरदाणीत मी होतो. बारीक करून कोपऱ्यात ठेवलेल्या कंदिलात थोडी धुगधुगी बाकी होती. डोक्याकडे असलेल्या खिडकीतून थडगार चंद्रप्रकाशाचा चौकोन जमिनीवर, भिंतींवर पसरलेला होता.

हळूच उठलो, पलिकडच्या खाटल्यावर झोपलेल्या मित्रवर्य मारोतराव चितमपल्लींची झोपमोड होऊ नये, अशा बेतानं दार उघडलं आणि बाहेर व्हरांड्यात आलो अंगणात उतरलो, फाटक उघडून उघड्यावर आलो.

आजूबाजूला फुललेली आमराई होती. डाव्या बाजूला मोहरानं फुलून गेलेली आंब्याची झाडं निश्चल उभी होती. मंजिऱ्याचा सुगंध सर्वत्र दरवळून उरला होता. शेजारी शेजारी उभ्या अशा दोन उंच आंब्याच्या काळ्या आकृतींमधून पलीकडे वाटोळा चंद्र दिसत होता आणि दुरून तनमोराचा टाहो पुन्हा-पुन्हा कानी येत होता.

हा फेब्रुवारीचा मध्य होता. तनमोराचा हा अंडी घालण्याचा काळ होता. मीलनोत्सुक अशा पक्षिणीचा टाहो समोर पसरलेल्या विस्तीर्ण जलाशयावरून सरसरत दूर जाऊन विरत होता.

एकाएकी मला एवढा उत्साह वाटला, की पंख फडफडवीत आणि मान फुगवून उंच बांग द्यावी !

भंडारा जिल्ह्यातल्या ' नवेगाव बांध ' ह्या राष्ट्रीय उद्यानातून गेले दोन-तीन दिवस भटकत होतो. सांग, धावडा, गराडी ऐन, साजा, मोहा, बांबू अशा वृक्षविशेषांनी, आणि त्यांना

वेढून राहिलेल्या लतावेलींनी काळोखी आणलेल्या ह्या वनातून हिंडताना मला विलक्षण आनंद होत होता.
जंगलातील अरुंद वाटेवरून पळत असलेल्या आमच्या जीपसमोरून कधी चकोतऱ्या तुरगत जात, तर कधी मोठ्या सोग्याचे मोर माना उंच करून सावट घेत उभे असलेले दिसत. लगेच मारोतराव सांगत,
" ग्रे आणि रेड जंगल फाऊल ह्या दोन्ही जाती सहसा एकत्र नसतात, पण इथं त्या आहेत, बर का ! "

माझं मन एकदम भरारून खूप मागे गेलं. नवी बंदूक माझ्या हाती आली होती. कारवार-कडे गुंजावती गेमब्लॉकमध्ये आम्ही दहा-बारा जण शिकारीला गेलो होतो. बांबू फुलावर आला होता आणि त्याच्या बियांवर ताव मारण्यासाठी प्रचंड संख्येनं रानकोंबड्या आणि कोंबडे आले होते.
जंगलातला कोंबडा हा भलता हुशार पक्षी असतो. बांबूच्या बेटातून फिरताना तो इतकी सावधानी बाळगतो, की भल्या भल्या शिकाऱ्याची त्याला टिपताना अब्रू जाते. त्यात, जयंतराव टिळकांनी आम्हा नव्या पोरासाठी पैज लावली होती
कोंबडा मारील, त्याला एक रुपया बक्षीस !
रोज सकाळी आणि संध्याकाळी मी दोन्हींकडे बांबूची दाट बेटं असलेल्या वाटेवरून फेरफटका घेई आणि कोंबडा मारण्याची खटपट करी. अनेकदा कोंबडे दिसले, आणि बंदूक सुधारायच्या आत बांबूच्या बेटाआड झाले. फक्त एकदाच एक सुरेख कोंबडा टप्प्यात आला. त्याला मी दिसलो नव्हतो. एक बेटाआडून माना काढून काढून तो बघे आणि भरकन् दुसऱ्या बेटाआड जाई. लपत लपत मी वारुळाच्या आडोशाला छपलो. नीट दिसेना, म्हणून वारुळावर चढून दोन पायांवर बसलो, आणि तेवढ्यात हा टप्प्यात आला. नेम धरून मी बार घातला आणि सैल धरल्यामुळं बंदुकीच्या दस्त्याचा असा दणका छातीला बसला, की वारुळावर निसमाळ्या बसलेला मी, बंदूक छातीवर घेऊन उताणा मागे कोसळलो. तिकडे कोंबडा फर्रकन उडूनही गेला. आजूबाजूला कोणी नसतानासुद्धा मी विलक्षण ओशाळून गेलो. एका नवशिक्या पोराची फजिती बघून तो कोंबडा पोट धरधरून हसला असेल.
पंधरा दिवसाच्या त्या मुक्कामात मला फक्त एक लहानशी कोंबडी मारता आली, पण तिला बक्षीस नव्हतं !
ह्या गोष्टीला तीस वर्षं उलटून गेली होती.

आता मी शिकारी उरलो नव्हतो. पाठीशी बंदूक नव्हती. गळ्यात फक्त दुर्बीण होती. ह्या जंगलाचा भूगोल माझ्या परिचयाचा नव्हता. कुठून कुठं चाललो आहोत, काही कळत

नव्हत.

पवनी नावाचं लहानसं गाव वाटेत लागलं. इथले जिम कारबेट माधवराव पाटील, धोतराचा काच्या मारून आणि खाकी शर्ट घालून आमच्याबरोबर हिंडायला आले. त्यानीही आता हत्यार टाकलं होतं. गेली तीस-चाळीस वर्षं जंगलातून हिंडल्यामुळं ही सगळी भूमी त्याना तळहातासारखी माहीत होती. आजतागायत ह्या शिकाऱ्यानं पायांत काही पादत्राण वापरलं नव्हतं. आजही ते अनवाणीच आमच्याबरोबर हिंडत होते. जंगलातल्या गच्याळ वाटांवरून कौशल्यानं जीप चालवीत होते.

मधेच पायउतार होऊन त्यानी मला, विद्वानाच्या भेटीला न्यावं, तसं एका वृक्षाच्या भेटीला नेलं. वाट काढीत काढीत आम्ही एका नाल्याच्या काठी आलो. ओल्या मातीत खूप रुतलेले गव्याचे खूर लागले, अगदी ताजे. एकुलता असा हा काळा गवा असला पाहिजे. दाट जंगलात राहणारा गवा दृष्टीला पडणं कठीणच. सहा फूट उंची आणि दोन हजार एकाहत्तर पौंडापर्यंत वजन, चमकदार काळा रंग, चारी पाय मात्र मोजे घातल्यासारखे पांढरे. असा गवा म्हणजे जंगलाचं भूषण असतं. तरणेबाड गवे गर्द किरमिजी रंगाचे असतात, आणि जून गवे काळे. शिंगं जबरदस्त. सर्वांत मोठी शिंगं सापडल्याची नोंद आहे, ती साडेएकतीस इंचाची.

बारा ते वीस अशा कळपानं गवे हिंडतात. वाड गवे, जून गवे आणि गाया कळपात असतात. काही नेणती वासरही असतात. कळपाचं म्होरकेपण अनुभवी अशा गाईकडं असतं. पोरबाळ, तरणे गवे, गाया मधे आणि जून काळे गवे पिछाडीला. कळपाची पुढारीण साठ-शंभर फूट पुढं राहून सारखी सावध घेत जात असते आणि मागला कळप बेफिकीरपणे, निर्धास्तपणे जात असतो

दोन अनोळखी गव्यांची गाठ होते, तेव्हा कोण ताकदवान, ह्याचा निर्णय होणं आवश्यक असतं. पण ह्यासाठी टक्कर खेळावी लागत नाही. ताकदवान असतो, तो डोकं खाली घालून आणि पाठीशी कमान करून आपल्या शरीराचं प्रदर्शन एखाद्या बॉडीब्युटिफुल-वाल्या पहिलवानाच्या झोकात करतो. दुसरा तीस-एक फुटाच्या अंतरावर नमून उभा राहतो. मग ताठ पायानं, सावकाश आपल्या प्रतिस्पर्ध्याभोवती चक्कर घेऊ लागतो. तसा हा जागा न सोडता, त्याला डोकं देत अंगाभोवती फिरत राहतो. हा एकमेकाची ताकद अजमावण्याचा प्रकार पाच-दहा मिनिटं चालतो आणि शेवटी दोघापैकी एक जण, 'बरं, बाबा, तू मोठ्या बापाचा' असं म्हणून लहानपणा पत्करून चालता होतो. विजयी योद्धा खुरानं माती उकरतो, डिरक्या देतो आणि जंगलातला एक नाट्यपूर्ण प्रवेश संपतो.

थोडं पुढं गेलो आणि विबट्याची पावलं लागली. अगदी पहाटे पहाटे हा नाला ओलांडून गेला होता. पावलं अगदी ताजी होती.



आणखी थोडं पुढं गेलो, आणि तो वृक्षविशेष दिसला. खोल, खडकाळ नाल्याच्या काठावर एक उंचा पुरा अंजन ताठ उभा होता. एखाद्या कुशल शिल्पकाराच्या नाजूक हत्यारानं नक्षीकाम करावं, असं त्याचं सगळं खोड सुशोभित झालं होतं. माधवराव म्हणाले, " हे अस्वलाचं झाड आहे. वर लागलेली मधाची पोवळी खाण्यासाठी ह्यावर अस्वल चढतात आणि उतरतात. त्याच्या नखानी हे नक्षीकाम केलय्, बघा."

बघणाऱ्याच्या डोक्याची टोपी पडावी, एवढी अंजनाची उंची होती. इतक्या उंचीवर चढणाऱ्या अस्वलांना खाली बघताच भोवळ येत असेल. आपल्या हाती कॅमेरा नाही, म्हणून सहसा मी कधी हळहळत नाही. इथं हळहळलो. हे नक्षीकाम रेखाचित्रात दाखविण्यापलिकडचं होतं. अंजनाला भेटून पुन्हा आम्ही आल्या वाटेनं परत फिरलो. जीपमध्ये बसलो. चितमपल्ली म्हणाले,

" माधवराव, आता तलागुडीला जाऊ. तरसाचं ठिकाण बघू. "

पुन्हा अरुंद जंगलवाटेवरून बराच प्रवास. गप्पागोष्टी. पुन्हा जीप वाटेवरच ठेवून पायपीट. ह्या नाल्यातून जाऊन ती चढण—ती चढण उतरून दुसरी चढण. आणि मग समोर उच्चस्थावर प्रचंड शिलाखंडाचा ढिगारा. एक एक फत्तर हत्तीच्या आकाराचा. काळाभिन्न. सादीखोपाऱ्यातून बाबूची बेटं उठलेली.

अगदी नमुनेदार जागा होती.

बाबूचे फराटे हातानं वारीत आम्ही तो तरसाचा किल्ला चढलो आणि वाकून वाकून बघू लागलो शिळांच्या खाली अंधारी जागा होती. नीट पाहिलं, तर तरसाचा चौसोपी वाडाच होता इथं तिथं तरसं बसल्याच्या खुणा होत्या. गळलेले केस होते. जुनीपुराणी हाडं होती. पण तूर्त, आजच्या घडीला इथं तरसाची वस्ती आहे, असं मात्र वाटत नव्हतं. एखाद्या इतिहासकालीन वास्तूची कळा ह्या जागेला होती. ते काही का असेना, आजमितीला काही कारणानी ही वस्ती सोडून तरस दुसरीकडे का गेली असेनात, वाडा तरी बघायला मिळाला. तरसानी ही जागा फार हुशारीन शोधली होती. बाहेरून इथपर्यंत येण्यासाठी नाले होते, म्हणजे आडोशान जाण्या–येण्यासारख्या वाटा होत्या. जागा बेताच्या उंचीवर होती. इथं बसून चौफेर नजर ठेवता येत होती. ऊन, वारा, पाऊस ह्यापासून संरक्षण होत. शिवाय ह्या ऐसपैस वाड्याला चोहों अंगानी बाहेरची दारं होती. हल्ला झाला, तर कोणत्याही दारान बाहेर पडता येईल, अशी सोय होती.

आफ्रिकेच्या जंगलात गेमवार्डन म्हणून अनेक वर्षं काढलेल्या हॅरी ओल्नेरच्या ' मेमरीज् ऑफ ए गेमरेंजर ' पुस्तकातली तरसाची एक हकीगत मला आठवली. तो लिहितो 'लहानशा डबक्याकाठी विश्रांती घेत मी बसलो होतो. जराशान समोरच्या झाडीतून एक तरस पळत पळत माझ्या दिशेनं येताना दिसलं. त्याच्या तोंडात काहीतरी होतं. मी दडल्या जागी गप्प बसून बघत होतो. तरस आपल्या नादात होत माझ्याकडं त्याचं मुळीच लक्ष नव्हत. ते डबक्यापाशी आलं. पाण्यात उतरलं. चारी पाय पाण्यात अर्धेमुर्धे बुडल्यावर त्यानं एकवार आजूबाजूला पाहिलं आणि तोंडातून आणलेली वस्तू पाण्यात टाकली. पुन्हा इकडं तिकडं बघून घेतलं. दरम्यान पाण्यात टाकलेली ती वस्तू वर आली. त्यासरशी त्याच्या तोंडावर आश्चर्य दिसलं. ती वस्तू पुन्हा तोंडात घेऊन ते थोडं पुढं सरकलं आणि तिथं वस्तू टाकून क्षणभर थांबलं.

' वस्तू पुन्हा वर आली ! तरस विलक्षण गोंधळून गप्प उभं राहिलं

' आता मात्र माझीही उत्सुकता शिगेला पोचली. मी जागचा उठून उभा राहिलो आणि चुकचुकलो. त्यासरशी चकित होऊन त्यान कान उभारले, आणि शेपटीचा गोंडा उडवून पोबारा केला.

पाण्यात उतरून मी ती वस्तू तपासली. वाईल्डबीस्ट नावानं ओळखल्या जाणाऱ्या जनावराचं ते फुफ्फुस होतं. सिंहानं शिकार केलेल्या वाईल्ड बीस्टवर तरसानं मनमुराद ताव मारला असला पाहिजे. खाऊन उरलेलं भक्ष्य कुठंतरी सुरक्षित जागी ठेवायचं आणि पुन्हा भूक लागल्यावर खायचं, ही तरसाची सवयच असते. हे पाण्याचं डबकं ही ह्या तरसाची खाद्य ठेवण्याची नेहमीची जागा असली पाहिजे. फुफ्फुसासारखा हलका पदार्थ पाण्यावर तरंगून तात्काळ वर येतो, ही गोष्ट बापड्या तरसाला माहीतच नसावी. टहा इंच खोलीच्या त्या डबक्यात शोध घेतल्यावर मला कुजलेली हाडं सापडली. मांसापासून जुन्या बुटापर्यंत काहीही खाद्य गोळा करून घेणाऱ्या तरसाची ही कोठीची जागा होती.'

तलागुडीचं तरसाचं ठिकाण पाहीपर्यंत माध्यान्हसमय झाला होता, म्हणून आम्ही पवनीला परतलो. माधवराव पाटलाच्या वाड्यावर ताटाला निमंत्रण होतं.
वाड्याचं भलं मोठं पटांगण शेणानं सारवून लखलखीत केलेलं होतं. वर मांडव घातला होता. कसला समारंभ आहे, म्हणून चौकशी केली तर माधवराव म्हणाले,
" नाटक आहे. "
" कुणाचं ? "
" आपल्या गावकऱ्यानींच बसवलंय्. गावकरीच करणार. "
" लिहिलय् कुणी ? "
माधवराव हसून म्हणाले,
" लेखक गावकरीच आहेत एक. "
नाटक संगीत होतं आणि माधवराव त्याच्या तालमी घेत होते.
जेवणखाण आटपून आम्ही इथून चाळीसएक किलोमीटर अंतरावर असलेल्या पालांदूर गावी निघालो. रात्री पालांदूरच्या फॉरेस्ट बंगल्यात मुक्काम करणार म्हटल्यावर माधवराव म्हणाले,
" मग मला परवानगी द्या. आज नाटकाची शेवटची तालीम आहे. "
यावर काय बोलणार ? माधवराव पाटलांना त्यांच्या नाटकी संसारात सोडून आम्ही पुढे निघालो.

तिसऱ्या प्रहरच्या सुमारास इटिहाडोहाच्या सरन्यावर वसलेल्या पालांदूरला आलो. आमराईच्या गर्दीत लहान दोन खोल्यांचा बंगला होता. पाणी आणवून आंघोळ केली. धुळीनं माखलेलं अंग स्वच्छ होताच सरन्यावर निघालो.
बॅक-वॉटरला मराठीत चांगलासा शब्द नाही. गोंडी बोलीत आहे. स र ना. आणखी कितीतरी सुरेख शब्द चितमपल्लींनी मला सांगितले. हॅरॉनला ' ढोकरी ', स्टोन कर्ल्यूला ' तनमोर ' ( तृणमोर ? ), माऊस डिअरला ' तन सांबर ' ( तृण सांबर ? ), नाईट

जाळा ' रानवा ' आणि कूटला ' चाञा '. ( का, तर काळ्याभोर कुटच्या कपाळावर पांढरा ठिळा असतो. )

झाडाझुडपातून, खाचखळग्यातून वाट काढीत सरन्यावर पोहचलो. समोर गर्द हिरवं रान, त्या पलीकडे दूरपर्यंत पसरलेलं पाणी, मधे मधे लहान बेटं. सरन्याच्या शांत पाण्यात काळीभोर वाळकी झाडं उभी होती आणि त्यावर पाणकावळे, बगळे शांत बसून होते. झाडाच, पाखराच प्रतिबिंब पाण्यात हलत होत. कुठून तरी एक पर्पल हॅरॉन आला आणि काठावरच्या उंच झाडावर, अगदी टोकाशी बसला. मान उंच करून आमच्या दिशेनं बघू लागला. निरभ्र अशा झुळझुळीत निळ्या आकाशातून कंकर पक्ष्याचा पांढरा थवा आपल्या रात्रीच्या मुक्कामावर निघून गेला.

पार पलिकडच्या काठावरून डोमा धीवर आणि त्याचा कोणी जातवाला आपली लहानशी डोंगी वल्हवत आले. मला दाखवण्यासाठी डोमानं घुई नावाचा किडा पकडून आणला होता. तो रसाळ, लठ्ठ किडा माझ्या पुढं धरून डोमान खुलासा केला,

" असल्या घुया आम्ही माशाच्या गळाला लावतो. "

" पण त्या मिळतात कुठ, डोमा ? "

" भातखाचरात कुदळीनं थोड उकरल, की रगड, गाडगं भरून घावतात. "

हा घुई म्हणजे दुसर तिसर काही नव्हत. ' मोल क्रिकेट ' होता. मी चिमटीत धरला, तर आपल्या पुढच्या दोन्ही दातेऱ्या, बळकट पायानी अशा जोरदार लाथा त्यान हाणल्या, की यंव् ! हे रातकिडे जमिनीखाली बिळं करून राहतात त्याच्या सहा पायांपैकी पुढचे दोन्ही पाय म्हणजे जमीन उकरण्याची हत्यारच असतात. बारीक किडामुंगी, पाला, मुळं हे त्याच खाद्य. मादी वसंत ऋतूत अंडी घालते, ती संभाळते. उबवते. पोराची पुरी वाढ होण्यासाठी दोन वर्षं लागतात.

माझ्या देखतच बाबूच एक दोन वाव दांडकं पाण्यात रोवून डोमान त्याला गळ बांधला. गळाच्या टोकाशी आमिष म्हणून घुई टोचला. पाण्यात पडताच तो गोलगोल वर्तुळ काढत राहिला.

डोमा म्हणाला,

" मासे ह्याच्या लटकतात राती. "

" कोणते मासे ? "

" वारगा असतोय्, मरळ असतोय् , रोहू असतोय्. "

असे अनेक गळ टाकून पालादूरची धीवर मंडळी रात्री घरी परततात आणि सकाळी सूर्योदयाच्या आत, डोंग्या वल्हवत, लागलेले मासे गोळा करतात.


" किती मासे मिळतात ? "

" काही मिळतात, काही हुदाळे खाऊन टाकतात. "

माझा चेहरा प्रश्नार्थक झाला, तेव्हा चितमपल्लींनी खुलासा केला,

“ हुदाळे म्हणजे ओटर्स. ह्या पाण्यात ओटर्स आहेत. त्यांना गळाशी लागलेले मासे आयते मिळतात ही हुशार जनावर धीवराच्या गळाला लागलेले बरेच मासे खाऊन टाकतात. ”

माशांइतक्याच सराईतपणे पाण्यात पोहणारी ही पाणमाजरं प्रत्यक्ष डोळ्यांनी बघावीत, म्हणून आसाममधल्या मानस अभयारण्यात नदीच्या काठानं मी पुष्कळ हिंडलो होतो. पण ह्या महाचपळ जातीचं दर्शन काही मला झालं नव्हतं. दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयात मी ती पहिल्यादा पाहिली. मुद्दाम बांधलेल्या, नालाच्या आकाराच्या डबक्यात त्यांना सोडलं होतं. ती सारखी पाण्यातून शिवाशीव खेळत होती, डुब्या मारत होती आणि जमिनीवर येऊन दोन पायावर उभी राहून, माझ्याकडं बघून चक्क शिट्या मारीत होती. दोन पायावर उभं राहून आपल्याकडं बघणारी ओटर्स फारच गोजिरवाणी दिसतात. इतक्या निष्पाप दिसणाऱ्या ओटर्सनी बापड्या डोमा धीवराच्या गळाला लागलेले मासे खाऊन टाकावेत आणि त्याचा तळतळाट घ्यावा, हे मला बरं वाटलं नाही.



घुई किडा

माझ्या नवेगाव बांधच्या सफरीचा उद्देश ओटर्स आणि दुसऱ्या लोकानी केलेल्या कमाईवर डल्ला मारणारे लोक यातील साम्य शोधणं हा जरी नसला, तरी गरीब बापड्या धीवरानी खटपटीनं पकडलेल्या माशावर ओटर्सनी बिनदिक्कत डल्ला मारावा, माशाचा चागला भाग तेवढा खावा आणि डोकी तेवढी धीवराना ठेवावीत, याचा अचंबा वाटला.
डोमाचं म्हणणं असं, की डोकं खाऊ, तर आपणही गळाला लटकू , हे शहाणपण हुदाळ्यानी अनुभवान कमावलं आहे.
ओटर्स फार हुशार असतात. धीवरानी त्याना पाळलं आणि शिकवलं, तर आपल्या धन्यासाठी नदीतले मासे मारण्यासाठीही त्यांचा उपयोग करता येतो, ही माहिती डोमाला नव्हती. तो वरचेवर म्हणत होता,
“ हेंचा तरासच आहे आमाला. दिवसा ही दिसत नाहीत. सगळा येपार रातचा चालतो हेंचा ! ”

एर म्हणजे ह्यात हुदाळे डोकं वापरत होते, का तोंडापर्यंतचा मासा, एवढंच त्याचं भक्ष्य होत, कोण जाणे!

हुदाळ्याचं राहण्याचं ठिकाण पाण्यातच नसत. त्यांची घरं जमिनीखाली, पण दार पाण्यात असतात. मासे, बदकासारखे पाणपक्षी, बेडूक, खेकडे हे त्यांचं खाद्य. हुदाळ्याची जमिनीखालची घरं शोधायची, म्हणजे त्यांनी पोरासाठी आणलेल्या माशाचा वास, कुठं भोकातून वर आला, तर त्या जागी जमीन खोदून बघायची. नाहीतर पाणाड्याप्रमाणं जमिनीला कान लावून त्याच्या पोराचा चिवचिवाट ऐकायचा. एरवी, जिथं माणसाचा वावर आहे, अशा ठिकाणी हुदाळे दृष्टीला पडणं कठीणच. ते फरार्‍यासारखे नित्य दडूनच राहतात.

डोमाबरोबर मी सरन्याच्या काठाकाठानं हिंडलो. कुठं हुदाळ्याची पावलं लागली, कुठं ते लोळल्याच्या खुणा दिसल्या. एका ठिकाणी दगडावर विष्ठेचा ढीगही दिसला. ह्या कामासाठी एकच एक जागा वापरण्याची त्यांची खोड आहे. प्रत्यक्ष हुदाळे मात्र नजरेला पडले नाहीत. नवेगाव बांधला येताना नागपुरातच लोक मला म्हणाले होते,
' साहेब, तुम्हाला प्राणी बघायचे, तर नागझिरा उत्तम. नवेगावला जनावरं फार आत आहेत, दृष्टीला पडत नाहीत. नुसत्या पाऊलखुणावर समाधान मानावं लागेल. '
गोष्ट खोटी नव्हती. मला आतापर्यंत तरी सगळी पावलंच दिसली होती.

आता पश्चिम दिशा नाना रंगांनी न्हाऊन गेली होती. सूर्याचा केशरी तांबडा गोळा पाण्यात बुडायला अगदी थोडा अवकाश होता. निळा डोंगर जांभळा झाला. सूर्याचा गोल पाण्यावर टेकला. तापल्या लोहरसाच्या पट्टीसारखं त्याचं प्रतिबिंब पाण्यात सरसरून, आम्ही उभे होतो, त्या काठाकडे येऊ लागलं. आणि बघता बघता सारे रंग मावळून आल्हाददायक संधिप्रकाश तेवढा उरला. आभाळाचं प्रतिबिंब वागवणारं पाणी आरशासारखं चमकू लागलं. तनमोरांचे टाहो आणि रातव्यांचं चक् चक् चकर्र चक् हे ओरडणं सुरू झालं.
झाडाचं खोड पोखरून तयार केलेल्या डोमा धीवराच्या चिंचोळ्या डोंगीतून मी दूरवर पाण्यात गेलो. पार पलीकडे लहानसं बेट होतं. शिकारी कुत्रे मागे लागले, म्हणजे हे एवढं अंतर तोडून सांबर त्या बेटावर आश्रयाला जातात, असं डोमा म्हणाला.
मी म्हणालो,
" मला त्या बेटावर घेऊन चल, डोमा."
" दादा, दिसतंय्, तेवढं बेट जवळ नाही. आपल्यापाशी दिवाबत्ती नाही. मधी पाणी खोल आहे. वारा सुटला, तर आपली डोंगी उपडी होईल."

यावर मी नाराजीनं म्हणालो,
" बरं, फिरू या माघारी. "
खरं तर त्या निर्जन बेटावर जावं आणि शेकोटी पेटवून रात्र काढावी आणि दिवसाउजेडी तिथं झाडंझुडं कोणती आहेत, पक्षी कोणते आहेत, हुदाळ्याची घरं तिथं आहेत का, हे सगळं बघावं, अशी माझी फार इच्छा होती.
काठावर परत येईपर्यंत अंधार दाटून आला. हुदाळे बघण्याचं वेड माझ्या डोक्यातून गेलं नव्हतं.
फॉरेस्ट गार्ड म्हणाला,
" साहेब, त्या फलाण्या फलाण्याला जागा माहीत आहेत. रात्री त्याला घेऊन मी बंगल्यावर येतो. तो आपल्याला बीळ उकरून दाखवील. "
मी म्हणालो,
" ठीक आहे. त्याला घेऊन ये. "

रात्री दहा साडेदहाच्या पुढे फॉरेस्ट गार्ड आला. म्हणाला,
" चला. "
चला, तर चला.
हातात कंदील घेऊन फॉरेस्ट गार्ड पुढे आणि मी आणि चितमपल्ली मागे, असे गावाबाहेर पडलो. सरन्यावर दुसऱ्या वाटेनं आलो. पाण्याच्या काठाकाठानं उंच बांध होता. डावीकडं खोल भात-खाचरं आणि उजवीकडे पाण्याकाठी झाडं, गवत, एकाला एक लागून झुडपं. त्या पलिकडचं पाणी दिसतही नव्हतं. बरीच पायपीट झाल्यावर गार्ड म्हणाला,
" ह्या हितच जागा आहे त्याची. "
आम्ही सावकाश, आवाज न करता चालू लागलो आणि काठावर बसलेल्या कोणी धपकन् पाण्यात उडी घेतल्याचा आवाज झाला.
तिघेही थांबलो सावट घेतला. झुडपाड्यातून पलिकडचं काही दिसत नव्हतं.
चितमपल्ली म्हणाले,
" हे ओटरचं. काठावर होतं. ते आपली चाहूल लागताच पाण्यात पडलं. "
आणखी पुढं जाऊन थांबलो. तो फलाणाफलाणा परस्पर येणार होता.
त्याची बराच वेळ वाट बघावी लागली. माझ्या दोन सिगरेटी ओढून झाल्या.
अखेर वैतागलेला गार्ड पुन्हा परत गेला.
फलाण्याच्या नावानं त्यानं घातलेल्या हाका स्पष्ट ऐकू आल्या.
अखेर दोघंही आले. फॉरेस्ट गार्डनं त्याला खूप ताणला असावा. बिथरलेला फलाणा, आम्हा अनोळखी लोकांना बघून फार बुजला. हे कोणीतरी मोठे फॉरेस्ट साहेब असावेत,

आजकाल नाना कायदे कानू झालेत, आपण हुदाळ्या उकरून काढला आणि, ' तू ह्या प्राण्यांना कायम उकरून काढून मारत असशील ', असं म्हणून ह्यांनी आपल्याला धरून डांबल, दंड केला, तर नसती बैदा होणार, असा विचार करून की काय, कोण जाणे, तो भरवशाचा साक्षीदार उलटतो, तसा एकदम उलटला. गार्डाला म्हणाला,
" मला जागा बिगा काई ठाऊक न्हाई. असल्या अंधाऱ्या रात्री तू साहेब लोकास्नी का म्हणून ह्या भयान जागत आणलस ? हे काय टाईम आहे का ? "
" अरे, त्यांना हुदाळ्या बगायचा आहे. तू नव्हतीस का एकदा बीळ उकरून पिल काढलीस ? "
" मी ? कधी ? "
" भले, तूच म्हणालास, की मी काढली होती. कबूल केलं होतस, आताही काढून दाखवीन. आत्ता खोटं बोलतोस. काय मानूस हायेस ! "
" मी म्हणलोच न्हाई. आन् एखाद्या साली कधी बीळ घावल असलं, तरी ते सदोदित घावतं काय ? रानची जनावरं ती, बाधून घातल्यासारखी जागी कशी घावतील ? "
आम्ही थक्क झालो.
सगळ्यांनी मिळून आर्जवं केली गार्डाने आरत्या केल्या. पण फलाणा कबूल होईना. आम्ही निराश होऊन परत फिरलो. बंगल्यावर येऊन मच्छरदाणीत शिरलो.

ही सगळी कालची हकीकत झाली. आता ह्या भल्या पहाटे मला विलक्षण प्रसन्न वाटत होत. सऱ्यावरून आलेला गार, आम्रमंजिऱ्यांचा गंध असलेला वारा पिऊन मी परत बिछान्यावर पडलो.
राहायला सिमेंटाच घर, अंगावर धुतलेले कपडे, आणि रोजच्या जेवणात मांस, लोणी, पोळी आपल्याला लागत. ह्या वस्तू मिळाव्यात, म्हणून आपण रोज आठ-आठ तास खाली मान घालून लिखापढी करत राहतो. डोमासारखं साधंसुधं जिणं पत्करून आपण निसर्गाच लेकरू होऊन का बरं राहू नये ?
अबोल, निरागस अशा ह्या धीवराबद्दल माझ्या मनात जिव्हाळा दाटून आला. कधी मासे धरून ते दूरच्या आठवडा-बाजारात विकावे, मोलमजुरी करावी, एवढंसं भात-खाचर पिकवावं, सर्पणाच्या मोळ्या डोक्यावरून बागवीत मैलोन्मैल पायपीट करावी आणि त्या विकाव्यात, अस काहीबाही करून हा डोमा गुजराण करीत होता, पण तो सुखी होता आनंदी होता. हे सगळं त्याच्या शरीराकडं, डोळ्याकडं बघितल्यावर कळत होत. त्याच्या निर्मळ हसण्यातून जाणवत होतं.
कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारखे महामानव ह्या भूमीवर झाले, म्हणून मला जसं कृतज्ञ वाटत, तस डोमासारखी साधीसुधी माणसही ह्या भूमीवर जन्माला आली, म्हणूनही वाटतं.

' पोलादाच्या चिरला साग ' अशा शरीराचा तो बळकट डोमा धीवर डोंगी वल्हवतो आहे आणि मी पाणी कापीत सरन्यावरून हिंडतो आहे, असच सारखं वाटत राहिलं. अगदी झोप लागेपर्यंत मी डोंगीतच होतो.


भल्या सकाळी डोमा सरन्यावरून आला. येताना त्यान मला दाखवण्यासाठी हुदाळ्यान गळ्यापर्यंत खाल्लेला वारगा मासा आणला होता.



समोर उभा करून मी माझ्या वहीत भराभरा डोमाच रेखाचित्र काढून घेतलं. फोटोसाठी निश्चल उभ राहाव, तसा डोमा उभा होता. हे लहानसं गाव, आजूबाजूच जंगल, पाणी, गावातले लोक आणि पाण्यातले हुदाळे हे सगळच किती मनोहारी होतं! इथ मनमुराद राहावं, चित्रं काढावीत आणि ह्या सगळ्यावर एक सुरेख पुस्तक लिहावं, अस मला फार वाटलं. पण एवढ्यात लक्षात आल, की सकाळचे दहा वाजले, आणि घाईगर्दीनं आम्ही परत फिरलो. माझी रजा संपत आली होती. अजून मला नागझिरा अभयारण्य बघायच होत, नागपूरला पोचायच होत आणि नोकरीच्या जागी पुण्याला वेळेवर हजर राहायच होत. लवकरच पुन्हा पालाद्रूला येईन, असं वरचेवर डोमाला सागून मी परत फिरलो.

वाटेवर असताना मारोतरावांच्या आणि माझ्या अनेक विषयावर गप्पा झाल्या पक्ष्यावर, प्राण्यावर, आणि पुस्तकांवर. मी म्हणालो,
" उपविभागीय वन अधिकारी म्हणून तुम्हाला चाकरी मिळाली, ही केवढी उत्तम गोष्ट आहे. मला तुमचा हेवा वाटतो. "
ते म्हणाले,
" हो, तुम्ही फॉरेस्ट डिपार्टमेन्टमधे हवे होता."
खरी गोष्ट होती. पण प्राणी, पक्षी पाहण आणि त्यावर लिहण एवढच मी करत राहिलो

असतो. सागवानी बल्ल्याचा लिलाव करणं किंवा बांबूच्या तोडीवर देखरेख करणं ही गोष्ट माझ्या अकलेबाहेरची होती. वनाधिकारी म्हणून मी लायक सरकारी नोकर मुळीच ठरलो नसतो.




हुदाळ्यान खालेला वारंगा मासा

मग आमच्या गोष्टी सारंगागारावर झाल्या कोणा जैन ग्रंथकाराचं हस्तलिखित 'मृगपक्षिशास्त्र' मारोतरावांना गवसलं होतं. हा ग्रंथ मराठीत करावा, म्हणून त्यांनी संस्कृत भाषा शिकून घेतली होती आणि ग्रंथाचं भाषांतर इत्यादी त्यांच्यापाशी तयार होतं. मृगपक्षिशास्त्रकर्त्यानं हॅरॉनरीला सारंगागार शब्द योजलेला होता. ही सारंगागारे गावातील चिंचेच्या झाडावरच का असतात, याचं कारण देताना त्यानं म्हटलेलं होतं, की जंगलातील प्राण्यांचे भयकारी आवाज ऐकून ह्या पक्ष्यांची पोरं भीतीनं घरट्यातून खाली पडतात. म्हणून जलाशयाजवळच्या गावातील एखाद्या चिंचेसारख्या झाडावर पावसाळ्याचे चार महिने घरटी करणं, अंडी घालणं, पोरांना उडायला शिकवणं, चारा घालणं ही पाखरं पसंत करतात. ढोक, करकोचे, बगळे असल्या पाणपक्ष्यांच्या ह्या वसाहती पाहणं ही गोष्ट अतिशय आनंदाची आहे. चार महिने धामधूम चालते आणि त्यात निसर्गाचं केवढं तरी नाट्य दृष्टीला पडतं. वसाहतीला सुरुवात होण्याआधी झाडाशेजारच्या एखाद्या मोकळ्या जागी पाणपक्ष्यांचा मेळावा हळूहळू जमू लागतो. एक, दोन करता करता अनेक पक्षी जमा होतात. खांदे काढून स्वस्थ उभे राहतात. मेळावा असला, तरी प्रत्येक जण एकाकी असल्यासारखा, दुसऱ्याची दखल न घेता बसून असतो. दंगाधोपा, आरडाओरडा काही होत नाही. हे सारे नर असतात. बराच मेळा जमला, म्हणजे झाडावर घरट्यासाठी जागा धरल्या जातात. तात्पुरतं काटक्या-कुटक्यांचं घरटं बांधून, सगळे नर मादीची वाट बघत बसून राहतात. एखादी मादी आली, की पंख फडफडून, अंग फुलवून तिला आपल्याकडे आकर्षित करण्याचा उत्सव सुरू होतो. असं करता करता पसंतीनुरूप जोड्या जमतात. मग घरटं नीट बांधण्याचा खटाटोप सुरू होतो. मादी

जाग्यावरच राहते, नर दूर उडून जाऊन चोचीतून एक एक काटकी घेऊन येतो. मादी ती तपासून, बरी असली, तर स्वीकारते, नसली, तर नापसत करून खाली टाकून देते. नर पुन्हा बांधकामासाठी योग्य अशा साहित्याच्या शोधासाठी जातो. मग मीलन, अंडी, आणि पोर. पोरांना रोज भरवणं. इतके आईबाप झाडावर असतात, प्रत्येक जण उडून जाऊन चारा घेऊन येतो, पण आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या पोरांना आपले आईबाप नेमके कळतात. दूरवर ते दिसले, की यांचा भूकओरडा सुरू होतो. कधी वाम माशासारखा लांबडा मासा घेऊन बाप घरट्यात उतरतो. हा एकच मासा दोन पोर दोन्ही टोकाकडून गिळू लागतात. अर्धा ह्याच्या पोटात, अर्धा त्याच्या पोटात. चोचीला चोची भिडतात. मग जे दणकट पोर असतं, ते दुसऱ्याच्या घशातून घास ओढून काढत आणि एकटं मटकावून टाकत. बाकीची पोरं रडत, ओरडत राहतात.

पोरं मोठी होतात. धीटपणानं घरटं सोडून फांदीवर येऊन बसतात. पंख हलवण्याचा, ह्या फांदीवरून त्या फांदीवर जाण्याचा व्यायाम सुरू होतो. आईबाप प्रोत्साहन देतात, शिकवतात, पोरं मोठी होतात.

पावसाळ्याच्या अखेरीला सगळं झाड मोकळं होत. पाखरं उडून जातात. रिकामी घरटी तेवढी राहतात. एखादं नांदतं गाव ओसाड पडावं, तसं होत.



नवेगाव बांधच्या परिसरात अशी काही सारंगागारं आहेत. माधवराव पाटलांच्या पवनी गावी, एका मोठ्या चिंचेच्या झाडावर प्रत्येक वर्षी हा नवनिर्माणाचा सोहळा दिसतो, हे समजल्यावर मी हरखून बोललो,

" मला हे सगळं बघायचं आहे, ह्या पावसाळ्यात मी नक्कीच येतो. "

चितमपल्ली म्हणाले,

" जरूर या, तुम्हाला आम्ही सगळी मदत करू. या आणि छान पुस्तक लिहा. मराठीत कोणी ह्या विषयावर लिहीत नाही. "

" येतोच. इथं राहून मी एक का, चार पुस्तकं लिहीन ! "

मी परत पुण्याला आलो. मार्च-एप्रिल-मे गेला, जूनही गेला, जुलै सपत आला. प्रपंचाच्या ह्या लिगाडातून अजून माझा पाय निघालेला नाही.

[ ' महाराष्ट्र टाइम्स ' : दिवाळी वार्षिक : १९७६ ]

# भरतपूर

भल्या सकाळी दिल्लीहून निघालो. अजून सूर्य उगवला नव्हता. दिल्ली ते भरतपूर सारा तीन तासाचा प्रवास. दोनशे चाळीस किलोमीटर्स रस्ता पार करायचा.

रस्ता सुरेख होता. सुखद अशी जानेवारी महिन्यातली सकाळ होती. आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोहरीची पिवळीरंजन शेत होती.

रस्त्यावर, रस्त्याकाठच्या शेतातून, रस्त्यावर आढळलेल्या गावातून सुद्धा पाखर दिसली. कधी पाण्याच्या डबक्याभोवती ढागा टाकणारे ढोक, करकोचे, कधी शेतात वावरून उभे असलेले सारस. कधी तारेवर बसलेला चाष, कधी बाभळीच्या खनपटावर बसलेला श्राईक.

मधेच एक खेड लागल, अजून गाव पुर जाग झालेलं नव्हतं. घराच्या माळवदावर मोर दिसले सोगेवाले दोन मोर आरामात बसले होते. आपल्याकडं, माळव्यावर कावळे बसलेले दिसतात, तसे

कावळेही वापडे आता आपल्या खेड्यात फारसे दिसत नाहीत. त्याच काय झालं, कुणाला ठाऊक.

ही गोष्ट मला विशेष लागली. अगदी अलीकडं आई गेली, म्हणून मी आमच्या गावी गेलो होतो. उदास वातावरणात सगळे विधी चालले होते. सकाळची वेळ होती, तरी ओढ्यावर चपाचपा उन्ह लागत होत. पिंड ठेवले होते, पण कावळ्याचा आवाज सुद्धा आजूबाजूला होत नव्हता.

वाट बघ बघ बघितली. अखेर देवानं धाडल्यासारखी कुणाची तरी गाय हिंडत फिरत आली आणि तिन पिंडाला तोंड लावलं.

कावळा अखेरपर्यंत दिसलाच नाही.

कुठं गेले सगळे कावळे ?

परिचित असा तो होल्याचा हुंकारही ऐकू आला नाही. मी होतो, नंतर चार-सहा दिवसात आभाळात घारी सुद्धा दिसल्या नाहीत. खेड्याच रूपही आता अशा तऱ्हेन पालटून गेलं आहे.


भरतपूरच्या वाटेवर जागोजाग पक्षी दिसत होते.

आमच्या गाडीत जर्मन पाहुणा होता. तो तर म्हणाला,

" इथूनच भरतपूर दिसायला लागलंय्. "
वारीच्या दिवसात पंढरीला निघाल्यावर जागोजाग दिंड्या दिसतात, तुरळक तुरळक वारकरी दिसतात आणि अखेर, ' धन्य ही पंढरी, सुखाची माऊली ' अशी विठूरायाची नगरी जेव्हा जवळ येऊ लागते, तेव्हा टाळ-मृदंगांचा गजर कानाना जाणवू लागतो. दुरूनच शिखरं दिसतात.

भरतपूरच्या पक्षी—अभयारण्यात शिरलो आणि आधी कॉर् कॉर् असा केवढा गजर कानी आला.
प्रत्यक्ष जंगलात गेलो, तर चंद्रभागेचं वाळवंट फुलून जावं, तसं सारं रानपाखरांनी भरून गेलं होतं. सतत आवाज होत





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

होते. पाणथळीत उभ्या अशा शेकडो बाभळीच्या झाडांवर घरटीच घरटी दिसत होती आणि माना उंचावून आवाज करणारे, ढांगोळ्या पायांवर तोल सांभाळणारे, पंख हलवणारे पक्षी दिसत होते. एकाच झाडावर किती जाती-जमाती राहात होत्या. त्यात रंगीत करकोचे होते, उघड्या चोचीचे करकोचे होते, गायबगळे होते, पाणकावळे होते, सापासारखी तलम मान असलेले पाणडुबे होते, काळ्या पाठीचे बगळे होते  आपली पायरी ओळखून प्रत्येकानं आपआपलं घरटं घातलेलं होतं. काही घरट्यात एवढी एवढी पोरं होती, आणि पोराना सांभाळीत आईबाप तोल सावरत घरट्यात उतरत होते. आभाळात उडत होते. शेजाऱ्यावर ओरडत होते. पोराची माया बघत होते. त्यांना भरवत होते. पोरं धडपडत होती. चोची वासत होती. ओरडत होती. कुणी माद्या आपली

उशिरा घातलेली अंडी उबवीत होत्या. जननाच, भरण-पोषणाच, केवढं तरी विराट पर्व घडत होत.

बारा चौरस मैलाच्या, बशीच्या आकाराच हे कुरण आहे. पावसाळ्यात धोधो पाऊस झाला, की बशी भरावी, तसं इथ पाणी भरत. बाभळी, बोरीच्या झाडझाडोऱ्यांनी असलेलं हे रान पावसाळा सपताच हळूहळू कोरडं होऊ लागत. सगळीकडं हिरवंगार गवत तरारत. कुरण माजत, तळी, डबकी, उथळ पाणथळ जागा, दलदल जागोजाग होते. आणि जवळजवळ एक लक्षापेक्षा जास्त एवढ्या प्रचंड सख्येन बदकं, टील्स्, गीज इथं दाही दिशांनी येऊन उतरतात, चरतात. थंडीचा काळ इथं निर्भयतेन घालवतात त्याच्या गाण्यानी सगळं वातावरण भरून जात. सारस पक्षी पाणथळीत घरटी करतात. अंडी घालतात, पोर वाढवतात. उडून जातात आणि पुन्हा मार्च, एप्रिलमध्ये त्याचे थवे इथंच जमा होतात. प्रियाराधनेच त्याच नृत्य, आणि आर्त आरोळ्या सुरू होतात. पक्षी-निरीक्षकाच हे नदनवन, अस सारख गाजत, हलत राहत !

कुणा तरी अधिकारी माणसाच बोट धरून गेल्याशिवाय अशा ठिकाणी जाण फलदायी ठरत नाही. माझ्याबरोबर खासदार जयंतराव टिळक होते. किंबहुना, जयंतरावाच्या बरोबर मी गेलो होतो. मला भरतपूर पाहायच होत, म्हणून वेळ काढून त्यानी हा प्रवास आखला, योजला होता. सौ. इंदुताई टिळकही होत्या.
गेल्या गेल्या आधी आम्ही तिथल्या सुरेख रेस्ट हाऊसमध्ये चहा उरकला आणि मग भटकायला बाहेर पडलो. जयंतरावापाशी छोटा मूव्ही कॅमेरा होता. सैबेरियाहून आलेले करकोचे, चीनहून आलेली काळी पाणपाखर याची फिल्म त्यांना घ्यायची होती. गळ्यात दुर्बीण आणि हातात रेखाटनाची वही घेऊन बाहेर पडलो. कूटस्, बदक, गीज, करकोचे यांची भराभर रेखाटनं आपल्या वहीत करून घ्यावीत, असा माझा इरादा होता.
पण कुणाही माणसाला स्वतःच्या मर्यादा कळाव्यात, असच हे ठिकाण आहे. मलाही त्या कळल्या. जमेल तेवढ्या रेघोट्या ओढल्या आणि पाहात, एकत्र हिंडलो.
इथं तिथं भिंगाप्रमाणं पाणी चकाकत होत. नाना जातीची कमळं पाण्यातून बाहेर येऊन फुलली होती. कुठं पिवळी, कुठं पाढरी, कुठं गुलाबी, कुठं निळी. आणि अशा या पाण्यातून पाखर सथपणान पोहत होती. काळी पाणबदकं, जाभळ्या पाणकोंबड्या, एवढी एवढी लहान बदकं, लाब पायांच्या पाणकोंबड्या, पाण्यावरनच चालताहेत, अस दिसे. पाण्याखाली असलेल्या वेली त्यानी आधारासाठी घेतल्या आहेत, हे काही ध्यानात येत नसे. इथले व्यवस्थापक अधिकारी होते, ते नेहमीप्रमाणे कोणा तरी वरिष्ठ पाहुण्याच्या सरबराईत आधीच गुंतले होते. कोण, तर पक्षितज्ज्ञ कैलाश साखला येणार होते. त्याना स्टेशनवरून आणण्यासाठी ते जाणार होते. अगत्यानं त्यानी आमची सारी व्यवस्था लावून



दिली. बरोबर एक हुशार गाईड दिला. आणि ते घाईगडबडीनं निघून गेले. सुदैवानं हा गाईड म्हणजे, सलीमअल्लींच्या बरोबर लहानपणापासून काम केलेला उत्साही तरुण होता. तो पटापट पक्ष्याची नावं सागत होता. दाखवत होता. भरतपूर पक्षी अभयारण्याच्या उभारणीत डॉ. सलीमअल्लींचा फार मोठा वाटा आहे. अनेकदा ते इथंच मुक्काम टाकून असत. मला ए. पी. गींच्या पुस्तकात त्यानी लिहिलेला अनुभव आठवला. रेंज ऑफिसरन त्याना सोबत करायला म्हणून जो नावाडी दिला होता, त्याला वल्हं कस हातात धरावं, हे माहीत नव्हत. शिवाय बैलगाडीतून पडल्यामुळं त्याचा गुडघा दुखावला होता. गीं नी आपल्याबरोबरही एक आसामी माणूस आणला होता. बोटीतून परतताना आसामी नावाडी आणि हा माणूस याच्यात हिंदी भाषेतून झालेला एक सवाद त्यानी दिला आहे.

" माझा गुडघा फार दुखतोय् ..."

" मग डॉक्टरसाहेबाना औषध द्यायला सागा की...."

त्यावर गीं नी विचारलं,

" कोण डॉक्टरसाहेब ? "

आसामी म्हणाला,

" सलीमअल्लीसाहेब. "

गी म्हणाले,

" ते पक्ष्याचे डॉक्टर आहेत. माणसाचे नव्हेत. "

मग गीं नीच त्या माणसाच्या गुडघ्यावर उपचार केले आणि त्याला बर वाटलं.

गी लिहितात

त्याच हे बर वाटणं अर्धं मानसिक आणि अर्धं शारीरिक असावं.

पाण्याच्या काठाकाठावर आम्ही भटकलो. जयंतरावानी फिल्म घेतली. मी रेखाटन केली. दुपारी जेवण, विश्राती घेऊन आम्ही गाडी घेऊन पुन्हा बाहेर पडलो.


भरतपूरच अभयारण्य नुसत पक्ष्याचच नाही, तिथ प्राणीही आहेत. चितळं आहेत, नील आहेत, कृष्णसारमृग आहेत. वराह आहेत.

जानेवारी महिना होता. संक्रांत नुकतीच झाली होती. भरतपूरच्या कुरणातली शेकडो बोराची झुडप फळानी लहडली होती. आणि थंडगार हवेत पिकल्या बोराचा सुवास भरून राहिला होता.

आम्हाला चितळाचे कळप दोनदा दिसले. नील तीन वेळा आढळले. चितळाना बोर, जांभळं, आवळे फार आवडतात, असं म्हणून आम्हीही पिकली बोरं दिसताच जागोजाग उतरून बोर खाल्ली आणि दात आंबवून घेतले

गाईड म्हणाला,
" तुम्हाला, साहेब, अजगर दाखवतो, चला. "
गेलो.

रस्ता सोडून पन्नास साठ यार्ड आत गेल्यावर,
अनेक मागची दार–पुढची दार असलेल्या
सायाळीच्या बिळावर पसरलेला अजगर दिसला.
भला ऐदानच्या ऐदान. लांबीनं सात-आठ फूट
होता. आम्हाला बघताच तो सुळकन् बिळात
शिरू लागला, तर गाईडनं शेपूट धरून त्याला
थांबवला. थोडा बिळात, बाकी बाहेर असा हा
अजगर आम्ही पाहिला. मग त्याला जाऊ दिला.
इथं मुबलक पाणी होतं. मुबलक पक्षी होते.
चितळाची पोरं होती. अजगरानी वस्ती करावी
आणि वाढावं, अशीच ही जागा होती.
थोड्या पलीकडे, असाच आणखी एक अजगर
दिसला.
मी गाईडला विचारलं,
" किती आहेत अजगर इथं ? "
तर म्हणाला,



" चाळीस-पन्नास तरी आहेत ! "

सध्याकाळ होईपर्यंत आम्ही जंगलातन भटकलो.
पाण्याच्या काठी एक भलामोठा बोर्ड दिसला. भरतपूरच्या राजेसाहेबानी उभारलेला. यावर शिकारीसाठी कोण साहेब कधी आले आणि त्यांनी किती बदकं मारली, त्याची नोंद होती :
एकोणीसशे चौदा साली डिसेंबर महिन्यात लॉर्ड हार्डिंग याच्या शिकारी पार्टीतील एकोणपन्नास बंदुकधाऱ्यांकडून चार हजार बासष्ट पाखरं मारली होती. लॉर्ड चेम्सफोर्डच्या पन्नास बंदुकानी चार हजार दोनशे सहा पाखरं, एकोणीसशे सोळा सालच्या डिसेंबरमध्ये मारली होती. आणि एकोणीसशे अडतीस सालच्या नोव्हेंबर महिन्यात लॉर्ड लिनलिथगो साहेबाच्या पार्टीनं चार हजार त्र्याहत्तर पाखरं मारली होती !

दिवस मावळता मावळता आम्ही परत फिरलो, दिल्लीची वाट धरली.
हिवाळ्यात भरतपूरला वेगवेगळ्या पधरा जातींच्या परदेशी बदकाचे थवे हजारोंनी येतात. दोन जातींची गूज पाखरं येतात. पेलिकन आणि सैबेरियातील करकोचे येतात.
देशी पाखर इथ घरटी करतात आणि पोर वाढवतात.
भरतपूरएवढे उत्तम पक्षी, अभयारण्यात इतर जगात कुठं नाहीत. ज्याना पक्षी पाहायचे आहेत, त्यानी एक वेळ भरतपूर पाहावं.
ज्यांना पक्ष्याचा अभ्यास करायचा आहे, त्यानी भरतपूरला जावं आणि जन्म घालवावा.

[ ' केसरी ' : दिवाळी पुरवणी : १९७९ ]

## राजस्थानचं वाळवंट

रोज घड्याळात सकाळचे सहा वाजतात. आसपास आपण जागे होतोच. मग वाघ मागं लागल्यासारखं घाईघाईनं नित्यकर्म आटोपतो आणि धुतलेले कपडे घालून कुणाची तरी ताबेदारी करायला जातो. तिथं अधिकाराची गरम इस्त्री आपल्यावर जोरजोरानं फिरते आणि आपल्या सगळ्या वृत्ती सपाट, कडंग होऊन जातात.
संध्याकाळचे सहा वाजतात. आपण मरगळून घरी येतो, जेवतो आणि झोपतो.
आयुष्यातला एक दिवस असा, पहिल्या पावसानंतर जमिनीतून भुळूभुळू वर उडणाऱ्या किड्याच्या पंखासारखा गळून पडतो.
दिवसामागून दिवस हे असंच चालू राहातं. आणि अकस्मात एकदा जाणीव होते, अरे, हे काय चालल आहे ? बुद्धिपुरस्सर असे चार दिवस तरी कधी आपण घालवणार आहोत, की नाही ? चरितार्थ चालवणं आणि कुटुंब पोसणं यापलीकडे काही नाहीच का ?
' आयुष्य वेचुनी कुटुंब पोशिले, काय हित केले, सांग, बापा ? ' हा प्रश्न तुकारामबावांनी विचारला, त्याला कितीशे वर्षं लोटली ? अशी स्वतःलाच निंदण्याची वेळ आली, की मी पाठीवर पडशी टाकून पहिल्यादा चार भिंतींबाहेर पडतो.

या गेल्या फेब्रुवारीत असंच झालं. मी बाहेर पडलो. कुठं वर जावं ?
ही वाट, की ती वाट, असा संभ्रम जेव्हा पडतो, तेव्हा निवडीचं काम आपण निसर्गावर सोपवावं. निसर्गात अतिशय तरल असा एक लोहचुंबकीय आकर्षणभाव असतो. आपण जर अजाणता त्याच्या कलानं चाललो, तर तो आपल्याला योग्य ठिकाणी घेऊन जातो. ज्या वाटेनं जाण्याचा आंतरिक ध्यास आपण घेतलेला असतो, तीच बहुधा ही वाट असते.
मी बाहेर पडलो. थेट राजस्थानच्या वाळवंटात गेलो. मध्यभारतातल्या कान्हा अरण्यात जाऊन हत्तीवरून हिंडलो आणि वाघ पाहिला. खजुराहोला जाऊन तिथली शिल्पं पाहिली. ओरिसात गेलो. कोणार्कचं भव्य सूर्यमंदिर पाहून थक्क झालो. आंध्रमधल्या पेलिकन पक्ष्याच्या वसाहतीला जाऊ म्हणत कुठल्या कुठं गेलो आणि पक्ष्याऐवजी माणसं बघून

माघारी आलो. नागार्जुनकोंडाला जाऊन ख्रिस्तपूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकातली इक्ष्वाकू राजाची ती प्राचीन भूमी मी पाहिली. अमरावतीच्या भग्न स्तूपाचे अवशेष पाहिले. महिनाभर मनमुराद भटकून मी जेव्हा परत आलो, तेव्हा वाटलं, समर्थांनी सांगूनच ठेवलं आहे, ब्राह्मणू हिंडता बरा ! समर्थांचा ब्राह्मणू म्हणजे मठाधिपती असला, तर तेवढा बदल आपण केला आणि म्हटलं, लेखकू हिंडता बरा !

•

सगळी शहरं आता सारख्या तोंडावळ्याची झाली आहेत. तेव्हा आपण खेडीपाडी जास्ती पाहावीत, असं मी ठरवलं होतं. मारवाड स्टेशनवर उतरलो आणि स्टेशनपासून बराच दूर मोटार अड्डा होता, तिथं जाऊन थांबलो.

हा मोटार अड्डा, गवाळी सांभाळत बसलेले उतारू, पलिकडचं पालातलं हॉटेल. हे सगळं दृश्य मला पार भूतकाळात घेऊन गेलं.

लवकरच मोटार आली. काठोकाठ भरलेली होतीच. पण आम्हाला न्यायला औवाचे मराठी शिक्षक आले होते, त्यामुळं जागा मिळाली.

मी खिडकीतून दिसणारा निसर्ग बघू लागलो. परप्रांतात आपली भाषा बोलणारा भेटला, म्हणजे आनंद होतो, तसा आपली झाडंझुडं पाहिल्यावरही होतो इथं भिनपानाची नेपती जागोजाग दिसली. माथ्यावर पिवळीरजन फुलं घेऊन डोलणारी तरवडाची झुडपं दिसली. बघता बघता एक गोष्ट लक्षात आली, की खासगी मालकीची लहान रानं सोडली, तर बाकी रानातल्या झाडांचा हिरवा विस्तार कुऱ्हाडीनं छाटलेला आहे. आपल्याकडेही बाभळीचे डहाळे छाटून शेळ्यामेंढ्याना घालतात. क्वचित दुष्काळ आला, तर नांदुरकी, पिंपळ, चिंच, जांभूळ असली झाडंही गुराना जगविण्यासाठी छाटली जातात. पण इथं तर दुष्काळ दिसत नव्हता मग ही छाटाछाट कोणत्या बरं निमित्तानं झाली असेल ?

दिवस कलला आणि औवा गाव आलं. इथं स्टॅण्ड वगैरे काही नव्हताच. लोक म्हणाले, ‘ तुम्ही उतरणार, तिथंच गाडी थांबेल. ’

अरुंद, धूळभरले रस्ते, सांडपाण्याचे ओघळ, दोन्ही बाजूंच्या घरातून डोकावून बघणारे औवाचे रहिवासी यांच्या दाटीवाटीतून अंग चोरत चोरत मोटार धुळीत कुठं तरी थांबली. आणि आम्ही उतरलो.

औवाच्या माध्यमिक शाळेत मराठी शिकवणारे शिक्षक मिश्राजी यांच्याकडे उतरलो होतो. मिश्राजी राहात होते, ही गल्ली म्हणजे एक सुरेख चित्र होतं. घराना व्यक्तिमत्त्व होतं. बांधकामाचा सगळा तोंडावळाच राजस्थानी होता. उत्तम नक्षीकाम केलेले लाकडी दरवाजे, महिरपी खिडक्या, लावणी वाङ्मयातले सज्जे आणि ठसठशीत दगडी भिंती. दरवाज्याच्या बाबतीत तर, घराचं प्रवेशद्वार हे शोभिवंत असावं, म्हणजे येणाराचं सदैव स्वागतच होतं, हे कौटिल्यानं सांगितलेलं शहाणपण सर्वांनी आजतागायत ध्यानी ठेवल्याचं दिसत होतं.

मी घराच्या दरवाज्यात येऊन पाहिलं, तर गल्ली फारच आकर्षक दिसली. छायाप्रकाश रेषा, चौकोन, गोल यांचा मनोहारी मेळ होता. सकाळी जागा झालो, तेव्हा बाहेरच्या एका पायरीवर बसून ही गल्ली मी वहीत रेखाटून ठेवली.

मिश्राजींच्या या गल्लीत बऱ्याच घरांना कुलपं होती. चौकशी केली, तेव्हा कळलं, की व्यापाराच्या निमित्तानं बरीच कुटुंबं विदर्भात असतात. काही अमरावतीला, काही अकोल्याला. वाड्याच्या किल्ल्या भाऊबंदाकडे ठेवलेल्या असतात. घराची देखभाल त्याच्याकडून होते. उलट, आपण असे, की एखाद्या दिवशी फ्लॅटला कुलूप लावून घाईनं बाहेर पडल्यावर अचानक शंका येते, कुलूप नीट लावलं ना ? आणि तो धसका घरी येईपर्यंत टिकतो. औनासारख्या लहान गावातल्या, लहान समाजातला हा विश्वास आणि बंधुत्व बघून आपल्याला साहजिकच गहिवरून येतं.

फेब्रुवारीची पाच तारीख होती. थंडी विलक्षण होती. याचं कारण राजस्थानातलं वाळवंट आहे, असं कळलं. दिवसा ते तापून हवा उष्ण करतं आणि रात्री थंड होऊन गारठा पसरवतं.

जणू काही सगळ्या गल्लीत आम्ही पाहुणे आहोत, असं आतिथ्य सकाळी बघितलं आणि गाव बघायला बाहेर पडलो. सोबत चार–सहा जण होते. मी मग एक एक विचारू लागलो,

“ का, हो, झाडं अशी छाटलेली का ? ” तर उत्तर मिळालं,

“ आता लवकरच पानगळ सुरू होणार. पानं पिवळी पडून गळून जाणार. त्या आधीच हिरवा डहाळा छाटून उंटाना, शेळ्यांना घातला, म्हणजे बरं नाही का ? चैत्रात नवी पालवी येतेच ! ”

खेड्याच्या रचनेत वरवर तर काही फरक दिसला नाही. रस्त्याच्या कडेला उंचावर चांभाराचं खोपट दिसलं. मी बलुतेदारीसंबंधी चौकशी केली, तर ती अजूनही बऱ्याच प्रमाणात इथं टिकून असल्याचं कळलं. ती काही इतिहासजमा झालेली नव्हती.

आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. मागे केव्हा मी अबू पर्वतावर गेलो होतो. तेव्हाही पाहिलं होतं आणि आता इथंही येता येता सतत पाहात होतो, आपल्याकडं दिसतात, तशीच तांबडी मुंडाशी धनगराच्या डोक्यावर इथंही दिसतात. पुढं फलोदीच्या वाळवंटात पाहिलं, तेव्हाही त्या धनगरांनी तांबडीच मुंडाशी बांधलेली होती. का बरं ? मातकट, बरड माळावर आपला धनी दुरूनही मेंढरांना ओळखू यावा, म्हणून ? पण मेंढरांना रंग कळतो का ? का, ज्या कारणासाठी कोंबड्याच्या डोक्यावर लालभडक तुरा असतो, त्याच कारणासाठी धनगर लाल मुंडासं वापरतो ?

खाली हिरवी पोपटी आणि माथ्यावर पिवळी पिवळी अशी राईची सुंदर शेतं जागोजाग दिसली. अशा शेतात, कधी निळा गडद घागरा आणि तांबडी भडक ओढणी, कधी पिवळा

घागरा आणि गर्द हिरवी ओढणी, अशा पेहरावातल्या स्त्रिया दिसत. तेव्हा राजस्थाननं रंगाच्या बाबतीतलं सगळं कौशल्य वापरून संपवलं आहे, असं वाटे. संगती आणि गडदपणा या बाबतीत त्यांनी नारंगी, पिवळा, तांबडा, निळा हे रंग किती परींनी राबवले आहेत. एवढं वैभव आणि एवढा आब जगात इतरत्र कुठं या रंगांना मिळाला नसेल. एकूणच, कलाबद्दलची चव ही या लोकांची सहजप्रवृत्ती आहे आणि तिच्यामागं कित्येक शतकांची परंपरा आहे. राजस्थानी धनगरांनी मागावर विणलेली साधी घोंगडी बघा. तिच्यावरची कलाकुसर बघून तुम्ही थक्क व्हाल.

जो जो वन्यतेकडं जावं, तो तो कलेची बूज वाढतीच दिसते.

रात्री थंडीनं हुडहुडी भरली होती. आणि आता दुपारी आभाळ वरून इंगळ ओतत होतं. आम्ही सकाळी औवाच्या शाळेतल्या मुलांचं मराठी ऐकलं होतं. मराठी गाणी ऐकली होती आणि आता देऊळ बघावं, म्हणून गावाच्या कमरेभोवती विळखा घालून वाहणाऱ्या ओढ्यातली गरम वाळू तुडवत पलिकडच्या काठाकडं निघालो होतो.

नवव्या शतकाच्या मध्याला बांधलेलं कामेश्वराचं हे देऊळ पंचरथ पद्धतीचं होतं. नक्षीदार कलाकुसरीनं श्रीमंत होतं, पण काळाच्या महिम्यामुळं आज ते गलितगात्र, वैभवहीन दिसत होतं. याचं बांधकाम दुमजली आणि आकार पिरामिडसारखा होता.

देव या कल्पनेवर तुमचा विश्वास असो वा नसो, पण तुम्हांला तुमच्या पूर्वजांशी जोडणाऱ्या साखळीतली देऊळ ही एक कडी मात्र आहेच आहे! शिवाय, आपल्या किती तरी कला देवालयाच्या परिसरातच नाहीत का वाढल्या? आपली वास्तुकला आणि शिल्पकला, आपली नृत्यकला आणि गायनकला यांचं जनन आणि संवर्धन देवळाच्या गाभाऱ्यात आणि आवारातच नाही का झालं!

इसवी सनापूर्वीची देवळं गोल आकाराची आणि लाकडी बांधकाम असलेली असत. सांचीजवळच्या बेसनगरला सापडलेले विष्णुमंदिराचे अवशेष सांगतात, की हे देऊळ लंबवर्तुळाकार होतं आणि त्याचं बांधकाम लाकडी होतं. या मंदिरापुढं एक प्रसिद्ध दगडी गरुडस्तंभ आहे. तो ग्रीक राजदूत हेलिओडोरस यानं उभारला, अशी नोंद आहे. हा राजदूत स्वतःला मोठ्या अभिमानपूर्वक 'वैष्णव' म्हणवून घेत असे.

औवाचा निरोप घेतला. जोधपूरला आलो. स्टेशनवरची रिटायरिंग रूम अपेक्षेपलीकडे उत्तम होती. एरवी या जागा म्हणजे धर्मशाळा असतात आणि तरीही त्या हव्या त्याला कधीही मिळत नाहीत. या अतिथिनिवासाची देखभाल करण्यासाठी नेमलेली माणसं बहुधा लुच्ची आणि धूर्त निघतात, पण जोधपूरच्या अतिथिनिवासाची देखभाल करणारा फारच भला माणूस होता.

घागरा आणि गर्द हिरवी ओढणी, अशा पेहरावातल्या स्त्रिया दिसत. तेव्हा राजस्थानन रंगाच्या बाबतीतलं सगळं कौशल्य वापरून सफल आहे, असं वाटे. संगती आणि गडदपणा या बाबतीत त्यांनी नारंगी, पिवळा, तांबडा, निळा हे रंग किती परींनी राबवले आहेत. एवढं वैभव आणि एवढा आब जगात इतरत्र कुठं या रंगांना मिळाला नसेल. एकूणच, कलाबद्दलची चव ही या लोकांची सहजप्रवृत्ती आहे आणि तिच्यामागं कित्येक शतकांची परंपरा आहे. राजस्थानी धनगरांनी मागावर विणलेली साधी घोंगडी बघा. तिच्यावरची कलाकुसर बघून तुम्ही थक्क व्हाल.

जो जो वन्यतेकडं जावं, तो तो कलेची बूज वाढतीच दिसते.

रात्री थंडीनं हुडहुडी भरली होती. आणि आता दुपारी आभाळ वरून इंगळ ओतत होतं. आम्ही सकाळी औंवाच्या शाळेतल्या मुलांचं मराठी ऐकलं होतं. मराठी गाणी ऐकली होती आणि आता देऊळ बघावं, म्हणून गावाच्या कमरेभोवती विळखा घालून वाहणाऱ्या ओढ्यातली गरम वाळू तुडवत पलिकडच्या काठाकडं निघालो होतो.

नवव्या शतकाच्या मध्याला बांधलेलं कामेश्वराचं हे देऊळ पंचरथ पद्धतीचं होतं. नक्षीदार कलाकुसरीनं श्रीमंत होतं, पण काळाच्या महिम्यामुळं आज ते गलितगात्र, वैभवहीन दिसत होतं. याचं बांधकाम दुमजली आणि आकार पिरामिडसारखा होता.

देव या कल्पनेवर तुमचा विश्वास असो वा नसो, पण तुम्हाला तुमच्या पूर्वजांशी जोडणाऱ्या साखळीतली देऊळ ही एक कडी मात्र आहेच आहे! शिवाय, आपल्या किती तरी कला देवालयाच्या परिसरातच नाहीत का वाढल्या? आपली वास्तुकला आणि शिल्पकला, आपली नृत्यकला आणि गायनकला यांचं जनन आणि संवर्धन देवळाच्या गाभाऱ्यात आणि आवारातच नाही का झालं?

इसवी सनापूर्वीची देवळं गोल आकाराची आणि लाकडी बांधकाम असलेली असत. सांचीजवळच्या बेसनगरला सापडलेले विष्णुमंदिराचे अवशेष सांगतात, की हे देऊळ लंबवर्तुळाकार होतं आणि त्याचं बांधकाम लाकडी होतं. या मंदिरापुढं एक प्रसिद्ध दगडी गरुडस्तंभ आहे. तो ग्रीक राजदूत हेलिओडोरस यानं उभारला, अशी नोंद आहे. हा राजदूत स्वतःला मोठ्या अभिमानपूर्वक 'वैष्णव' म्हणवून घेत असे.

औंवाचा निरोप घेतला. जोधपूरला आलो. स्टेशनवरची रिटायरिंग रूम अपेक्षेपलीकडे उत्तम होती. एरवी या जागा म्हणजे धर्मशाळा असतात आणि तरीही त्या हव्या त्याला कधीही मिळत नाहीत. या अतिथिनिवासाची देखभाल करण्यासाठी नेमलेली माणसं बहुधा लुच्ची आणि धूर्त निघतात, पण जोधपूरच्या अतिथिनिवासाची देखभाल करणारा फारच भला माणूस होता.

शहरात भटकलो नाही. स्टेशनशेजारीच मोठा रस्ता होता. तो कुठल्याही शहरात नेऊन ठेवता आला असता. प्लॅस्टिकच्या वस्तूंनी भरलेली रंगीबेरंगी दुकानं, नॉयलानच्या कपड्याची दुकानं, रेडिओ आणि घड्याळाची दुकानं, बूट आणि जोड्याची दुकानं आणि हॉटेल. हे दृश्य काय नवीन असतं ?

नाही म्हणायला, जुन्या वस्तूंच एक सुंदर दुकान पाहिलं. पण तिथले सगळे भाव, अमेरिकन टूरिस्ट लोकांसाठी होते. आपण आपलं म्यूझियमसारखं नुसतं बघायचं.

मी फक्त एक पितळी हात खरेदी करू शकलो.

पुण्यवंतानी अल्लाच्या नावानं केलेली खैरात आपल्या मर्त्य हातात न घेता फकीर ती ह्या कलापूर्ण बनावटीचा हात पुढं करून त्यावर घेतो.

मी म्हणालो, लेखकाच्या जातीलाही हा हात सोयीचा आहे !

मला राजस्थानच्या वाळवंटाच मोठं आकर्षण होत. अरबी सुरस आणि चमत्कारिक गोष्टींचा खजिना इंग्रजीत आणणारा प्रवासी बर्टन म्हणतो, की

' वाळवंटात तुमची नीतिमत्ता सुधारते. तुम्ही मोकळे आणि सौजन्यशील बनता, आतिथ्यशील व एकाग्रवृत्तीचे बनता, तिथं केवळ अस्तित्वातच तीव्र आनंदोपभोग भरलेला असतो. '

मला वाळवंटाचा अनुभव घ्यायचा होता. त्यासाठी बर्टनप्रमाणे मला उंटावरून प्रवास करणं आवश्यक होत. पण माझ्याबरोबर विजया होती. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी कुसुमताई कामत होत्या. त्यांना ही कल्पनाच निर्दय वाटली असती. आम्ही टॅक्सीनं गेलो.

जोधपूर ते फलोदी असं एकशे चाळीस किलोमीटर अंतर होत. जीवनराम छोगारामजी हा भला आणि उत्साही टॅक्सीवाला एक रुपया किलोमीटरप्रमाणे आम्हाला घेऊन जायला मोठ्या आनंदानं तयार झाला.


सकाळी नऊला निघालो.

शहरी परिसर हळूहळू माग पडला आणि दोन्ही बाजूंना अपरंपार वाळवंट असलेल्या जोधपूर ते बिकानेर या रस्त्यावर गाडी जाऊ लागली. हायवे असून रस्त्यावर रहदारी नव्हती. ट्रक्स् नव्हत्या. गाड्या नव्हत्या. क्वचित, पत्र्याच्या हौदातून पाणी घेऊन जाणारी उंटगाडी आढळे.

आजूबाजूच सगळं दृश्य बरड, धुळवट करड्या-तांबड रंगाच होत. खुरटी झुडपंसुद्धा हिरवीचार दिसण्याऐवजी मळकट दिसत होती.

इथंही मला ओळखीची नेपत दिसली. थोडा फरक आढळला, तो एवढाच, की हिचे फोकारे लांबलचक होते. अशा वैराण वाळवंटात कुठला ओलावा पिऊन ही झुडपं वाढत असतील ?

" जीवनराम, या झुडपाना काय नाव आहे तुमच्या भाषेत, नेपत ? "
" नाही, साहेब, आम्ही याला केर म्हणतो. "
वनस्पती मूळ रोवून उभ्या होत्या, तशी या वैराण भागात माणसंसुद्धा झोपड्या टाकून राहात होती. मधेच एखादी, रस्त्यापासून दूरवर आत गोल झोपडी, डोक्यावर छपराचं जंगल वाढवून गप्प बसलेली दिसे. भोवती कुंपण. माणूसकाणूस नाहीच.
जीवनराम म्हणाला,
" ही छपरं दिसतात, ती केरचीच. सावली म्हणून बरी, पण आग लागली, की कापरासारखी जळतात. काही मिनिटातच सगळ्या झोपडीला छुट्टी ! "
मी म्हणालो,
" जीवनराम, आमच्या मुलखातही ही झुडपं आहेत. याना लालचुटुक फुलं येतात. बारीक बोरासारखी फळ धरतात. त्याचं आम्ही लोणच घालतो. ही फळं पिकून माणकासारखी झाली, की गोड लागतात. "
" होय, जी. "
डाव्या बाजूला बोराटीच्या झुडपाचं बन लागलं. जीवनरामनं गाडीचा वेग कमी केला. चिंकारा जातीच्या हरणाचा बराच मोठा कळप चरत होता. ही मंडळी बहुधा पिकून खाली गळलेली बोरं चघळत असावीत.
चिंकारा ( Gazella Gazella—Pallas ) ही लहानखोरी हरणाची जात आहे. आमच्या भागात त्याला माळटिसकी म्हणतात. रंगानं पिवळट तांबडी, शेपटाच्या भोवती पांढरं गोल टिगळ. पोटाचा, खालचा, पायाच्या आतला भाग पांढरा. नाकावर काळसर ठिपका. चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंना पांढरे पट्टे आणि डोक्यावर गोल गोल रिंगा असलेली दहा ते बारा इंच उंचीची शिंगं. माद्या बोडक्याही असतात. काहींना चार-पाच इंच उंचीची शिंगं असतात. प्यायला पाणी नाही मिळालं, तरी यांचं चालतं. हिरव्या पानातून मिळते, तेवढी ओल पुरी असते.



जसजसे आम्ही पुढं आलो, तसतशी ही हरणं शेळ्यामेंढ्यांसारखी वरचेवर दिसू लागली.
" जीवनराम, ही हरणं निर्भय दिसतात. याची शिकार नाही का होत ? "
" नाही, साहेब. "
हरणं दिसली, तसे जागोजाग माणूस-वस्तीला लागून सोगेवाले मोर आणि लाडोऱ्याही दिसल्या.
" मोरानाही मारत नाहीत का ? "
" मोर, करकोचा, चितूर याचं दर्शन शुभ आहे. त्याना कोण मारील ? "

एका जागी उंच वाढलेल्या रुईचं बन दिसलं. इथंही चिंकाराचा कळप चरत होता. एक मोठा नर तर शेळीसारखा दोन पायावर उभा राहून, उंच रुईच्या माथ्यावरची पांढरी फुलं खात होता.
रुईची पानं चाटून स्त्रिया उपास करतात. रुईच्या पानांची चिलीम करून जुने लोक तंबाखू ओढीत. रुईच्या पानांचा आणि फुलांचा हार करून तो हनुमानाच्या मूर्तीला वाहिला, की पुण्य मिळतं, हे सगळं मला माहीत होतं, पण चिंकारे आवडीनं रुईची फुलं खातात, हे मला मुळीच माहीत नव्हतं.

वाळवंटातलं जहाज, असे उंट आता जागोजाग भेटू लागले. काही पिवळे, काही काळे. ते चरत होते.
वाऱ्यानं वाळू उडून जमलेल्या टेकड्या दिसल्या. या प्रकारानं रस्ते गाडले जात असतील, याविषयी शंका अशी उरली नाही.
तीनधारी निवडुंगाचे फडही जागजागी भेटले. काही ठिकाणी खडबडीत सालीचे उंच वृक्ष होते आणि त्यावर केशरी रंगाची फुलं फुललेली होती. अशा वृक्षांखाली चरताना मी काही चिंकारे पाहिले.
" जीवनराम, हे झाड कोणचं ? "
" याला रोहिडा म्हणतात, साहेब. या लाकडाची सुरेख खेळणी बनतात. "
मी एके ठिकाणी टॅक्सी थांबवली. वाळूतून पावलं रुतवत रोहिडा वृक्षापर्यंत गेलो आणि त्याची खाली पडलेली फुलं गोळा करून आणली. जिथं पाच पाच वर्षं पाऊस पडतच नाही, आणि जिथं विहिरीचं पाणी शंभर-सव्वाशे फूट खोल असतं, अशा वाळवंटात रजपुताचा प्रिय केशरी रंग फुलविणाऱ्या या वृक्षाची फुलं ओंजळीत घ्यावीत, अशी इच्छा मला झाली होती. रस्त्यापासून बरेच आत अशा, चार-सहा ठिकाणी विहिरी दिसल्या पाणी वाहून नेण्यासाठी तिथं उंटाच्या गाड्या, तांबड्या मुंडाश्याची आणि पांढऱ्या कपड्याची मूठभर माणसं या विहिरीभोवती गोळा झालेली दिसली.
अशा वाळवंटात माणसं वस्त्या घालून राहात होती, तसे देवही राहात होते. मूळची वाट

जरा वाकडी करून जीवनरामन आम्हाला ओसियन दाखवलं. कोणे एके काळी वैभवशाली असलेली ही प्राचीन नगरी आता फार एकाकी, स्तब्ध वाटत होती.

नगराच्या वेशीपाशीच आम्हाला देवळांचा समूह दिसला. आठव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत याची बांधणी झाली होती, म्हणे. पूर्वीची बारा, नंतरची सहा अशी एकूण अठरा देवळं इथं आहेत. आता सगळी पडझड झाली आहे

सुप्रसिद्ध असं ते ओसियनचं सूर्यमंदिर इथंच आहे.

सूर्याचं मंदिर ही कल्पनाच केवढी भव्य आहे! सूर्याचं हे देऊळ उंच ओट्यावर बांधलेलं आहे. प्रवेशद्वारापाशी दोन भव्य, उंच असे, ग्रीक वास्तूत दिसतात, तसे खांब आहेत. गाभाऱ्याच्या दारावर नागाच्या आकृत्या, त्यांच्या शेपट्या गरुडाच्या हाती. भिंतीवरच्या खांबावर अप्सरा. कुठं विष्णु, बलराम, कुठं फुलाचा झेला, कुठं पुष्पपात्र, कुठं कीर्तिमुख, कुठं पानांची वेलबुट्टी. पाहता पाहता डोळे थकून आपण बाहेर येऊन उभं राहावं, तर सगळीकडे पडझडीचा खच पडलेला व ईश्वरी उदासीनता भरून राहिलेली.

ऐन दुपारी फलोदीला पोचलो. फलोदी हेसुद्धा लाकडी नक्षीकामाचं वेड लागलेलंच गाव आहे. इथल्या अरुंद गल्ल्यांतून हिंडताना, काळ काही शतकं मागं सरकतो. बोळातून वळावं, तर अचानक पुढं उंटाची गाडी येऊन उभी राहते:

फलोदीची शाळा एका जुन्यापुराण्या, पण ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयात मांडावी, इतक्या देखण्या वाड्यात होती. भव्य लाकडी दरवाजे, डोक्यापेक्षा वर उंच अशी जोती, ढेलजा, बैठकी, नक्षीदार जाळ्या, नक्षीदार छत असा हा भव्य वाडा.

पुण्याला मराठी शिकून गेलेले तिथले शिक्षक श्री. तवर. त्यांनी मराठी भाषेतून राजस्थानी स्वागत केलं. विजया आणि कामतबाई शैक्षणिक कार्यात गुंतल्या. मी वाड्यातल्या जाळ्यांवर घुमणारी कबुतर, लाकडी छताचं नक्षीकाम बघत राहिलो.

मुख्याध्यापिका बाईंना शाळेचं भाडं विचारलं.

त्या म्हणाल्या,

" साठ रुपये. हा वाडा सावकाराचा आहे. ते व्यापारानिमित्त बाहेरच असतात. ही व्यवस्था तात्पुरती आहे. आता आम्ही शाळेची नवी वास्तू बांधतोय्. पुढच्या वर्षी आम्ही आमच्या वास्तूत जाऊ. "

बाहेर पडल्यावर ही पुरी होत असलेली वास्तू आम्हाला दाखवली गेली आणि मला इतका वेळ ज्या विद्यार्थिनींचा हेवा वाटला होता, त्यांच्याविषयी सहानुभूती वाटली. या सिमेंटच्या कुरूप गुदामात बापड्या मुली आता हलवल्या जाणार होत्या.

तवरजींनी आम्हाला आग्रहानं जेवू घातलं.

जेवणात प्रमुख पदार्थ म्हणजे दुधापासून बनवलेली उत्तम मिठाई होती.

" तवरजी, मी मिठाई खात नाही. "

" वा : ! मग खाणारच काय आपण, साहेब ? आलेल्या पाहुण्याचं स्वागत आम्ही काय तिखट पदार्थ देऊन करू ? "

संभाषणातून एक गोष्ट जाणवली. शिवाजीच्या महाराष्ट्रातले लोक म्हणून राजस्थानी माणसाला मराठी माणसाविषयी फार आदर वाटतो. मराठी माणूस फार नेक असतो. त्याच्यावर डोळे मिटून विश्वास टाकावा.

आनंद आहे !

जेसलमीर आता इथून फार थोड्या अंतरावर आहे.

" मी तुमच्याबरोबर येतो. एवढी चांगली संधी तुम्ही गमावू नका, बरं. " तंवरजी वरचेवर म्हणत होते. पण कामतबाईंना मुंबईला वेळेवर पोचायचं होतं. रात्रीची गाडी जोधपूरहून घ्यायची होती.

आम्ही परत फिरलो.

लवकरच उन्हं सौम्य झाली. जागोजाग काळ्या तोंडाची राजस्थानी पांढरी मेंढरं दिसू लागली. कधीकधी प्रचंड मोठी वाळूची टेकडी दिसे. तिच्यावर शेळयाच्या खुरानी नक्षी उठवलेली असे. येतानाही आम्हाला पुन्हापुन्हा मोर आढळत होते आणि बऱ्याच वेळा, तित्तर पक्ष्याच्या जोडया आडव्या तिरतिरत जात होत्या. आपल्याकडे कावळे दिसावेत, इतक्या वेळा तित्तर दिसले.

धनगराची एकाकी झोपडी पुन्हापुन्हा दिसत होती. हे लोक इथं का राहात असतील ? कसे राहात असतील ? काय खातपीत असतील ?

उटाचे कळप क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर दिसत होते. कधी वाटेपलीकडे दिसत होते. कधी वाटेवर दिसत होते.

जीवनराम म्हणाला,

" उन्हानं कधीकधी उंट फार पिसाळतात. चालवणाराला चावतात. "

वाळवंटातला प्रवासी विल्फ्रेड थेसिगर म्हणतो, की

" वाळवंटातलं पाणी खारट लागत, तसं उंटाचं दूधही अंमळ खारच लागतं. उंटाच्या माद्या मवाळ असतात, पण नर कधीकधी धोका देतात. मी एका अरबाला उंटान फोडलेला पाहिला. त्याच्या दंडाच्या हाडाचा चुरा झाला होता. "

छे ! आता लवकरात लवकर जोधपूर ते जेसलमीर असा प्रवास उंटावरनं केलाच पाहिजे.

राजस्थान सोडताना चुटपूट लागली, की अनेक गोष्टी बघायच्या राहून गेल्या. पुन्हा पुन्हा मनात आलं, मोजका वेळ हाती ठेवून प्रवास काही खरा नाही. मोकळेपणाचा एक लांबलचक पदर माणसाच्या जीवनाला असला पाहिजे. रमणं आणि रेंगाळणं नाही,

तर फिरण म्हणजे नुसता शारीरिक व्यायाम, तो घरातल्या घरात चक्रदंड वाल्तही घडतो. जोधपूरहून इंदूरला आलो. मधे चितोडगड स्टेशनवर डबा तासभर बाजूला पडला होता. आडव्या रुळापलीकडे रजपुताचं ते धारातीर्थ, तो स्तंभ दिसत होता. पण तिथं जाणं घडलं नाही.

अपरात्री म्हणजे दीड वाजता इंदूर स्टेशनवर पोचलो. इथं रिटायरिंग रूममध्ये जागा नव्हतीच. सामानाच्या ढिगाऱ्यापाशी विजया आणि कामतबाई थांबल्या आणि वाटाड्या म्हणून एक तरणाबांड हमाल बरोबर घेऊन मी जवळपास हॉटेल मिळतं का, हे पाहायला बाहेर पडलो. इंदूर शहर गाढ झोपेत होत. स्टेशनसमोरचा आडवा रस्ता पार करून आम्ही डाव्या गल्लीतली पाच आणि पुन्हा अलीकडे येऊन उजव्या हाताच्या गल्लीतली सहा अशी एकूण अकरा हॉटेलं पाहिली. सगळं साम्राज्य नोकर—चाकरांच होतं. प्रत्येक ठिकाणी डोळे चोळत उत्तर मिळायच,

" फुल हाय, जागा नाही. "

हिंडून हिंडून बेजार झालो. कारण काय, तर गावात कसला तरी धार्मिक उत्सव चालू होता, किसीका मेला ! अखेर एक अरुंद बोळातल्या चाकरान डोळे अर्धवट उघडीत दार उघडून आम्हाला आत घेतलं. एकच मोठी खोली रिकामी होती. एकूण हॉटेलची कळा मला फार उत्साहवर्धक वाटली नाही. म्हणून म्हणालो,

" खोली जरा बघायला मिळेल का ? "

त्याबरोबर त्यान किल्ल्या माझ्या हातावर ठेवल्या आणि चौथ्या मजल्यावरची सातवी खोली बघायला सांगितली. पाहिली. प्लॅटफॉर्मवर झोपण्याऐवजी इथं येणं निश्चितच सोयीच होतं.

खाली उतरून येईपर्यंत बाकावरच्या अंथरुणावर तो मला चाकर पसरला होता. दिवा होता. याला झोप लागायच्या आत आपण चपळाई करायला पाहिजे, म्हणून मी पुन्हा धावत स्टेशनवर गेलो. दोन सायकलरिक्षा केल्या आणि हॉटेलवर आलो.

सकाळी खाली गेलो. पलीकडेच बस-स्टँड होता. कोणत्याही शहरात बस-स्टँड आणि रेल्वेस्टेशन याभोवती सगळा बकालपणा गोळा झालेला असतो.

इथं पायाशी गटार वाहत होती. आणि वर गरम दूध—जिलबी, ' शुद्ध घी मे बनायी हुई ', साग-पुडी, कचोरी, चाय याची दुकान गजबजून गेली होती. फोडणीचे पोहे आणि वर पेरलेली शेव हा इथला आपल्या पाव—सॅम्पलसारखा लोकप्रिय प्रकार दिसला. मला आता शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे तीन दिवस कान्हा किसलीच्या जंगलात घालवायचे होते. कान्हाला कसं पोचायच, याची चौकशी करण्यासाठी ऑफिस उघडण्याच्या वेळेला बस—स्टँडवरच पर्यटकांच्या सोयीसाठी जे खास माहिती—केंद्र उघडलं होतं, तिथं गेलो.

दोन मख्ख चेहऱ्याची माणसं टेबलाशी होती. एक पलीकडं. एक समोर. दोघांचीही तोंडं पानभरली होती. यापैकी अधिकारी कोण, याचा अंदाज करून मी टेबलापलिकडच्या माणसाला कान्हाविषयी विचारलं, तेव्हा तत्परतेन त्यान मला कान्हा पार्कसंबंधी पर्यटन खात्यान छापलेलं फोल्डर दिलं. ते उत्तम छापलं होतं. पण मला हवी होती, ती माहिती मात्र त्यात नव्हती. गृहस्थ प्रसन्न मुद्रेनं म्हणाले,

" जबलपूरसे व्हाया मंडला कान्हा जानेके लिये बसकी सुविधा है, आप बिलासपूर एक्सप्रेससे जबलपूर जाईये और वहासे कान्हा जानेवाली बस लेके, साब, चले जाईये आरामसे कान्हा ! "

" या बसेस् जबलपूरहून कधी सुटतात, कधी कान्हाला पोहोचतात ? "

अत्यंत लीन अशा पद्धतीनं साहेब म्हणाले,

" वो तो, साहब, वहाँ जाके पता करना अच्छा रहेगा ! क्योंकि हमारे पास जो इन्फरमेशन है, वो शायद पुरानी हो सकती है ।"

फोल्डरमध्येही ही माहिती नव्हती. देशी पर्यटकापेक्षा परदेशी पर्यटकांवर डोळा ठेवूनच फोल्डर निघालेलं होत. त्यामुळं ' जवळचा विमानतळ, नागपूर दोनशेसत्तर किलोमीटर आहे. चार्टर्ड फ्लाईट्सही मिळू शकतात. जबलपूरहून टॅक्सी मिळतात. तिथं राहण्यासाठी, बारा सूटस् असलेली चार विश्रामगृहे आहेत ' वगैरे माहिती होती.

मी बिलासपूर एक्सप्रेसनं जबलपूरला जायच ठरवलं. पण स्टेशनवर जाऊन तिकीट पाहिलं, तर कोणतही रिझर्वेशन शिल्लक नव्हत. पहिल्या वर्गाचं नाही. दुसऱ्या वर्गाचं नाही. विजया आणि कामतबाई पुढच्या शैक्षणिक कार्यासाठी सकाळच्या गाडीनं उज्जैनला गेल्या होत्या. मला आता दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत इंदूरला राहण्यावाचून काही गत्यंतर नव्हतं. उज्जैनला जावं, म्हणून बसची चौकशी केली, तर दुपारनंतर संध्याकाळी पाचपर्यंत गाड्या नव्हत्या. उद्याचं रिझर्वेशन मात्र मी करून टाकलं होत.

मी सागपुडी खाऊन झोपलो. तिसऱ्या प्रहरी रिक्षा करून शहरातले बुक स्टॉल्स् धुंडाळले. कान्हापार्कसंबंधी कसलंही पुस्तक नव्हत. मग पाय दुखेपर्यंत पायी भटकलो. पाट्या वाचून करमणूक करून घेतली. एक पाटी

' यहाँ बाल शेट किया जाता है ' अशी होती.

परभाषेतील ध्वनीचा अभाव, हा प्रत्येक भाषिकाच्या विनोदाचा विषय होतोच. १९५५ साली दिल्लीला मी प्रथम गेलो, तेव्हा कवि अनिल भेटले होते. रस्त्यातून जाताना सप्रू हाऊसकडं बोट दाखवून म्हणाले होते,

" हे मुळात प्रू हाऊस होत. पंजाब्यानी त्याच सप्रू केलं. "

दुसरा दिवस मी समोरच्या हॉटेलच्या भिंतीला लागून बसलेल्या कबुतराची रेखाटनं करण्यात काढला. आपण म्हणतो, पण पाखराच्या हालचाली रेषेत पकडणं फार अवघड

काम आहे.
सगळं साहित्य एका पडशीत घेऊन, ती पाठीशी टाकून, सहज कुठही जाता यावं, अशी सोय मी केली होती. पाण्याची बाटली, दुर्बीण, रेखाटनाची वही, स्लीपिंग बॅग आणि आणि कपड्याचे दोन जोड. रेल्वे टाईम टेबल हे वगायला फारच कटकटीच असतं, म्हणून मी कधी बाळगत नाही. पैशाच पाकीट गर्दीत चोरीला जाण्याचाही संभव असतोच. म्हणून थोडे पैसे खिशात, थोडे पैसे पडशीत, थोडे पैसे टोपीत अशी विभागणी करतो. म्हणतात ना, सगळी अंडी एका टोपलीत ठेवू नका.
थोडा अगोदर इंदूरच्या फलाटावर गेलो. रेखाटनं करण्यात बरा वेळ घालवला. फलाटावर कित्येकदा खास व्यक्ती दिसतात, त्याची रेखाटन करण हा आनदाचा भाग असतो.

दुपारी दोनला बसलो, ते भल्या सकाळी जबलपूरला पोचलो.

स्टेशनवर ' कान्हा पार्कला या ' अशा पाट्या होत्याच. ' विशेष माहितीसाठी आमच्या स्टेशनवरच्या पर्यटन कचेरीला भेट द्या ', असंही म्हटल होत. इतक्या सकाळी कचेरीत अर्थातच कोणी नव्हत. आता रिक्षा करून एखाद्या हॉटेलात पडशी टाकावी, आघोळ, न्याहारी उरकावी आणि पुन्हा स्टेशनवर येऊन पर्यटन कचेरीत सविस्तर चौकशी करावी, असा विचार केला. यात एकच धोका होता. कान्हाला जाणारी बस अगदी सकाळी असली, तर ती चुकणार होती. पर्यटन कचेरीला लागूनच, अतिथि–निवास होता. त्याची देखभाल करणारा लाकडी पेटीवर बसलेला होता. आवाजात नम्रता आणून मी चौकशी केली,
" का, हो, ही कचेरी उघडते किती वाजता ? "
तर थंडपणे उत्तर आलं,
" आज सुट्टी आहे. दुसरा शनिवार, म्हणून. शनिवार–रविवार सुट्टी. आता एकदम सोमवारी सकाळी दहा वाजता उघडेल. "
हताश होऊन मी सायकल–रिक्षा केली आणि बस-स्टॅंडकडं निघालो.
माणसान चालवायच्या या रिक्षात बसणं सुरुवातीला मनाला आणि शरीराला फारच अप्रशस्त वाटत, पण हळूहळू आपण सरावतो. पडशी पाठीला मारून चालायला माझी हरकत नसते, पण आपल्याला रस्त्याची माहिती नसते. नव्या माणसाला अतिशय उपयोगी असा शहराचा नकाशा, अजून आपल्याकडे हर शहरात मिळतोच, असं नाही.
बस–स्टॅंडवर चौकशी केली. कान्हाला जाणारी बस नऊ वाजता होती. वेळ होता. स्टॅंडजवळच्या एका हॉटेलात जाऊन मी शुचिर्भूत झालो. खाणं उरकल, जंगलात असावेत, म्हणून बिस्किटं, वाळलेले टोस्ट, शेव वगैरे जिन्नस घेतले आणि थोडा आधीच येऊन तिकीट–खिडकीशी उभा राहिलो. कारण इथं तिकीट घेतल्याशिवाय गाडीत बसायच

नाही, अशी पद्धत होती. एकुणच मध्यप्रदेशामध्ये बस–वाहतुकीची उत्तम अव्यवस्था होती. कापसाच्या भोतात कापूस भरतात, तशी इथं माणसं गाड्यात भरतात. 'रुके' म्हणून उतारू ओरडले, की गाडी अधेमधे थाबते. 'बढे' म्हणाले, की पुन्हा सुरू होते. गाड्या वेळेवर सुटतीलच, असं नाही. 'डिझेलची कमी' असल्यामुळं गाड्या ऐनवेळी रद्द होतात. काहीही होऊ शकत.

नऊ, साडेनऊ, दहा, साडेदहा, अकरा साडेअकरा वाजले. माझ्या मागं अनेक प्रवासी क्यूमध्ये येऊन उभे राहिले होते आणि तिकीट–खिडकी मात्र उघडत नव्हती.
'पूछताछ' असं लिहिलेल्या शेजारच्या खिडकीत, खाकी कपड्यातल्या एक तरुण वाचनात गढून गेला होता. कान्हाला जाणाऱ्या बसची चौकशी अनेकांनी केली, तो मख्खपणे वाचत होता.
माझ्यामागं, क्यूमध्येच एक काठीकडं झुकू लागलेला म्हातारा उभा होता. डोक्याला काळी टोपी, चाळीशी, अंगात कोट आणि खाली पाढऱ्या रंगाची पॅंट असा पोशाख होता. तो फार कावला. म्हणाला,
"अरे बेटा, लोक चौकशी करताहेत. त्याच्याशी दोन शब्द बोल. अफसर म्हणून बोलू नकोस, माणूस म्हणून बोल. माणसान माणसाशी बोलावं."
मला वाटलं, आता जोरदार चकमक झडणार. पण वडिलकीचा मान ठेवण्याची बुद्धी त्या पोराला झाली असावी. पुस्तक पालथं घालून तो कुठं तरी गेला. पाच मिनिटांत परत आला आणि त्यान जाहीर करून टाकल,
"कान्हाला जाणारी गाडी कॅन्सल आहे!"
लोकांत प्रचंड गवगव सुरू झाली. मी हताश होऊन त्या काडी चक्रव्यूहाच्या बाहेर पडलो आता पुढं काय?
दरम्यान खिडकी उघडली आणि मंडलाची तिकीटविक्री सुरू झाली. क्यूमध्ये मघापासून उभी राहिलेली काही तरुण पोरं मंडलाला जाणार होती. ती म्हणाली,
"मंडलापर्यंत चला, साहेब. पुढं कान्हाला कसंही जाता येईल. प्रायव्हेट गाड्या, टॅक्सी, ट्रक–काहीतरी मिळेल."
आता क्यूत उभं राहून मंडलाच तिकीट काढायला पाहिजे होत.
तो मघाचा काळा कोटवाला म्हाताराही मंडलालाच जाणार होता. त्याची मुलगी तिथल्या दवाखान्यात नर्स होती. तिनं बोलावलं होत.
तो म्हणाला,
"साब, चलिये हमारे साथ मंडला! सब ठीक हो जाएगा!"
एवढं आम्ही बोलतो आहे, तोवर 'आली, आली,' असा आरडाओरडा होऊन खिडकीवर एकच गर्दी उडाली. तिच्यात घुसून तिकीट मिळविण्याएवढं शौर्य माझ्यापाशी नव्हतंच.

उभा राहिलो.

क्यूतला तो मघाचा पोरगा म्हणाला,

"मी काढतो तुमचं तिकीट."

रेटारेटी करून क्यूपुढं घुसला. त्यानं तिकीट मिळवलं. गठली, बॅगा सांभाळीत सगळे मंडलाच्या गाडीकडे धावलो. 'खिसको, भई, खिसको,' असा ओरडा होतच होता. गाडी हां हां म्हणता तुडुंब भरली. सुटली.

काळ्या कोटातला म्हातारा माझ्या मागल्या बाकावर होता. ती पोरं कुठं कुठं विखुरली होती. म्हातारा स्वभावानंच थोडा बडबड्या वाटला. काही बाही सांगत होता. त्यात जीवनविषयक शहाणपण होतं, त्याचे अनुभव होते. बदलत्या मूल्यांवर भाष्य होतं. बरंच काही होतं. मी आपला हूं, हूं करून ऐकत होतो. डोळे मिटून बसत होतो.

दोन–तीन तास निघून गेले

मधे कुठं तरी गाडी थांबली. फार अडथळे ओलांडावे लागतील, म्हणून मी जागचा उठलो नाही. काही लोक भराभरा उतरले, त्यात हाही उतरला.

दहा मिनिटांनंतर गाडी सुरू झाली. मग तर हा बेफाम बोलायला लागला. इतका वेळ आत्मनिवेदन तरी होतं. आता बरळणं सुरू झालं. शिवीगाळ सुरू झाली. अचानक हा फिलॉसफर एवढा वाहावला कसा ? मग माझ्या लक्षात आलं, की गाडी थांबली, तेव्हा शेजारच्या झोपडीत शिरून हा चहाऐवजी हातभट्टी हाणून आला आहे.

मंडल जवळ आलं, तेव्हा याला काही बोलता येत नव्हतं. डोळे उघडत नव्हते. मंडलाच्या स्टॅन्डवर लोकांनीच खाली उतरवला. कुठं, कुणाकडं जायचं, हेही त्याला सांगता येत नव्हतं. अखेर धुळीत पडला, तेव्हा लोकांनी नेऊन झाडाच्या सावलीत झोपवला.

कान्हाच्या गाडीची वाट बघत मी बाकड्यावर बसून राहिलो, कारण बोलवा अशी होती, एक रद्द झाली, तरी दुसरी कान्हाला जाणारी गाडी येणार आहे. तिकिट–खिडकी बंद होती. सकाळ स्टॅंडवर खच्चून गर्दी होतीच. धड कुणी निश्चित काही सांगतही नव्हतं. ती मघाची पोरं गाव येताच निघून गेली होती.

बराच अंत पाहून कान्हाची गाडी आली. घाईगर्दीनं मी तिकीट मिळवलं आणि खेचाखेच झालेल्या गाडीत शिरलो. इथं मात्र बरं आहे, 'जागा नाही, चढू नका,' असं कुणी दटावत नाही.

नेहमीपेक्षा जास्त प्रवाशांची ने-आण जर केली, तर म्हणे, कण्डक्टर आणि ड्रायव्हरला

बोनस मिळतो.

गर्दीत बसून बसून वैताग आला. कान्हा येता येईना बऱ्याच डुलक्या घेऊन झाल्या. इकडं गाडीत धूम्रपान करायला बंदी नाही. सिगरेटीही फुंकून झाल्या.

संध्याकाळ झाली. बाहेर काळोख झाला. वाड्यावस्तीवरचे, खेड्यापाड्यातले उतारू उतरून गेले. आता गाडीत अगदी मोजकी म्हणजे सहा-सातच माणस राहिली.

इतका वेळ उतारूंवर गुरकावणारा हिंदी सिनेमातल्या दादासारखा दिसणारा कण्डक्टर आता मोकळ्या बाकावर येऊन बसला, अंग सैल सोडून बसला. त्याचा मूड बरा वाटला, म्हणून मी जवळ गेलो आणि चौकशी केली,

" का, हो ? कान्हा अभयारण्य अजून किती दूर आहे ? "

तर तो म्हणाला,

" ही गाडी कान्हाला जात नाही, साहेब, किसलीपर्यंत जाते. किसलीला रात्रीचा मुक्काम."

मी सर्द झालो. हे मला आधी कुणीच सांगितलं नव्हत

" तिथन कान्हा किती ? "

" बारा किलोमीटर. "

रात्री मी बारा किलोमीटर जाणार कसा ?

बसमध्ये आता संपूर्ण शांतता होती. ध्यानस्थ बसावे, तसे उतारू बसले होते. जराशान कण्डक्टर मला म्हणाला,

" तुम्हाला सोबत आहे. कान्हाला जाणारे एक आहेत. "

एक सहप्रवासी होता खरा. स्वभावानं भला, वयानं पोरगेलासा असा हा कान्हाला रेंजर होता.

मी त्याच्याशी गप्पा मारल्या. मी कोण, कुठन आलो, कशासाठी आलो, ते सांगितलं.

तो म्हणाला,

" आज फार उशीर झालाय् गाडीला. तरीपण आपण कान्हाला जाऊ. मला जायचच आहे. माझ्याबरोबर तुम्हीही चला. "

शेवटी किट्ट काळोख झाला आणि गाडी कान्हापार्कची हद्द जिथन सुरू होते, त्या लाकडी फाटकाशी येऊन उभी राहिली.

कण्डक्टर मला म्हणाला,

" उतरा, साहेब. इथं काही जेवणखाण मिळत का, बघू या. उशीर झाला. आता किसलीच्या कॅन्टीनमध्ये काही मिळणार नाही. "

उतरलो.

रस्त्याच्या बाजूला झोपडं होतं. पुढच्या झाडाखाली भली मोठी शेकोटी पेटलेली होती. दोन मोठे ओंडके जळत होते थंडी बोचू लागली होती. लालपिवळ्या शेकोटीभोवती आम्ही बसलो.

मला हलके हलके कल्पना आली. हा काही केवळ थांबा नसावा. ट्रकवाल्यांची जशी खाण्यापिण्याची खास ठिकाणं असतात, ' धावे ' असतात, तसं हे ठिकाण होतं. किसलीच्या कॅन्टीनमध्ये न मिळणारी वस्तू इथं मिळत असली पाहिजे.
हाका मारून मारूनही कोणी बाहेर आल नाही. बाहेर जाळाचा उजेड होता, तसा आत कंदील होता. अस्वस्थ होऊन, ड्रायव्हर आणि कण्डक्टर यांच्या फेऱ्या, आत-बाहेर सुरू झाल्या.
मी पिशवीतून खायच्या वस्तू बाहेर काढल्या. सिगरेटी वाटल्या. लंब्याचौड्या वार्ता सुरू झाल्या. हलके हलके वातावरण उल्हसित झाल. भीड चेपली. माझ्याशेजारी मिशावाला कण्डक्टर होता. त्यानं मला हळूच विचारलं,
" साब, मटणमुर्गा चलेगा ? "
" क्यूं नहीं चलेगा, भाई ? जरूर चलेगा ! "
" और जंगलकी देसी चीज पीनेको चलेगी ? "
" जरूर चलेगी ! "
ताबडतोब कण्डक्टरन कुणाला तरी पिटाळल. तो महुआची पांढरी दारू घेऊन आला. ड्रायव्हर कण्डक्टर, रेंजर आणि मी अशी चार माणसं होतो. पण कप दोनच होते. तत्काळ मी माझ्या पडशीतल्या बहुउद्देशीय टिनमगचा उपयोग केला.
एवढं झाल्यावर आम्ही एकमेकांच्या जास्ती जवळ येणं अपरिहार्यच होत.
ड्रायव्हर हा चांगला सहा फूट उंचीचा राक्षस माणूस होता. कण्डक्टर हा बृत्तीन एक खास नमुना होता.
आपण एकवार आख्खी गाडी कशी खाल्ली ( म्हणजे तिकिटाचे पैसे कसे खाल्ले ) आणि एका खडूस तिकीट—चेकरला ऐन रानात टशूबच्या खरान झाडाला बांधून कसा झोडपला, ही हकीकत त्यान फार रंगवून सांगितली.
दरम्यान या झोपड्याचा मालक, कोण करीम का मकबूल होता, तो येऊन पुढं हजर झाला.
कण्डक्टर त्याला म्हणाला,
" भाईसाब, ये बंबईसे बडे मेहमान आये हैं.... खाना पकायेंगे तुम ? "
" जी हां, साब, पकायेंगे. "
" क्या पकायेंगे, करीम ! "
" मुर्गा पकायेंगे ! "
" वल्ला ! कितनी देर में ? "
" एक घंटा लगेगा, साब ! "
" लगने दो ! "
वेदपूर्वकाळातील पूर्वजाप्रमाणं शेकोटीभोवती बसून आम्ही तिखटजाळ मुर्गा खाल्ला. गोष्टी

सांगितल्या, हसलो आणि खिदळलो.
सारे बिल मिळून अठरा रुपये आणि काही पैसे झाले. ते मी टेकून टाकताच, तिघानाही आपला मोठाच आदरसत्कार झाला, असं वाटल.

रात्रीचे अकरा वाजले.
कण्डक्टर म्हणाला,
" साहेब, आता आपण किसलीला जाऊ. बघा, तुमची कान्हाला जाण्याची काही सोय झाली, तर. नाही तर आरामसे गाडीतच बिस्तरा लावून झोपा. सकाळी बघा कान्हा. "
रेंजर म्हणाला,
" फिकीर करू नका, साहेब, आपण कान्हाला जाऊ. "
आता मी फार हवालदील झालो. अशा अपरात्री, अनोळखी मुलुखात मी का आलो ? या लोकाचा भरवसा काय, ह्या रेंजरचा भरवसा काय ?
रखवालदारान गेट उघडलं, बंद केलं. गाडी सुरू झाली आणि काही मिनिटातच किसलीला पोचली.

या मधल्या प्रवासात रेंजर मला म्हणाला,
" साहेब, तुम्हाला रेस्ट हाऊसमध्ये एका रात्रीचे साठ रुपये घेतील. कशाला पैसे खर्च करता ? माझ्या घरी चला. मी एकटाच आहे. तिथं खुशाल झोपा. "
आम्ही खाली उतरलो. थंडी प्रचंड होती. गार वार सुटल.
खाकी ग्रेट कोट घातलेला एका एक शिपाई शेकोटी पेटवून बसला होता. रेंजर त्याच्यापाशी जाऊन काही बोलला. शिपाई अंधारात गेला. मी गप्प शेकोटीशी बसून राहिलो. आलोच, म्हणून रेंजरही गेला.
ऐन जगलातच होतो. रातकिड्याच समूहगान चालू होत. वर आभाळ चादण्यांनी खचलं होत. शेकोटीच्या अंधूक प्रकाशात प्रचड बुंध्याचे वृक्ष माझ्याभोवताली उभे दिसत होते.
' कान्हा ' पाहायच पाहायच, असं मी किती वर्षे बोलत होतो. जॉर्ज शेल्लरच ' द डिअर ॲन्ड द टायगर ' हे पुस्तक वाचल्यापासून तर ही इच्छा फार बळावली होती. डॉ. शेल्लरनं चौदा महिने इथल्या जुन्या रेस्ट हाऊसमध्ये राहून वाघ, चितळ, बारशिंगा, गवा या जातींचा सूक्ष्म अभ्यास केला होता. कान्हा ही या थोर प्राणिशास्त्रज्ञाची अभ्यासिका होती. असं सागतात, की वर्डस्वर्थ नसताना आलेल्या पाहुण्यांना घर दाखवताना वरची मोलकरीण म्हणाली,
' इथं ते वाचतात. त्याची अभ्यासिका मात्र घराबाहेर आहे. ' शेल्लरनं हा अभ्यास एकोणीसशे त्रेसष्ट ते पासष्ट या सालात केला. एकशेतेवीस चौरस मैलाच्या या अरण्यातला

मध्यभाग त्यान अभ्यासासाठी निवडला होता. पायी हिंडून त्यानं वाघ पाहिले. वाघांनी मारलेल्या जनावराच्या सागाड्याचे जवडे गोळा केले आणि त्यांची वयं निश्चित केली. वाघानी मारलेल्या जनावराचे कोठे तपासले आणि ही चितळे, हे बारशिंगा, हे गवे कोणत्या वनस्पती, कोणत्या साली, कोणती फळं, कोणती पालवी खातात, याची नोंद केली. मला शेल्लर कुठं राहिला, कुठं हिंडला, हे पाहायच होत. त्याच्याबरोबर काम केलेल्या लोकांशी बोलायच होत. त्याच्या आठवणी ऐकायच्या होत्या.

मला कान्हाच फार फार आकर्षण होत.

खाकी ग्रेट कोट घातलेला ड्रायव्हर जीप घेऊन आला. रेंजरनं वाहन मिळवल होत. कान्हा ते किसली हे सुमारे बारा किलोमीटरच अंतर म्हणजे जंगलातला धूळभरला कच्चा रस्ता होता. जाताना मला वाटेवर सात चितळं दिसली.

बापड्या रेंजरचं क्वार्टर असून किती सोईच असणार ? शिवाय हा कारा. सदोदित जंगलात फिरतीवर असणारा. त्यानं मला क्वार्टरच दार उघडून दिलं. खाटलं दाखवल. माझ्यापाशी बिछाना नाही, कारण तो मी दूरवर गेलो होतो, तिकडे राहिला आहे, असं सांगितल. ती अडचण नव्हतीच, कारण माझ्या पडशीत स्लीपिंग बॅग होती. खरी उशी होती. दिव्याची बटण, मागील दार वगैरे दाखवून रेंजरमजकूर शेजाऱ्याकडं झोपायला जातो, म्हणून गेले. आणि जंगलातल्या त्या जुन्यापान्या कौलारू क्वार्टरमध्ये मी एकटा उरलो. पडशी उघडून स्लीपिंग बॅग काढली, दिवा लावला आणि तिच्यात शिरून झोपून गेलो. दिवसभरात जी दमणूक झाली होती, तीमुळं गरकन् झोप आली. स्वप्नं पडली नाहीत. उंदीर, डास याच अस्तित्व जाणवलं नाही.

[ ' स्वराज्य ' : शनिवार, १० मे व १७ मे १९८० ]

# शेल्लरच्या अभ्यासिकेत

सकाळी सात वाजायच्या सुमाराला रेंजर धावत पळत आला आणि म्हणाला,
" वाघ बघायला एक मोटार निघालीय्. चला. "
मी कपडे करून तयारच होतो. गळ्यात दुर्बीण अडकवली आणि बाहेर पडलो.
ही मोटर म्हणजे शेजारच्या कुठल्या तरी गावातून आलेली मेटॅडोर होती. वन्य प्राण्याच्या आकर्षणामुळं इकड ओढले गेलेले हे लोक दिसत नव्हते. हल्लागुल्ला करणारी, मजा करायला आलेली मंडळी होती.
रेंजरन विनती केली. त्यांनी मला आत घेतल. एक म्हातारा बैगा आदिवासी वाटाड्या म्हणून सोबतीला दिला आणि मोटार निघाली.
मोटारीतली मंडळी इतकी बडबडी आणि उथळपणे वागणारी होती, की याना काही बघता येईल, असं मला वाटलं नाही.
मोठमोठ्यान आवाज करीत हिरव्या रंगाची ही गाडी जंगलातला एक चढ चढून वर आली, तशी म्हाताऱ्या आदिवासीन खूण केली. गाडी थांबली. आणि समोर झाडाझुडपात आपला हत्ती उभा करून वाघ बघणारा माहूत रागारागानं त्या बैगाला शिव्या मोजू लागला. त्याच म्हणणं होत, की तू गाडी इथवर का आणलीस ? किती प्रयत्नान मी वाघ शोधून ठेवले होते एक वाघीण आणि तिचे दोन बच्चे. रात्री बाधलेला रेडा मारून त्याच मास खात होते. मोटारच्या आवाजानं, लोकाच्या ओरडण्यान ते गेले.
माहुताच्या या सरबत्तीन बिचारा बैगा हवालदील झाला. हे टोळकं मात्र हसून टाळ्या देत होत. विनोद करत होत. बडबडत होत.

आता इथं मला, ही काय पद्धत कान्हाला आहे, ते सांगितल पाहिजे.
कान्हाच्या परिसरात एकूण साठ वाघ आज मितीला आहेत. पर्यटन खातं आणि जंगल खात आळीपाळीनं लहान रेडे मोक्याच्या ठिकाणी बाधत. भल्या सकाळी तीन हत्ती तिन्ही दिशाना माग काढीत जातात. कुठं तरी रेडा मारला आहे. आणि वाघ खातो

आहे, असं दिसताच मुख्य ठाण्याला बातमी मिळते. देशीपरदेशी पर्यटक गळयांत दुर्बिणी आणि कॅमेरे अडकवून सज्ज होतात. ' सफारी ' गाड्यातून त्याना त्या ठिकाणच्या जवळपास नेलं जातं. प्रत्येक हत्तीवर चार याप्रमाणं बारा पर्यटक जातात. हत्ती वाघाला वेढून उभे राहतात आणि पर्यटकाना भक्ष्यावर तुटून पडलेला वाघ बघता येतो.
आम्ही गाडीतून उतरून पालापाचोळ्यात बसून होतो, तोवर माहुतानं खूण केली. त्या क्षणी हापापलेले चार आडदांड पर्यटक इतराना ढकलून पुढं झाले. हत्तीवर चढले. त्याना घेऊन हत्ती मोक्याच्या ठिकाणी गेला.
वाघीण आणि तिची पोरं पुन्हा रेडा खायला आली होती. माझ्यापाशी १० X ४० ची चांगली दुर्बीण होती. त्यामुळं हत्तीवर बसणाऱ्या पर्यटकात घुसाघुसं न करता मी हळूच उजव्या बाजूची दरड चढून थोडा वर गेलो आणि समोरच्या नाल्याचा भाग तपासला. सकाळच्या लखलखीत प्रकाशात, काळे-तांबडे पट्टे दिसले. सुमारे सात महिन्यांची दोन पोरं संशयानं माना वळवून बघत होती. नाल्यापलीकडे वाघीण उभी होती.
शंभर यार्डांवर उभा राहून मी पाहात होतो. दरम्यान हत्तीवर चढलेल्या त्या चौघांनी, ' ती पाहा, ती पाहा, ती वाघीण, ते बच्चे,' असा दबक्या आवाजात एवढा गोंगाट केला, की आधीच संशय आलेली वाघीण झाडीत निघून गेली. तिच्यामागं पोरही गेली.
आता हे तीन वाघाचं कुटुंब दिसलं आहे, ही बातमी, कशी, ईश्वर जाणे, पण मुख्य ठाण्यापर्यंत पोचली होती. लाल रंगाच्या तीन सफारी जिपा भराभरा आल्या आणि गोरे सोजीर उतरावेत, तशी हिरव्या कपड्यातली भले लांब टेलिफोटो लेन्स लावलेले कॅमेरे आणि दुर्बिणी या आयुधांनी सज्ज अशी सोळा माणसं उतरली. त्यात चार महिलाही होत्या. त्यांनी काही गोंधळ केला नाही. आवाज केला नाही. सर्वच जण फार गंभीर होते. आता काही तरी प्रचंड नाट्य आपल्याला बघायला मिळणार, ही अपेक्षा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती.
एकाच्या दुर्बिणीकडे मी हळूच बघून घेतलं ती १२ X ५० अशी होती.



साडेआठ वाजले.
आकाशात गिधाडं घिरट्या घालू लागली. मेटॅडोरमधल्या मंडळींनी बुजवलेली वार्घीण आणि पोर पुन्हा रेड्यावर मुळींच आली नाहीत.
सुरुवातीला उभी राहून बघणारी, पुन्हा खडकावर, मातीत, पाचोळ्यात बसून वाट बघणारी पर्यटक मंडळी हळूहळू झाडाच्या सावलीला पाठीवर पसरली.
हे सगळं इंग्रजी जंगलपटातील दृश्यासारखं वाटू लागलं.
साडेदहा वाजेपर्यंत वाट पाहिली, पण वाघाचं कुटुंब आलं नाही. ते आता संध्याकाळशिवाय येणारच नव्हतं. एवढ्यात ' चला, चला, ' असा निरोप आला.
किसलीकडे ज्याचा हत्ती गेला होता, त्यानं बातमी पाठवली होती, की रेडा मारलेला आहे. वाघ त्याला खातो आहे.
सफारीचे ड्रायव्हर आणि ते परदेशी पर्यटक निघाले. मला त्यांनी जागा देऊ केली, पण मी किसलीला जायचं नाकारलं. एक तर मी वाघ पाहिला होता आणि आता या वेळेला



किसलीच्या रेंज्यावर वाघ दिसेल, यावर माझा विश्वास नव्हता.
मी रेंजरच्या घरापाशी उतरलो.
( संध्याकाळी मला समजलं, की पंधरा किलोमीटर जाऊन या परदेशी पर्यटकांना किसलीचा वाघ दिसला नाहीच. बिचारे ! )

कान्हाच्या टायगर प्रोजेक्टचे डायरेक्टर श्री. पवार याना मी भेटलो. माझा हेतू सांगितला.
मी असा अचानक, काही न कळवता आलो, आणि कुठं तरी राहिलो, उद्या परतही जाणार, याबद्दल त्याना हळहळ वाटली. म्हणाले,
" आधी कळवून या. म्हणजे आठ–दहा दिवस तुम्हाला सगळा पार्क दाखवता येईल. तुम्ही इथं उतरलात कुठं ? "
मी रेंजरकडं उतरलो, म्हणून सांगून टाकलं.
अखेर त्यानी फुलसिंग माहुताला बोलावून सांगितलं
" या साहेबाना हत्तीवरन पार्क दाखव. जमला, तर वाघ दाखव. साडेतीनला दुपारी निघा. "
रेंजरची पळापळ चाललीच होती. मी कँटीनमध्ये जाऊन जेवलो आणि झोपून गेलो.

दुपारी दोन वाजता ओढ्यावर थोडा फिरून आलो. कान्हाचे वृक्ष इतके उंच आणि त्यांचे बुंधे एवढे अजस्र होते, की केवळ ह्या झाडाच्या दर्शनानच निसर्गाच्या भव्यतेचा परिणाम मनावर होत होता. भव्य आणि उंच अशा देवाळयाचं दर्शन घडताच होतो, तसा.
करडी काळी बदकं पाण्याच्या काठाशी गप्प बसून होती. ती विसावली असावीत. जवळ जाता आलं नाही, म्हणून नक्की कळलं नाही. पण ही लेसर व्हिसलिंग टील्स् असावीत. टंगळमंगळ करत मी वेळ काढत होतो. तेवढ्यात रेंजर आला म्हणाला,
" फुलसिंग आत्ता तुम्हाला घेऊन जाईल. मी त्याला सांगून ठेवलं आहे. "
क्वार्टरच्या मागल्या बाजूलाच माहुताच्या वस्त्या होत्या फुलसिंग माहूत हा सर्वांत शहाणा, त्याचा हत्तीही चांगला. पण सकाळीच जाऊन आल्यामुळं जनावराला पुन्हा तकलीफ द्यायला तो फारसा राजी नव्हता.
अखेर, साडेतीनच्या थोडं आधी, हत्तीला खाली बसवून फुलसिंग आणि त्याचा दहा–अकरा वर्षांचा पोरगा हत्तीच्या पाठीवर बस्कर घालू लागले. हा एक मोठा खटाटोप असतो. पाठीवर जड, लाकडी हौदा वागवायचा असल्यामुळं, गादी, पट्टे, दोर अशी बरीच बांधाबांध करावी लागते.
मी सावलीला उभा राहून बघत होतो.

अखेर हौदा वर चढविला गेला.

फुलसिंग मला म्हणाला,

" साब, आइये ! "

बसलेल्या हत्तीच्या पाठीवरसुद्धा शिडीशिवाय चढणं सोपं नसत. त्याच्याच अवयवांचा पायरी म्हणून उपयोग करावा लागतो.

फुलसिंगनं हत्तीचं शेपूट त्याच्या अंगाबरोबर आडवं खेचून पायरी केली. पायावर चढलेला मी, शेपटीच्या पायरीवरून हौद्यापर्यंत पोचलो. आत छान गादीच होती. त्यामुळं आरामात मांडी घालून बसलो.

हाडेतीनला आम्ही हळूहळू पूर्व दिशेकडं जाऊ लागलो. अजून उन्हाचा चांगलाच चटका जाणवत होता. फुलसिंगला पान खाण्याचा नाद होता. चौफेर बारीक नजरेनं बघत त्यानं पान तयार केलं आणि ते गालात धरून गप्प राहिला.

वाळलेल्या गवताच्या प्रदेशातून आम्ही जात होतो. मी विचारलं,

" फुलसिंग, इथल्या नोकरीला किती वर्षं झाली ? "

" पासष्ट सालपासून आहे, साहेब. "



" डॉ. शेल्लर इथं काम करत होते, तेव्हा होता का ? "
" हां, होतो ना, साहेब, नुकताच लागलो होतो. डॉक्टर शेल्लरसाहेबांच्या गोष्टी आमचे लोक सांगतात ना. "
" ते वाघ बघायला ते पायी हिंडायचे का ? "
" हा, साब. त्यांना काही डरच नव्हती. मुर्गा द्याचे वाघाला आन् फोटो काढायचे. "
" वाघ बघायला डॉक्टर शेल्लर जेथे बसायचे, त्या जागा अजून तशाच आहेत ? मला बघायच्या आहेत त्या. "
" हायेत ना, साब, एक हाईड हाय, शेल्लर हाईड. "
बोलता बोलता आम्ही एका नाल्याच्या काठी आलो. पाण्याच्या काठाशी होती ती. पाच पंधरा स्वॅम्प डिअर–बारशिंगा जातीची हरणं उठली. इचीकडं टवकारल्या कानांनी बघत राहिली.
फुलसिंग म्हणाला,
" फार ऊन आहे ना, साहेब, म्हणून शेवाळ खायला ही पाण्याकडंला येतात. "
अभ्यासकापेक्षा सतत जंगलात राहणाऱ्या लोकांचं निरीक्षण कित्येकदा फार सूक्ष्म असतं. डॉक्टर शेल्लर याच्या निरीक्षणातून मात्र ही गोष्ट सुटलेली नाही. बारशिंगा जातीची हरणं पोटं बुडेपर्यंत पाण्यात जाऊन वॉटर वीड ( Naias ) खातात, अशी त्याची नोंद आहे.
बारशिंगा जातीची हरण वरचेवर दोन्ही कान हलवत राहतात. उष्ण हवेमध्ये त्याचा हा पंखा असतो. चेहऱ्याभोवतालची हवा थंड राहते.
एक लहानसा कळप झाडाच्या सावलीला बसून होता. शेल्लरनी एकदा याच अरण्यात चाळीस फूट लांबीच्या सावलीला सदतीस हरणं बसलेली पाहिली. कारण सावलीसाठी तेवढं एकच झाड होतं. कुणीही स्वस्थ नव्हतं. सतत जागा बदलणं चालू होतं. सावलीच्या कडेला असणाऱ्यांना मध्यभागी यावं वाटत होतं. आणि उन्हं अंगावर येताच कडेचे काहीजण सावलीसाठी आत सरकत.
हा लहानसा नाला वाघाला थंड पाण्यात बसायला, पाणी प्यायला फार सोयीचा होता. एका ठिकाणी म्हशीएवढ्या प्रचंड काळ्याशिळा एकाला एक लागून, एकीच्या अंगावर दुसरी अशा पडलेल्या होत्या आणि खाली खोल पाण्याचं डबकं होतं.
फुलसिंग म्हणाला,
" हितं तीन-तीन-चार-चार वाघ पाण्यात पडलेले दिसायचे मागं. "
इथून चाळीस एक यार्डांवर शेल्लर हाईड होती. पाण्यावर येणारे वाघ पाहावेत, म्हणून डॉक्टर शेल्लरनी चौकोनी आकाराची सिमेंटची ही पेटीच बांधून घेतली होती. सहा बाय् आठची. चारीही भिंतींना लहान लांबट भोकं होती. आत खुर्चीवर बसून चारी बाजूंच्या हालचाली इथून दिसत होत्या.



तूर्त मात्र या हाईडची दुर्दशा झाली होती. मला उगीचच वाटलं, की इथ निदान पाटी पाहिजे होती आणि हे हाईड जतन करायला पाहिजे होत.

डॉ. शेल्लर इथ जेव्हा वाघाचा अभ्यास करत होते, तेव्हा 'लाईफ' साप्ताहिकानं त्याचा लेख मागविला आणि लेखासाठी रंगीत फोटो हवेत, म्हणून फोटोग्राफर पाठवला. त्यानं कधी जंगलात वाघ पाहिला नव्हता.

पहिल्यादा, हाईडमध्ये येऊन बसल्यावर, कॅमेरा, लेन्सेस् वगैरे ओझं घेऊन आलेल्या नोकराला शेल्लरनी सांगितल,

" तू आता गाणी गुणगुणत परत जा, म्हणजे वाघाना वाटेल, आलेली माणसं गेली. "

नोकर गेला. फोटोग्राफरन हलक्या आवाजात विचारल,

" तो एकटाच गेला, आपण दोघं इथंच आहोत, हे वाघांना कळणार नाही का ? "

तेव्हा हा प्राणिशास्त्राचा अभ्यासक गंभीरपणे म्हणाला,

" वाघाना गणित करता येत नाही. "

कदाचित ते हेच डबकं असेल आणि हेच हाईड असेल.

आता वर जंगल लागलं होतं. घनदाट झाडी होती, ती ओलांडून गेल, की मोकळ गवताळ कुरण होत.

समोर एक सुंदर झाड दिसल. गर्द हिरव्या रंगाच्या या वृक्षावर बोराएवढ्या शेंदरी फळाचे घोस लहडले होते.

" फुलसिंग, या झाडाच नाव काय ? "

" शेंदर, साब. हे हत्तीला खायला फार आवडतं. " अस म्हणून माहुतानं हत्ती झाडापाशी नेला. शेंदर हे स्थानिक नाव असावं.

हत्ती आनदान पाला खात राहिला.

पाच मिनिटं गेली. दरम्यान फुलसिगनं पान लावलं, मी सिगरेट ओढली.

सावलीत उभ राहून हत्तीनं थोडं खाऊन घेतल्याची खात्री झाल्यावर माहुतान त्याला चलण्याचा इशारा दिला. कुरणात उतरण्याअगोदर, एक मोठा बारशिंगा चरताना दिसला. हत्तीकडं त्याच लक्ष नव्हत. दहा यार्डांवर आम्ही गेलो, तरी खाली मान घालून तो चरत होता कान हलवत होता. त्याच्या भव्य शिंगापैकी उजव्या बाजूच शिंग मोडलं होत. कशामुळं ?

पुढच्या पटांगणात येताच फुलसिंग म्हणाला,

" वो देखो, साब, हिरन टट्टी कर रहा है ! "

तीनशे यार्डांवर एक कृष्णसारमृग देहधर्म उरकीत होता. फुलसिंगला नुसत्या डोळ्यानी हे दिसलं. मला दुर्बीण वापरावी लागली.

फुलसिंग म्हणाला,

" रोज एकाच जागी ही जात टट्टी करते. "
नव्या जुन्या लेड्याचे ढीग पुढं जागोजाग दिसले. चितळाचा एक कळप दिसला. अठरा चितळं होती. त्यातल्या दोन लेकुरवाळ्या माद्या कळपापासून शंभर फुटावर जाऊन पोरांना पाजत होत्या.
फुलसिंग म्हणाला,
" या पोरांना कोल्ही खातात. "
बारशिंगा, कृष्णसारमृग, काचनमृग बघत बघत आम्ही वाघाच्या मुलखात शिरलो. ओढे, नाले, दरडी, ओघळी होत्या. कधी उंच उंच गवत, तर कधी दाट बांबू होता. बांबूतून मार्ग दिसेनासा होई. तेव्हा फुलसिंग हत्तीला म्हणे,
" बांबू बाजूला कर, बाजूला कर. '
आणि आपल्या बळकट सोंडेनं तो बांबूचा अडथळा दूर करी. कधी फुलसिंग म्हणे,
" दबाव, दबाव. "
—आणि पाय ठेवून हा बांबू खाली जमिनीशी दडपून जायला वाट करी.
या अगोदरही मी काझीरंगा जंगलातून हत्तीवरनं हिंडलो होतो, पण हा अनुभव विलक्षण होता. जवळजवळ दोन तास आम्ही या दुर्गम जंगलातून हिंडलो. दहा दहा फुटावरून चितळं भडाडताना पाहिली, पण वाघ दिसला नाही.

अखेर संध्याकाळी सहा वाजता त्याच ओढ्याच्या दरडीवर येऊन आम्ही उभे राहिलो, जिथं सकाळी एक वाघीण आणि तिचे दोन बच्चे दिसले होते.
जंगलात आता संध्याकाळचे आवाज सुरू झाले होते.
उंच दरडीवर हत्ती कान हलवीत उभा होता. ओढ्याचा केवढा तरी विस्तार दिसत होता.
दहाएक मिनिटं तिथं उभा राहिलो, पण वाघ दिसला नाही. आम्ही त्या मारल्या रेड्यापाशी गेलो. पानांनी रेडा झाकला होता. त्यावर दगड, लाकडं ठेवली होती. कदाचित दुसऱ्या कोणी खाऊ नये, वाघालाच उपयोगी पडावं, म्हणून जंगलातील कामगारांनी ही खबरदारी घेतली असेल.
सकाळी अर्धवट खाल्लेलं हे भक्ष्य झाकलं आहे, त्यामुळं संशयानं तर वाघ येत नाही, अशी शंका येऊन की काय, फुलसिंगनं हत्तीला ' उठाव, उठाव ' असा हुकूम पुन्हा पुन्हा सोडूनही वाघानं केलेल्या त्या शिकारीला स्पर्श करण्याचा वेडेपणा हत्ती करायला तयार नव्हता. त्यानं हुकूम साफ नाकारला.
मग फुलसिंगच तरातरा सोंडेवरनं खाली उतरला आणि ते धोंडे, ती झाड लाकडं त्यानं उचलून बाजूला टाकली.
त्याचं हे धाडस मी वर बसून पाहात होतो. वाघीण आणि तिची पोरं यावेळी नक्कीच

जवळपास असणार. त्याची आता भुकेची वेळच झाली होती.
Kill उघडं करून आम्ही पुन्हा अल्किडच्या दरडीवर, जिथून सकाळी त्या
मेटॅडोरवाल्यानी वाघ बुजवला होता, त्या जागी जाऊन उभे राहिलो.
साडेसहा वाजून गेले, तरी वाघाचा पत्ता नव्हता. फुलसिंग म्हणाला,
" चागला-अंधार झाल्याशिवाय येणार नाहीत आता. "
आम्ही मुक्कामाकडं आलो.

रात्र पुन्हा रेंजरचा पाहुणा म्हणून घालवली. सकाळी डायरेक्टर पवार किसलीला चालले होते. त्यांच्या गाडीतून बसपर्यंत गेलो. ही बस आणि ड्रायव्हर कंडक्टर आता दुसरे होते. अगदी जबलपूरपाशी दहा किलोमीटरवर आलो आणि गाडीच टायर फुटल.
जादा स्टेपनी नव्हती. कमी लगेजवाले उतारू धावपळ करीत पुढच्या फाट्यावर गेले त्याना कुठली तरी जबलपूरकडं जाणारी बस मिळाली.
मला कोणीही घेतलं नाही. ट्रकन नाही. बसनं नाही. आता इथून पुढं जबलपूरकडं जाणारी बसही येणार नव्हती.
आम्ही दहा–वीस उतारू फाट्यावरच्या हॉटेलपाशी चिमणीएवढी तोंडं करून बसून राहिलो. रात्र उघड्यावर घालवण्यावाचून पर्याय नव्हता.

[ ' स्वराज्य ', मुंबई–पुणे : शनिवार २४ मे १९८० ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. २५४२२०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# खजुराहोची शिल्पकला

माझी दया त्या तिठ्यावरच्या हॉटेल मालकाला आली. तो म्हणाला,
" साहेब, तुम्ही आता असे किती वेळ इथं बसून राहणार ? रस्त्यावर बंद पडलेल्या ट्रकच्या दुरुस्तीसाठी एक टेंपो मघाशी जबलपूरहून आली आहे. ती आता माघारी जाईल. तिच्यातून जा. "
माझी काहीच हरकत नव्हती. तीन चाकी टेंपो काय, बैलगाडी मिळाली, तरी मला आनंदच होता. पण तूर्त इथं प्रवाशांची इतकी गर्दी होती, की टेंपो दिसताच सगळे तिच्यावर तुटून पडले असते. धक्काबुक्की करून जागा पटकावणं माझ्या आवाक्याबाहेरचं काम होतं. पण हॉटेल–मालकानं मनावरच घेतलेलं दिसलं. टेंपो येताच तो धावला. मागोमाग मी धावलो. सुदैवानं टेंपो उभी राहिली. मला जागा मिळाली.
आत ग्रीसनं लडबडलेला ट्रकचा कणा उभा टाकलेला होता. आणखीही काहीबाही सामान होतं. मी कोपऱ्यात जाऊन बसलो. सडे, जवळ थोडं सामानसुमान असलेले आणखीही पाच–सात प्रवासी आले. टेंपो खच्चून भरली आणि सुटली.
एवढ्यानं भागलं नव्हतं. मधे एक वस्ती लागली. नुकतंच लग्न झालेली एक मारवाडी मुलगी, तिची पाठराखीण आणि तरुण नवरा अशा तिघांची भर पडली.
हळूहळू, झुरळाला मुंग्या डसाव्यात, तसे प्रवासी ह्या वाहनाला डसले.

जीव मुठीत धरून मी कसाबसा जबलपूरला पोचलो. स्टेशनवर वेटिंग रूममध्ये बराच वेळ वाट पाहिल्यावर विजया आणि कामतबाई आल्या. कान्हा–किसलीच्या माझ्या रसभरित प्रवासाची हकीकत मी त्यांना ऐकवली. कामतबाई इथून मुंबईला परतल्या आणि आमचा मध्य प्रदेशचा प्रवास सुरू झाला.

जबलपूरहून आम्ही शहाडोलला आलो. रात्रभर मुक्काम केला. शहाडोलला मराठी माणसं बरीच आहेत. ती मोठ्या अगत्यानं जमा झाली. एका लहानशा हॉलमध्ये आम्ही एकत्र जमलो. इथं एवढे वाचक असतील, याची मला कल्पना नव्हती. पन्नास–साठ मराठी

माणसं, काही हिंदी साहित्यिक होते.
लोकांनी प्रश्न विचारले. मी उत्तर दिली. चहापाणी, मिठाई झाली. प्रकट मुलाखतीचा हा कार्यक्रम सुरेखच झाला. किती तरी दिवसांनी भरपूर मराठी ऐकायला मिळालं, म्हणून मराठी महिला खूश झाल्या.

पहाटे साडेतीनला उठून आम्ही शहाडोल ते अलहाबाद जाणाऱ्या बसमध्ये जाऊन बसलो. गर्दी तुफान होतीच. अलहाबादपासून एकोणीस किलोमीटर अलीकडे असलेल्या चाकघाट नावाच्या गावी माध्यमिक शाळेत काही विद्यार्थी मराठी शिकत होते. तिथ दुपारचा वेळ काढून, चाकघाट ते रिवा, रिवा ते सतना असे आलो. सतनाला श्री. सक्सेना नावाचे शिक्षक होते. त्यांचा पत्ता सांगितला, तेव्हा एक रिक्षावाला तयार झाला. त्यानं रात्रीची वेळ असून सुद्धा फार तत्परतेनं आम्हांला नेमक्या ठिकाणी पोचत केलं. आणि मग म्हणाला,
" मला दोन रुपये आणखी द्या, साहेब. उद्या महाशिवरात्र आहे. मी ब्राह्मणपुत्र आहे. "
तोंडावरची कळा, अंगावरचे कपडे यावरून याची फारच हलाखी आहे, असं वाटलं.
मी म्हणालो,
" अरे ब्राह्मणपुत्रा, रिक्षा ओढण्यावाचून इतर काही उद्योग तुला मिळत नाही का ? "
त्यानं दुःखी चेहरा करून मान हलवली. म्हणाला,
" मी एकटाच नाही, स्टेशनवर हमाल, रिक्षेवाले जितके आहेत, ना, त्यांपैकी बरेच ब्राह्मणच आहेत. "
दोन रुपये आणखी दिल्यानं याची महाशिवरात्र उत्तम जाणार असेल, तर जावो, म्हणून मी त्याला खूश केलं. आपल्या या कृत्यामुळं, येऊ घातलेली क्रान्ती लांबेल, याचा विचार केला नाही.
श्री. सक्सेना स्वतः एका खेड्यात शिक्षक होते. त्यांची पत्नी, सतनाच्या महाविद्यालयात प्राध्यापक होती. दहा वर्षांपूर्वी पुण्यास शिकलेलं मराठी सक्सेनासाहेब अजून उत्तम बोलत होते. सारखे आग्रहानं खाऊ घालत होते, म्हणत होते,
" आणखी थोडं घ्या ना आपण. काही होणार नाही. "

सामानाची ओझी त्यांच्या घरी टाकून आम्ही सकाळच्या बसनं खजुराहोला गेलो. सहाची बस ऐन दुपारी खजुराहोला पोचली. तिथं प्रचंड मोठी जत्रा भरली होती ! हा जनाचा प्रवाह इकडं आज का बरं लोटला आहे ? खजुराहोची अप्रतिम शिल्पं पाहण्यासाठी ? नाही. कारण कलावाह्य होतं. आज शिवरात्र होती. भग्नमूर्तींची पूजा करायची नाही, असा धर्मशास्त्राचा दंडक जरी असला, तरी इथल्या महादेवाच्या दर्शनासाठी आदिवासी लाखांनी आज त्या आडबाजूच्या देवळाकडे लोटले होते. आजच

नव्हे, प्रत्येक वर्षी लोटत असले पाहिजेत. कारण भक्त येणार, म्हणून बाकीचा बाजार उभा राहिला होता. जत्राच होती. जत्रेला जे जे आवश्यक, ते ते सर्व जमा झालेलं होतं. माणसं होती, व्यापार होता, पोलिस बंदोबस्त होता. वाहनं होती, गोंगाट होता. वस्तूंचे भाव कडाडले होते.

गाईडचा भाव आज पंचवीस रुपये होता चला, पंचवीस तर पंचवीस! त्याच्या मागोमाग हिंडू.

कंदारिया महादेव हे सर्वांत उत्तम देऊळ प्रथम पाहिलं. याचा आकारच भव्य आहे. एकशेदोन फूट तीन इंच लांब, सहासष्ट फूट दहा इंच रुंद आणि एकशेएक फूट नऊ इंच उंच. त्याच्या बाहेरच्या बाजूची शिल्पं पाहिली. उत्तमोत्तम शिल्पाचं वन होतं. एका दृष्टिक्षेपात दिसणारं वन.

कोण होता हा वास्तुशास्त्रज्ञ? कोण होते हे शिल्पकार?

हा सगळा दगड मऊ कुरुंदी आहे. काळा पाषाण नाही. पिवळसर, गुलाबी अशा मनोहारी रंगाचा हा दगड आहे.

बुंदेलखंडावर जेव्हा चंदेला वंशाचं राज्य होतं, तेव्हा, इसवी सन नऊशेपन्नास ते दहाशे पन्नास या काळात, या आडबाजूला ऐंशी देवळं बांधली गेली. त्यापैकी आता तीन आपल्याला उभी दिसतात. बाकी सगळीकडं वसाण पसरलेलं आहे.

या देवळाचं पहिलं वेगळेपण लक्षात येतं, ते म्हणजे देवळाभोवती संरक्षक तट नाही. उंच, भव्य अशा जोत्यावर देवळं उभी आहेत. कंदारिया महादेव हे देऊळ सर्वांत उजवं आहे. या एकाच देवळात बाहेरच्या भिंतीवर सहाशे सेहेचाळीस आणि आत दोनशे सव्वीस मूर्ती आहेत. मूर्तींची उंची सर्वसामान्यतः अडीच ते तीन फूट आहे. ज्यांनी ही देवळं बांधली, देवतांची पूजाअर्चा केली, त्या लोकांच्या सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक जीवनाचं अत्यंत वेधक आणि चौफेर असं दर्शन आपल्याला आज होतं.

आदिवासींचे जथेच्या जथे पलिकडच्या देवाला ओल्यान पाणी वाहून, इकडंही येत होते. कुतूहलानं माना वर करकरून ही शृंगारदर्शक शिल्पं बघत होते, खिदळत होते, एकमेकांच्या पाठीवर थापा टाकीत होते. बायका पुन्हा वर बघतच नव्हत्या. खाली मान घालून दूर जात होत्या.

खजुराहोच्या शिल्पांपैकी या मिथुनशिल्पांचीच प्रसिद्धीच जास्त झाली आहे, पण एकूण शिल्पांपैकी फार थोडा भाग ह्या शिल्पांनी व्यापलेला आहे. इतर जीवनाचा मोठा पसारा इथं मांडलेला आहे ह्यात देवदेवता आहेत. कौटुंबिक दृश्य आहेत. राजघराणं आहे. खेळ आहेत. युद्ध आहे. संगीत आहे. नृत्य आहे. पाठशाळा आहे. उद्योग–व्यवसाय

आहेत. पशुपक्षी आहेत.

पण सर्वसामान्य पर्यटकांना कुतूहल आहे, आकर्षण आहे, ते स्त्री–पुरुषातील शृंगारदर्शक शिल्पात, वात्स्यायनान कामसूत्रात वर्णन केलेल्या आसनाच्या शिल्पात. आपल्या मनात भलंमोठं प्रश्नचिन्ह उभं राहतं, की देवळासारख्या पवित्र वास्तूवर ही शिल्पं का म्हणून कोरली असतील?

आजवर अनेक अभ्यासकानी आपल्या परीन याची उत्तरं दिलेली आहेत, पण त्यातलं एकही पूर्ण समाधान करणार नाही.



कंदारिया महादेव

काही जण म्हणतात, तेव्हा शाक्त पंथाच जोर होता. गुप्तपणे 'तंत्र' अभ्यासणारे लोक होते. मद्य, मांस इत्यादी त्याचे पाच मकार आहेत. चंदेला राजवंश हा आदिवासींपैकी होता. म्हणून हा तंत्रमार्ग इथं दिसतो.

काही म्हणतात, त्या काळच्या जीवनाचा एक भाग म्हणून शिल्पकारानी हे घडवलं आहे. सुबत्ता होती. विलास होते, त्याच हे दर्शन आहे. जे समाजात असत, त्याचच प्रतिबिंब कलामध्ये पडत.

काही म्हणतात, हे स्त्रीपुरुष नाहीत, प्रकृतिपुरुष अशी प्रतीकं आहेत. काहीही असो. एकवाक्यता नाही. श्रेष्ठ कलाकृतीत काही गूढता, काही धुकं असत, तशापैकीच हेही.

पण एकूणच खजुराहोची ही शिल्पं आपल्याला विलक्षण असा आनंद देतात. ती पाहून आपण थक्क होतो.

इथं उभ्या मूर्ती फार दिसतात. खजुराहोच्या स्त्रिया उभ्या उभ्या डोळ्यात काजळ घालतात, पायाच्या तळव्यांना मेंदी लावतात, तळपायातला काटा काढतात, प्रियकराला पत्र लिहितात, भांगात शेंदूर भरतात, ओठांना रंग लावतात, कपाळाला कुंकू लावतात.

खरं पाहिलं, तर कितीही लवचीक बांध्यांची असली, तरी कुणी स्त्री पायाच्या तळव्याला आळता उभ्या उभ्या लावणार नाही. कितीही उतावळी झाली, तरी पत्र लिहिण्याचं काम उभ्या उभ्या कोण उरकेल ?

हेही आपण चालवून घेऊ; पण वात्स्यायनानं सांगितलेला शृंगार हे शिल्पकार जेव्हा उभाच्या उभा घडवतात, तेव्हा हे काही अज्ञानं नव्हे, तर शिखराच्या उंचीशी सुसंवाद साधण्यासाठी या मूर्ती उभ्या आहेत, हे लक्षात येतं. निळ्याभोर आभाळाच्या दिशेनं झेप घेणाऱ्या या मेरुपर्वतासदृश शिखराची गती सतत, सर्वांगानी ऊर्ध्वगामीच राखली पाहिजे, याचं भान हे प्रतिभासंपन्न शिल्पकार कसं बरं विसरतील ?

खजुराहोचे तरुण स्त्री-पुरुष बेहोश होऊन आलिंगन देतात. नायिका मंद चादण्यासारखं हसतात. दासी लाजून तोंड झाकून घेतात. इथल्या अप्सरा अंगावरचं वस्त्र मुद्दाम ढळू देतात. तरुण-तरुणी एकमेकांना डोळ्यांनी पिऊन टाकतात. देवदेवता प्रसन्न चेहऱ्यानं बघत असतात. सुंदरी मुरडतात.

बारकाईनं पाहात गेलं, तर शस्त्रांचे अनेक प्रकार दिसतात. नाना प्रकारच्या तरवारी, खंजीर, गदा, भाले, धनुष्यबाण, ढाली, परशु.

वाद्यं अनेक प्रकारची आहेत. ढोल आहेत, कर्णे आहेत, बासरी आहे, डमरू आहे, वीणा आहे.

स्त्री-पुरुषांचे विविध पोशाख आहेत, केशरचना आहेत, पगड्या आहेत. अलंकारांची तर मोजदाद करता येणार नाही, एवढे प्रकार आहेत. पाची बोटांत अंगठ्या आहेत.

फर्निचरचे अनेक प्रकार आहेत. छपाई केलेलं कापड आहे. हॅन्डबॅग्ज् आहेत.

खजुराहोचे लोक विशेष करून रानडुकराची शिकार करताना आढळतात. हरणाची आणि मोराचीही शिकार होत होती.

असं हे खजुराहोचं पाषाणातलं जग आहे. प्रेम आणि द्वेष, सुख आणि दुःख, युद्ध आणि शांती, भक्ती आणि वैराग्य यांचं केवढं तरी डोळे दिपवून टाकणारं दर्शन शिल्पकारांनी घडवलं आहे.

अनेक परदेशी प्रवाशांनी आपल्या प्रवासवर्णनात खजुराहोचा उल्लेख केला आहे. सातव्या शतकात ह्यू एन त्संगला इथं अनेक बुद्धमठ आढळल्याचं तो लिहितो. खजुराहोच्या उत्तरेला आणि पूर्वेला जी ओसाडी, मातीचे ढीग पसरलेले आढळतात, ते बहुधा या मठांचेच असावेत.

त्या काळातल्या लोकांची करमणूक कोणती होती ? नृत्य-संगीतासह नाटकं होत. कंदारिया, विश्वनाथ आणि लक्ष्मण ह्या देवळांतली विस्तृत दालनं म्हणजे रंगशाळाच असाव्यात. खजुराहोच्या शिल्पातील नायिका ह्या अभिनयपटु आहेतच. त्यांच्या उभं राहण्यात नाट्य आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचं स्मित, त्यांच्या हाताच्या मुद्रा, त्यांचे थरथरते ओठ, आणि

त्यांचे अर्थपूर्ण कटाक्षच सांगतात, की अभिनयगुणात ह्या फार निपुण आहेत.'

नाटकातली पात्रं मुखवटे वापरत असावीत. महादेव देवळात, नृत्यपथकातल्या एका पात्रानं जंगली प्राण्याचा मुखवटा घातलेला आहे.

एका शिल्पात कोणी स्त्री समोर फलक ठेवून चित्र रंगवताना दाखविली आहे.

चित्रगुप्त देवळात दोन मल्ल लढताना दाखवले आहेत. दुलादेव देवळात एक पहिलवान वजन उचलतो आहे.

गप्पा मारीत बसलेल्या बायका, पुरुषही जागोजाग आढळतात. एका ठिकाणी तर टेबलाशी बसून दोन माणसं चर्चा करत आहेत.

दारू पिणाऱ्या ढेरपोट्या माणसाची शिल्पं अनेक ठिकाणी आहेत.

तेराशे पस्तीसमध्ये आलेला इब्नबतूता सांगतो, की

' खजुराहोला एक मैल लांबीचं तळं आहे. इथं जटाधारी योगी राहतात. उपासतापास केल्यामुळं यांचा रंग पिवळट दिसतो. अनेक मुसलमान लोक ह्या योग्यांकडे मंत्रतंत्र शिकायला येतात.'

तूर्त खजुराहोला जटाधारी आणि भगवी वस्त्रं चढवलेले पुष्कळ परदेशी पर्यटक मात्र दिसतात.

ज्याला इतिहासात, शिल्पकलेत, वास्तुकलेत रस आहे, ज्याला भटकणं आवडतं, अशा कोणीही भारतीय माणसानं खजुराहो पाहिल्याशिवाय मरू नये.

[ ' स्वराज्य ' : मुंबई–पुणे . शनिवार, २१ मे १९८० ]

# शोध

ह्या गेल्या फेब्रुवारी महिन्यात, संपूर्ण महिनाभर मी पाठीला हॅवरसॅक लावून मनसुराद भटकलो. कुठं कुठं जायचं आणि काय काय बघायचं, ह्याची थोडीफार आखणी केली होती, पण भर होता, तो ऐन वेळी जमेल तिथं, जमेल तसे जाऊ, ह्यावरच.
पहिल्यांदा मी थेट जोधपूरला गेलो. राजस्थानात बघण्यासारखं बरंच होतं, पण मला ओढ होती, ती वाळवंट बघण्याची. मग मी एक भला टॅक्सीवाला गाठला आणि त्याचा वाटाड्यासारखा उपयोग करून जोधपूर ते जसलमीर ह्या वाळवंटी रस्त्यावरून फलोदीपर्यंत म्हणजे दीड पावणेदोनशे किलोमीटर असा गेलो. ओसियनचं शेकडो वर्षांपूर्वी बांधलेलं सूर्यमंदिर पाहिलं. वाटेत चिंकारा जातीच्या हरणांचे कळप, जागोजाग आढळणारे मोर, चितूर पाहून चकित झालो.
ह्या निर्दय वाळवटात, पाच शतकांपूर्वी, जंभेश्वर नावाचा महात्मा होऊन गेला आणि त्यानं, हिरवं झाड तोडू नये, प्राणिहत्या करू नये, ह्या दोन गोष्टींचा प्रसार करण्यात उभा जन्म घालवून, उजाड होय चाललेल्या जमिनीला हिरवं वस्त्र नेसवण्याचं काम आपल्या अनुयायामार्फत केलं. ही हकीकत अगदी नव्यानं मला समजली. ते इतिहासप्रसिद्ध खेजडी वृक्ष मी पाहिले. त्याच्या सावलीला मी क्षणभर उभा राहिलो, आणि त्याच्या खोडाला हात लावून मी आतली स्पंदनं मला जाणवतात का, हे पाहिलं.

आणखीन मी कुठं कुठं गेलो  खजुराहोला जाऊन मी ती भव्य मंदिरं पाहिली, कान्हा–किसलीच्या जंगलात गेलो आणि हत्तीवर बसून बरंच जंगल तुडवलं. ज्या भूमीवरून पंधरा वर्षांपूर्वी जॉर्ज शेल्लर हा विख्यात प्राणिशास्त्रज्ञ पायी हिंडला आणि वाघासंबंधी आजवर कुणाला माहीत नव्हत्या, त्या गोष्टी त्यानं जगासमोर मांडल्या, ती भूमी मी पाहिली. शेल्लरनं आपल्या निरीक्षणासाठी बांधून घेतलेली, ' शेलर हाईड ' पाहून रोमांचित झालो. ह्याच जागी रात्रीच्या रात्री जागवून त्यानं समोरच्या पाण्यावर आलेली वाघीण आणि तिचे चार बच्चे मोठे होताना पाहिले होते आणि त्यांची चरित्रं शब्दबद्ध केली होती.

मी कोणार्कचं ते भव्य सूर्यमंदिर पाहिलं. आणि विद्याधर महापात्र ह्या थोर शिल्पकाराच्या पायांवर लोटांगणं घेतली.

ह्याच धावपळीत दोन दिवस काढून मला आंध्र प्रदेशातलं ते सुप्रसिद्ध ' कोलेरु सरु ' हे पेलिकन पक्ष्यांचे हंगामी वसतिस्थान पाहायचं होतं.

मी विजयवाड्याला आलो. दिवस दवडायचा नाही, म्हणून गाडीतून उतरताच बस–स्टेशनकडं धावलो.

सगळी बस–स्टेशन सारखीच असतात. महाराष्ट्रातली काय, मध्य प्रदेशातली काय, ओरिसातली काय आणि आंध्रातली काय, प्रचंड गोंगाट, धावपळ, गर्दीचे लोंढे आणि बावरलेले चेहरे.

भाषा हे विनिमयाचं साधन आहे, ही गोष्ट आंध्र प्रदेशात हिंडताना फार पटते. विशेषतः, खेड्यापाड्यात तर तुम्ही गाढवच होता. काहीही समजत नाही, काहीही समजावून देता येत नाही.

विजयवाड्याच्या बस–स्टेशनवर कोणती गाडी कुठं जाणार आहे, हे तुम्हांला मुळीच कळत नाही. प्रत्येक बसच्या कपाळावर जाज्वल्य भाषिक अभिमान लिहिलेला होता. आणि ह्या लिपीचा मला गंधही नव्हता. मी निरक्षर होतो.

प्रवासी लोकांना मदत करणाऱ्या अधिकारी बाई वयानं प्रौढ, आणि धीम्या वृत्तीच्या होत्या. जणू काही आग लागली आहे, अशी धावपळ आणि गोंधळगर्दी असूनही त्या विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देत होत्या. त्यांच्या टेबलपुढं जाऊन मी फार निर्धारपूर्वक म्हणालो,

" मला लेक कोलेरू ह्या ठिकाणी जायचं आहे. कोणची गाडी तिथं जाते, हे मला कृपा करून सांगाल का ? "

बाईंचा चेहरा प्रश्नार्थक.

" कोलेरू ? "

" हो. KOLLERU. It is a big sweet water lake...Pelicans migrate there from distant lands, for nesting..."

बाईंनी आपल्या भाषेत सहकाऱ्यांशी चर्चा केली. मी, पाठीवरचं ओझं सांभाळीत, त्यांचे चेहरे बघत राहिलो. ह्या पेलिकन पक्ष्यांच्या आणि त्यांच्या घरट्यांचा ठावठिकाणा, ह्यांपैकी कोणाला नक्की ठाऊक नसावा. पक्षीच ते.

उत्तेजित, उंच स्वरात बरीच चर्चा झाली. मग आपसांतलं बोलणं संपवून बाई मला म्हणाल्या,

" तुम्ही आकेविडु ह्या गावाला जा. तिथून कोलेरूला जाता येईल. "

" आकेविडूची बस केव्हा सुटते ? "

" ती काय, आता सुटेलच. पळा तुम्ही. "

पळा, तर पळा.
घाईघाईनं जाऊन मी आकेविडूच्या बसमध्ये बसलो. बस भरली होतीच. यथावकाश सुटली.

मी आजतागायत रानात पेलिकन्स् पाहिलेले नाहीत. आसाममधल्या काझिरंगा आणि मानस ह्या जंगलात ते आढळतात, असा उल्लेख मी वाचलेला आहे, पण ही दोन्हीही जंगलं मी तुडवली आहेत. काझिरंगातले गेंडे, बारशिंगे पाहिले आहेत, भूतान सरहद्दीला लागून असलेल्या मानस नदीकाठचं सुंदर जंगलही मी हिंडलो आहे. तिथली सोनेरी वानर पाहिली आहेत, पण पेलिकन पक्षी मला तिथं आढळले नाहीत.

एकोणीसशे साठ साली, के. के. नीलकंठ ह्यानी आंध्र प्रांतातली सर्वांत मोठी पेलिकन वसाहत शोधून काढली आणि त्यानी दिलेल्या माहितीप्रमाणे ए. पी. गी हे निसर्गप्रेमी गृहस्थ ही कॉलनी पाहायला निघाले. एकोणीसशे साठ साली जानेवारी महिन्यात ते कलकत्याहून मद्रास मेलनं निघाले आणि तालेपल्लिगुडम् ह्या जागी उतरले. पेलिकन पक्ष्यांची वसाहत असलेली दोन खेडी अरेदू आणि कोलामारू ही तिथून बारा आणि पधरा मैल अंतरावर होती. तिथल्या लहानशा रेस्ट हाऊसमध्ये गी राहिले आणि त्यानी पक्षी पाहिले, त्यांची अनेक छायाचित्रं घेतली. फिल्म घेतली. गींनी म्हटल आहे .
' मला वाटतं, भारताच्या पेलिकन पक्ष्यांची छायाचित्र घेणारा मी पहिला मनुष्य आहे. '
गींना हे सर्व दृश्य फारच चकित करणार वाटल. फक्त तेलगू भाषाच येणाऱ्या लोकानी गींना सांगितल, की,
' नोव्हेंबर महिन्यात भारताच्या चोहो दिशानी हे पक्षी इथं येतात, त्याचा आम्हाला काही त्रास नाही. आमचे ते पाहुणे आहेत. '
दुसऱ्या दिवशी मात्र, गींच्या जवळ असलेले कॅमेरे, तिकाटणं, आयती कापडाची तयार केलेली दडण हे सगळं बघून खेडूत लोकाना संशय आला. गी ह्यांच्याबरोबर असलेल्या फॉरेस्ट रेंजरला ते म्हणाले,
" हे, साहेब, पाखराचं रक्त काढून न्यायला आलेत. "
रेंजर म्हणाला,
" अरे, येडे काय तुम्ही ! मोठे साहेब आहेत हे. आपल्या देशातल्या वन्य पशुपक्ष्याचं रक्षण करण्यासाठी एक पंचायत आहे नेमलेली सरकारनं. त्या पंचांपैकी एक आहेत हे. ह्याचा फार उपयोग होईल तुमच्या गावाला. "
रेंजरसाहेबांनी बरंच समजावून सांगितल्यावर लोकाना पटल आणि त्यानी साहेबाना फार मदत केली.
कोलामारू खेड्याजवळच्या कॉलनीमध्ये गींना एकूण पंधराशे घरटी आढळली. दोन चौरस

मैलात पसरलेली भातखाचर होती. ह्या पिकाना कॅनॉलच पाणी होत. बाधावर जी झाडं होती, त्यांवर पेलिकन पक्ष्यांनी घरटी केली होती.

भरतपूरच्या पक्षी अभयारण्यात जसा पाखराचा सतत चाललेला गोगाट ऐकू येतो, तसाच आवाज, चांगला अर्धापाऊण मैलपर्यंत ऐकू येत होता. जवळ गेलं, की नाना तऱ्हाचे आवाज ऐकू येत. पंखाचा फडफडाट, विव्हळणं, ढुरढुर आणि मचमच हे सगळे आवाज मी साहेबांनी ध्वनिमुद्रित केले.

चागलस घरटं बघून, फोटो घ्यावेत, म्हणून साहेब सावकाश, बघत बघत चालले असताना एकदम कुणीतरी टाळ्या वाजवल्या.

साहेबानी मागं वळून, कॅमेरे वगैरेची ओझी वागवत येणाऱ्या रोजगारी पोराना दटावल, "चूप चला, रे, पाखरांना बुजवू नका आवाज करून !"

तर पोर बावरून एकमेकाच्या तोंडाकडं बघत राहिली. त्यानी टाळ्या वाजवल्या नव्हत्या ! जराशान साहेबाच्या ध्यानात आल, की हे मोठमोठे पक्षी, त्यांतला एकदा दुसरा अचानक खाली दबत होता डोकं मागं करून चोच उघडत होता. आणि जोरजोरान टाळ्या पिटल्यासारखा आवाज काढत होता.

का बर ? तर, काही ठाऊक नाही !

पक्ष्याच्या आणि प्राण्याच्या बाबतीत बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीतच नसतात.

पेलिकनच्या चोचीला मोठी झोळी असते. ही झोळी ताणली गेली, म्हणजे पेलिकनची चोच त्रिकोणी दिसते. ह्या झोळीत, पोटापेक्षा जास्ती अन्न पेलिकनला सामावता येतं. पाण्यातले मासे पकडताना ह्या झोळीचा, पेलिकनला झेलणीसारखा उपयोग होतो. ही मोठी मोठी पाखर पाण्यात उतरून घोळक्यान जेव्हा खोलातले मासे उथळ पाण्याकडे हाकून नेतात, तेव्हाही ह्या चोचींचा त्याना फार उपयोग होतो.

पोराना खायला घालणं हा कार्यक्रम फार पाहण्यासारखा असतो. थोडसं पचलेलंच असं अन्न, म्हणजे मासे पोराना भरवले जातात. आभाळातून येऊन पेलिकन फादीवर उतरतो. काही वेळ फांदी झोके घेत राहते मग हा घरट्याकडे जातो आणि एक दोन उचक्या देताच पोटातलं अन्न झोळीत येत. कागारूच पोर जसं आईच्या पोटातल्या पिशवीत शिरत, तसंच पेलिकनच पोर खाता खाता ह्या झोळीत शिरून दिसेनासं होत.

एकाच बाभळीच्या झाडावर बारा-पधरा घरटी असतात. चळवळी पोर सारखी मिसळत असतात. कोण कोणत्या घरातलं, हे पाहणाराला कळत नाही. आईबापाना मात्र बरोबर कळत. अन्न घेऊन माघारी आल्यावर ते नेमकी आपली पोर शोधून त्यांनाच खाऊ घालतात.

हे आईबाप पोराची फार काळजी घेतात, असं समजल जातं, पण मी साहेबाना दिसल, की अनेक पोर घरट्यातून खाली पडतात, आणि वरून पडणाऱ्या अन्नाच्या उष्ट्या

तुकड्यावर जगतात. काही मरून जातात, काही कोल्ह्याकुत्र्यांकडून खाल्ली जातात, काही थोडी जगतात. एकदार घरट्यातून खाली पडल्यावर आईबाप त्यांच्याकडं पाहात नाहीत, ते आपल्या पोरांना विसरून जातात

एरवी दिसायला पेलिकन हा कुरूप, अवजड असा पक्षी आहे; पण एकदा का पंख पसरून तो उडाला, की सुरेख दिसतो. गिधाडं जशी आभाळात उंच अशी गोल गोल फिरत राहतात, तसे पेलिकन फिरतात आणि मध्येच एखादा, केवळ आनंद म्हणून हवेतच कसरतीचे खेळ करू लागतो.

ह्या वसाहतीत कावळ्याची, घारींचीही गर्दी असते. पेलिकननी मिळवून आणलेल्या शिकारीतले तुकडेताकडे उचलण्यासाठी ह्यांच्या भराऱ्या सुरू असतात.

वर्षाकाठी पाहुणे म्हणून येणाऱ्या ह्या पाखराचं खेडूत मंडळी स्वागत करतात आणि त्यांना सांभाळतात. ते आपलं काम आहे, असं त्यांना वाटतं.
राजस्थानातले बिश्नोई लोक नाहीत का आपल्या गावाभोवतालचे प्राणी-पक्षी सांभाळत, तसेच आंध्रमधले हे खेडूतही पेलिकन्सना सांभाळतात.

गीसाहेबांनी पाहिलेली ही पेलिकन पक्ष्यांची वसाहत मला पाहायची होती. तिथं गुपचूप झाडाखाली, किंवा झाडावर बसून मी माझ्या वहीत अनेक रेखाटनं करणार होतो, टिपणं घेणार होतो. जमेल तसा पुन्हा पुन्हा इथं येणार होतो आणि मराठीत त्यावर एक छानसं पुस्तक लिहिणार होतो.
मी फार आनंदून गेलो होतो. पक्षिजीवनातलं केवढं तरी भव्य नाट्य मला पाहायला मिळणार होतं.

आकेविडु ह्या गावाच्या दिशेनं गाडी भन्नाट पळत होती. शेती, कालवे, ताडाची चित्रमय झाडं भराभर येत होती, मागं पडत होती. अधूनमधून गाडी थांबत होती. उतारू उतरत होते, नवे चढत होते.

संध्याकाळी सहाच्या सुमाराला आकेविडु आलं.
गाडी उभी राहिली. हॅवरसॅक घेऊन मी उतरलो. डाव्या-उजव्या बाजूला दरिद्री दुकानं, हाटेलं. माणसांनी ओसंडून जाणारा रस्ता. लगोलग माझ्याभोवती सायकल-रिक्षावाल्यांचा गराडा पडला.
मी गोंधळून गेलो.

हिंदी कुणाला कळत नव्हत. रिक्षावाल्यांपैकी एकाला थोड कळत होत.
" मला कोलेरूला जायच आहे. "
" कोलेरू ? "
" हां. "
" मोटारबोटनं जाव लागेल. "
" कुठून ? "
" चला, मी नेतो. एक रुपाया द्या. "
" चल. "
गलिच्छ झोपड्या, मातीचे ढीग, घाण पाण्याची डबकी ओलांडत आम्ही पाण्याच्या काठी आलो. हा पाण्याचा प्रवाहही गलिच्छच होता. दहा-बारा मोटारबोटी पाण्याच्या काठाशी लागलेल्या. गर्दीतून वाट काढीत रिक्षा एका बोटीशी जाऊन उभी राहिली.
डगरीवरून उतरून मी, पाण्यात टेबल टाकून तिकिट विकणाऱ्यापाशी गेलो. तिकीट विकणाराला इंग्रजी येत होत.
" मला कोलेरूला जायचं आहे. "
" तीन रुपये. "
" किती वेळ लागतो पोचायला ? "
" तीन तास. "
" तीन ? "
" हो. "
मी ह्या भागात नवा आहे आणि गोंधळून गेलो आहे, हे बहुधा माझ्या चेहऱ्यावरून याला वाचता आलं.
सफाईदार इंग्रजीत बोटवाल्यान मला विचारलं,
" सर, तुम्ही कुठून आला ? "
पुण्यापेक्षा मुंबई सर्वांना माहितीची असते.
म्हणालो,
" मुंबईहून. "
" वाटलंच. कोलेरूला तुम्ही कशासाठी जात आहात ? "
" पेलिकन् पक्ष्याची कॉलनी पाहायला. "
हा काळ्या वर्णाचा, प्रौढ वयाचा, उंच आणि शिडशिडीत असा माणूस होता. तो हताश झाला म्हणाला,
" तुम्हाला तीन तास लागतील तिथं पोचायला. "
" रात्री राहण्याची काही व्यवस्था तिथं आहे का ? "
" दोन मैल चालून गेलात, तर एक देऊळ आहे. देवळाची व्यवस्था पाहणाऱ्या लोकांना

विनती केली, तर ते जागा देतील. "
मी फार विचारात पडलो. सहा वाजले होते. तीन तास, म्हणजे रात्री नऊ वाजता मी पोचणार. तिथून पाठीवर हॅवरसॅक घेऊन दोन मैल चालायच, म्हणजे आणखी एखादा तास. दहा–साडेदहाला कुठल्या तरी अनोळखी देवळात जाऊन मी पडणार.
" का, हो ? तिथ सकाळीं मला हे पेलिकन पक्षी बघायला मिळतील का ? "
बोटवाला मान नकारार्थी हलवून म्हणाला,
" काही सांगता येत नाही ! "
आता पुढं काय ?
मग मी त्यालाच विचारलं,
" तुमचा सल्ला काय आहे ? "
तो म्हणाला,
" सर, माझं म्हणणं आहे, की तुम्ही रात्रीच्या वेळीं जाऊ नका. रात्री इथं आकेविडूला राहा आणि सकाळी पहिल्या बोटीनं निघा. अगदी पहाटे चारला आला, तरी मी तुम्हाला तिकडं पाठवतो. "
" इथं राहायला ठिकाण आहे ? "
बोटवाला हसला. म्हणाला,
" हे काही शहर नाही, साहेब. लहान गाव आहे. तुम्ही बसमधून उतरला ना, तिथं एक लॉज आहे. गोड मानून रातभर तिथं राहा. "
मी रिक्षा अजून ठेवला होता. तो हाफ्पॅन्ट घातलेला पोरगा मोठा चटपटीत होता. त्याला थोडं हिंदी कळत होत. बोटवाल्यान त्याला सगळं समजावून सांगितल आणि मी लॉजवर आलो.

खाली हॉटेल, किराणा मालाच दुकान, विडीकाडीच दुकान, सायकल दुकान आणि वर खोल्या असं लॉज होत. एका पोरानं मला खोली उघडून दिली. ह्या लहानशा खोलीत कॉट होती, मच्छरदाणी नव्हती. पाणी, समोरच्या गलिच्छ अशा डबक्यातूनच आणल जात होत. ते येताना मी पाहिलच. कावडीला जर्मन सिल्व्हरची दोन मोठी डेचकी लावलेली होती आणि हॉटेलचा पोऱ्या, तळ्यातून आणलेल हे पाणी हॉटेलात भरत होता. लोक सारखे तोंड बाजूला करून थुंकत होते. आणि हत्ती रोगान हैराण झालेले अगडबंब पायाचे तीन–चार लोक, बस जिथं थांबते, तिथंच मी पाहिले होते. एक हमाल होता. एक झाडूवाला होता आणि एक कोण होता, त्याचा धंदा मला कळला नाही.
ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर मला रात्र फारच भयाण वाटत होती. खोलीच्या भिंतीवर आणि छतावर नाना जातींचे डास बसलेले मी पाहिले. इथं असेपर्यंत पाण्याचा थेंबही तोंडात घ्यायचा नाही, अस मी ठरवून टाकलं. पाणी नाही आणि जेवणही नाही. केळी खावी,

म्हणून पाहिलं, तर हे गाव इतकं गरीब होतं, की आम्रात इतरत्र सहज दिसणारं हे फळ तिथं मुळीच दिसलं नाही. केळं नाही, वहाळेही नाही. उकडलेल्या शेंगा होत्या, पण त्या कोणत्या तरी तळ्याच्याच पाण्यात उकडलेल्या असणार, ह्या विचारानं त्या मला खाऊ दिल्या नाहीत.

सुदैवानं माझ्याजवळच्या पाण्याच्या बाटलीत चांगलं पाणी होतं. नेहमी मी जवळ ठेवतो, तसा एक बिस्किटांचा पुडा होता. सुकी फळं होती. झोपेच्या गोळ्या होत्या आणि आत शिरून झोपायची पिशवीसुद्धा होती.

भकास मनानं मी माझ्या खोलीसमोरच्या गॅलरीत उभा होतो. समोर घराची कौलारू छपरं तेवढी दिसत होती. अंधारून आलं होतं. वीज गेली होती. एक पोरगा आला आणि खोलीत मेणबत्ती लावून गेला. माझ्या शेजारच्या खोलीतला प्रवासी लुंगी लावून बाहेर येऊन उभा राहिला.

त्यानं विचारलं,

" तुम्ही कुठले ? "

" मुंबई. "

" मी कलकत्याहून आलो. काय गाव, हो, हे ! पाणी नाही चांगलं, अन्न नाही. लॉज हे असलं कुठं येऊन पडलो, असं झालंय्. "

तो हिंदीत बोलत होता. फार हताश होऊन म्हणाला,

" इथं आपली भाषाही कुणाला कळत नाही. "

" होय. "

" तुम्ही व्यापारी, का कुठल्या कंपनीचे एजंट ? "

आता ह्याला मी काय सांगणार ? म्हणालो,

" मी सुटी घेऊन देश बघायला बाहेर पडलो आहे ! "

तो चकित झाला,

" ह्या गावात काय आहे बघायला ? "

" पक्षी आहेत. इथून जवळपास कोलेरू नावाचं मोठं तळं आहे. तिथं पेलिकन पक्षी वस्तीला येतात, घरटी घालतात. अंडी घालतात. मोठी वस्ती आहे त्या पाखरांची इथं. ती बघावी, म्हणून मी आलो आहे. तुम्ही ? "

" माझा कलकत्याला माशाचा व्यापार आहे. गोड्या पाण्यातले मासे तिकडं मागवता येतील का बघावं, इथल्या मुसलमान कोळ्यांना भेटावं, म्हणून आलो आहे. "

" प्रथमच आलात का इथं ? "

" हो. "

" तुम्ही इथल्या कोळ्यांना केव्हा भेटणार आहात ? मला ह्या पक्ष्यांबद्दल काही माहिती कदाचित कोळ्याकडून मिळेल. "

" चार जणं इथंच मला भेटायला बोलावलेत. नऊ वाजता येतील. ते आले, की तुम्हाला सागतो. "

तास–दीड तास अवकाश होता. मी बाहेर उभा होतो, तो आत जाऊन पडलो.

स्लीपिंग बॅगमध्ये शिरलो.

झोप लागली.

सुमारे दहाच्या सुमाराला शेजारच्या खोलीतून मोठमोठ्याद्या बोलण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. हे कोळ्याचेच असावेत, माझा शेजारी, कलकत्तेवाला मला बोलवायला विसरला असावा.

दरम्यान केव्हातरी वीजही आली होती.

मीच उठून त्या खोलीत गेलो.

मच्छीमारीचा व्यवसाय करणारे तीन लोक आले होते त्याना कोलेरू माहीत होत. पेलिकन माहीत नव्हते. तुम्ही पेलिकन पक्षी कुठं पाहिलेत का, असं मी विचारल्यावर ते म्हणाले,

" कसला असतो ? "

" मोठा पक्षी असतो पाण्यात पोहणारा, मासे खातो. त्याच्या गळ्याला झोळी असते. "

पेलिकनच असं शब्दचित्र मी रेखाटल्यावर प्रकाश पडल्याप्रमाणे एकजण उल्हसित आवाजात बोलला

" हा हां, साब, बचपनमे देखा है ! "

बचपनमें ? हा आता चाळिशीला आला होता. ह्याच बाल्पण म्हणजे वीस–पंचवीस वर्षांपूर्वीचा काळ. तेव्हाच तर ए. पी. गी ह्या निसर्गवेत्त्यान हे पक्षी पाहिले होते.

मी विचारल,

" अलीकडे कधी तुम्ही किंवा तुमच्यापैकी कोणी पाहिलेत का ? "

सगळ्यानी नकारार्थी माना हलवल्या.

मला डॉ. सलीमअलींशी झालेलं संभाषण आठवल. पुण्याला त्यांची माझी भेट जेवणाच्या टेबलावर झाली होती. मी त्यांना म्हणालो होतो,

" ए. पी. गी ह्यानी कोलेरूला पंधराशे घरट्याची जी पेलिकन कॉलनी पाहिली होती, तिथं जाण्याची माझी फार इच्छा आहे. "

तेव्हा ते मला म्हणाले होते,

" तिथं आता काही उरलेल नाही. "

खर तर त्यानी सांगितलेल्या ह्या बातमीवर विश्वास ठेवून मी इकडे येण्याचा खटाटोप करायला नको होता. पण त्यानतरही मी ठिकठिकाणच्या ट्रॅव्हल गाईडमध्ये, इथं तिथं, वाचत होतो, की कोलेरूला पेलिकन पाहायला मिळतात.

पंधराशे नसतील, पण तळ्याकाठी एखाद्या बाभळीच्या झाडावर मला चार–सहा घरटी तरी

दिसतील. गेले, नाहीसे झाले, असं म्हणता म्हणता, सोलापूर जिल्ह्यात माळढोक पक्षी नाही का दिसले?
तसे पेलिकन्स् मला का नाही दिसणार?
ते मच्छीमार म्हणाले,
" साब, तुम्ही आमच्याबरोबर मशिदीत येता का, तिथं एक म्हातारा शिकारी आहे. तो बरोबर माहिती देईल."
आता इतक्या रात्री, मशिदीतला म्हातारा शिकारी शोधायला बाहेर पडण्याची माझी इच्छा नव्हती पेलिकनचा झाला एवढा शोध पुरे होता.

झोपण्याआधी मी लॉजच्या पोरापाशी चौकशी केली,
" विजयवाड्याला जायला गाडी केव्हा आहे?"
तो म्हणाला,
" सहा वाजल्यापासून प्रत्येक तासातासाला गाडी विजयवाड्याला जाते."
कोलेरूला न जाता आता माघारी जाण्याचा निश्चय मी केला.
छतावर डासांचे पुजके बसून होतेच. तोंडाला ओडोमॉस चोपडून मी झोपेची एक गोळी घेतली आणि देवा, भगवाना म्हणून पिशवीत शिरलो.

सकाळी मला पहाटे जाग आली. वीज नव्हतीच. बॅटरीच्या उजेडात भराभरा सारं सामान आवरलं. चहापाण्याचा प्रश्न नव्हताच. झोपेतून जागं करून पोरापाशी बिल दिलं. गॅलरीत, जिन्याजवळच्या जागेत नाना प्रकारची माणसं झोपलेली होती. उघडीवाघडी, आडवीतिडवी, दाढीवाली, जटावाली, अपंग, पाय–मुजकी.
खाली उतरून मी बसची वाट पाहात उभा राहिलो. तो कालचा रिक्षावाला आला आणि सलाम करून हसत उभा राहिला.
मी त्याला म्हणालो,
" अरे बाबा, विजयवाड्याला जाणारी बस आली, म्हणजे मला सांग. कारण, मला तुमची लिपी वाचता येत नाही. आणि हा बोजा उचलून गाडीत ठेव. एक रुपाया देईन."
हा पोरगा नुसता रिक्षावाला नव्हताच. हरकामी ठेकेदार होता. तो बसच्या टपावर सामान चढवायला मदत करत होता. सामान उतरवायलाही मदत करत होता. मध्येच त्यानं कोणा व्यापाऱ्याची हिरव्या मिरच्यांनी भरलेली चार पोती उतरवली. ती राखत बसला. एक पोतं थोडंसं फाटलं होतं, त्यातून मिरच्या गळत होत्या. ह्यानं चांगल्या ओंजळभर काढून घेतल्या आणि आपल्या विजारीच्या दोन्ही खिशात घातल्या. मग शेजारी जाऊन दाभण–सुतळी घेऊन आला आणि बंदोबस्तानं त्यानं ते फाटकं पोतं शिवून टाकलं.

बऱ्याच वेळानं व्यापारी आपला माल घेऊन आला आणि एकामागून एक पोती त्यानं हलवली.
मी उभा राहून कंटाळलो. हॅवरसॅक धुळीत टेकवून त्यावर बसलो.
कुठून कुठून बस येत होत्या; थाबत होत्या, जात होत्या. आठ, नऊ, दहा वाजले, तरी सहा वाजल्यापासून तासातासानं असलेली विजयवाड्याला जाणारी एकही बस आली नाही. अकरा वाजता आली. मला कळलं नाहीच. रिक्षावाला धावत आला. सामान चढवून, सलाम ठोकून गेला. बस सुटली.

तीन वाजण्याच्या सुमाराला ह्या जलद बसनं मी विजयवाड्याला आलो. ' तिलोत्तमा ' नावाच्या लॉजवर जाऊन उत्तम आघोळ केली, जेवलो आणि झोपलो. अजून एक गोष्ट राहिली होती. इथल्या स्टेट इन्फर्मेशन ऑफिसमध्ये जाऊन मला कोलेरूसंबंधी चौकशी करायची होती. एकोणीसशे ब्याहत्तर साली छापलेल्या, टूरिस्ट मॅप ऑफ आंध्र प्रदेश ह्या भारत सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या नकाशात कोलेरू लेकसंबंधी बरीच माहिती होती.
वोळक्यान पोहणाऱ्या सात पेलिकन्सचं रंगीत छायाचित्रही होतं.
चमत्कारिक वेळी हे माहिती-केंद्र उघडत, बंद होत होतं. म्हणून मी पाटीवरच्या वेळा वाचून मग गेलो.
अधिकारी बरे होते. पण त्यानी मला ह्या टेबलावरून त्या टेबलाकडे फिरवलच. शेवटच्या टेबलावरचा माणूस म्हणाला,
" मी सात दिवसापूर्वीच जाऊन आलो. मला पक्षी आढळले नाहीत. "
" म्हणजे मी नेमक्या ठिकाणी गेलो, तरीही मला काही दिसणार नाही ? "
" नाही. "
" नक्की ? मग मी पुन्हा प्रयत्न करू नको ? "
सरकारी अधिकाऱ्यासारखं हसून ते म्हणाले,
" प्रयत्न करू नका, असं मी सांगणार नाही. कदाचित आम्हाला ठाऊक नाही, ते ठिकाण तुम्हाला दिसेलही ! "
मी प्रयत्न केला नाही. पुण्याला आलो.

अलीकडेच मला कळलं, की वेस्ट गोदावरी ह्या जिल्ह्यात कोलेरू हा विशाल जलाशय आहे. एकूण दोनशे साठ चौरस मैल एवढं त्याचं क्षेत्र आहे, आणि ह्या जलाशयाच्या काठावर एकूण बहात्तर खेडी आहेत. मी जर पुणे ते विजयवाडा, विजयवाडा ते कैकलूर आणि तिथून साडेचार मैल टांगा किंवा रिक्षा करून भुजबल-पट्टनम् ह्या गावी गेलो, तर तिथले त्रिविक्रम शास्त्री नावाचे एक उत्साही शिक्षक मला पेलिकन कॉलनी

दाखवतील.

माझा काही भरवसा नाही. एखाद्या नोव्हेंबरात उठून मी अस्तित्वात नसलेल्या ह्या पक्ष्यांच्या कॉलनीच्या शोधासाठी जाईनही.

[ कवडसे : दिवाळी वार्षिक, १९८० ]

# मगर आणि वानर

उंचावर बांधलेल्या सुंदर बंगलीच्या व्हराड्यात बसलं, की समोरचा सगळा तलाव दृष्टीच्या घेरात घेता येई.
हिराडोटसन सांगितलेल्या इतिहासात पर्शियाचा राजा झेरक्सेस आपला सेनासागर एका दृष्टिक्षेपात पाहण्यासाठी संगमरवरी सिंहासनावर जसा बसला होता, तसं इथं बसता येई. पाच किलोमीटर व्यासाचा तलाव म्हणजे साक्षात सौन्दर्य होतं. क्षणाक्षणाला तो नवं रूप घेई. कधी भिंगासारखा लखलखे, तर कधी निळं आभाळ पांघरे. कधी पश्चिमेचे लाल रंग याच्यात मिसळत, तर कधी सगळा विस्तार गर्द हिरवी-निळी शाई होई. कधी रुपेरी चमचम, तर कधी काठावरच्या घनगर्द झाडींच्या तरल झुळझुळीत छायेची चौफेर झालर आणि मध्ये शुभ्र ढगांसहित आभाळरंग.
सारखं रूप बदलत राही, तसे नाना आवाजही होत. किलकिल्या खंड्या उंच आभाळात झोकून धपक्कन् पाण्यात पडे आणि मासा उचलून उडे, तेव्हा वर्तुळं उठत, पसरत आणि विरून जात. चोंचसाठी मासोळ्या नाकं वर काढत. बुडबुडे निघत आणि तात्काळ विरून जात. संध्याकाळी मंद वारा सुटे आणि लहान लाटा काठाशी थडून चुबुक् चुबुक् असा आवाज होई. बदकांचा थवा एकदम उडाला, की वेगळा आवाज होई आणि आभाळातून थवा पाण्यात उतरे, तेव्हा वेगळाच आवाज होई.

देव ताडोबा तळ्याच्या काठाशी राहात होता. चिंचेच्या प्रचंड बुंध्याच्या आधारानं त्याची वस्ती होती. कार्थोडी किंवा वानर जशी छपराखाली राहायला राजी नसतात, तसाच हाही नसावा. झाडाचा निवारा त्याला पुरेसा होता. देवाची पाठ पाण्याकडं होती. लालभडक रंगाचा, शेंडी उभा असा हा देव दिसायला उग्र होता. त्याच्या पुढ्यात काळेकरडे त्रिशूळ, बाण रोवलेले होते.
हा एरवी माझ्या दृष्टीला पडलाही नसता. पण एकवार, सकाळी सकाळी डफड्याची बाई आणि त्या बरोबर ऐकणाराचा थरकाप व्हावा, अशा आरोळ्या ऐकू आल्या. बंगलीच्या उजव्या बाजूला, पार खाली जी गर्द झाडी होती, तिकडून हा आवाज येत होता. काय

आहे, ते तरी बघू, म्हणून उताराची वाट चालून खाली गेलो, तर देवाला जत्रा लोटली होती. बाया-बापडया, पोरटोर, बाप्ये असा घोळका पायी चालत, काही बैलगाडी उडवत असा नवस फेडायला आला होता.

मी जाऊन देवाच्या पायरीशी बसलो. पोलादी शरीराचा एक आदिवासी देवाकडं टक लावून पाहात पाठमोरा उभा होता. डोईला काही नाही, अंगात काही नाही. कमरेला तेवढं धोतर. एकजण ढोलकं बडवीत देवाच्या शेजारी बसला होता. दंग होऊन वाजवत होता.

समोरचा लालभडक देव सारखी ढोलक्यावर टिपरी आणि प्रतिस्पर्ध्याला रणात आव्हान देताना उठतात, तशा आरोळ्या, धूपाचा आणि कापराचा वास. बघता बघता, ढोलक्याचा ठेका धमन्यात शिरून तो पाठमोरा आदिवासी नागासारखा डोलू लागला, घुमू लागला. तात्काळ पुढं होऊन कोणी त्याच्या डोईला रुमाल बांधला आता ह्याच्या अंगात वारं आलं होतं.

तो देव, तो ठेका, तो वास आणि त्या आरोळ्या ऐकून कुणाच्याही अंगात आलं असतं. मी फारच पोशाखी बनलो होतो. एरवी, माझ्यासुद्धा आलं असतं.

एखाद्या विचारवंताला क्रांतिकारी विचार स्फुरतो. कलावंताला कलाकृती स्फुरते, कवीला काव्य स्फुरतं, त्या क्षणी त्याच्या अंगातच येत नाही का ? हा संचार संपला, की ती चार माणसाप्रमाण सामान्य माणसंच नसतात का ?

जंगलात ठाण मांडून तळं राखीत बसलेला हा देव आदिवासींनी जन्माला घातला होता. इतिहास काय होता, कोण जाणे. आज त्याची खतमाती होऊन तिथं दैवतकथा उगवली होती.

एकदा, म्हणे, नवलग्न झालेली नवरानवरी, नात्यागोत्यातल्या माणसासकट ह्या जंगलातून चालली होती. कडक उन्हाळ्याचे दिवस होते. नवरानवरी घोडयावर होती. बाकी लोकं चालत होती. वाटचालीनं सगळे थकले. तहानेन व्याकूळ झाले. पण पाणी कुठं भेटलं नाही. कोरडया ओढ्याओघळीच्या वाळूत झरे खोदून पाहिले. पाणी लागलं नाही. मग प्रत्यक्ष नवरामुलाच हातात कुदळ घेऊन, देवाचा धावा करत खणू लागला. त्यानं पार शेषाची टाळू लागेपर्यंत कुदळ चालवली. आणि एकाएकी पाण्याचा लोंढा जमिनीतून उसळून वर येऊ लागला. धोधाट लोंढा असा वाहू लागला, की त्यात आख्खं वऱ्हाड, तो नवरदेव, ती नवरी, घोडी, बैलगाडया सगळं वाहून गेलं. चहूकडं अपरंपार पाणी झालं.


ते हे पाणी आणि हा तो नवरदेव.

त्याला दोन फूट उंचीचे दोन सुरेख मातीचे घोडे वाहिले होते. एक मोठा होता, एक जरा धाकटा होता. पाढऱ्या रंगाचे, आतून पोकळ असे हे घोडे म्हणजे आदिवासी कलेचा उत्तम नमुना होता. हे घोडयासारखे घोडे नव्हते, तर कलाकाराला स्फुरलेले घोडे होते.

त्यांच्या अंगावर नाना अलंकार होते. आत्ता आलेल्या भक्तांनी पिवळ्या केशरी रंगाचे कापड फरारे म्हणून आणलं होतं. ते वस्त्र घोड्यानाही मिळालं होतं. तांबडा देव, काळे त्रिशूळ, पांढरे घोडे आणि केशरी फरारे.
हे घोडे, म्हणे, दर तीन वर्षांनी नवे करायचे. म्हणजे जुन्या घोड्याची माती भिजवून पुन्हा मळायची. जुनं मोडून नवं करायचं.

इथलं पाणी माडिया आदिवासींचं तीर्थ आहे. हे पाणी आदिवासी घेऊन जातात आणि आपल्या उगवून आलेल्या पिकावर शिंपडतात. यामुळं पिकावर रोगराई येत नाही. ती जोमान वाढतात, अशी त्यांची श्रद्धा आहे.
श्रद्धेचाच भाग म्हणून एक कोंबडा देवाला दिला गेला.
विषाचा प्याला घेऊन मरणशय्येवर पडलेल्या सॉक्रेटिसचे शेवटचे शब्द होते.
" अरे क्रीटो, देवाला कोंबडा द्यायचा राहिला. तेवढा दे, विसरू नकोस. "
धाव भरून आला, की देवाला कोंबडा द्यायचा असतो, हे सॉक्रेटिसच्या ध्यानात होतं.
Death is the cure for life.

रात्री अंथरुणावर पडलो, तेव्हाही डोक्यात डफड वाजत होतं. आदिवासींच्या युद्धआरोळ्या ऐकू येत होत्या. तळ्याच्या पार पलिकडच्या टोकाला चितळ धोक्याचे इशारे देत होतं. फार दुरून वाघही ऐकू आला. हा कुठं तरी दृष्टीला पडावा, म्हणून सध्याकाळी सात ते रात्री अकरापर्यंत आम्ही मोटार पिटाळली होती. आधी तळ्याभोवती गोलाकार असलेल्या पाच किलोमीटर रस्त्यावर हिंडलो. सर्चलाईटच्या झोतात प्रचंड मोठे



गवे तळ्याकाठच्या हिरवळीत चरताना दिसले. नर, माद्या, पोर. मग पाण्यावर आलेल्या कांचनमृगाचा मोठा कळप दिसला. किर्र अंधार. प्रकाशाचा झोत झटकताच हिरवीनिळी रत्नं उजळावीत, तसे कांचनमृगाचे डोळे दिसत. मग अंग. शिंगांचा डौल दाखवत उभा असलेला नर, भीतीन शरीर आकसून घेतलेल्या माद्या आणि कान उभारून पाहणारी चकित शावकं. काही काळी सांबरं दिसली. नीलगाई दिसल्या. ससे दिसले. एक ऊदमांजर-सुद्धा दिसल. वाघ किंवा बिबळ्या मात्र दिसला नाही.

मग आम्ही तळ्याचा काठ सोडला आणि जंगलातले रस्ते धुंडाळले. रस्त्याच्या बाजूला, किंवा क्वचित, रस्ता ओलांडताना वाघ दिसेल, असं वाटल होत; पण नाही दिसला. आता हा पलीकडे कुठं ओरडत होता. तळ्याच्या आसमतात फेरी घेत असावा. आज नाही दिसला, उद्या दिसेल.

अगदी ब्राह्ममुहूर्तावर उठून तळ्याभोवती परिक्रमा करावी, असा बेत आमचाही होताच. मग, चितळ, सांबर, नाईट जार, टिटवी ऐकता ऐकता झोप पापण्यांवर उतरली.

अद्याप तोंडाला तोंड नीट दिसत नव्हत. बाहेर पडलो. दुर्बीण गळ्यात, पाठीवरच्या पिशवीत चित्ररेखाटनाची वही आणि दोन फेल्ट पेनं होती.

थंड हवेला मोहरल्या झाडाचा गंध होता. हळू उजळत जाणाऱ्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर झाडाचे विस्तार दिसत होते. पाखरं नुकतीच जागी होऊन बसल्या जागीच गाऊ लागली होती. मुद्दामच रेंगाळलो. जाता जाता, जंगल अधिकाऱ्याच्या कॉलनीत जाऊन रामानंदांना हाका टाकल्या. आदल्या दिवशीच रामानंदांनी आपल्या घराकडं नेऊन सांगितल होत,

" This is my den. सकाळी निघताना मला बोलवा. "

रात्री रामानंदांकडे कुणी पाहुणे आले असावेत आणि त्यांना जंगलातून हिंडवून आणीपर्यंत फार रात्र झाली असावी. कारण, हाकेला लवकर प्रतिसाद आला नाही. पाच-सात मिनिटांनी दार अर्धवट उघडून रामानंदांचा कोणी दक्षिणी नोकर डोकावला, म्हणाला,

" अजून उठले नाहीत साहेब. "

" ठीक, आम्ही पुढं गेलो, म्हणून सांग. "


गडबडीन आम्ही रस्ता धरला. कारण तळ्याच्या काठी काही ना काही बघायला मिळणार, अशी अपेक्षा होती. पानगळीन ओकंबोकं झालेल जंगल डाव्या बाजूला, विस्तीर्ण जलाशय उजव्या बाजूला. धूळभरल्या वाटेवर बुटाचे ठसे उमटवीत आम्ही चालू लागलो. रात्रभर पाण्यावर जनावरांची ये-जा झालेली होती. गव्याचे, चितळाचे खूर जागजागी लागले होते. पाखरं ऐकू येऊ लागली होती. पहिल्यांदा कानावर आला, तो नीळकंठ. हे निळगर्द

पाखरू दिसायला इतकं सुंदर आहे; पण त्याच्यापाशी चांगला गळा मात्र नाही. नीळकंठ ऐकू आला, दिसला मात्र नाही.

कुणाची ती गोष्ट, मॅटरलिंकची का ? दोन निरागस मुलं निळं पाखरू पाहण्यासाठी रानावनात भटक भटक भटकतात. दमून भागून, निराश, सुकून गेलेली अशी घरी परत येतात. आणि त्यांच्या लक्षात येतं, की आपल्या घरी जे पाखरू पाळलेलं आहे, त्याचा रंग निळाच आहे!

रस्त्याच्या डाव्या बाजूला उंच उंच वृक्षराजी होती. त्यातल्या एका उंच वाढलेल्या वृक्षावर भलं मोठं काळं घरटं दिसलं. मागं भव्य आभाळ. निष्पर्ण असा एकाकी उंच वृक्ष आणि त्याच्या माथ्यावर काळं घरटं. हे बहुतेक मच्छीमार गरुडाचं असावं. हा पाण्याकाठी उंच वृक्षावर वस्ती करून असतो. मासे, साप, खेकडे हे याचं खाद्य असत. विशेष म्हणजे हा चाचेगिरी करण्यात पटाईत आहे. याच्यासारखेच पाण्यावर झडप घालून मोठे मासे उचलणारे जे आणखी पक्षी आहेत, त्यांच्यावर पाळत ठेवून बसतो. त्यांनी मासा धरला, की हा तो झडप घालून पळवतो. दुसऱ्याच्या श्रेयाचा अपहार करण्याची मक्तेदारी काही एकट्या मनुष्यप्राण्याचीच नाही.

आधी घरटं दिसलं. मग पार पलिकडच्या काठावर एका उंच वृक्षावर बसून टेहळणी करणारा गरूडही दिसला. गडद किरमिजी रंगाचा, बळकट अंगाचा. मान तपकिरी आणि



शेपटीला आडवा पांढरा पट्टा. त्यानं मला बरंच जवळ येऊ दिलं. अगदी झाडाखाली गेलो, तसा उडाला आणि नेमका त्या घरट्याच्या दिशेनं गेला.

हिरव्या चमकदार तळ्याच्या काठावर आता हालचाल चालू झाली. पांढरे गायबगळे ढांगा टाकीत उथळ पाण्यातून चालू लागले. कमळाच्या पानावर पाय देत निळ्याजांभळ्या रंगाच्या पाणकोंबड्या तुरगू लागल्या.

उथळ पाण्यात इथं तिथं झाडांचे लहान खुंट उभे होते. त्यावर पॉण्डहॅरॉन कुबड काढून स्तब्ध बसले होते.

मचाणाशी जिथं मच्छीमार गरुडाचं घरटं पाहिलं, त्या झाडीकडून एकापाठोपाठ एक अशा तीन नीलगाई बाहेर पडल्या. त्यांनी रस्ता ओलांडला. तळ्यात आल्या. उथळ पाण्यातून चालल्या. पालखीवर उधळलेलं खोबरं वेचण्यासाठी जत्रेच्या गर्दीत गवश्यांची जशी धादल होते, तशी गायबगळ्यांची झाली. तीन नीलगाईंच्या बारा पायांनी लहान बेडूक, चिंगळ्या, पाण्यावर उडू लागताच त्यांना मटकावण्यासाठी हे नीलगाईंमागं धावू लागले. निर्वास्त अशी ही मोठी हरणं सकाळी सकाळी थंड पाणी पीत उभी राहिली. हे एक लहानसं कुटुंबच होतं. आई आणि दोन लेकी. एक चांगली कळती, दुसरी अजून अल्लड. आईचा पदर सोडून स्वतंत्रपणे वागायला त्या अजून शिकल्या नसाव्यात. पाणी पिऊन झाल्यावर ह्या तिघीही पाण्याकाठच्या हिरवळीवर थोड्या चरल्या आणि रमत गमत, पुन्हा आम्ही आलो, तो गोल रस्ता ओलांडून जंगलात शिरल्या.

पानं गळून जाऊन केवळ रेषांचं सौंदर्य उरलेलं झाड पाण्याच्या काठी होतं. फार लांबून मला त्याच्यावर हिरवी फळं लटकावीत, तसे हरेल पक्षी दिसले. गप्प राहून ते आमची चाहूल घेत होते. जमिनीवर बसता येण्याजोगे सोईस्कर पाय त्यांना नाहीत, त्यामुळं ते आता तळ्यावर हिरव्या भराऱ्या घेणार होते आणि एवढ्याशा चोचीनं पाणी वेचणार होते.

लाजरे हरेल झाडांच्या पर्णसंभारातून माणसाच्या डोळ्यांना दिसता दिसत नाहीत. त्यांनी घातलेल्या सुरेल शिळा तेवढ्या ऐकू येतात. ह्या इतक्या मानवी असतात, की ही आपल्याच प्रियकराची खुणेची शीळ म्हणून कोणी कृषिकन्या शपथेवर सांगेल. ह्या झाडाला पानंच नव्हती. मुरून बसलेले हरेल मला दुर्बिणीनं स्पष्ट दिसत होते. आपण ह्याला दिसलोच नाही, ही त्यांची समजूत मी बराच वेळ चालू दिली. किती जवळ येऊ देतात, ते बघावं, म्हणून सावकाश चालत अगदी दहा यार्डांवर गेलो. मग मात्र फडर्र करून चाळीसभर हरेल थव्यानं उडाले आणि पार त्या टोकाला गेले. मला चुटपूट लागली. खरं तर मी दूर बसून त्यांचं पाणी पिणं पाहायला हवं होतं.

आता समोरच्या हिरवळीवर पिवळ्यारजत रंगाची धोबी पाखरं शेपट्या नाचवीत हिंडत होती. पलीकडं काळ्याकरड्या रंगाच्या बदकांचा एक लहानसा थवा सावध असा, माना

वर करून स्तब्ध राहिला होता. ह्या थव्यात एकच एक पाढराधोट पण काळ्या मानेचा, वाकड्या चोचीचा आयबीस उभा होता. ' सारख्या पंखाची पाखरं एका ठिकाणी गोळका करतात ', ही म्हण त्याला मंजूर नसावी.

कोपऱ्यात हिरव्या पानाच्या वर्तुळातून एकच आनंदी देठ वर उठला होता आणि त्यावर लाल-पांढुरक्या कमळाची एकमेव कळी उमलता, उमलता मधेच थबकली होती.
तळ्याच्या विस्ताराच्या शीर्षभागी मी आता उभा होतो. कवि बोरकराच्या कवितेची ओळ मनाच्या तबकडीवर वाजत राहिली,
' हिरवळ आणिक पाणी,
तेथे सुचती मजला गाणी.'

•

—जिवंत निसर्गाबद्दलच्या असा अगदी साधा उल्लेखही आपल्याला आकृष्ट करतो.
जोपर्यंत पाणी वाहातं आहे आणि गवत उगवतं आहे, तोपर्यंत अशा ओळी लिहिल्या जाणारच.
निळा, किरमिजीपोटच्या असा खंड्या पक्षी एकाएकी स्फूर्ती येऊन, किलकिलत झाडावरून तळ्याच्या पाण्यावर उंच उडाला आणि अधांतरी ठिपका होऊन राहिला.

रामानंद आणि स्वरूप आमच्यामागून आले. हे दोघंही इथले अधिकारी तर होतेच, पण एकूण वन्यजीवनावरचेही ते अधिकारी होते.
तळ्याकाठी पडलेल्या झाडापाशी येताच रामनदानी सांगितलं,
" ही ती जागा. मगरीची अंडी मला इथं मिळाली "
नुकतच इथं मगर प्रजनन-केंद्र सुरू झालेलं होतं आणि रामानद एका विशेष उद्योगात दंग होते. आपल्या घराशेजारी वाळूचे तीन खड्डे तयार करून ते कृत्रिम रीतीन मगरीची अंडी उबवीत होते.
मगरीनं अंडी घातली होती, ती ही जागा पाण्यापासून बरीच दूर होती. ह्या विस्तीर्ण जलाशयात आजमितीला वीस मगरी होत्या. नुकतीच एक मगर मेली होती. तिचं वय काढलं, तर ते ऐंशी वर्षांच होतं. पण ह्या वयातही ती अंडी घालत होती. ह्या ऐंशी वर्षांच्या मगरीची प्रजा, लहान लहान अशी सोळा पिलं, तळ्यापलीकडे असलेल्या मगर प्रजनन-केंद्रातल्या टॅकमधे पोहत होती.
रामानद म्हणाले,
" एक मगर वीसपासून साठपर्यंत अंडी घालते. "
" एवढी पोरं दर वर्षी जन्माला आली, तर ह्या तळ्याकाठी हिंडायलाच नको. "
मगरीचा अधिक्षेप करणारं विधान रामानद ऐकून घेत नाहीत. ते म्हणतात, माणूस हे

काही मगरीच नैसर्गिक भक्ष्य नाही. माणसानं माणसाला खाणं जसं आणि जेवढं होत असेल, त्याच प्रमाणात हेही घडत असेल. इथं ताडोबाला तरी आजवर मगरीनं माणूस मारल्याची हकीकत घडलेली नाही. तसं हे तळं आज पंचाहत्तर वर्षं जंगलखात्याच्या अखत्यारीत आहे. हां, एक मात्र झालं होतं. सात रानकुत्र्यांनी एक चितळ ताणलं, ते धावत धावत येऊन तळ्यात पडलं. पोहू लागलं, ते मात्र मगरीनं धरल्याचं अनेकांनी पाहिलं आहे.

मगरीचं अंडं रुंदीनं चार सेंटिमीटर आणि लांबीनं सात सेंटिमीटर असतं. आदिवासी, कोल्हे ही अंडी शोधून खातात.
पावसाळ्याआधी दोन महिने, मगर घरटं करण्यासाठी जागा शोधू लागते. सोईस्कर जागी ती आधी ' ट्रायल नेस्ट ' करते. ही जागा रामानंद शोधून काढतात आणि मगरीनं वाळूत अंडी घातली, की ती काढून आणतात. पक्ष्यांप्रमाणं मगरीला आपली अंडी अंगाखाली घेऊन उबवावी लागत नाहीत. वाळूत पुरलेली ही अंडी ओलसरपणा, ऊब ह्यामुळं साठ दिवसांनी उबवली जातात. लहान पोरं बाहेर येतात. ही पोरं, आईचा आवाज वर ऐकू आला, की वाळूत ओरडू लागतात. पोरं बाहेर आली, हे आईला कळतं. ती त्यांना उकरून काढते.
एवढं हे लेढार आता पाण्यापर्यंत सुखरूप जाणार कसं ? करकोचे, कावळे, घारी, बाज झडप घालून ही कोवळी लुसलुशीत पोरं उचलून नेणार. म्हणूनच शंभरातली दोन पोरं जगतात, बाकी अशी खाल्ली जातात.
पोरं पाण्यापर्यंत सुखरूप नेण्यासाठी मगर त्यांना आपल्या तोंडात घेते. आणि घरट्यापासून पाण्यापर्यंतचं अंतर काटते. सुरक्षित जागी पोरांना सोडते.

मगर–प्रजनन केंद्रात आम्हाला हात, दीड हात लांबीची पोरं बघायला मिळाली ती खळाळत्या ओढ्यात होती. एकमेकांच्या अंगावर रचून बसली होती. आणि इतकी निश्चल होती, की ही खोटी आहेत, असं वाटावं.
माझ्याबरोबर आलेल्या उषा भिडे एकदम किंचाळल्या आवाजात म्हणून गेल्या,
" ई, किती कुरूप दिसतात, नाही ! "
रामानंद म्हणाले,
" नाही, मॅडम, ती सुंदरच दिसतात. "

तळ्याच्या आसमंतात काही वानरदळंही होती. तळ्यात पाण्याकाठी असलेल्या झाडावर आणि झाडाखाली मी त्यांचा वावर पाहिला, आणि ती सुप्रसिद्ध लोककथा आठवली. वानराचं काळीज खाऊ बघणारी मगर, तिच्या पाठीवर बसून तळ्यामधोमध आल्यावर,

वानराला आपली ही रक्तपिपासू इच्छा बोलूनच दाखवते, म्हणते,
" अरे, त्या जाभळाच्या झाडाखाली पडलेली पिकली जांभळं मी खाल्ली, ती किती मधुर लागली. अशी जांभळ खाऊन तू राहतोस. तुझं काळीज मला खाऊन बघायच आहे. "
वानर हुशार होता. म्हणाला,
" हात् तिच्या, आधीच बोलायच नाहीस का ? मी ते घेऊन आलो असतो. नेहमी ते असतच माझ्यापाशी, पण आजच काढून जाभळीच्या ढोलीत ठेवलं होत. चल, देतो तुला. "
मगर मठ्ठच असली पाहिजे. वानराला पाठीवर घेऊन ती पुन्हा काठाशी आली. त्यासरशी टुणकन् उडी घेऊन वानर जांभळीच्या शेंड्यावर गेला, म्हणाला,
" मूर्खे, दगाफटका करून कुणाच काळीज मिळत नाही. जा, पाण्यातल्या माशांना कसली काळजं आहेत, ते बघ, जा ! "
त्या कथेतला परिसर आणि पात्र इथं होतीच. जलाशयात मऊ पाठीच्या मगरी होत्या. शाबूत काळजाची वानर काठावरच्या वृक्षराजीत होती. आणि काळज काढून टागावीत, अशी जामळीची सुंदर झाडंही होती.

एका सकाळी पश्चिमेकडून पूर्वेकडं, आणि दुसऱ्या सकाळी पूर्वेकडून पश्चिमेकडं अशा ह्या तळ्याच्या दोन परिक्रमा मी आणि भिडेबाईंनी केल्या. तळ्याकाठी पुष्कळच नीलकंठ होते. झगमगीत निळ्या रगाचे नीलकंठ. पिवळेरजन धोबी, जांभळ्यानिळ्या पाणकोंबड्या, किरमिजी पोटाचा आणि निळ्या पाठीचा खंड्या, पांढरेशुभ्र बगळे, आणि हिरवे हिरवे हरेल. आणि हे रग किती ताजे, किती चमकदार होते. आरा किंवा चंद्रे किंवा प्रफुल्ल किंवा नेत्रा ह्यापैकी कुणाच्या कुचल्याला हे आभाळातून भरारणारे रग लागले आहेत ? हे रग उचलणं कलेच्या कुवतीपलिकडचंच. केवळ निसर्गच आपली कुवत वाटेल तेवढी वाढवू शकतो.

संध्याकाळी वाघ दिसेल, दिसेल, म्हणून आम्ही पंचझरीला, आणखी कुठं, आणखी कुठं असे ओहळ, झरे, गर्द वनराई शोधत हिंडलो. जीपच इंजिन बद करून एका ठिकाणी गप्प राहिलो.
मधेच एकवार गर्जना ऐकू आल्या, एकदा, दोनदा, तीनदा. तो वनराज, नाक भुईला लावून ओरडला. एक भयचकित कांचनमृगी धावत येऊन आमच्यासमोर उभी राहिली. श्वास रोधून आम्ही पाहात राहिलो.
तृणात उभ्या राहिलेल्या, भिऊन मुठीएवढ्या झालेल्या त्या मृगीला आमचा पत्ता नव्हता. ती चहू दिशाच्या वाटा हुंगत होती. मोठे मोठे कान उभारून सावट घेत होती. चकित

डोळ्यांनी जाळ्याकडे, गर्द झुडुपाकडे बघत होती.

झाडात वानरं गप्प झाली होती. तृणात उभा असलेला अनंतचक्षू मोर बावरल्या मानेनं जंगल न्याहळीत होता. लहान पाखरं गोंगाट करत होती.

सूर्य मावळला. संधिप्रकाश राहिला.

दूरवर पुन्हा तीन गर्जना ऐकू आल्या.

वाघ फार दूर गेला होता !

पठारावरून परत मुक्कामाकडं येत होतो. दगडगोट्यांचा बरड प्रदेश होता. तुरळक अशी हिरवी झाडं होती. मे महिना असल्यामुळं रान वाळून कोळ झालं होतं. हा माथाच होता. चोहोकडं क्षितिज खाली उतरल्याचं दिसत होतं.

ध्यानीमनी नसताना दाणकन् एक भलामोठा बिबळ्या वाघ जीपला आडवा आला.

एकदम वेग कमी. कमी. इंजिन बंद.

जीपला बघून हा एकदम जमिनीशी मुरला. जीपच्या काळ्या धुडानं हालचाल किंवा आवाज काहीच केला नाही, तेव्हा सावधपणे उठला. दबत दबत पुढं आला. पटकन् रस्ता ओलांडून पुन्हा दबला. पाठमोरा. आणि मान वळवून आता तरी हे धूड काही हालचाल करतं का, याचा त्यानं अदमास घेतला. मग, मनात शंका घेऊनच, उठला आणि दबत दबत, झुडपाचा आडोसा घेत, वारंवार मागं बघत तिरका तिरका असा टेकडी उतरून दिसेनासा झाला.

ड्रायव्हर म्हणाला,

" तकदीर मोठं, साहेब, तुमचं. इतक्या जवळून, असा दिवसाउजेडी हा कुठला दिसायला ! किती नजीक होता. एका झेपेत बॉनेटवर आला असता ! "

थोडं पुढं गेलो आणि माझ्या लक्षात आलं. तळ्याकाठच्या ज्या रेस्टहाऊसमध्ये आम्ही मुक्कामाला होतो, त्याच्या मागच्या बाजूला एका हाकेच्या अंतरावर हे पठार होतं.

आजपर्यंत मी बरीच जंगलं हिंडलो आहे आणि त्यांतले जलाशय पाहिले आहेत. कर्नाटकातला ' मदग ' तलाव, मगरींनी भरलेला आणि चितळ, सांबर, डुक्कर, वाघ ह्यांनी वेढलेला. भूतान हद्दीजवळची खळाळती ' मानस ' नदी आणि तिच्या काठावरची सोनेरी वानरं. शिलाँगजवळचं ' बरा पानी,' भंडारा जिल्ह्यातील ' इटियाडोह,' आंध्रमधला ' नागार्जुन कोंडा. ' पण चंद्रपूरजवळच्या ह्या ताडोबाइतकं उत्तम ठिकाण मला दुसरं आढळलं नाही.

तो निसर्गपुत्र थोरो म्हणाला होता :

' माझे विचार माझ्यापाशी असले, वाचायला उत्तमोत्तम ग्रंथ असले, तर मी माळ्यावरचा

कोळी होऊनही आनंदानं कालक्रमणा करीन.'

मी म्हणतो :

ताडोबाचं तळं मिळालं, तर त्याच्या काठावर मुठीएवढा खंड्या होऊनही मी आनंदानं आयुष्य काढीन.

[ महाराष्ट्र टाइम्स : वार्षिक १९८० ]

# काळवीट पाहायला रेहेकुरीला

अर्धा सप्टेंबर निघून गेला आहे. काटवनातल्या बाभळीच्या काळ्या खोडावर चहू अंगांनी पोपटी पालवीचा विस्तार उसळलेला दिसतो आहे. अगदी समोर हिवराचं मोहरानं फुलून आलेलं झाड केवढं तरी नक्षीदार आणि नाजूक दिसत आहे. त्याच्या अलीकडे बुटक्या बाभळीच्या शेंड्यावर राखी श्राइक निश्चळ बसला आहे. शिसव, कडूलिंब, तरटी, हिवर, सौंदड अशा कमी पाऊसकाळ असलेल्या सपाट रानातच दिसणाऱ्या झाडाझुडपानी आसपासचा परिसर हिरवाकंच करून सोडला आहे. मोहराचा, गवताचा, झाडाचा, मातीचा गंध थंड हवेत मिसळलेला आहे.

दिवस आता पार मावळतीला झुकला आहे. आभाळ मोठ्यामोठ्या काळ्या ढगानी भरून थाल आहे. रेहेकुरीच्या जंगलातला काळा तितिर उंच स्वरात हाका देतो आहे. उमाळ्यावर बांधलेल्या लहानशा विश्रामधामाच्या अंगणात उभा राहून हा शांत परिसर मी पाहतो आहे. काटवनात नाना पाखराचे आवाज उठताहेत. कुठतरी तांबडा होला घुमतो आहे. मधूनच ' पटीला-पटीला-पटीला ' अशा हाका तांबडा तितिर देतो आहे. एकदम सातबायांचा कोलाहल उठतो आहे—शांत होतो आहे. पठाणी होला बोलतो आहे. सुग्रण पाखराचं समूहगान ऐकू येत आहे.

हा सगळा बोभाटा वेगवेगळ्या कारणांनी होतो आहे. सातबायांचा गल्का झोपण्याच्या जागा धरण्यासाठी चाललेला आहे. काळा तितिर चरण्याच्या नादात दूर गेलेल्या आपल्या जोडीदाराना गोळा करण्यासाठी हाका देताहेत. होला आपली काल्पनिक हद्द आवाजानं आखतो आहे.

सूर्य मावळता-मावळता ऐकू येत असलेले हे आवाज अंधारातून येताच विरून गेले, आणि कातरवेळच जणू बोलते आहे, असा रातवा पाखराचा ' टकर्र...टक्-टक्-टक् ' एवढाच शब्द तेवढा वारंवार उठत राहिला.

चांगला काळोख झाला.

रेहेकुरीचे काळवीट पाहायला मी अगदी अधीर झालो होतो. पुण्याहून निघताना,

दिवसाउजेडीच पोचू, अशा हिशेबान निघालो; पण नगरला वनखात्याच्या कचेरीत थोडा वेळ, गावाबाहेरच्या नर्सरीत थोडा वेळ, चहापाण्यात थोडा वेळ असं करता करता नगर सोडायलाच उशीर झाला, आणि तिसरा प्रहर उलटून गेल्यावर रेहेकुरीला पोचलो. लहानशा विश्रामधामात सामानसुमान टाकणं, दिवाबत्ती, पाणी याची सोय लावणं, ह्याला–त्याला निरोप धाडणं ह्यात काही वेळ गेला.

भराभर लोक जमा झाले—काही फॉरेस्ट गार्डस्, रेंज फॉरेस्ट ऑफिसर फडके, आणखी कोणीकोणी आसपासचे शेतकरी. नगरहून येताना दोन दिवसाची सवड काढून उपविभागीय वनाधिकारी मूर्तजा खान आल्यामुळं त्यांनी तत्काळ आवश्यक ती साधनसामग्री आणि मनुष्यबळ गोळा केलं होत. नाही म्हटलं, तरी तीनएक दिवस आम्ही आजूबाजूला हिंडणार होतो. आणि रानात मुक्काम टाकायचा, म्हणजे हळकुंडा-पासून तयारी करावी लागतेच.

अंधार झाला, तरी लवकरच चंद्रप्रकाश येणार होता. चांदणी रात्र होती. चांदण्यात काळविटांच्या झुंडी बघू या, म्हणून जीपमधे घुसलो आणि निघालो.

काल–परवा असा दोन दिवस थोडाफार पाऊस झालाच होता वाटेवर चिखल होता. अशा, पायाला चिकट आणि अंगालाही थंड–ओल्या वातावरणात काळविटं हिंडती–फिरती आढळतील का, अशी शंका मनात होतीच. आजूबाजूची झाडं–झुडुपं उजळवीत, जंगल खात्यानं आखलेल्या लहानशा वाटेवरून जीप सावकाश चालली होती. खानसाहेब गाडी चालवीत होते. मी शेजारी बसलो होतो. आमच्याजवळ आचा तरी मोठा टॉर्च वगैरे काही नव्हता. जीपच्या झगझगीत प्रकाशात जे दिसेल, तेवढंच नजरेला पडणार होत. आधी एक लाबकान्या ससा धुम्–धुम् पळाला. हा तसा रात्रिंचरच. दिसला, ह्यात नवल नाही. माळरानातसुद्धा ह्याला खाणारे फार! कोल्हे, मुंगसं, रानबोके, ससाणे ह्याच्या मागावर असतात. एक पळाला. थोडं पुढं जाताच दुसरा पळाला. बहुतेक ही नर–मादीची जोडीच असावी.

जंगलात शिरताच काही ना काही नजरेला पडलं, की हुशारी वाटते. तशी आम्हांला वाटली. वाटलं, कुणी सांगावं, हरणाचा कळपही असाच दिसेल.

वाकडीतिकडी वळणं घेत, पुष्कळ हिंडलो. हरणं दिसली नाहीत.

ऐन जंगलात उमाळ्याच्या जागी वन खात्यान एक उंच लोखंडी माळा उभा केला आहे. निरीक्षकांनी ह्या उंचीवर जावं आणि आसमन्त न्याहाळावा. कुरणात चरणारे, टकरी खेळणारे, एकमेकांचा पाठलाग करणारे कृष्णसारमृग पहावेत. चपळ मृगी, भित्री शावक पाहावीत.

अंधारातच हा माळा चढलो. वर जाऊन बघितलं. सभोवार गडद काळोखच दिसला.

अथांग काळोख. आभाळात चंद्र होता, पण भल्यामोठ्या काळ्या ढगानं त्याला संपूर्ण झाकून टाकलं होतं.
माझ्या गळ्यात दहा-बाय-पन्नासची दुर्बीण होती. ही चांदण्यातसुद्धा चांगली उपयोगी पडते, असा अनुभव, बुद्धपौर्णिमेला नागझिरा अभयारण्यातल्या तळ्यावर पाणी प्यायला जेव्हा अनेक चितळं, सांबर, डुकरं आली, तेव्हा मी घेतली होती. पावसाळी काळा ढग थोडा सरकेल आणि चंद्रप्रकाशानं रान न्हाऊन निघाल, की मोकळ्या रानात चरणारा, घोळामेळानं बसून विश्रांती घेणारा एखादा हरणाचा कळप आपल्याला दिसेल, म्हणून मी बराच वेळ वाट बघितली.
चंद्र थोडासा बाहेर आला. सगळं रान उजळलं. मी दुर्बीण डोळ्यांना लावून चारी दिशा चाळल्या. झाडझुडोऱ्यांचे आकार दिसत होते. चंद्रप्रकाशात पानं चमकत होती. कळप काही दिसला नाही. बघेबघेतो पुन्हा ढगानं चंद्राला झाकून टाकलं. गर्द काळोख पडला. मग मी म्हणालो,
“ खानसाब, आता उद्या सकाळी लवकर उठून ह्याच टॉवरवर येऊन बसू. आता चला परत.”

अहमदनगरपासून सत्तर किलोमीटर अंतरावर कर्जत गावानजीक हे काळविटाचं अभयारण्य आहे. दोनशे सत्तर हेक्टर एवढ्या विस्तीर्ण क्षेत्रावर वन खात्यानं झाडझुडोरा, गवत लावून जंगल वाढू दिलं आहे. इथं आता कृष्णसारमृगाचे कळप निर्वेधपणे हिंडतात.

कृष्णसारस्तु चरति मृगो यत्र स्वभावतः ।
स ज्ञेयो यज्ञियो देशो म्लेच्छदेशस्त्वतः परः ।’

असं ‘मनुस्मृती’त म्हटलेलं आहे. म्हणजे तीन साडेतीन हजार वर्षांपूर्वी हा मृग माहीत होता. कृष्णसार हरिण जिथं यथेच्छ विहार करतात, त्याला यज्ञीय देश म्हणतात. ह्याशिवाय असणारा तो म्लेच्छदेश होय.
फार दूरचा, म्हणून हा काळ आपण सोडून देऊ. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीशेवटी जेर्डननं नोंदवून ठेवलं आहे, की दक्षिणेतल्या जाल्नाच्या परिसरात मी कृष्णसारमृगाचे फार मोठमोठे कळप पाहिले. एका कळपात हजार तरी हरणं होती.
फोरसिथनं अठराशे एकोणऐंशी साली लिहिलं आहे :
‘सत्तावन्न सालच्या बंडानंतर लगेच, सागर भागात मी हजारापेक्षा जास्ती हरणं असलेले कळप पाहिले. थंडीच्या दिवसात दिल्लीच्या आसपास मोठमोठे कळप दिसल्याचंही काहींनी सांगितलं आहे.’
जॉर्ज शेल्लर हा अभ्यासक सांगतो, की

' एका वर्षाच्या काळात दोन बदल ह्या कळपात घडताना दिसतात. फेब्रुवारी ते नोव्हेंबर ह्या काळात मोठा कळप फुटून लहान लहान टोळ्या तयार होतात. एका टोळीत एखाददुसरा काळा नर मृग आणि काही माद्या, शावकं असतात. गर्भधारणा व्हावी, म्हणून ह्या लहान टोळ्या मुख्य कळपापासून बाजूला होऊन, ठरावीक अशा आपल्या क्षेत्रात हिंडत असतात. डिसेंबर–जानेवारीत ह्या टोळ्या मोडतात. आणि नर, माद्या, शावकं असा सरमिसळ कळप तयार होतो. पुन्हा फेब्रुवारी महिना आला, की प्रजोत्पत्ती-साठी नव्या लहानलहान टोळ्या पुन्हा जमायला लागतात. पंधरापासून तीसपर्यंत हरणं एका टोळीत असतात. '

कृष्णसारमृगाचा माजावर येण्याचा काळ बहुधा फेब्रुवारीच्या मध्यावर सुरू होतो. सहा महिन्यांनंतर हरिणी वितात. म्हणजे ऑगस्ट महिन्यामधे हरणाची पिल्लं जन्माला येतात. मध्यभारत, राजस्थान ह्या भागातल्या कृष्णसारमृगाचा थोडाफार अभ्यास झालेला आहे. महाराष्ट्रात काही झाल्याचं माझ्या वाचनात नाही. माजावर येण्याचा काळ, विण्याचा काळ ह्यात थोडाफार फरक हवामान, झाडझाडोरा ह्यानुसार असतोच.

कृष्णसार हा फक्त भारतातच आहे. तो सपाट मोकळ्या रानात राहतो. अशा ठिकाणी त्याला उंच उड्या घेता येतात. ताशी चाळीस–पन्नास मैल वेगानं धावता येतं.

लांब पल्ल्यावर मारा करणाऱ्या बंदुकी, रायफली माणसांच्या हाती आल्या आणि बघता बघता सपाट भागावरचे रहिवासी असणारे हे कृष्णसारमृग फार झपाट्यानं मारले गेले. गेल्या दोन शतकात असा क्वचितच शिकारी असेल, की ज्यानं काळवीट मारला नाही. भारताच्या जंगलातून चित्ता जसा कायमचा नाहीसा झाला, तसाच बीमोड काळविटांचाही होतो, की काय, अशी धास्ती वाटावी, इतक्या बेसुमार प्रमाणात ह्या हरणाची कत्तल झालेली आहे. आता मात्र कुठंकुठं ह्याला संरक्षण देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

मी भरतपूरला काळवीट पाहिला होता. मध्यभारतातल्या कान्हा किसलीलाही एक कळप पाहिला होता. दिल्लीच्या झू–मधेही एक कळप आहे.

सकाळी न्याहरी उरकून रानात गेलो. कुरण, काटवन म्हणावं, असं हे जंगल आहे कमी पाऊसकाळ असणाऱ्या भागात उगवणारी, तगून राहणारी झाडं वनखात्यानं मुद्दाम लावली आहेत. ह्यांत माझ्या ओळखीची झाडं बरीच होती. बाभळ, हिवर, कडूनिंब, सौंदड, खैर, नेपत, बोराटी, तरवड, म्हाळुंग, तरटी— ही झाडं, मी ज्या वैराण भागात जन्मलो आणि वाढलो, त्याच भागातली. शिसव, चंदन असली अपूर्वाईची झाडं आणि हमाटा, सिंक्रस अंजन गवत हे मात्र मी नव्यानं पाहात होतो. कुबाभूळ हे नव्यानंच आलेलं परदेशी झाडही होतं. वन खात्यानं ह्या साध्यासुध्या झाडांचीही सागासारखी पद्धतशीर लागवड केली होती. काळविट, म्हणे, इथं पूर्वीपासून होतीच. संरक्षण, दडण, चारा, पाणी, खार चाटण–असं सगळं मिळालं. त्यामुळं ती आता इथं निर्वेध राहात होती.

संख्येन वाढली होती, वाढत होती. तीनशे–साडेतीनशे हरणं ही संख्या काही अगदी लहान नाही.

सकाळी माळ काटवनातून चरणारे, उधळणारे, टकरी खेळणारे कळप मला बघायला मिळाले. वारंवार कळप दिसत होते. एकदा खानसाहेबांनी झाडांच्या रांगेतून कौशल्यानं जीप आडवीतिडवी दामटून पंधरा–वीस फुटांवर नेली. वाटेच्या ह्या कडेपासून त्या कडेपर्यंत उंच उड्या हाणताना कळपातलं एकएक हरण मला मोजता आलं. तीस हरणांचा सरमिसळ असा हा कळप होता. त्यात एकच काळा मृग होता. तरणे मृग विटकरी रंगाचे, पण माथ्यावर शिंगं मिरवणारे होते. माद्या त्याच रंगाच्या, पण बिनशिंगवाल्या होत्या. कळप दिसताहेत, म्हणताच आम्ही पायउतार झालो. जंगलाच्या हिरवेपणात मिसळून जावेत, असे कपडे फक्त माझ्या एकट्याच्याच अंगावर होते. दडत दडत जावं, आणि कुठं तरी आडोशाला बसून कळपाची रेखाटनं करावीत, म्हणून मी फार धावपळ केली, घामाघूम झालो. हरणांनी मला स्वस्थ चित्तानं मुळीच रेखाटनं करू दिली नाहीत. त्यांनी मला जवळच येऊ दिलं नाही. काळवीट ( Antilope cervicapra ) हे जगातले सर्वांत वेगवान मृग आहेत आणि जिथं वेगानं धावता येतं, उंचउंच, लांबलांब, उड्या मारता येतात, अशाच सपाट भागात ते राहतात, ह्याचा मला प्रत्यय आला. अगदी लहानशा आवाजानसुद्धा हरणाचा कळप दचकतो; मग वाऱ्याची झुळूक येऊन पाचोळा का वाजेना ! दचकला, की कळपाच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या माद्या एकाएकी उंचउंच उड्या मारायला लागतात. हा इशाराच असतो. काही मिनिटांतच अख्खा कळप सावध होऊन टणादण पळायला लागतो.

मद्रासकडचे एक वन्य प्राणि–अभ्यासक आणि छायाचित्रकार एम्. कृष्णन् ह्यांनी आठवण दिलीय्, की 'पुढं कृष्णसारमृगाचा कळप धावतोय् आणि मागनं ताशी चाळीस मैल वेगानं मी गाडी हाणतोय्, अशी शर्यत तीन मैल चालली होती. शेवटी रस्ता वाईट लागला, म्हणून मलाच वेग कमी करावा लागला. दरम्यान मृगाचा कळप मात्र भरधाव निघून गेला, दिसेनासा झाला.'

मोठा काळा नर कळपातल्या तरण्या नरांना हाकून देतो. असे हाकून दिलेले नर एकत्र येतात आणि एकत्र भटकतात. माजाच्या काळात, नरानरांच्या ज्या मारामाऱ्या होतात, त्यात जिंकला, की हा नर काही माद्यांचा मालक होतो. ह्या मारामाऱ्या म्हणजे एक विधीच असतो; जीवघेणं द्वंद्व नसतं. कधीकधी ह्या मारामाऱ्या हद्दीवरूनही होतात.

दुपारी बारा–एक वाजेपर्यंत मी काळविटांमागे धावत होतो.

दिवस मावळायच्या वेळेला, रेहेकुरीच्या आसपासचे शेतकरी विश्रामधामाच्या ओसरीवर जमले. त्यांच्याशी गप्पागोष्टी करून काही माहिती मिळते का, म्हणून बराच वेळ बोलत

बसलो.
ह्या शेतकऱ्याची तक्रार होती,
" काळविटाचे कळप कायवन सोडून आमच्या रानात येतात आणि कितीही राखण केली, तरी रात्रीअपरात्री आमचा डोळा लागला, की ज्वारीची कणसं, भुईमुगाचे वेल, तूर असलं पीक खाऊन फस्त करतात. आम्हाला फार त्रास होतो, फार नुकसान होत ! "
मी विचारलं,
" वनखात्यानं काय उपाय करावा ? "
तर सगळ्याच मत एक
" तार–कुंपण घालावं ! "
आता दोनशेसत्तर हेक्टर कुंपण कस घालायच ? ते किती उंच घालायच ? घातल, तरी ते ते मग अभयारण्य कसल ?

डी. एफ्. ओ. श्री. वि. द. वाणेकर हे पुढ मला नगरला भेटले. ते म्हणाले,
" शेतकऱ्याची तक्रार अगदी रास्त आहे. त्याला आम्ही असा इलाज शोधतोय्, की आम्ही काळविटाना खाण्यासाठीच ह्या पिकाचे अनेक छोटेछोटे प्लॉटस् अभयारण्यातच पेरू ."

रेहेकुरीला मी होईल तेवढा भटकलो. झाडाझुडपाची, पक्ष्याची, हरणाची जमतील तेवढी रेखाटनं केली. इथं माळटिसकीही आहेत, म्हणे. हीही एक खास भारतीय हरणाची जात आहे. शास्त्रीय नाव : Gazel Gazel. रानात मला कुठं हे हरिण आढळलं नाही. तरी, रेहेकुरीच्या रोपवाटिकेमधे एक पाळीव माळटिसक होत, त्याची एक–दोन रेखाटन केली.
माणदेशातल्या माळावरही, लहानपणी ही माळटिसकी मी पाहिली होती. तेव्हाच्या लाबच लाब आणि एकाकी अशा पायी प्रवासात, संध्याकाळच्या वेळी अचानक दोन-चार माळटिसक्याच्या काळ्या आकृती दूरवरच्या क्षितिजरेषेवर दिसत; आणि तिथपर्यंतची सगळी कंटाळवाणी वाटचाल म्हणजे एक चमत्कार होई. तिथून पुढची आक्काच्या गावाकडची पायपीट पायघड्यावरूनच होई.

सध्याकाळी रेहेकुरीच्या विश्रामधामाला निरोपाचा सलाम ठोकला आणि श्रीगोंद्याला यायला निघालो, तेव्हा पुन्हा एक मोठा काळा ढग आभाळ व्यापून बसला होता चार–सहा किलोमीटर जातो, न जातो, तोवर विजांचा लखलखाट होऊ लागला. वारे सुटले आणि धुवाधार पाऊस सुरू झाला.
सबंध प्रवासात––– म्हणजे अडतीस किलोमीटर–– सतत चिमधार पाऊसच पाऊस होता.

वाटेवरचे ओढेनाले ताबडंजर्द पाणी घेऊन रोरावत होते. प्रत्येक खेपेला गाडी पाण्यातून जाताना जीव मुठीत धरून जात होतो. अडतीस किलोमीटर अंतर जाईतोवर बारा–तेरा बारीकमोठे ओढे–ओहळ ओलांडावे लागले. श्रीगोंदे गावाजवळचा मोठा ओढा तर तुफान गर्जत होता. तो आम्ही ओलांडला आणि तिथून पुढ ह्या रस्त्यावरची वाहतूक बंद झाली, ती सकाळपर्यंत. रात्रीचा मुक्काम श्रीगोंद्याच्या विश्रामधामात केला. ' भगवंता ! ' म्हणून झोपी गेलो.

सकाळी देऊळगाव.
रेहेकुरीला वनखात्याची नर्सरी आहे, तशीच सुरेख नर्सरी देऊळगावला आहे. घनगर्द झाडीत लहानशी झोपडी आहे. तिथं चबूतऱ्याळं उतरलं आणि पुन्हा काळवीट बघायला बाहेर पडलो.

देऊळगावलाही बाभळीखैराच जंगल वनखात्यान वाढवलं आहे. वाटेवर काळ्यामातीचा राडा झालाच होता. तरी डाव्या–उजव्या झाडीतून मृग दिसले. पायउतार होऊन बाभुळवनात दुपारपर्यंत भटकलो.
इथला कृष्णसारमृगाचा कळप तर फार मोठा होता. सत्तर–ऐंशी हरणं असावीत.

शेवटी पाय भेंडाळले. उन्हान चेहरे काळवंडले. घामान कपडे चिंब झाले. थकूनभागून रोपवाटिकेत येऊन थंड असे बसलो. इथंही काळे तितिर हाका देत होते.
सध्याकाळी नगर.
—आणि पुढचा पुण्याकडे परतीचा कंटाळवाणा प्रवास.

माझ्या मनात सारखं येत होत, एक फेब्रुवारी महिना आणि एक ऑगस्ट महिना ह्या रानात रेखाटनाची वही पाठीवरच्या पिशवीत टाकून आणि गळ्यात दुर्बीण अडकवून मला जर भटकता आलं, तर कृष्णसारमृगाचं केवढं तरी नाट्यपूर्ण जीवन मी शब्दात आणि काळ्या रेषात पकडीन !

पुण्याला पोचायला मध्यान्‌रात्र झाली. तोपर्यंत राल्फ थॉम्सनच्या ' ॲन आर्टिस्टस्‌ सफारी ' ह्या, जलद रेखाटनानी आफ्रिकेतल्या जंगलाचं सारं वैभव वाचकापुढे उभं करणाऱ्या अप्रतिम ग्रंथासारखा एक ग्रंथ मी मनोमनी पुरा केला होता.

[ हंस ' दिवाळी विशेषांक १९८२ ]

# पेरियार

त्रिवेंद्रमच्या सुप्रसिद्ध पद्मनाथस्वामी मंदिराच्या अगदी शेजारी, ' राजधानी ' नावाच्या हॉटेलात उतरलो होतो.
व्यवस्थापकांपैकी एक नाटकवेडा, नट, वगैरे होता. त्यामुळं आमचं गोत्र जमलं.
एके दिवशी त्याला म्हणालो,
" आम्हाला पेरियार बघायचं आहे. तुमच्या ओळखीनं चांगली गाडी आणि चांगला ड्रायव्हर बघून द्याल, तर बरं होईल. "
यावर तो म्हणाला,
" नो प्रॉब्लेम ! उद्या निघता का ? मी उत्तम गाडी, उत्तम ड्रायव्हर देतो. "
" मग पेरियार काय, आम्ही कोचीनला वगैरे जाऊन, सगळं पाहून येऊ. "
" नो प्रॉब्लेम. केव्हाही निघा. "
गाडी, खरच चांगली नवी कोरी ॲम्बॅसिडर होती. पणिक्कर नावाचे ड्रायव्हर होते. स्वभावानं अतिशय चांगले आणि हिंदी भाषा समजणारे. हा अगदी मणिकाञ्चन योग होता. आपल्याकडे हल्ली लक्झरी टॅक्सीज् मिळतात; पण गाडी बरी असली, की ड्रायव्हर बिथरलेला, आणि ड्रायव्हर सज्जन निघाला, की गाडी बिथरणारी, असा अनुभव येतो. इथं गाडी आणि ड्रायव्हरही बऱ्या चालीचा निघाला, त्यामुळं समस्त केरळविषयी आमचं मत फारच चांगलं झालं

सकाळी सात वाजता निघालो.
सप्टेंबर महिना संपत आला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंला हिरवीगार, लांबच लांब भातशेतं, माडांच्या बागा सतत दिसत होत्या. मोठं थोरलं भातशेत, कडेवर लहानसं कौलारू झोपडं, बांधावरची पायवाट, आभाळाचं प्रतिबिंब पडलेल्या डबक्यांत फिरणारी पाळलेली बदकं—असं छान दृश्य दिसे.
माणसाच्या जीवनात एक काळ असा येतो, की बघितलेल्या प्रत्येक सुंदर जागी त्याला, घर

घालवून पुढचं आयुष्य इथं निवान्त घालवावं, असं वाटतं.
त्रिवेंद्रमपासून पेरियार दोनशे छप्पन्न किलोमीटर्स आहे. आचा पोचू, असं वाटलं होत. पण अकरा वाजून गेले, तरी ते दृष्टीच्या टप्प्यात येईना. पणिकरही पहिल्यादाच येत होते, त्यामुळे तेही वाट विचारत विचारतच चालले होते. मग कटाळा जावा, म्हणून आम्ही रस्त्याकडेच्या एका हॉटेलात जाऊन, गरम गरम अशा लहान आकाराच्या आंबोळ्या, बदकाच्या अड्याच ऑम्लेट, तळलेल केळं असं काहीबाही खाऊन कंटाळा घालवला. दुभाष्याचं काम अर्थातच पणिक्करनी केल.

पेरियारबद्दल मी फार वर्षांपूर्वी अण्णाच्या तोंडून ऐकलं होत. दक्षिणेकडे ' कलावतांचे आनंदपर्यटन ' करून ते परत आले, तेव्हा म्हणाले,
" तात्या, अरे, एक पेरियार लेक म्हणून काय सुंदर सरोवर आहे केरळला ! सरोवराच्या आत लहानशा बेटावर हॉटेल आहे. तिथ राहायच. बोटीतून हिंडायला बाहेर पडल, की काठावर चरणारे हत्ती, गवे, साबरं दिसतात. तू जायला पाहिजेस तिथ. "
जाऊ, जाऊ अस करत बरीच वर्षं गेली आणि सत्याहत्तर सालच्या सप्टेंबरमधे मी गेलो.

पेरियार हे तयार केलेल सरोवर आहे. समुद्रसपाटीपासून तीन हजार फूट उंचीवर असलेलं. आकारान दहा चौरस मैल. एकोणीसशे सालात तयार झालेल, किंवा केलेल. मद्रासच्या शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी.
हळूहळू सपाट रस्ता सुटला आणि सहा हजार फूट उंचीवर असलेला डोंगरमाथा गाठण्यासाठी अरुद अशा चढाच्या घाटातून गाडी जाऊ लागली.
दोन्ही बाजूंना कधी लवंगाच्या, कधी मिरीच्या बागा लागत.
हवा हळू हळू थंड होऊ लागली.
अगदी वर तर उतारावर सुरेख दिसणारे चहाचे मळे लागले.
हवा आणखी थंड झाली. थोडी पावसाळी अशी, पण फार सुखद. रस्त्यावर रहदारी फार कमी होती. वळणावर केरळच्या ट्रक्स आगाऊ हॉर्न मुळीच देत नाहीत. समोर आल्यावर मग देतात, असा एक मजेशीर अनुभव वारवार आला.

सात वाजता निघालो होतो, तो दीड वाजता पेरियार लेकवर जाऊन पोचलो.
आभाळ चांगलच भरून आल होत.
हॉटेलच नाव होतं ' अरण्यनिवास. ' आम्ही आधी काही कळवलं नव्हत. त्यामुळं राहायला जागा मिळाली, पण जेवायला मिळाल नाही. लवकरात लवकर टोस्ट आणि ऑम्लेट मिळेल, म्हणाले. पन्नास साली, प्रसिद्ध प्राणिशास्त्रज्ञ ए. पी. गी इथं आले होते, तेव्हा काही सोय नव्हती. फॉरेस्ट बंगल्यातल्या चौकीदाराला फक्त मल्याळी आणि तामिळी

भाषा कळत होती. कोंबडीसारखे आवाज आणि अंडं घातल्याचे हावभाव केले, तेव्हा कुठं त्यांना अंडी मिळाली होती. आम्ही म्हणालो,

" चालेल. "

खाऊन गुडुप झोपलो.

चार वाजताहेत, तोवर जोरदार पाऊस आला.

मी मनाशी म्हणालो,

' आता कशाची मोटारलँच आणि कशाचे प्राणी ! आज तरी काही बघायला मिळणार नाही. '

पण चौकशीअंती कळलं, की इथं पाऊस रोजच पडतो. काही वेळात उघडेल. साडेपाच वाजता मोटर लँच सुटेल. एकूण बारा प्रवासी मिळाले, म्हणजे लँच सुटते.

इतके प्रवासी इथं असण्याची शक्यताच नव्हती. थोडे हिरमुसले होऊन आम्ही पावसाळी हवेत बाहेर पडलो आणि पाण्याच्या काठावर येऊन उभे राहिलो. मी, आमचा मोहन आणि विजया. पण, ' पण कोठुनि आले येथे, काल संध्याकाळी नव्हते ' असा चमत्कार झाला आणि देशी–परदेशी पर्यटकांचा मेळा बघता बघता गोळा झाला. तीस शिग्र भरल्य आणि ती एवढीशी लँच निघाली.

इतरत्र कुठही बघायला मिळणार नाही, असं दृश्य पेरियारच्या ह्या सरोवरात आहे. सरोवर भरण्याआधी आजूबाजूचे वृक्ष तोडले गेले नाहीत. ते पाण्यात आजमितीला तसेच उभे आहेत. आणि वठून, वाळून काळे झालेले हे वृक्ष पाण्यामुळ आता दगडासारखे कठीण



झाले आहेत. जणू काही जागोजाग शिल्पच उभी केली आहेत. ह्या काळ्या शिल्पाची मनोहारी प्रतिबिंब निळ्या पाण्यावर पडलेली असतात आणि आपण एका अद्‌भुत वातावरणात हिंडतो आहोत, असं वाटत.

पाऊस उघडला होता, तरी आभाळ भरलेलंच होत. अशा हवेत रानची जनावरं सहसा बाहेर पडत नाहीत. त्यामुळं काठावर फार काही दिसणार नाही, असं समजून मी लॉंचमधल्या बाकावर बसून होतो.

दोन्ही काठावर गर्द झाडी होती. मधूनच नुसती हिरवळ पांघरलेल्या लहान, गोल टेकड्या दिसत. इतक्या सुंदर, की कविवर्य श्रीकृष्ण पोवळ्यांच्या ओळी आठवल्या :

—आणि टेकड्या दिसता मजला हिरवळ पांघरली
स्तनयुगलांची तुझ्या आठवण हो मजला नामी,
हे तर तुझेच रूप विशाल,
वसुंधरा नच केवल दिसले, तुझेच रूप विशाल

एवढ्यात लॉंचचा वेग कमी झाला. कोणीतरी म्हणालं,
“ बायसन, बायसन. ”
दूर टेकडीच्या उतारावर गव्याचा कळप चरत होता.
सहा काळे ठिपके. मी बाकड्यावरून उठून लॉंचच्या टोकाशी आलो. छपरावर डोकं काढून उभा राहिलो आणि दुर्बीण डोळ्यांना लावली. कळपच होता. एक काळा, दोन तांबडे, बाकीच्या गाई.



सतत हलणाऱ्या लॉंचवर पाय रोवून जड दुर्बिणीनं पाहणं सोपं नव्हत.मोहनला, विजयाला प्रयत्न करूनही नीट दिसलं नाही.

हिरव्या उतारावर काळे ठिपके तेवढे दिसले !

तेवढ्यात पावसाची सर आली. पाण्यावर लाह्या उडू लागल्या. लॉंचच्या खिडक्यांना असणाऱ्या काचा सरकावून सगळे आत बसले.

मोहन काचेला नाक लावून बाहेर बघत होता. काही वेळ गेला, आणि मोहनच म्हणाला,

" बाबा, हरिण, हरिण !...."

अगदी जवळ, म्हणजे पंचवीस यार्डांवर मोठा सांबर शिंगं सावरत, वळून लॉंचकडे बघत होता, तो शेपूट उडवून पळाला.

हा कळपच होता. कारण लगेच बाजूला आणखी चार सांबर दिसली.

बारीक पाऊस येतच होता.

पाण्यावरच्या हिरवळींवर एक भला मोठा डुक्कर दिसला. मग, सहा हत्ती आणि एक मोर असा कळप चरताना दिसला.

सहा वर्षांचा मोहन पहिल्यांदाच जंगलातली ही जनावर बघत होता आणि चेकाळून ओरडत होता,

" हत्ती, हत्ती !"

" हरिण, हरिण !"

डुक्कर हा प्राणी त्यानं ह्याआधी पाहिलेलाच नव्हता. तेव्हा ते दिसताच तो ओरडला,

" हत्तीच पिल्लू ! हत्तीचं पिल्लू !"

मराठी समजणारे कोणी पर्यटक नव्हते. आमचे आम्हीच हसलो.



एकूण दोन तास आम्ही लॉंचमधे होतो. काळ्या शिल्पातून वाट काढत काढत लॉंच जात होती. शिल्पं सावकाश फिरत होती. हिरव्या टेकड्या, पाण्यात पडलेली झाडींची प्रतिबिंबं फिरत होती. निळं पाणी फिरत होतं. काही दिसलं की, लॉंचचं इंजिन बंद होई. आवाज थांबे. काठावरच्या झाडीत बोलणाऱ्या पक्ष्यांचे मंजुळ आवाज तेवढे कानावर येत.

एकदा एकटाच काळा गवा दिसला.

एकटा हत्ती जसा भडक माथ्याचा असतो, अंगावर चालून येतो, तसा असला एकटा गवाही येतो, असा समज आहे. कळपातल्या बैलाशी झुंज होऊन, हाकलला गेलेला, एकटेपण वाट्याला आलेला असा हा पुष्ट बैल असतो, अशी आपली समजूत आहे. पण तसं नाही. समुदायात राहणं सोडून असले गवे आपण होऊन बाजूला होतात, आणि शांततेच एकटं जिणं पत्करतात. जरूर त्यावेळी त्यांना कळपात जाता येतं.

गवत खाता खाता ह्या गव्यानं लॉंचकडे पाहिलं. माणसांची हालचाल दिसली, त्यासरशी तो झाडीत शिरला.

सुखाचा जलविहार आटपून दोन तासानी आम्ही परत ' अरण्यनिवास 'वर आलो.



सांबर, गवे, डुक्कर, हत्ती हे प्राणी दिसले होते. सकाळच्या वेळी आणखी काही दिसतं का, याची उत्सुकता होती. जंगलात नाट्य सततच घडत असत. फक्त प्रेक्षक म्हणून आपण नेमके गैरहजर असतो. सकाळी पुन्हा एकवार लॉंचमधून जायचं ठरवलं. प्रयोगाची आगाऊ जाहिरात नसलेल्या ह्या थिएटरात वेळोवेळी जाणं हा एकमेव मार्ग प्रेक्षकापुढं असतो.

कालची मंडळी निघून गेली होती. एक शीख जोडपं आणि आम्ही तिघे याखेरीज कोणीही गिऱ्हाईक लॉंचला नव्हतं. एकूण बाराजण असल्याशिवाय लॉंच सोडणं त्याला परवडण्यासारखं नव्हत.

मग आम्ही म्हणालो,

" एकूण भाडं किती मिळाल पाहिजे ? "

लॉंचवाला म्हणाला,

" साठ रुपये, साहेब ! "

" आम्ही साठ रुपये देऊ. "

तो म्हणाला,

" आम्ही लॉंच सोडू. "

शीख जोडपं आनंदाने तयार झालं.

आज सुरेख सूर्यप्रकाश होता. आभाळ स्वच्छ होत. हिरवळ लखलखीत होती, आणि सगळ्या लॉंचमधे आम्ही पाचजण होतो.

ह्या फेरीत एकूण तीन वेळा हत्तीचे कळप दिसले. पेरियारचे हत्ती, पावसाळी ढगासारखे काळे दिसत नाहीत, तांबडे दिसतात. कदाचित, तांबडमातीच्या राडीत लोळल्यामुळं असं असेल. इथं माती तांबडी आहे.

एक गोजिरवाणं पोर होत. ते सतत दोन हत्तींच्या मधे चरत होत. हे दोन हत्ती म्हणजे



त्याची आई, मावशी, आक्का, ताई—असं कोणीही असेल. पोर सुरक्षित राहावं, हिंस्र जनावराकडून मारलं जाऊ नये, म्हणून त्या हत्तिणी दोन्ही बाजूंना आपल्या अंगाचे तट उभे ठेवीत असाव्यात.
लाँचचं एंजिन बंद केलं होतं पाण्याच्या प्रवाहाबरोबर लाँच डोलत होती. आणि बराच वेळ आम्ही हा कळप पाहत होतो.

पुढं एक गंमत पाहायला मिळाली—
मोठा, सुळेवाला डुक्कर पाण्याच्या काठी असलेल्या उंच गवतात काही उकरण्याच्या नादात दंग होता. टेकडीच्या उतारावरून एक मध्यम आकाराचा हत्ती आला. तोही डाव्या-उजव्या बाजूचं गवत सोंडेनं उपटत होता आणि तोंडात घालत होता. त्याला डुक्कर दिसला नाही. डुकराचंही हत्तीकडे लक्ष नसावं.
एकदम हत्ती डुकराच्या पुढ्यातच आला. त्यासरशी हा डुर्रहुर्र करून त्याच्यावर धावून गेला. आणि काय आश्चर्य, एवढा प्रचंड गजराज, पण शेपूट वर करून धुम् पळाला. त्यानं मागं वळूनही पाहिलं नाही!
माझ्या ऐवजी सतराव्या शतकातल्या एखाद्या राजानं हे दृश्य पाहिलं असतं, तर विशेष जागा म्हणून ह्या ठिकाणी, राजवाडासुद्धा बांधला असता!

थोडं पुढं आलो आणि शिट्या ऐकू आल्या. पाहतो, तर पलीकडे, पाण्यातून डोकं आणि पुढचे दोन पाय वर काढून पाणकुत्री आमच्या लाँचकडे बघत होती!
एक, दोन, तीन एकूण सात दिसली!
भंडाऱ्याला, इटियाडोहाच्या काठानं रात्री दीड वाजेपर्यंत मी आणि मारोतराव चितमपल्ली ह्या प्राण्याचं केवळ ओझरतं दर्शन व्हावं, म्हणून हिंडलो होतो. आज बारा यार्डांवरून दिवसाढवळ्या हा कळपच्या कळप मला बघण्यासाठी उड्या हाणत होता.

मला ‘ Ring of Bright Water ’ ह्या पुस्तकाची आठवण आली. हे एक अतिशय चांगलं असं पुस्तक वाचण्यात, आयुष्यातले काही तास आपण सार्थकी लावले, ह्याचा मला फार आनंद वाटतो.
उत्तम पुस्तकाची ओळख करून देणं हे उत्तम माणसाची ओळख करून देण्याइतकंच अवघड असतं. मॅक्सवेल नावाचा एक माणूस. लेखक, पोर्ट्रेट-पेन्टर वगैरे असलेला. त्याला त्याच्या कोणा मित्राकडून कळतं, की वेस्ट हायलॅण्ड्समधे फलाण्या फलाण्या ठिकाणी, समुद्रकिनाऱ्याला आपण एक इस्टेट घेतलीय्. तिथं रिकामी झोपडी आहे. जवळ समुद्र आहे. जायला रस्ता नाही. जवळ कुठतरी एक बेट आहे. त्यावर ऑटोमॅटिक लाइट-हाउस आहे. बरीच वर्षं झाली, तिकडे कुणी फिरकलेलं नाही. तुला जाऊन राहायचं असेल,

तर राहा.

ह्या वेडा तिथं गेला आणि आठ वर्षं राहिला. सोबत म्हणून त्यानं एकापाठोपाठ एक अशी दोन ओटर्स म्हणजे पाणकुत्री नेली. एकाच नाव मिजबील, दुसऱ्याच इडल. ह्या निसर्गरम्य, शांत अशा जागी राहून ह्या दोन पाणकुत्र्यांवर आणि एकूणच त्या जागेबद्दल तिथल्या पशुपक्ष्यांबद्दल, चार मैलांवर राहणाऱ्या शेजाऱ्यांबद्दल मॅक्सवेलन ह्या पुस्तकात लिहिलं आहे. ओटर त्यानं अरबस्तानातून नेल होत. दहा दिवसाच पिलू होत, ते मोठं झालं हळूहळू बाहेर एकटं हिंडू लागल, आणि एके दिवशी परतच आल नाही. मॅक्सवेलनं खूप तपास केला आणि शेवटी, रानटी समजून कुणी शिकाऱ्यान त्याला ठार मारल्याच आढळल. अर्थात, हेसुद्धा लवकर समजल नाही. अनेक दिवस मॅक्सवेल आपल्या मित्राच्या नावान रात्री अपरात्री हाका मारत राहिला,

" मिजी—! "

" मिजी—! "

त्यानं शिकाऱ्याचा पत्ता लावला. त्याला नाना परींनी विनवलं. पण त्याच म्हणण,

" मी ओटर मारलं नाही. माझ्या ट्रकखाली येऊन ते मेल. "

" त्याच कातडं तरी मला द्या—"

" ते मी फेकून दिल. म्हाताऱ्या ओटरच केस झडलेल कातड घरी कशाला आणू ? "

मी सगळ सागत बसत नाही. पण, मॅक्सवेलन ह्या ओटरच जे निरीक्षण केल, ते एवढं अपूर्व होत, की ओटरच्या ह्या विशिष्ट जातीला प्राणिशास्त्रज्ञांनी मॅक्सवेलच नाव दिल. Lutrogable Perpicillata Maxwelli ह्या नावानं ही जात आता ओळखली जाते. पुस्तकाच्या प्रस्तावनेत, आपण कुठं राहिलो, त्या जागेच खर नाव मॅक्सवेलनं सांगितलेल नाही. ते सांगून ह्या ठिकाणाचा विश्वासघात केल्यासारखं होईल, असं त्याच म्हणणं आहे. कारण नाव उघड केल्यान, उद्योगधंदे आणि शहरी जीवन इथं येईल.

माती आणि इतर प्राणिजीवन ह्यापासून स्वतःला वेगळं काढून माणसान स्वतःच अतोनात नुकसान केलं आहे, याबद्दल मला आता काही एक संदेह उरलेला नाही, असं मॅक्सवेल सांगतो.

सकाळच्या फेरीत आम्हाला पुन्हा हत्ती दिसले. ओटर्स दिसली, डुकरं दिसली. साबरं आणि गवे दिसले.

माझी इच्छा होती, की एकवार पेरियारच्या जंगलातून पायी भटकावं. त्यासाठी इथल्या हॉटेल अधिकाऱ्याची मदत हवी होती. परत हॉटेलवर येताना मी पणिकरना घेऊन साहेब मजकुराच्या भेटीला त्याच्या बंगल्यावर गेलो.

घर, ऑफिस एकच होतं.

साहेब नव्हते. बाईसाहेबांकडून कळलं, की ते फिरतीवर गेले आहेत, आणि चार

दिवसांनी परत येतील.

घोर निराशा झाली.

निदान, पर्यटकांसाठी ठेवलेल्या हत्तीवरून जंगलात एक फेरी मारावी, म्हणून हत्तीचा तपास करत हिंडलो. हत्ती दिसला नाही. माहूत भेटला आणि त्यानं माहिती दिली, की हत्ती आजारी आहे. पायाला दुखापत झाल्यामुळं तो चालू शकत नाही. तूर्त फेरी बंद आहे.

जे बघायला मिळाल, तेही थोडं नव्हतं. अशी मनाची समजूत घालून आम्ही गबाळं आवरलं, मोटारीत टाकलं आणि पुढच्या प्रवासासाठी ' अरण्यनिवास ' सोडलं !

[ ' दीपावली ' : दिवाळी वार्षिक, १९७९ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 25220
अ.प्र. 25106
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024220